# अल्बेरुनीचा भारत

खंड पहिला

साहित्य अकादेमी

MR
954. 022
B 539 P

MR
954.022
B 539 P

अलबेरुनीचा भारत

अस्तरावरील छायाचित्र–महाराणी माया श्री भगवान बुद्धाची माता होती. तिला बुद्ध जन्मापूर्वी एक स्वप्न पडले. बुद्धाचा पिता राजा शुद्धोदन याला त्या स्वप्नाचा अर्थ तीन भविष्यवाद्यांनी समजावून दिला. हा प्रसंग ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकातील नागार्जुनकोंडा येथील एका शिल्पात कोरलेला आहे. त्याची छायाकृती इथे पुनर्मुद्रित आहे.

शिल्पाच्या खालील बाजूला राजचिटणवीस बसलेला आहे. ज्योतिषी सांगत असलेल्या स्वप्नाचा अर्थ तो लिहून घेत आहे. भारतात लेखनकला अवगत होती, याचा जास्तीत जास्त पुरातन असा शिल्पबद्ध पुरावा देणारे हे शिल्प आहे असा संभव आहे.

नॅशनल म्यूझियम, नवी दिल्ली यांच्या सौजन्याने पुनर्मुद्रित

# अल्बेरूनीचा भारत

## खंड पहिला

लेखक
अल्बेरूनी

अनुवादक
यू. म. पठाण

साहित्य अकादेमी

*Al-Berunicha Bharat*, Volume I ( अल्बेरुनीचा भारत– खंड पहिला ) :
Marathi translation by Y. M. Pathan of Al Beruni's
*Kitab-ul-Hind* ( Arabic classic ).
Sahitya Akademi, New Delhi ( 1986 ).

SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs. 30-00

© Sahitya Akademi, New Delhi
First edition 1986

MR
954.022
B 539 P

Publisher
Sahitya Akademi,
Rabindra Bhavan,
35, Ferozeshah Road,
New Delhi 110 001

Library IIAS, Shimla
MR 954.022 B 539 P
00116992

Regional Offices :
172, M. M. G. S. Marg, Bombay 400 014
29, Eldams Road, Teynampet, Madras 600 018
Block V-B, Rabindra Sarovar Stadium, Calcutta 700 029

Printer
Ashok K. Kothavale,
Om Mudranalaya,
250 / A, Shaniwar Peth,
Pune 411 030

116992
8/12/04

SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs. 30-00

# अनुक्रमणिका


प्रस्तावना (७)
१. विषय प्रवेश (१)
२. हिंदूंचे ईश्वरविषयक विचार (९)
३. उत्पत्तीविषयीच्या हिंदूंच्या समजुती (१४)
४. कर्मकारण आणि आत्मा–प्रकृति–संबंध (२५)
५. आत्म्याचे भ्रमण आणि पुनर्जन्म (२९)
६. विविध प्रकारचे 'लोक' : स्वर्ग आणि नरक (३६)
७. मुक्तीचे स्वरूप आणि मोक्षप्राप्तीचे विविध मार्ग (४२)
८. जीवांचे विविध वर्ग (६०)
९. वर्णव्यवस्था (६७)
१०. धार्मिक व नागरी कायदे (७२)
११. मूर्तिपूजा ७७
१२. वेद, पुराणे इ. राष्ट्रीय साहित्य (८९)
१३. व्याकरण व छंद : शास्त्र (९६)
१४. ज्योतिष–खगोलादि अन्य विज्ञानविषयक साहित्य (११२)
१५. मापन–पद्धती (११८)
१६. लेखन पद्धती, अंकगणित व तत्सम शास्त्रे, हिंदूंच्या काही चमत्कारिक रुढी (१२५)
१७. लोकांच्या अज्ञानाच्या आधारे जगणारी हिंदूंची काही शास्त्रे (१४१)
१८. भारताचे स्वाभाविक प्रदेश, भारतातील नद्या, भारताच्या सीमा (१५१)
१९. ग्रह, राशिचक्र, नक्षत्र आणि तत्सम अन्य विषय (१६५)
२०. ब्रह्मांड (१७३)

प्रस्तावना

# मायाळू, दयाळू परमेश्वराचे स्मरण करून

ऐतिहासिक अधिकृततेच्या [ प्रश्नांच्या ] संदर्भात, आपण जे ऐकले
१ परंपरे- ते, आपण जे डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिले त्याची बरोबरी करू शकत नाही
संबंधी हे कोणीही अमान्य करू शकत नाही. कारण पाहणाऱ्यांनी ज्या काळी
ऐकीव पाहिले त्या काळाचे आणि ज्या स्थळी पाहिले त्या स्थळाचे संबंधित
आणि सार त्याची दृष्टी ग्रहण करीत असते. ऐकिवात त्या मानाने बऱ्याच
प्रत्यक्ष उणीवा असतात. परंतु हा जर दोष नसता तर ऐकिवालाच प्रत्यक्ष
निरीक्षण. दर्शनापेक्षा जास्त मान्यता मिळाली असती, कारण दृष्टीचा विषय
२ वृत्तदात्यांचे म्हणजे केवळ क्षणकालीक वास्तव्य. परंतु श्रुतीचे विषय मात्र एका
विविध अर्थाने भूत, वर्तमान आणि भविष्य हे तीनही होऊ शकतात. त्यामुळे
प्रकार. ऐकिवाचा संबंध जे आहे आणि जे नाही त्या दोघांशीही [ म्हणजे
३ सत्यवादी- ज्याचे अस्तित्व संपलेले आहे त्याच्याशी किंवा जे अस्तित्वात अजून
पणाची यावयाचे आहे त्याच्याशी ] असतो. लिखित परंपरा म्हणजे ऐकिवाचाच
प्रशंसा. एक प्रकार होय. सर्वांत अधिक मान्यता पावलेला प्रकार म्हणाना,
नाहीतर लेखणीने साकार केलेल्या अमर स्मारकांशिवाय आपल्याला
राष्ट्रा राष्ट्रांचा इतिहास कसा ज्ञात झाला असता !

तार्किक वा भौतिक नियमांचे ही परंपरा भंग करत नसेल तर एकाद्या घटनेच्या वृत्ताची विश्वासार्हता, तिचा खरेखोटेपणा वृत्तदात्याच्या चारित्र्यावर अवलंबून राहील. वृत्तदात्यांच्या चारित्र्यावर अनेकविध हितसंबंध, लोभालोभ, राष्ट्रा राष्ट्रांतील सर्व प्रकारचे वैमनस्य आणि असहिष्णूता यांचा प्रभाव पडत असतोच. म्हणून वृत्तदात्यांचे आपण निरनिराळे प्रकार मानले पाहिजेत.

पहिल्या प्रकारचा वृत्तदाता खोटा इतिहास सांगतो, ते स्वतःचा स्वार्थ साधावा या हेतूने. त्यासाठी तो ज्या कुटुंबाचा वा राष्ट्राचा घटक असेल त्याची स्तुती करतो किंवा परक्या कुटुंबांवर वा राष्ट्रावर टीका करतो. असे केल्याने आपले ईप्सित साध्य होईल असे त्याला वाटते. अशा तऱ्हेने आक्षेपार्ह अशी लोभी वृत्ती आणि वैरभाव यातून त्याच्या दोन्ही तऱ्हेच्या वृत्ती निर्माण होतात.

दुसऱ्या प्रकारचा वृत्तदाता लोकसमूहाबद्दल खोटे बोलतो. त्याचे कारण एक तर त्या लोकसमूहाचे त्याच्यावर ऋण असते नाही तर त्या लोकसमूहाशी काहीतरी बिनसल्यामुळे तो त्यांचा द्वेष करीत असतो. हा दुसराही पहिल्यासारखाच, कारण दोघांच्याही वृत्तांवर वैयक्तिक आवडी निवडी, रागलोभ यांचा प्रभाव पडलेला असतो.

तिसऱ्या प्रकारचा वृत्तदाता खोटे बोलतो कारण त्याच्या हीन स्वभावामुळे एक तर वृत्तांत देताना तो फायद्याचा विचार करत असतो किंवा भ्याडपणामुळे सत्य सांगायची त्याला भीती वाटत असते.

खोटे सांगणाऱ्यांचा आणखी एक प्रकार असतो. असत्य हा त्यांचा स्वभावधर्मच असतो. खोट्याशिवाय ते दुसरे काही करूच शकत नाहीत. नीच प्रवृत्ती आणि अधःपतित अंतकरण हे त्यांच्या असत्याच्या मुळाशी असतात.

शेवटचा प्रकार म्हणजे अज्ञानामुळे खोटे सांगणाऱ्याचा दुसऱ्याने जे काही सांगितले त्याच्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवायचा. अशा प्रकारच्या वृत्तदात्यांची संख्या वाढून त्यांची एक परंपरा झाली किंवा काळाच्या ओघात साखळीच्या दुव्याप्रमाणे त्यांचे समूह झाले किंवा त्यांची राष्ट्रे बनत गेली की, एकीकडे पहिला वृत्तदाता आणि त्याचे अनुयायी आणि दुसरीकडे असत्य निर्माण करणारा व त्याचे ऐकणारे अशी शृंखला निर्माण होते. आणि हे जर दुवे नष्ट केले तर मग उरतो तो पहिली खोटी कथा निर्माण करणारा ज्या खोटारड्यांची आपण गणती केली त्यातला एक. त्या एकाशीच आपल्याला मुकाबला करावयाचा असतो.

जो असत्याला टाळतो, सत्याला नेहमी चिकटून रहातो तोच सर्वांच्या स्तुतीला पात्र होतो. अगदी खोटारड्या लोकांच्या स्तुतीला देखील इतरत्र त्याच्या शब्दाला मान देतातच हे सांगणे नलगे.

कुराणात म्हटले आहे की, " सत्य बोला, सत्य अगदी तुमच्या विरुद्ध जात असेल तरीही " [ सुरा ४१३४ ], आणि प्रेषित आपल्या शुभ संदेशात आपले मनोगत याप्रमाणे व्यक्त करत. " राजांसमोर सत्य बोलताना त्यांच्या क्रोधाची पर्वा करू नका. ते फार तर तुमच्या शरीरावर हुकमत गाजवू शकतील. तुमच्या आत्म्यावर त्यांची सत्ता नाही " [ सेंट मॅथ्यू १८, १९, २८, सेंट लुक ४ ] या शब्दात प्रेषिताने आपल्याला नैतिक धैर्य दाखवण्याचा आदेश दिलेला आहे. लढाईत बिनदिक्कत घुसतो किंवा विनाशाच्या गर्तेत उडी घेणे अशा गोष्टींना

**१ धर्म आणि तत्वज्ञान यांच्या प्रणाली विषयीच्या इस्लामी ग्रंथातील दोष.**

सामान्य माणसे साहस म्हणतात. पण तो साहसाचा एक उपप्रकार झाला. पण सर्व प्रकारच्या उपजातींना सामावून घेणारा साहसाचा श्रेष्ठ प्रकार म्हणजे कायावाचे, मृत्यूचा तुच्छ लेखणे.

न्याय [ म्हणजे न्यायी असणे ] हा गुण त्याच्या अंगभूत वैशिष्ट्यासाठी आणि अंतस्थ सौंदर्यासाठी प्रिय आणि हवा हवासा वाटतो. सत्यप्रियेतेलाही तेच लागू आहे. याला कदाचित अपवाद असलाच तर तो अशा लोकांचा की ज्यांनी त्या गुणांच्या माधुर्याचा आस्वाद घेतला नाही किंवा ज्यांना सत्य माहीत असूनही ते त्याचा तिरस्कार

**२ हिंदूंच्या विषयीचे उदाहरण एरहात-शरींच्या पुस्तकाची अलोचना.**

करीत असतात हे लोक एका कुप्रसिद्ध खोटारड्यासारखे आहेत. या खोटारड्याला एकदा विचारण्यात आले की तू कधी खरे बोलला आहेस का, त्यावर त्याने उत्तर दिले. "खरे बोलायची मला भीती वाटली नसली तर या प्रश्नाला मी "नाही" असे उत्तर दिले असते." असत्य भावी न्यायाचा मार्ग टाळीत असतो. अत्याचार, खोटी साक्ष, लोकांच्या मालमत्तेचा कपटाने केलेला अपहार, चोरी आणि जगाचा आणि मानवजातीचा नाश करणारा इतर सर्व दुर्गुणांचा तो स्वखुशीने साक्षीदार बनतो.

**३ या विषयावर पुस्तक लिहिण्याची बेरूनीला आज्ञा.**

एकदा मी गुरुवर्य 'अबू साहल' अब्द अल्मुनिम इब्न अली नुह अन् तिफिल्सी [परमेश्वर त्यांना सामर्थ्य देवो.] याची भेट घेतली. त्यावेळी मला आढळले की मुताजीन पंथावर पुस्तक लिहिणाऱ्या एकाला त्या पंथाचे तत्त्वज्ञान विकृत रूपात मांडल्याबरोबर ते दोष देत होते. कारण त्यांच्या मतानुसार परमेश्वर स्वतःविषयी सर्वज्ञ आहेच. पण त्या

**४ तो आपली पद्धत मांडतो.**

लेखकाने असे दाखविले होते की [तोकडे ज्ञान असणाऱ्या माणसाप्रमाणे] जणू काही परमेश्वराला ज्ञान नसते अशा विधानामुळे अडाणी लोकांची दिशाभूल होऊन त्यांना वाटते की मुताजीन पंथाप्रमाणे परमेश्वर अज्ञानी आहे. परमेश्वराची प्रशंसा असो, तो या सर्व अयोग्य वर्णनांच्या पलीकडे आहे. त्यावर मी गुरुवर्यांच्या निदर्शनास असे आणून दिले की ज्या धार्मिक आणि तात्त्विक प्रणालीशी आपला मतभेद वा विरोध आहे त्यांचे विवरण करताना नेमक्या याच पद्धतीचा अवलंब करण्याची आजकाल टूमच आहे. एकाच धर्माच्या चौकटी वापरून निरनिराळ्या पंथांच्या केलेल्या निवेदनाच्या विवरणात ही विकृती सहजच सापडते. कारण त्या प्रवृत्तींचा घनिष्ठ संबंध असून त्या एकमेकांशी एकजीव झालेल्या आहेत. याउलट तत्त्व आणि तपशील या दोन्ही बाबतीत सर्वस्वी भिन्न आणि परक्या असलेल्या धर्मपंथांच्या बाबतीत हा दोष सापडणे कठीण आहे. कारण असे संशोधन काहीसे आडवाटेचे असून ते पूर्णपणे आत्म-

ज्ञात करणे आवश्यक की साधने अपुरेच आहे. तत्त्वज्ञान आणि धर्मग्रंथ या संबंधीच्या सर्व साहित्यात हीच प्रवृत्ती दिसते. काटेकोर शास्त्रीय पद्धतीची जर लेखकाला जाण नसली तर तो केवळ वरवरची माहिती मिळवू शकेल पण त्यामुळे ना त्या पंथाच्या अनुयायाचे समाधान होईल ना जाणत्यांचे. अशा परिस्थितीत लेखक जर प्रामाणिक चारित्र्याचा असेल तर तो आपले म्हणणे मागे घेईल आणि ओशाळेल. पण सत्याचा योग्य मान न ठेवण्याइतका तो निकृष्ट असेल तर मात्र तो आपल्या मूळ दृष्टीकोनाविषयी वादावादी करत राहील. लेखकाची पद्धत जर योग्य असेल तर तो एखाद्या पंथाच्या तत्वज्ञानाविषयी निष्कर्ष काढण्यासाठी लोककथाद्वारे मिळणाऱ्या ज्ञानाचा उपयोग करण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न करील. अशा कथा लोक नेहमीच सांगत असतात. त्या ऐकताना आनंद होतो. सामान्यतः तो ज्या कथा स्वप्नातही खऱ्या मानणार नाही वा विश्वास ठेवणार नाही. अशा तऱ्हेच्या या कथा असतात.

आमच्या बोलण्यातला एक मुद्दा स्पष्ट करण्याच्या हेतूने उपस्थितांपैकी एकाने उदाहरणादाखल हिंदूंच्या धर्म आणि तत्वज्ञानाचा उल्लेख केला. यावर मी त्याच्या असे लक्षात आणून दिले की आपल्या वाङ्मयात या विषयासंबंधी जे जे आहे ते ते माहितीची केवळ नक्कल असून तिची विश्वासार्हता दुय्यम अर्थाची आहे. खिचडीसारख्या असणाऱ्या या माहितीला चिकित्सकेची चाळणी लावून तिची निवड केलेली नसते. माझ्या माहितीतला अशा प्रकारचा एकच लेखक असा आहे की ज्याने साधी आणि अचूक माहिती—अभ्यासपूर्ण अधिकृत संदर्भ—द्यायचे ठरवले होते, म्हणजे 'अब्रू अल अल्फाम अलेराशहारी' त्याचा स्वतःचा त्यावेळचा रूढ अशा कोणत्याही धर्मावर विश्वास नव्हता. फक्त स्वतः निर्माण केलेला धर्म तो मानत होता. त्याचाच प्रचार करायचा त्याने प्रयत्नही केला. तथापि ज्यू आणि ख्रिस्ती या दोघांच्याही मतांची त्यांनी चांगली माहिती दिली असून थोरा आणि शुभसंदेश यांचा आशयही त्याने नीट मांडलेला आहे. शिवाय मॅनिकियेन्स लोकांची पण त्याने उत्तम माहिती दिलेली असून त्यांच्या ग्रंथात ज्यांचा उल्लेख आहे अशा नामशेष झालेल्या धर्मांची माहिती त्यांनी सांगितली आहे. परंतु तो जेव्हा आपल्या पुस्तकात हिंदू आणि बौद्ध धर्मात आला तेव्हा जणू त्याचा नेम चुकला. पुस्तकाच्या शेवटच्या भागात तो भरकटत गेला कारण त्याने 'झरकान' या पुस्तकाला आधार बनवून त्या पुस्तकातला तपशील स्वतःच्या पुस्तकात घातला. 'झरकान' या पुस्तकातून त्याने जे घेतले नव्हते ते मात्र

त्याने सर्वसामान्य हिंदू आणि बौद्ध जनांकडून ऐकलेले होते.

नंतरच्या काळात गुरुवर्य अबू सहल यांनी संबंधित पुस्तकांचा पुन्हा एकदा अभ्यास केला आणि त्यांना आढळले की मी कथन केली तशीच वस्तुस्थिती होती. त्यावर त्यांनी मला हिंदूंच्या विषयी जी माहिती असेल ती लिहून काढण्यास प्रवृत्त केले. ज्यांना त्यांच्याशी धार्मिक कार्याविषयी चर्चा करायची असेल त्यांना हे लेखन उपयोगी पडेल. ज्यांना त्यांच्याशी सहकार्य करायचे असेल त्यांच्याकरता हे लिखाण संग्रहित माहिती म्हणून सिद्ध होईल हा या मागे उद्देश होता. गुरुवर्यांना प्रसन्न करण्यासाठी हिंदूंच्या धार्मिक तत्त्वाविषयी मी हे पुस्तक लिहिले आहे. धार्मिक दृष्ट्या आमचे विरोधी असणाऱ्यांवर मी विनबुडाचे आरोप केलेले नाहीत. एखादा विषय स्पष्ट करण्यासाठी मुळातला मजकूर उद्धृत करण्यात, मुसलमान म्हणून माझी जी कर्तव्ये आहेत त्याच्याशी काही विसंगती आहे असे मी मानलेले नाही. या अवतरणांचा आशय सर्वस्वी विधर्मी [हिदन] असेल आणि सत्याच्या अनुयायांना म्हणजे मुसलमानांना तो आक्षेपार्ह वाटत असेल तर आम्ही असे म्हणू की तो हिंदूंच्या श्रद्धेचा विषय आहे आणि स्वतःच्या श्रद्धेचे समर्थन करण्यास ते स्वतः लायक आहेत.

हे पुस्तक वादविवादात्मक नाही. आमच्या विरोधकांची जी मते माझ्या दृष्टीने चूक आहेत त्यांचा प्रतिवाद करण्यासाठी मी मुद्दे मांडणार नाही. माझे पुस्तक म्हणजे घटनांचा एक साधा ऐतिहासिक वृत्तांत. वाचकासमोर मी हिंदूंची मते जशी आहेत तशी ठेवीन आणि ग्रीकांची तशाच प्रकारची जी तत्वे आहेत त्यांचाही उल्लेख परस्पर संबंध दाखवण्यासाठी करीन. कारण अमूर्त सत्य हेच ग्रीक तत्त्ववेत्याचे उद्दिष्ट असले तरी सामाजिक स्वरूपाच्या प्रश्नावर ते परंपरागत अभिव्यक्ती आणि धर्म व कायदा या बाबतीत सर्वसामान्य सार्वजनिक विचार या पलिकडे जात नाहीत. ग्रीकांच्या विचारांबरोबरच क्वचित कुठे सुफींच्या मतांचा आणि काही ख्रिस्ती मतांचा उल्लेख आपण करू. कारण [माणसाच्या मृत्यूनंतर होणारा] आत्म्याचा प्रवास सर्वसृष्टीजात आणि परमेश्वर एकात्म आहेत ही अनेक ईश्वर वाद मानणाऱ्यांची भूमिका इ. बाबतीत या प्रणालींमध्ये सारखेपणा आहे. अरबी भाषेमध्ये मी दोन पुस्तकांची भाषांतरे आधीच केलेली आहेत. त्यापैकी एक आहे विश्वाच्या उत्पत्तीसंबंधीचे. सर्वसृष्ट जगताचे वर्णन करणारे 'सांख्य दर्शन' हे पुस्तक] आणि दुसरे आहे देहाच्या शृंखलेपासून आत्मा मुक्त कसा होऊ

शकतो, याचे वर्णन करणारे पातंजली ' पातंजल ' [ योगशास्त्र ]. या दोन ग्रंथात हिंदूंच्या धार्मिक श्रद्धेचे जवळजवळ सर्व घटक आलेले आहेत. अर्थात त्यातून निघणारा प्रत्येक नियम मात्र कदाचित त्यात नसेल. प्रस्तुत पुस्तक वाचकाच्या हाती पडल्यावर पूर्वीची माझी दोन पुस्तके आणि त्याच प्रकारची इतर पुस्तके ते बाजूला ठेवू शकतील अशी मी आशा बाळगतो. परमेश्वराची कृपा असेल तर विषयाचे पुरेसे दिग्दर्शन हे पुस्तक करीलच व त्याद्वारे वाचकांची या विषयांशी पूर्ण ओळख होईलच.

# १

# विषयप्रवेश

भारतासंबंधी विवेचन करताना बऱ्याच अडचणी उपस्थित होतात. या अडचणींची कल्पना आली की आपल्या ज्ञानाच्या मर्यादांची तीव्र जाणीव तरी आपणास होते किंवा या अध्ययनक्षेत्रातील प्रगतीच्या दिशा तरी उमजू लागतात. हिंदू लोकांची संस्कृती आपल्या संस्कृतीपेक्षा कितीतरी वेगळी आहे. आपला देश आणि भारतयांच्यामध्ये अधिक घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाले असते तर कदाचित या गोष्टी आपल्याला इतक्या गुंतागुंतीच्या वाटल्या नसत्या. दुर्दैवाने आजवर हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाले नाहीत. असे का घडले, याचा आपण विचार करू लागलो की त्या संदर्भात कितीतरी वेगवेगळी कारणे आपल्या लक्षात येतात.

आपल्या देशामध्ये व इतर कित्येक देशांमध्ये सांस्कृतिक दृष्ट्या बऱ्याच समान गोष्टी आढळतात तथापि भारत आणि आपला देश या दोहोंमध्ये तुलना केल्यास या दोन्ही देशांत कितीतरी बाबतीत वेगळेपण आढळते. या संदर्भात भाषेचा प्रश्न मुख्यत्वे-करून उपस्थित होतो. भारतीयांची संस्कृत भाषा शिकणे ही गोष्ट वरकरणी वाटते तितकी सोपी नाही. संस्कृत भाषेतही अरबी भाषेप्रमाणेच शब्दसंग्रहाचे आणि प्रत्ययांचे वैपुल्य आढळते. संस्कृत भाषेत एकाच वस्तूसाठी कितीतरी संज्ञावाचक शब्दांचा उपयोग केला जातो. तसेच कधी कधी तिच्यामध्ये वेगवेगळ्या विषयांकरिता एकाच व्यापक शब्दानेही काम भागविले जाते. अशा ठिकाणी त्या शब्दाचा संदर्भ लक्षात घेतल्याशिवाय त्याचा नेमका अर्थ कळत नाही. या अनेकसंदर्भसूचकत्वासारख्या आपल्या भाषेतील वैशिष्ट्यांचा हिंदुस्थानातील लोकांना मोठा अभिमान वाटतो. वस्तुतः हा त्यांच्या भाषेतील एक दोष आहे, असे मला वाटते.

या भाषेची दोन रूपे प्रचलित आहेतः समाजातील सर्वसाधारण लोक एका प्रकारची भाषा बोलतात तर समाजाच्या उच्च थरातील, सुशिक्षित, व्युत्पन्न व सुसंस्कृत लोक दुसऱ्या प्रकारची व्याकरणशुद्ध शिष्ट भाषा बोलतात. संस्कृत भाषेच्या अध्ययनात अरबी भाषिकांना जाणवणारी आणखी एक अडचण म्हणजे त्या भाषेतील वैशिष्ट्यपूर्ण उच्चार व त्यांच्यासाठी उपयोजिलेली लिपिचिन्हे. संस्कृत भाषेतील काही

ध्वनींचे–व्यंजनांचे– उच्चार व त्यांच्यासाठी वापरली जाणारी लिपिचिन्हे अरबी भाषेत नाहीत. त्यामुळे आपल्याला या संस्कृत वर्णांचे उच्चारण करता येत नाही. तसेच त्या विविध ध्वनींतील वेगळेपणही आपल्या लक्षात येत नाही. त्यामुळे अरबी– फार्सी– भाषिकांना भारतीय भाषेतील वर्ण, उच्चार वा शब्द यांचे लिप्यन्तर करण्याचे काम अत्यंत अवघड वाटते. भारतीय भाषेतील या उच्चारांचे आपल्या भाषेत लिप्यन्तर करावयाचे झाल्यास एक तर आपल्या ( अरबी ) वर्णमालेत आवश्यक ते परिवर्तन करावयास हवे किंवा ते शक्य नसल्यास अरबी वर्णमालेत उपलब्ध आहे तेवढ्याच लिपिचिन्हांवर काम भागवावयास हवे.

एवढे करूनही आणखी एक महत्त्वाची अडचण उद्‌भवतेच. भारतीय प्रतलेखक– नकलकार– अत्यंत निष्काळजीपणाने ग्रंथांच्या प्रती तयार करतात. ते मूळाबरहुकूम नक्कल करीत नाहीत. त्यामुळे मूळ ग्रंथाच्या शुद्ध, विश्वासार्ह व प्रमाणप्रती उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे मूळ लेखकाच्या विद्वत्तेचा व ज्ञानाचा जितका लाभ आपणास व्हावयास हवा तितका होत नाही. प्रतलेखनातील या निष्काळजीपणामुळे मूळ ग्रंथकारांच्या विचारांचे यथार्थ दर्शन आपणास घडत नाही. तसेच ग्रंथाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या प्रतीतच ( नकलीतच ) किती तरी दोष आढळतात. पुढे पुढे तर या नकललेल्या प्रतींमध्ये इतका फरक पडू लागतो की त्या ग्रंथाची शेवटची नक्कल हा एखादा स्वतंत्र, वेगळाच ग्रंथ, आहे की काय अशी साधार शंका येऊ लागते. आणि मग अशा प्रकारच्या अपभ्रष्ट प्रतीतील मजकुराचा बोध कुणालाच होत नाही.

प्रस्तुत विषयासंबंधीची माहिती मिळविताना मी जी सामग्री जुळविली, तिच्यातील भारतीय शब्दविशेषांच्या उच्चारांचे लिप्यन्तर मी अत्यंत परिश्रमपूर्वक व काळजीपूर्वक केले आहे. त्या शब्दांचे उच्चारण मी पुनःपुन्हा त्यांच्यासमोर केले तरीही त्यांतील वेगळेपण त्यांच्या लक्षात आले नाही. एवढ्या एकाच उदाहरणाने भारतीय भाषेतील ग्रंथाचे अरबीसारख्या परकीय भाषेत लिप्यन्तर व अनुवाद करण्याचे काम किती अवघड आहे, याची कल्पना येईल. संस्कृत भाषेतील काही शब्दांत तीन–चार व्यंजने सलग उच्चारली जातात, त्यांच्या उच्चारणात स्वर येत नाही. त्यामुळे कित्येक शब्दांचे उच्चारण अत्यंत कठीण व क्लिष्ट झाले आहे. अन्य भाषिकांना तरी ते तसे वाटणे अपरिहार्य आहे.

हिंदूंचे शास्त्रीय विषयांवरील ग्रंथही छन्दोबद्ध आहेत. मूळ ग्रंथातील मजकुरात कोणत्याही प्रकारचे परिवर्तन होऊ नये यासाठी यांनी ही दक्षता घेतली असावी, असे वाटते. कारण छन्दोबद्ध रचनेमुळे त्या ग्रंथाचे पाठांतर करणे अधिक सोयीचे होते. ग्रंथांच्या पारायणास किंवा पाठांतरास हिंदू लोक बरेच महत्त्व देतात. पाठ केलेली छन्दोबद्ध वचने उद्‌धृत करणे हे त्यांना लिखित स्वरूपातील ग्रंथापेक्षाही अधिक महत्त्वाचे वाटते. छन्दोबद्ध रचनेमध्ये कधी कधी केवळ छन्दाच्या पूर्तीसाठीही अनेक

शब्द येतात. हे सर्वश्रुतच आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या रचनेत काही अनावश्यक शब्दांचाही भरणा होऊ लागतो आणि त्यामुळे बऱ्याच वेळा त्या ठिकाणी ग्रंथकारास अभिप्रेत असलेल्या अर्थाऐवजी वेगळाच अर्थ व्यक्त होण्याचीही दाट शक्यता असते. अशा प्रकारच्या छन्दोबद्ध रचनेमुळे संस्कृत भाषेत लिहिलेल्या ग्रंथाचे अध्ययन करणे ही किती अवघड गोष्ट होऊन बसली आहे, हे सहज लक्षात येईल.

हिंदू आणि मुसलमान समाजातील हे अंतर वाढण्यास त्यांचे उभयतांचे धर्मही कारणीभूत ठरले आहेत. ज्या गोष्टींवर हिंदूंची आत्यंतिक श्रद्धा आहे, त्याच गोष्टींवर मुसलमानांचा मुळीच विश्वास नाही. मुसलमानांची धर्मविषयक मते हिंदूंना पटत नाहीत. हिंदू समाजामध्ये प्रमुख धार्मिक बाबींत फारसे मूलभूत व तीव्र स्वरूपाचे, तात्त्विक मतभेद आढळत नाहीत. धर्मचर्चा करताना ते शाब्दिक वाद व चर्चा करतात तथापि त्यासाठी ते आपली संपत्ती, शरीर व प्राण पणाला लावीत नाहीत. परधर्मीयांच्या मतास मात्र ते विरोध करतात. त्यांना ते ' म्लेंच्छ ' ( अपवित्र ) म्हणतात. ते म्लेंच्छांशी कोणत्याही प्रकारचे रोटीबेटीव्यवहारादी संबंध ठेवीत नाहीत. कारण असे केल्यास आपण धर्मभ्रष्ट होऊ असे त्यांना वाटते. परधर्मीयांच्या पाण्यास व अग्नीस ज्याचा स्पर्श झाला आहे ते सारे अपवित्र, असे त्यांना वाटते. सर्वसाधारणपणे, नेहमीच्या दैनंदिन व्यवहारात, एखादी वस्तू अपवित्र झाल्यास आपण ती शुद्ध करून घेतो. वरील प्रकारे, म्लेंच्छांच्या संसर्गाने अपवित्र झालेली वस्तू मात्र ते कधीच शुद्ध करून घेत नाहीत. या परकेपणाच्या भावनेमुळे त्यांना परधर्मीयांच्या गाठीभेटी घेता येत नाहीत. एवढेच नव्हे तर एखाद्या परधर्मीय गृहस्थाचा त्यांच्या धर्माकडे थोडाफार कल असला तरी त्याच्याशीही ते असेच परकेपणाने वागतात. त्यामुळे आजवर त्यांच्यामध्ये आणि अन्यधर्मीयांमध्ये फारसे निकटचे संबंध प्रस्थापित होऊ शकले नाहीत. धर्मभेदामुळे त्यांच्यामध्ये आणि आपल्यामध्ये तर फार मोठी दरीच निर्माण झाली आहे.

हिंदूंच्या व आपल्या दैनंदिन जीवन–व्यवहारात व चालीरीतींमध्येदेखील किती तरी अंतर आहे. त्यामुळे आपला वेश, आपले बोलणे– चालणे, आपल्या चालीरीती त्यांना आवडत नाहीत. त्या वाईट, चुकीच्या आहेत असे त्यांना वाटते. आपण ( परधर्मीय लोक ) ' बागुलबोवा ' आहोत, असे आपल्या मुलांना सांगून ते त्यांना भीती दाखवितात. इतर धर्माचे लोक सैतान असून आपण मात्र सत्पुरुष आहोत असे ते समजतात. तथापि अन्यधर्मीयांविषयींचा अशा प्रकारचा आपपरभाव केवळ भारतातच आढळतो असे नाही. जगातील सर्वच देशांतील स्वधर्मीय व परधर्मीय लोकांत ही भावना आढळते, हे मान्य करावयास हवे.

या संदर्भात एका हिंदू गृहस्थाने मला सांगितलेली एक आख्यायिका आठवते. या आख्यायिकेतून हिंदूंची आपल्याविषयीची तिरस्काराची भावना व्यक्त होते.

एका हिंदू राजावर शत्रूने स्वारी केली. तो आपल्या देशातून भारतावर चालून

आला. या स्वारीत हिंदू राजा मारला गेला. राजाच्या मृत्यूनंतर त्याच्या राणीस पुत्ररत्न झाले. त्याचे नाव सगर. सगरास पुढे राज्याधिकार प्राप्त झाला. गादीवर बसल्यानंतर सगराने आईस आपल्या वडिलांविषयीची माहिती विचारली तेव्हा तिने त्यास घडलेली सर्व हकीगत सांगितली. ती हकीगत ऐकल्यावर सगर राजा अत्यंत क्रोधायमान झाला. शत्रूच्या प्रदेशावर स्वारी करून कित्येक लोकांची हत्या केल्यावर त्याची तृषा शांत झाली. जेव्हा त्याला शत्रूची कत्तल करण्याचा कंटाळा आला तेव्हा त्याने शत्रुपक्षाच्या वाचलेल्या लोकांना म्लेंच्छांचा वेश परिधान करण्याची शिक्षा दिली. अशा प्रकारचा वेश परिधान करणे ही एक अत्यंत भयंकर व तिरस्करणीय शिक्षा असल्याचे या देशात मानले जाते. जेव्हा मी ही हकीगत ऐकली, तेव्हा भारतातील म्लेंच्छांना त्याने भारतीय वेष परिधान करण्याची आणि हिंदू चालीरीतीनुसार वागण्याची सक्ती केली नाही, याबद्दल मला अत्यंत धन्यता वाटली.

भारतातील बौद्ध लोक ब्राह्मणांचा मनापासून द्वेष करतात. तथापि असे असूनही इतर धर्मांच्या लोकांपेक्षा हिंदू लोकांना बौद्ध लोकच अधिक जवळचे वाटतात. प्राचीन काळी खुरासान, पर्सिस, इराक, मोसुल–सीरियाच्या सीमेपर्यंतचा प्रदेश इ. प्रदेशांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता. पुढे झरतुष्टाने अझरबैजानपासून बल्खपर्यंत आपल्या धर्मतत्त्वाचा प्रसार केला. त्याच्या तत्त्वप्रणालीत गुश्तास्प राजाचा आश्रय मिळाला. गुश्तास्पचा पुत्र इस्फेंदियाद याने कधी आपल्या सामर्थ्याच्या साहाय्याने तर कधी सामोपचाराने झरतुष्टाच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. त्याने आपल्या राज्यात चीनच्या सीमेपासून ग्रीक साम्राज्यापर्यंत–अग्नीच्या उपासनेसाठी मंदिराची स्थापना केली. त्याच्यानंतर जे राजे होऊन गेले त्यांनी पर्सिस व इराक येथे या धर्मास राजधर्माचे मानाचे स्थान दिले व तो स्वीकारण्याची सक्ती त्यांनी आपल्या प्रजेवर केली. परिणामतः, बौद्ध लोकांना या प्रदेशात राहणे दुष्कर झाले. तेव्हा त्यांनी तेथून बल्खच्या पूर्वेकडील प्रदेशात स्थलांतर केले. (आजही भारतात या मताचे अनुसरण करणारे 'मग' नावाचे अल्पसंख्य लोक राहतात ही गोष्ट या संदर्भात लक्षात घ्यावयास हवी.) या वेळेपासूनच बौद्ध लोक खुरासान व त्याच्या परिसरातील प्रदेशाचा तिरस्कार करू लागले. त्यानंतर इस्लामच्या उदयाबरोबर पर्शियन साम्राज्याचा अस्त झाला.

मुसलमानांनी भारतात प्रवेश केल्यानंतर हिंदूंच्या मनातील परधर्मीयांविषयीच्या विरोधाची भावना वाढीस लागली. मुहम्मद इब्न अल्कासिम इब्न अलमुनब्बी याने सिजिस्तान नामक प्रदेशाकडून भारताच्या सिंध प्रांतात प्रवेश केला आणि 'बहमनवा' व 'मूलस्थान' ही शहरे काबीज केली. त्याने याच शहरांची नावे अनुक्रमे 'अल्मन्सूर' आणि 'अल्मामूर' अशी ठेवली. त्यानंतर तो भारतात पुढे कनोजपर्यंत गेला. गांधार नामक प्रदेशातही गेला आणि तेथून तो काश्मीरच्या सीमेवरून परतला. आपले उद्दिष्ट साधण्यासाठी कधी त्याने एतद्देशीय लोकांबरोबर युद्ध केले तर

कधी त्यांच्याशी सामोपचाराने तह केला. येथील लोकांच्या धर्मावर मात्र त्याने कधीच प्रहार केला नाही, ज्यांना स्वेच्छेने इस्लाम धर्माचा स्वीकार करावयाचा होता, त्यांना त्याने तशी अनुमती दिली. तथापि या सर्व घटनांमुळे हिंदूंच्या मनात परधर्मीय लोकांविषयीची द्वेष-भावना खोलवर रुजली.

पुढे बराच काळपर्यंत कोणीही मुसलमान राज्यकर्ता काबूलची सरहद्द किंवा सिंधू नदी ओलांडून भारतात आला नाही. त्यानंतर तुर्क लोकांनी गझनी येथे आपली सत्ता प्रस्थापित केली आणि नासिरउद्दौला सबक्तगीन हा सर्वाधिकारी झाला. हा राजा स्वतःला 'अल्गाझी' (धर्मयोद्धा) म्हणवीत असे. भारताच्या सरहद्दीजवळ त्याने रस्ते बांधले. तीस वर्षांनंतर याच वाटेने त्याचा पुत्र यामीनउद्दौला याने भारतात प्रवेश केला. महमूदने तर भारताच्या एकसंघतेवर प्रहार केला. त्याच्या या प्रहारामुळे हिंदूंची मोठीच वाताहत झाली आणि त्यांच्या देशाचे वैभव नष्ट झाले. हिंदूंच्या मनांतील मुस्लिमद्वेष वाढीस लागण्यास हेही एक कारण घडले. मुस्लिमांनी भारतातील जे जे प्रदेश जिंकले, त्या त्या प्रदेशातील शास्त्रेही 'अदृश्य' झाली. ही शास्त्रे पुढे मुसलमानांचे हात जेथे पोचणार नाहीत अशा प्रदेशात–काश्मीर व बनारस येथे– विसावली. आणि मग तेथे परधर्मीयांविषयीची द्वेषभावना अधिकच वाढीस लागली.

हिंदूंमध्ये आणि अन्य धर्मीय लोकांमध्ये विशेष जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित होऊ शकले नाहीत याचे आणखी एक दुःखद कारण आहे. ते कारण म्हणजे एतद्देशीयांचा अहंकार. अहंकाराची भावना हिंदूंमध्ये खोलवर रुजली आहे. जगाच्या पाठीवर आपल्या देशासारखा दुसरा देशच नाही, आपल्या राजांसारखे राजे कोठे नाहीत, आपला धर्म हाच एकमेव धर्म, आपल्या शास्त्रांसारखी शास्त्रेही इतरत्र नाहीत, असा त्यांचा समज आहे. ते अत्यंत तापट व गर्विष्ठ आहेत. आपल्या ज्ञानाचा ते इतरांना लाभ घेऊ देत नाहीत. याबाबतीत ते असे कृपण आहेत, असेच म्हणावे लागेल. आपल्या धर्मातील इतर जातीच्या लोकांनाही हे ज्ञान मिळू नये, याबद्दलही ते विशेष दक्षता घेतात. यावरून परदेशी लोकांना हे ज्ञान मिळू नये याबद्दल ते किती दक्ष असतील याची सहज कल्पना करता येईल. जगाच्या पाठीवर आपल्या देशासारखा देश नाही, आपल्यासारखा मानववंश नाही आणि आपल्याशिवाय इतर देशांत कुणालाही ज्ञान–विज्ञानाची काहीच कल्पना नाही, अशी त्यांची धारणा आहे. खुरासान किंवा पर्सिस येथील एका शास्त्रग्रंथाचा किंवा पंडिताचा तुम्ही त्यांच्यासमोर उल्लेख केला तर ते तुमच्यावर विश्वास ठेवीत नाहीत. तुम्ही खोटे बोलत आहांत, असे त्यांना वाटते. या लोकांनी अन्य देशांत प्रवास केला असता तर त्यांची वृत्ती अधिक व्यापक झाली असती. भारतातील सध्याच्या पिढीपेक्षा पूर्वीच्या पिढीतील लोक इतक्या संकुचित वृत्तीचे नव्हते. याविषयी वराहमिहिराचे विचार उद्धृत करण्यासारखे आहेत :

ब्राह्मणांचा आदर करावा असा उपदेश करताना तो म्हणाला, "ग्रीक लोक हे अपवित्र असले तरी शास्त्रांत त्यांनी कितीतरी प्रगती केली आहे. तेव्हा त्यांना योग्य मान द्यावयास हवा. विज्ञानाची माहिती असलेल्या अपवित्र ग्रीकांचा आदर करावयास हवा असे आपण म्हणतो तेव्हा ज्यांच्यामध्ये शुचिता आणि शास्त्र–ज्ञान यांचा संगम झाला आहे, त्या ब्राह्मणांचा आपण किती तरी आदर करावयास हवा." 'प्राचीन काळी, आपल्यापेक्षा ग्रीकांमध्ये विज्ञानाची अधिक प्रगती झाली आहे, ही गोष्ट हिंदू लोक मानीत असत. तथापि वरील अवतरणात वराहमिहिराने आपण इतरांना (परदेशी लोकांना) न्याय देत आहोत, असा आविर्भाव करीत आत्मप्रशंसाच केली आहे.

प्रथमतः मी या देशात आलो त्यावेळी त्या देशातील लोकांची वृत्ती व एतद्देशीय शास्त्राध्ययनाच्या पारंपरिक पद्धती यांची मला माहिती नव्हती. त्यामुळे येथील खगोल-शास्त्रज्ञांपुढे मी एकदा सामान्य विद्यार्थ्याप्रमाणे विनम्रपणे उभा राहिलो आणि त्यांना मी आपला गुरू मानले. काही दिवसांनंतर, शास्त्रांची मूलतत्त्वे, शास्त्रीय तर्कपद्धती व गणिताची शास्त्रशुद्ध पद्धती यांची मला अवगत असलेली माहिती मी त्यांना दिल्यावर या देशाच्या सर्व भागांतील लोक मजकडे येऊ लागले. त्यावेळी मजजवळील ज्ञान शिकण्यास ते अत्यंत उत्सुक होते. माझ्या विद्येचे त्यांना मोठे आश्चर्य वाटत असे. मजजवळ ही विद्या शिकत असतानाच "ही विद्या तुम्हाला कोणत्या हिंदू गुरूपासून प्राप्त झाली?" असा सवाल ते टाकीत असत. तेव्हा ज्ञानाच्या क्षेत्रात हिंदू लोक किती मागे आहेत, हे मी त्यांनाही दाखवून दिले. त्यावेळी आपण त्यांच्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहोत याचीही मला जाणीव झाली. मी एखादा जादुगार किंवा चेटक्या असेन असे त्यांना वाटत असे. एवढेच नव्हे तर "हा शिरक्यापेक्षाही कडवट असा समुद्र आहे" या शब्दांत ते माझा उल्लेख आपापसांत बोलताना करीत असत.

एकूण भारतातील परिस्थिती ही अशी आहे. येथे काम करताना माझ्या मार्गात कित्येक अडचणी आल्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मला येथे काम करावे लागले. मला माझ्या विषयाविषयी आत्यंतिक जिव्हाळा वाटत असल्यानेच हे काम पूर्ण करू शकलो.

या अशा प्रकारे विषयासंबंधी अध्ययन करणारा माझ्या काळात तरी मी एकटाच असेन. संस्कृत ग्रंथ मिळवून त्यातील ज्ञानाचे अध्ययन करण्यासाठी मी कोणत्याही प्रकारचे परिश्रम करण्यात व कितीही पैसा खर्च करण्यात कधी कुचराई केली नाही. जेथे जेथे म्हणून संस्कृत ग्रंथ उपलब्ध होण्याची शक्यता आहे असे मला कळले तेथून तेथून मी ते ग्रंथ मिळविले. या ग्रंथांचा ज्यांचा ज्यांचा म्हणून व्यासंग आहे, त्या त्या हिंदू पंडितांना मी भेटलो व त्यांच्याजवळ मी या ग्रंथांचे अध्ययन केले. प्रतिकूल परिस्थितीत का होईना, माझ्या आवडत्या विषयाचे अध्ययन मला करता आले, याबद्दल

मी परमेश्वरास धन्यवाद देतो.

प्राचीन काळात, ख्रिस्ती धर्माच्या उदयापूर्वी, निसर्गोपासक ग्रीक लोकांची मतेही हिंदू लोकांप्रमाणेच होती. त्यांच्यामधील 'विद्वानां'ची विचारसरणी हिंदू पंडितांप्रमाणेच होती. सामान्य ग्रीक जनता हिंदू लोकांप्रमाणे मूर्तिपूजक होती. या ग्रंथात या दोन्ही देशांतील विचार–प्रणालींतील साम्य लक्षात घेऊन मी त्या वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे तथापि त्यात कुणाचीही, कोणत्याही प्रकारची चूक दाखविण्याचा किंवा त्या चुकीची दुरुस्ती सुचविण्याचा माझा विचार नाही. कारण जेथे मूळ सत्याचाच अभाव असतो, तेथे चूक दुरुस्त करण्यासही मान्यता दिली जात नाही. ग्रीक लोकांचे अज्ञान काय किंवा हिंदू लोकांचे अज्ञान काय, या दोहोंच्या मागील अध्याहृत तत्त्व एकच आहे– आणि हे तत्त्व सत्यापासून दूर दूर गेले आहे. तथापि या ठिकाणी ग्रीक लोकांच्या बाबतीत मात्र एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करावयास हवा. सर्वसामान्य जनता ही अंधश्रद्धेवर विश्वास ठेवीत असली तरी विचारवंतांनी सत्य–शोधनार्थ शास्त्राध्ययन केले पाहिजे व त्यानुसार आपण वागले पाहिजे, हे ग्रीक तत्त्वज्ञांनी वेळीच ओळखले होते व त्यांनी प्रचलित रूढी व गैरसमजुती यांना फाटा देऊन निखळ शास्त्राध्ययनाचा पुरस्कार केला होता. त्यामुळे त्यांना सत्याचे यथार्थ दर्शन घडले. अर्थात् यासाठी सॉक्रेटिसासारख्या तत्त्वज्ञांनाना जबर किंमत द्यावी लागली, हेही आपणास ठाऊक आहे. मूर्तिपूजा हे पाखंड असून तांन्यांना आपण देवता मानावयास तयार नाही, असे सॉक्रेटिसाने उभ्या देशातील जनतेला निक्षून सांगितले. त्याच्या न्यायालयीन चौकशीसाठी नेमलेल्या बारापैकी अकरा न्यायाधीशांनी सॉक्रेटिस हा दोषी असल्याचे मान्य केले. त्याला फाशीची शिक्षा देण्याविषयीही ह्या अकरा न्यायाधीशांचे एकमत झाले. सत्यासाठी सॉक्रेटिसासारखा तत्त्वज्ञाने आपले प्राण वेचले.

आपली शास्त्रे परिपूर्ण व्हावीत यासाठी सॉक्रेटिसासारखा त्याग करणारा तत्त्वज्ञ हिंदू लोकांत निपजला नाही. त्यामुळेच हिंदूंच्या अनेक वैज्ञानिक सिद्धान्तांतहीं वैचारिक गोंधळ व तर्कशुद्धतेचा अभाव आढळतो. त्यात सर्वसामान्य समाजात प्रचलित गैरसमजुतींचीही सरमिसळ झालेली असते. अपरिमित संख्या, असंख्य कालगणना, समाजातील रूढ गैरसमजुती व धार्मिक अपसमज यांची भेसळ त्यांच्या शास्त्रीय ग्रंथांत झाल्याचेही आढळते. मोत्यांची शिंपले आणि आंबट खजूर, मोती आणि शेण किंवा रत्ने आणि गारा यांच्या संमिश्रणाशी त्यांच्या या सरमेसळ झालेल्या गणित व खगोलशास्त्रादी शास्त्रीय साहित्याची तुलना करता येईल. या दोन्ही गोष्टी (मोती व शेण, रत्ने व गारा, शिंपले व आंबट खजूर) हिंदू लोकांना सारख्याच वाटतात आणि त्यामुळे केवळ शास्त्रशुद्ध तर्कपद्धतीचा ते अवलंब करू शकत नाहीत.

माझ्या या संपूर्ण ग्रंथात मी जेथे अगदी अपरिहार्य असेल तेथेच टीका केली आहे. एरवी शक्यतो सरळ सरळ माहितीचे निवेदन केले आहे. मूळ संस्कृत नामे किंवा

पारिभाषिक शब्द यांचा निर्देश आवश्यक त्या ठिकाणी मी संदर्भास्तव दिला आहे. ग्रंथात मूळ शब्दाला अरबी प्रतिशब्द दिला आहे तथापि जेथे अनुवाद करणे अशक्य आहे तेथे मूळ संस्कृत शब्दाचे शक्य तेवढे शुद्ध लिप्यन्तर केले आहे. तद्भव शब्दही शक्य तो तसेच वापरले आहेत. त्यांच्याशी जुळणारे अरबी प्रतिशब्द प्रचलित असले तरी ते तेथे वापरलेले नाहीत. मूळ तद्भव शब्द वापरताना त्याचे महत्त्वही विशद केले आहे. अशा प्रकारे, संस्कृत भाषेतील पारिभाषिक शब्दावली स्पष्ट करण्याचा प्रयत्नही प्रस्तुत ग्रंथात केला आहे.

२

# हिंदूंचे ईश्वरविषयक विचार

प्रत्येक राष्ट्रातील सुशिक्षित आणि अशिक्षित लोकांच्या समजुती आणि श्रद्धा यांत नेहमीच लक्षात घेण्याजोगे अंतर असल्याचे प्रत्ययाला येते. सुशिक्षित लोक अमूर्त कल्पना घेऊन त्यांच्या आधारे काही सर्वसामान्य सिद्धान्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. अशिक्षित लोक मात्र इंद्रियगम्य संवेदनांच्या पलीकडे जाऊ शकत नाहीत. वस्तुतः धर्मशास्त्र आणि कायदेशास्त्र यांच्या मूलतत्त्वांसंबंधी मतभेद होणे अगदी स्वाभाविक आहे तथापि याबाबतीतदेखील अशिक्षित समाज पूर्वप्रस्थापित मतांची चिकित्सा न करिता त्यांचा स्वीकार करतो.

ईश्वराविषयी हिंदूंची मते पुढीलप्रमाणे आहेत : ईश्वर एक आहे. तो शाश्वत, आद्यन्तविरहित, बुद्धिमान, जीवन देणारा, स्वेच्छेनुसार आचरण करणारा, सर्वसत्ताधारी, सर्वांचा रक्षणकर्ता, साम्य-वैषम्यातीत असा आहे. कोणतीही वस्तू त्याच्यासारखी नाही व तो कोणत्याही वस्तूसारखा नाही, असे त्याचे वर्णन हिंदू लोक करतात. याविषयी अधिक कल्पना यावी म्हणून त्यांच्या वाङ्मयातील काही दाखले पुढे दिले आहेत.

पतंजलीच्या एका ग्रंथातील पुढील गुरु-शिष्य-संवाद लक्षात घेण्याजोगा आहे. एक शिष्य आपल्या गुरूस विचारतो, " ज्याची उपासना केल्याने पुण्य मिळते तो कोण ?" यावर गुरू उतर देतो, " असे एकमात्र शाश्वत किंवा चिरंतन तत्त्व आहे. ज्यामुळे लोकांना मानवी वरदान किंवा शाप मिळेल अशा प्रकारच्या कोणत्याही मानवी क्रियेची या शाश्वत तत्त्वास आवश्यकता वाटत नाही. हे तत्त्व सूक्ष्मातिसूक्ष्म आणि साम्यवैषम्यातीत असून विचारशक्तीस त्याच्या स्वरूपाचे यथार्थ आकलन होणे केवळ अशक्य आहे. त्यास सर्व गोष्टींचे मुळापासून ज्ञान असते. येथे ' ज्ञान ' या संज्ञेचेही मानवाच्या संदर्भात स्पष्टीकरण करावयास हवे. आधी एखाद्या गोष्टीविषयी कुठलीही माहिती नसते. पुढे ही माहिती उपलब्ध झाल्यावर त्या गोष्टींचे आपणास ज्ञान झाले असे आपण म्हणतो. परमेश्वराच्या संदर्भात कोणत्याही काळी, कोणत्याही अवस्थेत ' अ–ज्ञान ' हे संभवतच नाही."

यावर शिष्य पृच्छा करतो, "तुम्ही ईश्वराच्या ज्या गुणधर्मांचा आता उल्लेख केला त्याशिवाय त्याचे काही अन्य गुणधर्म किंवा लक्षणे आहेत काय?"

गुरु : केवळ उंचीचा विचार करावयाचा झाल्यास प्रत्यक्ष उंची म्हणजेच ईश्वर, असे म्हणता येईल. ही उंची स्थलाच्या परिमाणात मोजताच येणार नाही. कारण उंचीच्या परिपूर्णतेची मूळ कल्पनाच या तत्त्वात साकार झाली आहे, कारण सर्व ठिकाणी ईश्वराचे अस्तित्व असतेच. ईश्वर हे अत्यंत पवित्र असे सत्‌-तत्त्व आहे. जन्मलेल्या प्रत्येक प्राण्यास या सत्‌तत्त्वाचे नेहमीच आकर्षण वाटत असते, ओढ लागलेली असते. अ–ज्ञान आणि विस्मरण या दोषांनी न डागळले गेलेले ज्ञान म्हणजेच ईश्वर होय.

शिष्य : ईश्वरास वाणी आहे काय?

गुरु : जेथे ज्ञान आहे तेथे वाणी ही असणारच.

शिष्य : ज्यास ज्ञान आहे, त्यास वाणीही असली पाहिजे, हा युक्तिवाद सुसंगत आहे असे गृहीत धरल्यास ईश्वरात आणि आपल्या वाणीच्या द्वारा ज्ञान देणाऱ्या ऋषींत काय फरक आहे?

गुरु : या दोघांमध्ये कालतत्त्वाचे अंतर आहे. ऋषींनी विशिष्ट कालातच अध्ययन केलेले असून त्यांनी त्या विशिष्ट कालातच ज्ञानविषयक विवेचन केले आहे. शिवाय, ज्ञानप्राप्तीपूर्वी ते अ–ज्ञानी होते. त्यावेळी ते अवाक् होते. त्यानंतर आपल्या वाणीच्या साहाय्याने त्यांनी हे ज्ञान इतरांना सांगितले. यावरून त्यांची ज्ञानप्राप्ती व त्यांचे बोलणे (ज्ञानविषयक विवरण) या दोन्ही प्रक्रिया विशिष्ट कालमर्यादेतच घडल्या आहेत. ईश्वराच्या संदर्भात कालतत्त्वास मुळातच अस्तित्व नसते आणि म्हणूनच ईश्वर हा चिरंतन काळापासून ज्ञानयुक्त आणि वाणीयुक्त आहे. ब्रह्माशी व सृष्टीच्या प्रारंभी निर्माण झालेल्या इतरांशी तो विविध प्रकारे बोलला. त्यांपैकी काही जणांना त्याने एक ग्रंथ दिला, काही जणांना आपल्याशी संवाद करण्याचे साधन दिले आणि काही जणांना स्फूर्ती आणि विचारशक्ती दिली.

शिष्य : पण हे ज्ञान त्याला (ईश्वराला) केव्हा प्राप्त झाले?

गुरु : ईश्वर हा अनादिकालापासून अनंतकाळपर्यन्त ज्ञाताच असतो. कोणत्याही काळी तो ज्ञाता नव्हता, असे म्हणताच येत नाही किंवा कोणत्याही गोष्टीचे त्यास पूर्वी ज्ञान नव्हते असे म्हणताच येत नाही. त्यामुळे त्याने विशिष्ट गोष्टीचे ज्ञान 'संपादन केले' असे म्हणताच येत नाही. त्याला स्वतः-विषयीचेही ज्ञान असतेच. त्याने वेदात आपले ज्ञान सांगितले व ते ब्रह्मास दिले. जो वेदापूर्वीही अस्तित्वात होता व प्रत्यक्ष ज्याच्या मुखातून वेद प्रकट झाले, त्या ईश्वराचे स्तवन करा.

शिष्य : इंद्रियांच्या साहाय्याने केलेल्या आराधनेने ज्याची प्राप्ती होते, त्याची भक्ती तरी कशी करावी ?

गुरु : त्याचे नाव हेच त्याचे अस्तित्व सिद्ध करते. एखादी वाणी आपण ऐकतो तेव्हा तिच्यामागे जशी एखादी घटना घडलेली असते, त्याप्रमाणे ज्यावेळी एखादे नाव आपण ऐकतो त्यावेळी ते नाव धारण करणारी वस्तू वा व्यक्तीही अस्तित्वात असतेच. तो ( इंद्रियांस ) गोचर होत नाही व त्यांच्या साहाय्याने त्याची आराधनाही करता येत नाही. तथापि मन व आत्मा यांच्या साहाय्याने त्यास आवाहन करता येते. त्यामुळे आपल्या विचारशक्तीस त्याच्या गुणाविषयीचे आकलन होते. मनन आणि चिंतन यांच्या साहाय्याने त्याची भक्ती करता येते. कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येऊ न देता मनन चिंतन केल्यास परमानंदाची प्राप्ती होते.

याबाबतीत पतंजलीच्या ग्रंथाप्रमाणेच गीतेचाही निर्देश करता येईल. ' भारत ' नामक ग्रंथाचा ' गीता 'हा एक भाग आहे. गीतेत वासुदेव ( श्रीकृष्ण ) आणि अर्जुन यांच्यामधील संवादाचे विवरण केले आहे. वासुदेव अर्जुनास म्हणतो, " आद्यन्तविरहित, जन्म न पावलेले विश्व म्हणजेच मी आहे. कोणतीही गोष्ट प्राप्त करण्यासाठी ( फल – प्राप्तीसाठी ) मी माझे कार्य करीत नाही. मी विश्वात अस्तित्वात असलेल्या कोणत्याही एका वर्गविशेषाचाच आहे, असे नाही. तसेच एकाशी माझे सख्य आहे व दुसऱ्याशी वैर आहे, असेही नाही. मी ज्यांना ज्यांना निर्माण केले, त्यांना त्यांच्या जीवनयापनास आवश्यक ते सामर्थ्यही दिले आहे. ज्यास माझे ज्ञान होते व जो कर्म करीत असताना फळाची आशा न धरता माझ्याशी एकरूप होण्याचा, तादात्म्य पावण्याचा प्रयत्न करतो त्याचे ( भव ) पाश तुटून त्याला मुक्ती प्राप्त होते.

—परमेश्वराशी तादात्म्य पावून ' तत्सम ' होण्याचे आवाहन करणाऱ्या तत्वज्ञानाचे या ठिकाणी स्मरण होते.

याच ग्रंथात वासुदेव पुढे अर्जुनास म्हणतो,

" बहुधा आपल्या इच्छा-आकांक्षांच्या पूर्तीसाठी लोक परमेश्वराची करुणा भाकतात. तथापि त्यांच्या या वृत्तीचे बारकाईने निरीक्षण केल्यास त्यांना मुळात परमेश्वराच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञानच नसल्याचे आढळते. कारण इंद्रियांच्या साहाय्याने परमेश्वराची आराधना करता येत नाही. यामुळेच अशा लोकांना ईश्वराच्या यथार्थ स्वरूपाचे आकलन होत नाही. काही जण इंद्रियगम्य ज्ञानाच्याही पलीकडे जातात पण निसर्गनियमांच्या सीमारेषेपर्यंतच ते येऊन ठेपतात. जो स्वतः ' अजात ' आहे किंवा ज्याने कुणालाही जन्म दिलेला नाही, ज्ञानाच्या कक्षेत ज्याचे स्वरूप सामावत नाही आणि ज्याच्या ज्ञानात मात्र सर्व गोष्टींचा समावेश होतो अशा परमेश्वराविषयींच्या ज्ञनाप्रत मात्र ते जाऊ शकत नाहीत, त्याच्या यथार्थ स्वरूपाची कल्पना त्यांना येत नाही. "

'कर्म' च्या परिभाषेसंबंधी हिंदू पंडितांमध्ये विविध मतमतांतरे प्रचलित आहेत. ईश्वर हा सर्व कर्मांचे मूळ असल्याने तोच विश्वाचेही आदिकारण आहे, असे हिंदू लोक मानतात. कर्त्याचे अस्तित्वच ईश्वरामुळे निर्माण होते, त्यामुळे ईश्वर हाच कर्माचे आदिकारण आहे, तसेच कर्त्याच्या माध्यमाद्वारा ईश्वरनियोजित कर्म प्रकट होते, असेही त्यांना वाटते.

मात्र, काही हिंदू पंडितांना हे मत मान्य नाही. बाह्य गोष्टींच्या अवलोकनावरून ते कर्माचे मूळ कारण ईश्वर हे नसून काही अन्य गोष्टींमुळेच कर्माची उत्पत्ती होते, असे ते मानतात.

'सांख्य' नामक ग्रंथात एका शिष्याने पुढील प्रश्न विचारला आहे—

"कर्म आणि कर्ता यांच्याविषयी कोणकोणती मते प्रचलित आहेत?"

यावर गुरु म्हणतात, "काही असे म्हणतात की आत्मा हा जिवंत नसतो व द्रव्यासही ( Matter ) अस्तित्व नसते. ईश्वर हा स्वयं पूर्ण असून तोच त्या दोघांना एकत्र आणतो किंवा त्यांना विलग करतो. म्हणून, वास्तविक पाहता, ईश्वर हाच कर्ता होय, असे काही जणांचे मत आहे. त्याच्यापासूनच कर्माची निष्पत्ती होते. तोच आपल्या इच्छेनुसार आत्मा व द्रव्य यांना कार्यप्रवृत्त करतो, असे ते मानतात.

कर्ता आणि कर्म यांच्या ऐक्यास निसर्गच कारणीभूत असतो. विकास व लय या प्रक्रियाही अशाच प्रकारे निसर्गनिर्मित होत, असे काही विद्वानांचे मत आहे.

"प्रत्येक गोष्टीची उत्पत्ती 'पुरुषा' पासून झाली आहे" या वेदवचनाच्या आधारे आत्मा हाच कर्ता आहे, ही भूमिका काही जणांनी स्वीकारली आहे.

एखाद्या प्राण्यास बळकट दोरखंडाने बांधल्यावर तो दोरखंड ज्या प्रमाणात सैल असतो किंवा आवळलेला असतो. त्या प्रमाणात त्या प्राण्यास हालचाल करता येते. त्याप्रमाणेच विश्व हे कालतत्त्वाशी बद्ध झालेले आहे आणि म्हणून काल हाच कर्ता होय, असे काही पंडितांचे मत आहे तर ( वर्तमान ) कर्म हे पूर्वकर्माचे फल होय असेही काही जण मानतात.

"ही सर्व मते चुकीची आहेत. कर्म हे द्रव्याशी पूर्णपणे संबद्ध असून आत्मा त्या द्रव्याशी संबद्ध असतो. त्यामुळे आत्म्यास विविध देह ( जन्म ) धारण करून भ्रमण करावे लागते आणि त्यानंतर द्रव्य त्यास मुक्त करते आणि म्हणून द्रव्य हाच कर्ता होय. द्रव्याशी ज्या ज्या गोष्टी संबद्ध आहेत, त्या सर्व कर्मपूर्तीस साहाय्य करतात, हे निर्विवाद होय," असेही एक मत प्रचलित आहे.

ईश्वर हा स्वयंपूर्ण असून तो हितकारक आहे. तो कशाचीही अपेक्षा न करता आपले कल्याण करतो, असे ते मानतात. त्यांच्या दृष्टीने परमेश्वराशी ऐक्य पावणे हे जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे, तथापि परमेश्वराशिवाय अन्य वस्तूंतही ईश्वरत्व आहे हे मान्य करणे म्हणजे द्वैतमत मान्य करण्यासारखे आहे. केवळ परमेश्वर हेच अंतिम सत्य

होय कारण सर्व वस्तूंना त्याच्यामुळेच अस्तित्व प्राप्त झाले आहे. एक वेळ ईश्वरास अस्तित्व आहे व इतर पदार्थांना ते नाही हे मान्य करणे फारसे अवघड नाही. तथापि तो नसतानाही इतर पदार्थांना अस्तित्व असू शकते हे मात्र मान्य करता येणार नाही.

–ही झाली सुशिक्षित हिंदू समाजाची विचारसरणी. सर्वसामान्य हिंदू समाजाच्या ईश्वरविषयक कल्पनेत किती तरी वैविध्य आढळते. यापैकी काही समजुती अत्यंत तिरस्करणीय व त्याज्य आहेत. तथापि अशा प्रकारच्या चुकीच्या समजुती केवळ हिंदू समाजातच आढळत नाहीत तर इतर धर्मांच्या सर्वसामान्य लोकांतही आढळतात. इस्लाम धर्मीयांतही ईश्वरास मानवी आकार व रूप देऊन त्यास सगुणत्व प्रदान करणारी विचारसरणी, 'जब्रिया' पंथाची शिकवण, धर्मतत्त्वाविषयी चर्चा करण्यास मनाई यांसारख्या गोष्टी आढळतात, त्यासही आपण निग्रहाने विरोध करावयास हवा. जे धर्मग्रंथ आपण लोकांसाठी लिहितो, त्या धर्मग्रंथातील शब्द-योजना व वाक्यरचना अत्यंत काळजीपूर्वक करणे किती आवश्यक आहे, हे पुढील उदाहरणांवरून लक्षात येईल.

ईश्वरात देहाचे किंवा वस्तुमात्राचे गुणधर्म नसतात हे तत्त्व स्पष्ट करण्यासाठी काही हिंदू पंडित त्याची 'बिंदू'शी तुलना करतात. अशिक्षित हिंदू माणसास या उदाहरणातील गर्भितार्थ कळत नाही. ईश्वर हा बिंदूइतका लहान आहे असा त्याचा अर्थ तो घेतो. त्यामुळे पंडितांनी ईश्वराची बिंदूशी केलेली तुलना त्यास आवडत नाही. या विचारसरणीस विरोध करण्यासाठी तो "ईश्वर इतका लहान असणे शक्यच नाही. तो बारा अंगुळे उंच असून दहा अंगुळाइतका जाड आहे." असे म्हणून ईश्वर हा किती मोठा आहे हे आपल्याला पटवून देईल. संख्या आणि परिमाण यांच्या कवेत न मावणाऱ्या परमेश्वराच्या स्वरूपाचे वर्णन मी कसे करू ?

परमेश्वर हा विश्वव्यापी व सर्वलक्षी आहे, हे मत ज्यावेळी एखादा अशिक्षित माणूस ऐकतो तेव्हा तो व्यापण्याची ही क्रिया केवळ आपल्या दृष्टीच्या कक्षेत येण्याजोगी आहे अशी कल्पना करतो. एका डोळ्यापेक्षा दोन डोळ्यांनी दृष्टीचा टप्पा आणखी वाढतो. तेव्हा परमेश्वर सर्व गोष्टी पाहतो, त्यामुळे त्यास हजार डोळे असावेत, असा अर्थ त्या अशिक्षित माणसाने लावल्यास त्याला दोष देता येईल काय ?

हिंदूंमध्ये–विशेषतः हिंदूधर्मात ज्या जमातींतील लोकांना धर्मशास्त्राध्ययन करण्याची अनुमती दिलेली नाही, त्या जमातींतील लोकांमध्ये–अशाच प्रकारची तिरस्करणीय मते प्रचलित आहेत. याविषयी आम्ही नंतर विवेचन करणारच आहोत.

३

# उत्पत्तीविषयीच्या हिंदूंच्या समजुती

अॅथेन्सचा सोलन, प्रीनचा बिआस, कॉरिन्थचा पेरियाण्डर, मिलिटसचा थेलिस, लॅकीडीमनचा किलोन, लसबोसचा पिटेकुस व लिंडसचा क्लियोब्रोलस आणि त्यांचे उत्तराधिकारी यांच्यापूर्वी ग्रीसमध्ये तत्त्वज्ञानाचा (व तर्कशास्त्राचा) विकास झाला नव्हता, तेव्हा या विषयासंबंधी प्राचीन ग्रीकांची व हिंदूंची मते जवळजवळ सारखीच होती. यांपैकी काही जणांना असे वाटत असे की, सर्व वस्तू एकच आहेत आणि तिलाच ते कार्यरत शक्ती मानतात तर काहीजण ती अव्यक्त आहे, असे मानतात. दगडासारख्या अन्य जड पदार्थांपेक्षा मानव हा आदिकारणाच्या अधिक निकट असून तो सृष्टीतील सर्वश्रेष्ठ प्राणी होय, असे काही जणांचे मत आहे.

इतरांचे मत असे आहे की, केवळ आदिकारणालाच वास्तविक अस्तित्व आहे कारण केवळ तेच एकमेव स्वयंपूर्ण आहे. अन्य सर्व गोष्टी अपूर्ण असून त्या या स्वयंपूर्ण आदिकारणावरच अवलंबून आहेत, त्यांना आपल्या अस्तित्वासाठी या आदिकारणाची आवश्यकता असते. ज्यांना आपल्या अस्तित्वासाठी अन्य गोष्टीचा आधार लागतो. त्या वस्तूंचे अस्तित्व वास्तव नसून ते केवळ स्वप्नवत् असते. या एकमेव आदिकारणाची सत्ता हीच खरी वस्तुस्थिती आहे, तेच खरे 'वास्तव' किंवा 'सत्य' होय, हीच सूफींचीही विचार–प्रणाली आहे.

'सूफी' या ग्रीक शब्दाचा अर्थ प्रज्ञा असून सूफी म्हणजे प्रज्ञावंत संत होत. यासाठीच प्रज्ञावंताला, तत्त्वज्ञांना ग्रीक भाषेत 'पैलासोफा' म्हणतात. इस्लाममधील काही जणांनी ग्रीक तत्त्वज्ञांच्या विचार–प्रणालीसारख्या विचार–प्रणालीचा स्वीकार केला आणि यांनी यांची 'सूफी' ही 'सूफ' या शब्दावर आधारलेली संज्ञाही स्वीकारली. काही जणांना या शब्दाचा अर्थ न कळल्याने त्यांनी त्याचा संबंध अरबी 'सूफा' या शब्दाशी जोडला. हजरत मुहम्मद पैगंबरांच्या साथीदारांना 'अहलस्सुफा' म्हणतात. हे 'अहलस्सुफा' म्हणजेच 'सूफी' असावेत, असा त्यांचा ग्रह झाला. पुढील काळात या शब्दाचे लेखनही चुकीचे केले गेल्याने त्याची उत्पत्ती अरबी 'सूफ्' (म्हणजे लोकर) या शब्दापासून झाली असावी, असाही समज प्रचलित

झाला. अब्रुलफतह् अलबस्तीने ही चूक दुरुस्त करण्याचा एक प्रशंसनीय प्रयत्न केला. तो म्हणतो, "प्राचीन काळापासूनच 'सूफी' या शब्दाच्या अर्थाविषयी विद्वानांत मतमतांतरे आहेत. या शब्दाची उत्पत्ती 'सूफ' या शब्दापासून झाली असावी, अशी त्यांची समजूत होती. 'सूफ' या शब्दाचा अर्थ 'लोकर' असा आहे. मी या शब्दाचा अर्थ एक 'साफी' म्हणजे 'पवित्र युवक' असा असावा असे मानतो. या 'साफी' शब्दाचेच 'सूफी' हे अपभ्रष्ट रूप झाले आणि पुढे विचार-वंतांच्या एका समूहालाही हेच नाव पडले."

याशिवाय याच ग्रीकांना असेही वाटते की, वर्तमान जग हा केवळ एकच पदार्थ असून आदिकारण त्याच्य विविध रूपांत प्रकटले आहे. आदिकारणाची शक्ती जगाच्या विविध भागांत व विविध परिस्थितीत दडलेली असते. यामुळे जगातील सर्व पदार्थांत विविधता असूनही त्यात एकता असते.

काही जणांचे मत असे आहे की, जी व्यक्ती या आदिकारणाशी एकरूप होण्या-साठी अत्यंत प्रयत्नशील असते. तिच्या मार्गात कितीही अडथळे आले तरी ती या मधल्या अवस्थांच्या पलीकडे जाऊन, आपले उद्दिष्ट साध्य करते. या बाबतीत या विचारवंतांच्या आणि सूफींच्या विचारसरणीत साम्य आढळते.

शरीर-प्रवेश करण्यापूर्वी जीवात्म्यांचे व प्रेतात्म्यांचे अस्तित्व असते, असे ग्रीकांना वाटते. त्यांची एक विशिष्ट संख्या असून त्यांचे विविध समूह किंवा गट आहेत, त्यांचा परस्परांशी संबंध आहे. त्यांपैकी काही एकमेकांशी परिचित आहेत तर काहींचा कुणाशीच परिचय नाही. जेव्हा ते शरीरात असतात, त्यावेळी ते स्वेच्छेने जी कर्मे करतात, त्यांतून देहत्यागानंतर त्यांचे भाग्य ठरत असते. यातूनच त्यांना जगावर विविध प्रकारे अधिसत्ता प्रस्थापित करण्याची शक्ती प्राप्त होते. त्यामुळे त्यांना देवता म्हणत असत. त्यांची मंदिरे बांधत असत व त्यांच्यासाठी आहुती देत असत.

आपल्या शिल्पकलेविषयीच्या पुस्तकात जालिनूस* ( Galenus) म्हणतो, "उत्कृष्ट लोकांना त्यांच्यातील मल्लविद्यानैपुण्यामुळे व गोळा-फेकीतील कौशल्यामुळे देवतेचे श्रेष्ठत्व प्राप्त झाले नसून त्यांनी या विद्यांची अभिवृद्धी केल्यामुळे त्यांना ते प्राप्त झाले आहे. उदा० अस्क्लीपियस ( Asclepius ) आणि डायोनिशस हे प्राचीन काळात मानव असून पुढे त्यांना देवतांचे स्थान लाभले असले काय किंवा प्रारंभापासूनच त्या दोन्ही व्यक्ती अलौकिक असल्या काय, त्या दोघांचाही सर्वोच्च सन्मान होणे अत्यंत उचितच होते; कारण यांपैकी एकाने मनुष्याला वैद्यकशास्त्राचे ज्ञान दिले तर दुसऱ्याने द्राक्षांच्या लागवडीची कला शिकविली."

---

* गॅलेनसचा उल्लेख अरबी भाषेत 'जालिनूस' असा करतात.

हिप्पोक्रेटस ( Hippocrates ) च्या सूत्रावर भाष्य करताना जालिनूस म्हणतो, कुणीही अस्क्लिपियसला बोकडाची आहुती दिल्याचे ऐकिवात नाही. याचे कारण असे की, बोकडाचे केस विणणे ही साधी कला नाही आणि त्याच्या मांसामुळे अपस्मारासारखे रोग उद्भवतात. लोक या देवतेला कोंबड्याचीच आहुती देतात. हिप्पोक्रेटसनेही असेच केले होते. डायोनिशस ( Dionysos ) ने मद्य तयार करण्याचा आणि डेमीटर ( Demeter ) ने ( ज्यापासून पाव तयार करता येतो त्या ) धान्याचा शोध लावला ( आणि त्यासाठीच मदिरेबरोबर डायोनिशसचे व धान्याबरोबर डेमीटरचे नाव जोडले गेले आहे ) हे खरे, तथापि हिप्पोक्रेटससारख्या अलौकिक व्यक्तीने वैद्यकशास्त्राचाच शोध लावला. त्याचे हे कार्य डायोनिशस आणि डेमीटर यांच्या कार्यापेक्षा कितीतरी अधिक महत्त्वाचे व श्रेष्ठ होते आणि यासाठीच लोक त्याला अशा प्रकारे आहुती देऊन त्याच्याबद्दल आदरभाव व्यक्त करतात. ”

प्लेटो आपल्या ‘ टीमियस ’ ( Timoeus ) या ग्रंथात म्हणतो, “ प्रेतात्मे मरत नसल्याने त्यांना रानटी लोक देव मानतात, तथापि या विद्यादेवता आहेत. ते विशेष देवतांना पहिला देव मानत असत. ”

पुढे प्लेटो म्हणतो, ‘ परमात्मा देवतांना म्हणाला, तुम्हीदेखील विनाश–विरहित आहात असे नाही. मृत्यूमुळे तुमचा विनाश होणार नाही इतकेच. मी तुम्हाला निर्माण केले त्यावेळी तुम्हाला मी माझ्या इच्छेने तसे आज्ञापत्र दिले आहे. ” या ग्रंथात प्लेटो अन्यत्र म्हणतो, ‘ परमात्मा एक आहे, परमात्मा अनेक नाहीत. ” या अवतरणावरून असे सिद्ध होते की ग्रीक लोक साधारणतः जे जे देदीप्यमान व उदात्त आहे, त्या सर्वांतच देवत्व असल्याचे मानतात. आणि ( देवत्वाविषयीचा ) असाच समज बऱ्याच देशांत प्रचलित आहे. याची व्याप्ती इतकी वाढली आहे की, पर्वत आणि समुद्र इत्यादींनाही ते देव मानतात. दुसरे असे की, ते आदिकारण, देवदूत (Sekinat) आणि त्यांचे आत्मे यांनाही देव मानतात. तिसरे असे की, प्लेटो देवांना ‘ सकीनात’ म्हणतो. या संदर्भात भाष्यकारांच्या व्याख्या सुस्पष्ट नाहीत. त्यामुळे आपल्याला केवळ नावच कळते. त्याच्या अर्थाचे आकलन होत नाही. प्रोक्लस ( Proclus )च्या मताचे खंडन करताना वैयाकरण जोहानेस ( Johannes ) म्हणतो, “ काही रानटी जमातीं-प्रमाणेच ग्रीक लोक आकाशात दिसणाऱ्या ग्रहांना देव मानू लागले. नंतर तत्त्वचिंतन व निगूढ कल्पनांचे मनन करीत असताना त्यांनी या ग्रहांना देवांची नावे प्रदान केली. ”

यावरून आपल्याला असा तर्क करता येईल की, त्यांची देवविषयक कल्पना ही आपल्या देवदूताच्या कल्पनेशी जुळणारी असावी. जालिनूस आपल्या या संदर्भात आपल्या ग्रंथात स्पष्टच म्हणतो “ प्राचीन काळात अस्क्लिपियस ( Asclepius ) नावाचा कुणी मनुष्य होता आणि परमेश्वराने त्याला आपल्या देवदूतांपैकी एक देवदूत

केले, हे सत्य असेल, तर मग बाकीच्या गोष्टींचा विचार करण्यात काही अर्थ नाही."

या ग्रंथात अन्यत्र तो म्हणतो, 'परमात्मा लाईकर्गस (Lycurgus) ला म्हणाला, तुला मानव म्हणावे की देवदूत म्हणावे याबद्दल मी साशंक आहे तथापि देवदूत आहेस असे म्हणण्याकडेच माझा कल आहे."

(या संदर्भात वेगवेगळ्या भाषांचा व धर्मांचा विचार करता असे आढळते की) काही भाषांतील अभिव्यक्ती एका धर्ममतानुसार स्वीकारार्ह वाटत नसली तरी दुसऱ्या धर्ममतानुसार ती स्वीकारार्ह असते. एका भाषेत ती योग्य मानली जाते तर दुसऱ्या भाषेत ती निषिद्ध मानली जाते. देवत्व हाही अशा प्रकारचा एक शब्द आहे. हा शब्द इस्लामधर्मीयांना कर्णकटू वाटतो. या शब्दाच्या अरबी भाषेतील प्रयोगाचा विचार करता असे दिसते की, 'अल्लाह्' साठी किंवा पवित्र सत्यासाठी जी नावे योजिली जातात ती, त्याच्याव्यतिरिक्त इतर पदार्थांसाठीही वापरतात तथापि 'अल्लाह्' हा मात्र असा एक शब्द आहे जो केवळ परमेश्वरासाठीच वापरला जातो. (याचा वापर अन्य पदार्थांसाठी केला जात नाही.) 'अल्लाह्' हे त्याचे सर्वश्रेष्ठ नाव होय. हिब्रू आणि सीरियन भाषांमध्ये कुराणपूर्व ईश्वरज्ञानविषयक ग्रंथ लिहिले गेले आहेत. या भाषांतील 'तौरेत' आणि त्यानंतर 'तौरेत'चा भाग मानल्या जाणाऱ्या प्रेषितविषयक ग्रंथात 'रब्ब' हा शब्द परमेश्वराव्यतिरिक्त अन्य कुणासाठीही वापरला जात नाही. तो 'अल्लाह्' या शब्दाचा समानार्थी शब्द आहे. 'रब्ब' या शब्दाचा अर्थ स्वामी असा आहे पण घराचा 'रब्ब' (स्वामी), संपत्तीचा 'रब्ब' (स्वामी) अशा प्रकारे त्याचा उपयोग या भाषांत केला जात नाही. अरबी भाषेत मात्र 'रब्ब' या शब्दाचा असा वापर केला जातो.

दुसरे असे की, हिब्रू भाषेतील 'इलोआह्' या शब्दाचा प्रयोग अरबी भाषेतील 'रब्ब' या शब्दाप्रमाणेच होतो, परमेश्वराव्यतिरिक्त अन्य पदार्थांसाठी तो अरबी 'रब्ब' या शब्दाप्रमाणे वापरला जातो. त्या भाषेतील ग्रंथांत पुढील वाक्ये आढळतात :

– जलप्रलयापूर्वी इलोहिमचे पुत्र मानवाच्या मुलींजवळ आले व त्यांनी त्यांच्याशी संभोग केला. (उत्पत्ति ग्रंथ ६, ४).

–सैतानाने इलोहिमच्या पुत्रांबरोबर त्यांच्या सभेत प्रवेश केला (अयूयूब, १, ६)

– मूसाच्या तौरेतमध्ये परमेश्वर मूसाला म्हणतो, मी फरऔनसाठी तुला देव बनविले आहे. (निर्गमन पुस्तक, ७, १)

– दाऊदच्या जबूरचे ८२ वे स्तोत्र असे आहे– परमेश्वर देवदूतांच्या सभेत प्रविष्ट होतो.

तौरेतमध्ये मूर्तीचा उल्लेख 'विदेशी देव' (देवदूत) असा केला आहे. त्यात परमेश्वराव्यतिरिक्त कोणत्याही अन्य पदार्थाचे पूजन, त्याच्या मूर्तीला प्रणाम करणे, त्याचे

नामस्मरण किंवा ध्यान करणे या गोष्टी निषिद्ध मानल्या नसत्या तर ही वाक्ये केवळ विदेशी देवांचा (देवदूतांचा) लोप करण्याच्या संदर्भात आली आहेत, अशी बायबलची आज्ञा आहे, असे अनुमान करता आले असते.

पॅलेस्टाईनच्या आसपासची राष्ट्रे प्राचीन ग्रीकांप्रमाणे मूर्तिपूजक होती. इस्राइली लोकांनी 'बआल' आणि 'अशतारोथ' यांच्या मूर्तींची उपासना करून परमेश्वराविरुद्ध नेहमीच बंड केले होते.

यावरून हे स्पष्ट होते की, हिब्रू भाषेत 'देव' या शब्दाचा प्रयोग, 'राजा' या शब्दाप्रमाणे, देवदूत आणि दैवी शक्तिसंपन्न आत्म्यांसाठी, करीत असत. त्यांच्या प्रतीकवत् मूर्तीकडूनही करीत असत, त्याचप्रमाणे दृष्टान्तरूपाने, ते हा शब्द राजासाठी आणि अन्य महापुरुषांसाठीही वापरत असत.

'परमेश्वर' हा शब्द सोडून 'पिता' आणि 'पुत्र' या शब्दांचा विचार करू लागलो, तर इस्लाम या शब्दांच्या प्रयोगाच्या बाबतीत उदार नाही, असे म्हणावे लागते. अरबी भाषेत 'पुत्र' या शब्दाचा स्वाभाविक अर्थ नेहमी 'बालक' असाच होतो, त्यातील जन्म व पितृत्व या कल्पनांतून सृष्टीच्या निर्मितीच्या स्वामित्वासंबंधी कोणतीच कोणतीच गोष्ट सूचित होत नाही. इतर भाषा याबाबतीत उदार आहेत, त्यांतील एखाद्या भाषेत एखाद्या माणसास, 'पिता' या शब्दाने संबोधिले तर त्याचा अर्थ 'महाराज' या संबोधनाशी मिळताजुळता असा होतो. या शब्दांचा या प्रकारचा प्रयोग ख्रिस्ती लोकांत तर इतका प्रचलित झाला आहे की, जे दुसऱ्याला 'पिता' व 'पुत्र' या शब्दांनी संबोधित नाहीत, ते ख्रिस्ती मानले जात नाहीत. 'पुत्र' हा शब्द ते विशेषकरून 'येशू' साठी वापरतात, तथापि त्याशिवाय इतरांसाठीही ते हा शब्द वापरतात. येशूनेच आपल्या शिष्यांना प्रार्थनेत 'हे आमच्या स्वर्गातील बापा' असे म्हणण्याचा आदेश दिला आहे. (मत्ती, ६, ९) आणि त्याच्या मृत्यूच्या समीप जाण्याची वार्ता कळविताना तो म्हणतो की, मी माझ्या आणि तुमच्या पित्याजवळ जात आहे. (सेंट जॉन, २०, १७). आपल्या अनेक वक्तव्यांत तो 'पुत्र' या शब्दाचा अर्थ सांगतो आणि असे म्हणतो की, मी मनुष्याचा पुत्र आहे.

ख्रिस्ती लोकांप्रमाणे ज्यूदेखील अशा प्रकारचे शब्दप्रयोग करतात.

राजांच्या दुसऱ्या पुस्तकात परमेश्वराने, उरियाच्या पत्नीपासून जन्मलेल्या त्याच्या पुत्राच्या मृत्यूबद्दल दाऊदचे सांत्वन करताना वर देऊन म्हटले आहे की, तिच्यापासून त्याला आणखी एक पुत्र होईल आणि त्या मुलाला 'मी माझा स्वतःचा मुलगा म्हणून मी स्वीकारीन.' (१ तवारीख, अध्याय २२, वाक्य ९, १०) सुलेमान (सालोमन) हा परमेश्वराचा दत्तक पुत्र आहे असा शब्दप्रयोग हिब्रू भाषेत करता येतो, त्यावरूनच ज्याने सुलेमानला आपला पुत्र मानले तो त्याचा पिता परमेश्वर होय, असेही म्हणता येते.

मनीची लोकांचा खिस्ती लोकांशी निकटचा संबंध आहे. मआनी याने आपल्या 'कंझ-अल् इह्या' या ग्रंथात असेच म्हटले आहे : 'देदीप्यमान यजमानांना आपण तरुणी, कुमारिका, पिता आणि माता, पुत्र, बंधू आणि भगिनी म्हणू या. कारण प्रेषितांच्या ग्रंथात तसेच म्हणण्याची प्रथा आहे. आनंदधामात कुणी स्त्री नसते, कुणी पुरुष नसतो, संतानोत्पत्तीची इंद्रिये नसतात. प्रत्येकाला सजीव शरीरे असतात. त्यांचे देह अलौकिक असल्याने त्यांच्यामध्ये सामर्थ्य आणि दुर्बलता, उंची आणि खुजेपणा, आकृती आणि सौंदर्य याबाबतीत काही फरक नसतो. जे एकाच दीपाने प्रज्वलित झाले आहेत आणि ज्यांच्यामध्ये एकच सामग्री (तेल) जळते आहे अशा दीपांसारखे ते आहेत. दोन प्रदेशांच्या परस्परांशी मिसळण्याच्या स्पर्धेमुळे या प्रकारची नावे देण्याची गरज भासू लागली. जेव्हा खालील अंधःकारमय प्रदेश प्रलयाच्या गडद गुंफेतून वर आला, आणि वरील देदीप्यमान प्रदेशाने त्यास स्त्री आणि पुरुष यांची जोडपी पाहिली, तेव्हा त्यानेदेखील आपल्या संततीला तशाच प्रकारचे बाह्य आकार दिले. त्यावेळी ही संतती खालील प्रदेशातील लोकांशी युद्ध करण्यासाठी गेली. तिने त्या प्रदेशातील एका प्रकारच्या व्यक्तीशी युद्ध करण्यासाठी त्याच प्रकारच्या व्यक्ती उभ्या केल्या. पुरुषांबरोबर लढण्यासाठी पुरुष आणि स्त्रियांबरोबर लढण्यासाठी स्त्रिया उभ्या केल्या.

दैवी व्यक्तींत स्त्रीपुरुष असा भेद करणे सुशिक्षित हिंदूंना आवडत नाही. तथापि जमावातील सर्वसामान्य माणसे आणि विविध संप्रदायांचे अनुयायी मात्र असा भेदाभेद करतात. आम्ही उल्लेखिलेल्या भेदाभेदांपलीकडेही ते जातात. परमेश्वराच्या संदर्भात ते (त्याची) पत्नी, पुत्र, कन्या, गर्भसंभव आणि अन्य शारीरिक प्रक्रिया इ. कितीतरी गोष्टी मानतात. या गोष्टींचा उल्लेख करताना अनुचित व अश्लील शब्दांचा निःसंकोच उपयोग करण्याइतका त्यांच्यांतील भक्तिभाव कमी असतो. तथापि अशा लोकांची संख्या विपुल असूनही त्यांना व त्यांच्या या विचारांना कुणी फारसे महत्त्व देत नाही.

ब्राह्मण ज्या बाबींसंबंधी विचार करतात आणि त्यांचा ज्यावर विश्वास आहे तेच हिंदूंच्या विचार-विश्वाचे प्रमुख केंद्र आहे. याचे कारण असे की, ब्राह्मणांना धर्मरक्षणाचे व धर्माच्या परिपालनाचे विशेष शिक्षण दिले जाते. ब्राह्मणांच्या या विश्वासाचे वर्णन आम्ही पुढे करणार आहोत.

सर्व निर्मिती हा एकच पदार्थ आहे, असे त्यांना वाटते याविषयी वासुदेवाने 'गीते'त म्हटले आहे, "अगदी नेमकेपणाने बोलायचे तर, सर्व पदार्थ दैवी आहेत. प्राणिमात्रांना राहाता यावे यासाठी विष्णू स्वतःच पृथ्वी झाला, त्यांचे पोषण व्हावे म्हणून तो स्वतःच जल झाला, त्यांच्या वृद्धीसाठी तोच अग्नी आणि वायू झाला. प्रत्येक प्राण्याच्या हृदयात तोच आहे. वेदात म्हटल्याप्रमाणे, त्याने त्यांना

विस्मृती व ज्ञान यांसारखी द्वंद्वे दिली."

हे विचार अपोलोनियसच्या 'डी कॉसिस रेरम्' या ग्रंथातील विचाराशी किती जुळतात!– जणू एकाने दुसऱ्याचा विचारच घेतलेला असावा, असे वाटते. तो म्हणतो, "सर्व मनुष्यांत एक दैवी शक्ती आहे, तिच्यामुळेच सर्व साकार आणि निराकार वस्तू ओळखता येतात."

याचप्रमाणे फार्सीत निराकार प्रभूला 'खुदा' म्हणतात. त्यातूनच 'पुरुष' आणि 'मानव-प्रभू' हे अर्थही सिद्ध होतात.

## १. पुरुष

जे हिंदू संदिग्ध गोष्टींऐवजी सुस्पष्ट व निश्चित व्याख्या करतात, ते आत्म्याला 'पुरुष' म्हणतात, कारण विद्यमान जगात तीच एक चेतन-सत्ता आहे. तो प्राणस्वरूप आहे, असे त्यांना वाटते. त्यात कधी अविद्या असते तर कधी ज्ञान असते, असे त्यांचे मत आहे. त्यात अविद्या स्वाभाविकपणेच असते पण ज्ञान मात्र तो प्रयत्नाने प्राप्त करतो. पुरुषाच्या अविद्येमुळेच कर्म निर्माण होते आणि कर्मबंधनापासून सुटका करून घेण्याचे एकमात्र साधन ज्ञान हेच होय.

## २. अव्यक्त

त्यानंतर सामान्य द्रव्याचा म्हणजे सूक्ष्म पदार्थांचा क्रम येतो, त्याला ते 'अव्यक्त' किंवा निराकार वस्तू म्हणतात. ते मृत असले तरी त्यात मूलतः सत्त्व, रज, आणि तम हे तीन गुण असतात. मी असे ऐकले आहे की, बुद्धोदन आपल्या अनुयायांबरोबर बोलताना त्यांना बुद्ध, धर्म आणि संघ असे म्हणतो. ज्ञान, धर्म आणि अविद्या यांच्या संदर्भात त्याने यांचा निर्देश केला असावा. पहिला गुण म्हणजे शांती आणि चांगुलपणा होय. अस्तित्व आणि वृद्धी यांचे ते कारण होय. दुसरा गुण म्हणजे परिश्रम आणि थकवा. त्याने दृढता आणि कालावधी (संस्थिती) यांचा लाभ होतो. तिसरा गुण म्हणजे शिथिलता आणि अधीरपणा. त्यामुळे विनाश व विध्वंस होतो. यासाठी पहिला गुण देवतांत, दुसरा मानवांत आणि तिसरा पशूंत असल्याचे मानतात. पुढे, मागे, त्याच ठिकाणी इ. शब्द भाषेच्या असमर्थतेमुळे, विशिष्ट सापेक्ष क्रमाच्या संदर्भात वापरता येतात, त्यातून कालविषयक कल्पना सूचित होतात, असे नाही.

## ३. व्यक्त

संभाव्य अवस्थेतून साकार अवस्थेत जाणाऱ्या, त्रिगुणात्मक विविध रूपांतून प्रकटणाऱ्या, द्रव्यास 'व्यक्त' किंवा साकार म्हणतात. सूक्ष्म अव्यक्त आणि स्थूल व्यक्त यांचे मीलन म्हणजेच 'प्रकृती' होय, तथापि या व्याख्येशी आपल्याला काही कर्तव्य

नाही. आपल्याला सूक्ष्म पदार्थाचे वर्णन करावयाचे नसून केवळ 'द्रव्य' या संज्ञेचा विचार करावयाचा आहे, कारण एकाशिवाय (त्या 'द्रव्या' शिवाय) दुसऱ्यास (सूक्ष्म अव्यक्तास) अस्तित्व नसते.

## ४. अहंकार

त्यानंतर येतो स्वभाव. याला ते 'अहंकार' म्हणतात. हा शब्द अतिप्रबलता, विकास आणि स्वत्वाचा आग्रह यांच्याशी निगडित आहे. जेव्हा द्रव्य विविध रूपांत प्रकटते तेव्हा वस्तू विकसित होतात, नवीन आकार धारण करतात. बाह्य द्रव्याला बदलून त्याला वर्धिष्णु वस्तूत परिवर्तित केल्यामुळे हा विकास होत असतो. तेव्हा, अहंकार हाच जणू काही त्या बाह्य द्रव्यास या परिवर्तन–प्रक्रियेद्वारा आपल्या आधीन ठेवतो आणि परिवर्तित पदार्थावरही आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो.

## ५–९ महाभूते

मिश्रण होण्यापूर्वी त्या मिश्रणातील (न मिसळलेली) मूलद्रव्ये अस्तित्वात असतात, हे उघडच आहे. त्यांनीच ते मिश्रण बनत असते व त्यात त्या मूलद्रव्यांचा विलय होत असतो. हिंदू विचारप्रणालीप्रमाणे, संपूर्ण विश्व पाच मूलतत्त्वांनी सिद्ध झाले आहे. आकाश, वायू, अग्नी, जल आणि पृथ्वी ही ती पाच तत्त्वे होत. त्यांना 'महाभूते' म्हणतात. अग्नी, हा आकाशाच्या अधोभागाजवळील उष्ण, शुष्क पदार्थ आहे, असे ते इतर लोकांप्रमाणे मानत नाहीत. धुरापासून निर्माण होणारी सर्वसामान्य स्वरूपाची आग ही त्यांची अग्नीविषयीची कल्पना होय. अगदी प्रारंभी पृथ्वी, जल, वायू आणि आकाश ही तत्त्वेच होती, असे वायुपुराणात म्हटले आहे. ब्रह्म्याने पृथ्वीखाली स्फुलिंग पाहिले आणि त्यांना त्याने वर आणून त्यांचे तीन विभाग केले. पहिला भाग 'पार्थिव' हा सामान्य अग्नी आहे. त्याच्या प्रज्वलनासाठी लाकडाची आवश्यकता असून तो पाण्याने विझविता येतो. दुसरा भाग 'दिव्य' म्हणजे सूर्य असून तिसरा भाग 'विद्युत्' म्हणजे वीज आहे. सूर्य पाणी आकर्षून घेतो आणि वीज पाण्यातूनच चमकते. पशूंमध्येही आतड्यांतील ओल्या द्रव्यात अग्नी असतो. या वस्तू अग्नी प्रज्वलित करतात, विझवीत नाहीत.

## १०–१४ 'पंचमातरस्' (पंचतन्मात्र)

हे मूळ पदार्थांचे मिश्रण आहे, तेव्हा मिश्रणापूर्वीच्या केवल पदार्थांचे अस्तित्व मानणे आवश्यक आहे. त्यांना 'पंचमातर' किंवा 'पाच माता' असे म्हणतात. ते त्यांचे ('पंच मातरां'चे) वर्णन इंद्रियव्यापारांनी करतात. आकाशाचा निजगुण शब्द आहे, तो ऐकू येतो. वायूचा निजगुण स्पर्श आहे, तो अनुभवता येतो. अग्नीचा

निजगुण रूप आहे, ते दिसते. जलाचा निजगुण रस आहे, तो चाखता येतो. आणि पृथ्वीचा निजगुण गंध आहे, तो ग्रहण करता येतो. या (पृथ्वी–जलादी) प्रत्येक महाभूताला 'पंच मातरस्'मधील एकेक गुण असतो आणि दुसरे म्हणजे ज्या तत्त्वांचे यापूर्वी वर्णन केले आहे, ती तत्त्वेही त्यात असतात. आकाशात शब्द आहे, वायूत शब्द आणि स्पर्श आहे, अग्नीत शब्द, स्पर्श आणि गंध आहे, जलात शब्द, रस, रूप आणि स्पर्श आहे आणि पृथ्वीत शब्द, रस, रूप, स्पर्श आणि गंध आहे.

हिंदू लोक आकाशाचा शब्दाशी संबंध असल्याचे का मानतात, ते मला कळत नाही. कदाचित ग्रीक कवी होमरला जे म्हणावयाचे होते तेच त्यांनाही म्हणावयाचे असेल. सात ग्रहांचा उल्लेख करताना तो म्हणतो, ज्यांना सप्तस्वर लाभले आहेत ते अत्यंत प्रसन्न, लयबद्ध रीतीने बोलतात आणि प्रश्नांची उत्तरे देतात.

आणखी एका कवीनेही असेच म्हटले आहे, "ज्यांना भिन्न भिन्न स्वर लाभले आहेत असे सप्तग्रह आकाशात आहेत. ते सतत भ्रमण करीत आपल्या निर्मात्याचे स्तवन करतात, कारण तोच त्यांना धारण करतो आणि आकाशाच्या दूरवरच्या प्रदेशात, तारकाशून्य अंतरीक्षात, त्यांना आलिंगन देतो."

पोरफीरीने (Porhyry) आपल्या ग्रंथात सुप्रसिद्ध तत्त्ववेत्त्यांची खगोलविषयक मते प्रतिपादिली आहेत. तो म्हणतो, पायथागोरस (Pythagores) आणि दिओजिनस (Deogenes) यांनी सांगितल्याप्रमाणे, अंतरीक्षात आकार घेऊन, सुस्वर निर्माण करीत नक्षत्रे व ग्रह भ्रमण करीत आहेत. त्यांचे स्वर सदैव स्थिर असतात आणि ते आपल्या अद्वितीय निराकार निर्मात्याचे स्मरण करून देतात. असे म्हणतात की, दिओजिनसची श्रवणशक्ती इतकी प्रबळ होती की, तो आणि केवळ तोच, आकाशचक्राच्या गतीचा ध्वनी ऐकू शकत असे."

हे सर्व उल्लेख म्हणजे सुस्पष्ट विवेचन नसून केवळ संकेत आहेत. विज्ञानाच्या आधारे त्यांचे सुव्यवस्थित विवरण करता येईल. ज्याने यातील संपूर्ण सत्याचे योग्य रीत्या आकलन केले नाही, अशा या तत्त्ववेत्त्यांपैकी एका उत्तरकालीन तत्त्ववेत्त्याने म्हटले आहे, "दृष्टीचा संबंध जलाशी, श्रवणाचा वायूशी, घ्राणाचा अग्नीशी आणि आस्वादाचा संबंध पृथ्वीशी असून स्पर्शाचा संबंध त्या पदार्थाशी आहे जो आत्म्याच्या संयोगाने त्याला लाभत असतो. मला वाटते की, या तत्त्वज्ञाने ओल्या वस्तू व त्यांचे विविध प्रकार यांच्याविषयी ऐकले असावे आणि म्हणूनच त्याने दृष्टीचा संबंध जलाशी असल्याचे प्रतिपादन केले असावे. धूम्र आणि सुगंध यांच्या अन्योन्य संबंधामुळे त्याने गंध आणि अग्नी यांचा संबंध जोडला असून आणि आहारामुळे त्याने आस्वादाचा संबंध पृथ्वीशी जोडला असावा आणि स्पर्शासाठी त्याला आत्म्याची आवश्यकता भासली असावी.

या सर्व मूलतत्त्वांचा परिणाम म्हणजे प्राणिमात्र होय. हिंदू लोक वनस्पतींनाही सजीव

प्राण्यांचाच एक वर्ग मानतात. वनस्पती इष्टानिष्ट विवेक करू शकत असल्याने ते सज्ञान असल्याचे प्लेटोनेही म्हटले आहे. प्राणिमात्रांना ज्ञानेंद्रिये असतात आणि हाच प्राणिमात्र आणि पाषाण यांतील फरक आहे.

१५–१९ इंद्रियाणी

पंच ज्ञानेंद्रियांना 'इंद्रियाणी' असे म्हणतात– ऐकण्यासाठी कान, पाहण्यासाठी डोळे, वास घेण्यासाठी नाक, आस्वाद घेण्यासाठी जीभ आणि स्पर्शासाठी त्वचा अशी ही पंच ज्ञानेंद्रिये आहेत.

२० मनस्

यानंतर इच्छेचा क्रम येतो. इच्छा इंद्रियांना आदेश देऊन त्यांच्याकडून विविध कार्ये करून घेते. तिचे वसतिस्थान आहे हृदय, यासाठीच तिला 'मनस्' असे म्हणतात.

२१–२५ कर्मेंद्रियाणी

पशुप्रकृती पाच आवश्यक व्यापारांनी प्रकट होत असते. त्यांना ते 'कर्मेंद्रियाणी' किंवा कर्म करण्याची इंद्रिये म्हणतात. यापूर्वी उल्लेखिलेल्या इंद्रियाद्वारा ज्ञान प्राप्त होते तर ही इंद्रिये कार्य करतात. त्यांना आपण 'आवश्यक इंद्रिये' म्हणतो. या इंद्रियांची कार्ये अशी आहेत :

१) मानवाच्या इच्छापूर्तीसाठी ध्वनी निर्माण करणे.

२) एखादी वस्तू जवळ घेण्यासाठी वा ती दूर फेकण्यासाठी हातांचा उपयोग करणे.

३) एखादी वस्तू शोधण्यासाठी चालणे किंवा तिच्यापासून दूर जाण्यासाठी पळणे.

४–५) पोषणाच्या द्रव्यातील अनावश्यक भाग शरीरातील दोन छिद्रांवाटे बाहेर टाकणे.

हे सर्व मूळ पदार्थ २५ आहेत :–

१) पुरुष

२) अव्यक्त

३) व्यक्त

४) अहंकार

५, ६, ७, ८, ९) पंचतन्मात्र

१०, ११, १२, १३, १४) आदि पंचमहाभूते

१५, १६, १७, १८, १९) ज्ञानेंद्रियें

२० ) मनस्

२१, २२, २३, २४, २५ ) कर्मेंद्रिये.

या सर्वांच्या समूहास ‘ तत्त्व ’ म्हणतात. सर्व ज्ञान यातच साठवले असल्याने पाराशरपुत्र व्यास म्हणतो, “ या पंचवीस पदार्थांची लक्षणे, त्यांचे भेद, आणि प्रकार यांचे अध्ययन न्यायशास्त्रातील एखाद्या सिद्धान्ताप्रमाणे निश्चित्त तथ्य मानून करावे. केवळ ते मुखपाठ करून त्यांचे अध्ययन करू नये. त्यानंतर तुम्ही कोणत्याही धर्माचे अनुसरण केले तरी तुम्हाला मुक्ती प्राप्त होईल. ”

४

# कर्मकारण आणि आत्मा-प्रकृति-संबंध

शरीरात जीव व आत्मा नसल्यास त्यात स्वतंत्र कर्माची प्रकृती निर्माण होत नाही. हिंदू लोकांची अशी समजूत व श्रद्धा आहे की, आत्म्यास स्वतःच्या अनिवार्य अस्तित्वाची किंवा आपल्या भौतिक आधाराची जाणीव नसते. जे अज्ञात आहे, ते जाणण्याची इच्छा आत्म्यात असते. आत्म्याच्या अस्तित्वासाठी देहाची आवश्यकता असते, अशीही हिंदू लोकांची धारणा आहे. आत्मा मंगलमय शाश्वत स्थितीसाठी आणि अज्ञाताच्या ज्ञानासाठी धडपडत असतो. या इच्छेमुळेच त्याचा प्रकृतीशी संयोग होतो. जोपर्यंत अतिसूक्ष्म व अतिस्थूल द्रव्यांचा संयोग साधणारे माध्यम नसते तोपर्यंत ती दोन्ही द्रव्ये एकत्र येऊ शकत नाहीत. उदा० जल आणि अग्नी ही विरोधी द्रव्ये असून वायू त्या दोहोंतील माध्यम असते. अग्नीत आणि वायूत विरलेल्या संदर्भात साम्य असून वायूत आणि जलात घनतेच्या संदर्भात साम्य असते. यासाठीच जल आणि अग्नी या दोन्ही द्रव्यांत वायू हे माध्यम आहे. साकार व निराकार यांत परस्परविरोध आहे. यासाठी आपल्या आकांक्षापूर्तीसाठी आत्म्यास प्रेतात्म्यासारख्या समान माध्यमाची आवश्यकता असते. हे माध्यम भूर्लोक, भुवर्लोक आणि स्वर्लोक यांत मूल मातांपासून निर्माण होते. सामान्य पंचतत्वांपासून सिद्ध झालेल्या शरीराशी याचे वेगळेपण दर्शविण्यासाठी हिंदू लोक याचा उल्लेख सूक्ष्म शरीर असा करतात. ज्याप्रमाणे सूर्य पृथ्वी आक्रमितो, त्याप्रमाणे आत्मा सूक्ष्म शरीर आक्रमितो. आत्मा सूक्ष्म शरीराचा वाहनासारखा उपयोग करतो. सूर्य एकच असतो तथापि त्याच्यासमोर ठेवलेल्या अनेक आरशांत आणि पाणी भरलेल्या घागरीत त्याची सारखीच प्रतिबिंबे दिसत असतात. उष्णता व प्रकाश देण्याचा त्याचा प्रभाव या सर्वांत सारखाच जाणवतो.

विविध शरीरे विविध घटकांनी बनली आहेत. अस्थी, रक्तवाहिन्या, आणि वीर्य हे नर-घटक मांस, रक्त आणि केस या नारी घटकांशी संयोग पावतात तेव्हा शरीर बनते. (ते जीवत्व स्वीकारण्यायोग्य होते.) असे झाले की आत्मा त्यात प्रविष्ट होतो. दुर्गांचा किंवा प्रासादांचा सम्राटांना जसा उपयोग होतो तसाच शरीराचा

आत्म्यास होतो. अधिक प्रगत अवस्थेत पंचवायू देहात प्रवेश करतात. त्यांपैकी पहिल्या दोन वायूंनी अनुक्रमे श्वसन व उच्छ्वसन या क्रिया घडतात. तिसऱ्यामुळे आतड्यांतील खाद्य पदार्थांचे मिश्रण होते. चौथा वायू शरीरास एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जातो आणि पाचवा वायू ज्ञानेंद्रियांच्या संवेदना शरीराच्या एका भागापासून दुसऱ्या भागापर्यंत घेऊन जातो.

हिंदूंच्या मतानुसार येथे उल्लेखिलेल्या या आत्म्यात भिन्नत्व नसते. त्यांचे स्वरूप मूलतः एकच असते. तथापि ज्या देहाशी त्यांचा संबंध येतो त्यानुसार व त्यांच्या सत्व, रज, तमादी गुणांनुसार या आत्म्याच्या व्यक्तिगत लक्षणांत आणि व्यवहारांत भेद आढळतो. त्यांच्यातील वर उल्लेखिलेले गुण एकमेकांवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी धडपडत असतात. ईर्ष्या आणि क्रोध या विकारांमुळे या त्रिगुणांतील संतुलन बिघडते. हे आत्म्याच्या कर्मप्रवणतेचे सर्वश्रेष्ठ कारण आहे.

याच्या उलट, त्याचे नीचतम कारण प्रकृतीची पूर्णत्वाप्रत जाण्याची अभिलाषा हे होय. जी गोष्ट कमी चांगली आहे तिच्यापेक्षा जी गोष्ट अधिक चांगली आहे ती प्राप्त करण्याचा प्रकृती प्रयत्न करीत असते. मिथ्या पदलालसा आणि महत्त्वाकांक्षा हे तिचे स्वाभाविक गुण आहेत. ती आपली सारी शक्ती एकवटून नाना रूपे धारण करते आणि आपल्या शिष्याला—आत्म्याला सर्व प्रकारच्या प्राण्यांच्या व वनस्पतींच्या शरीरांत फिरविते. हिंदू लोक आत्म्याला एक कला-निपुण नर्तकीची उपमा देतात. आपल्या प्रत्येक हावभावाचा आणि मुद्रेचा काय परिणाम होईल, याची तिला पूर्ण कल्पना असते. कलेचा आस्वाद लुटायला उत्सुक असलेल्या विषयी पुरुषापुढे ती उभी आहे. ती आपल्या कलेची विविध रूपे त्याच्यासमोर क्रमशः प्रकट करते. तो विषयी पुरुष तिच्या कलेची सातत्याने दाद देतो. शेवटी नृत्य थांबते आणि दर्शकही संतुष्ट होतो. आणि तिचे नृत्यही एकदम थांबते कारण ती आता पुनरावृत्तीशिवाय दुसरे काही करू शकत नाही, आणि त्या दर्शकालाही तेच एकदा पाहिलेले नृत्य पुन्हा पाहावयाचे नसते. त्यासाठी तो तिला जाण्याची अनुमती देतो. याबरोबरच कर्माचीही समाप्ती होते. या प्रकारच्या संबंध-समाप्तीची तुलना पुढील उदाहरणाशी करता येईल :

एका वनात काही प्रवासी प्रवास करीत होते. त्यांच्यावर दरोडेखोरांच्या एका टोळीने हल्ला केला. त्या प्रवाशांत एक आंधळा होता व एक पांगळा होता. या दोघांव्यतिरिक्त बाकीचे सारे प्रवासी इतस्ततः पळून गेले. पांगळा आंधळ्याला म्हणाला, 'मी चालू शकत नसलो तरी तुला मार्ग मात्र दाखवू शकेन. तुझी अवस्था याच्या उलट आहे. तेव्हा तू मला आपल्या खांद्यावर घे. मी तुला मार्ग दाखवीन आणि आपण दोघेही या संकटातून आपली सुटका करून घेऊ. आंधळ्याने तसे केले. त्या दोघांनी एकमेकांना साहाय्य केले आणि वनातून बाहेर पडल्यावर त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला. अशा प्रकारे त्यांची ताटातूट झाली.

हिंदू लोक कार्याचे वर्णन अनेक प्रकारांनी करतात, हे यापूर्वी आम्ही सांगितलेच आहे. 'विष्णुपुराणा'त म्हटले आहे, 'प्रकृती हे जगाचे आदिकारण आहे. ज्याप्रमाणे वृक्ष हेतुतः आपले बीज पेरत नाही, त्याच्या उपजत प्रवृत्तीमुळेच तो बीज पेरतो. किंवा वाऱ्याला केवळ वाहायचेच असते पण उपजत प्रवृत्तीमुळे तो अग्नी विझवतो, त्याचप्रमाणे प्रकृतीदेखील उपजत प्रवृत्तीमुळेच कर्म करते. स्वेच्छाधीन कर्म हे केवळ विष्णूचेच असते. येथे शेवटच्या वाक्यात, प्रकृतीपेक्षा श्रेष्ठ असलेले चैतन्य तत्त्व (परमात्मतत्त्व) ग्रंथकारास सूचित करावयाचे आहे. ज्याप्रमाणे एखादा मित्र आपल्या मित्राचे कार्य कोणत्याही अपेक्षेने करीत नाही, अत्यंत परिश्रमाने व प्रेमाने तो मित्रकार्य करतो, याप्रमाणे या चैतन्य–तत्त्वासाठी प्रकृती कर्म करते.

यावर मानीने म्हटले आहे,

"जेव्हा जड जगताच्या जीवनाविषयी येशूला विचारले तेव्हा तो म्हणाला, जडतत्त्वाशी चैतन्य-तत्त्व मिसळलेले आहे, जडतत्त्वापासून चैतन्य–तत्त्व विलग केले की जड जगत निर्जीव, चेतनारहित होते, तसे चैतन्य–तत्त्वाचे नाही, ते विलग झाले तरी चेतनारहित, निर्जीव होत नाही, ते कधी मृत्यू पावत नाही, त्यात शाश्वत सामर्थ्य असते."

सांख्यदर्शन प्रकृतीपासून कर्माची उत्पत्ती होते, असे मानते. प्रकृतीच्या नाना रूपांतील वेगवेगळेपणाचे कारण तिच्यातील आदिगुण हे होत, यातील काही गुण कमीजास्त प्रमाणात असतात व हेच या वेगळेपणाचे कारण होय. हे त्रिगुण दैवी, मानवी व पाशवी असून ते [ आत्म्याचे नसून ] प्रकृतीचे असतात. प्रकृतीच्या कार्याचे अवलोकन करून त्यासंबंधीचे ज्ञान प्राप्त करणे हे आत्म्याचे कार्य होय. एखादा वाटसरू गावात येतो व तेथे एखाद्या ठिकाणी बसून तो काही काळ विश्रांती घेतो. गावकरी आपापली भली-बुरी कामे करीत असतात. तो वाटसरू त्याचे दुरून अवलोकन करतो, आणि त्यांपासून काही बोध घेतो. गावकऱ्यांच्या या कामांत तो मुळीच सहभागी होत नाही. असे असूनही तो वाटसरू या अवलोकनात व ज्ञानग्रहणात मग्न असतो, गावकऱ्यांच्या विविध कर्मांचे कारण हा वाटसरू नसतो. तसेच आत्म्याचे असते.

कर्माशी आत्म्याचा काहीही संबंध नसतानाही सांख्यदर्शन आत्म्याचा आणि कर्माचा विशिष्ट संबंध असल्याचे मानते. प्रवासात एका वाटसराची काही अनोळखी लोकांशी भेट होते व ते सारे मिळून वाटचाल करू लागतात. हे अनोळखी लोक दरोडेखोर असतात. ते एक गाव लुटून आलेले असतात. तो माणूस त्या दरोडेखोरांच्या टोळीबरोबर थोडीफार वाटचाल करतो. तोच दरोडेखोरांनी जे गाव लुटलेले असते. त्या गावातील लोक येतात व त्या सर्वांना घेरतात. दरोडेखोरांबरोबर त्या निरपराध माणसालाही ते धरतात व दरोडेखोरांबरोबर त्यालाही शिक्षा करतात. कोणताही अपराध न करताही त्या निष्पाप मनुष्याला दरोडेखोरांबरोबर शिक्षा भोगावी

लागते. येथे निरपराध मनुष्याचा दरोडेखोरांच्या कर्माशी जो संबंध आहे तोच आत्म्याचा प्रकृतीच्या कर्माशी आहे.

आत्मा आकाशात सतत एकाच रूपात बरसणाऱ्या पावसाप्रमाणे असतो, असे लोक म्हणतात. सोने, चांदी, काच, माती, चिकणमाती किंवा खारी माती यांच्यापासून तयार केलेल्या भांड्यात हे पाणी ठेवल्यास प्रत्येक भांड्यातील रूप-रस-गंधादी बाबतीत फरक आढळतो. याप्रमाणे, आत्म्याचा प्रकृतीवर एका गोष्टीशिवाय कोणताच परिणाम होत नाही. आणि ती गोष्ट म्हणजे प्रकृतीच्या संसर्गात आल्याने तो तिला जीवनप्रदान करतो, ही होय. त्रिगुणातील प्रधान गुणानुसार, अन्य दोन गुणांच्या पारस्परिक सहकार्यामुळे, प्रकृती जी कर्मे करते त्यात वेगवेगळेपण आढळते त्रिगुणांचे हे सहकार्य ताजे तेल, वाळलेली वात आणि अग्नी यांच्या परस्पर-सहकार्याप्रमाणे असते. त्या सर्वांच्या सहकार्याने प्रकाशाची निर्मिती होते. प्रकृतीमधील आत्मा रथाच्या सारथ्या-प्रमाणे असतो. इंद्रियांच्या साहाय्याने तो हा रथ स्वेच्छेनुसार चालवितो. परमेश्वराने दिलेल्या बुद्धीप्रमाणे आत्मा कार्य करतो. बुद्धीमुळे पदार्थांच्या यथार्थ रूपाचे ज्ञान होते आणि तीच ब्रह्मविद्येचा मार्ग दाखविते. प्रशंसनीय व शुभ कार्यांनाही ही बुद्धीच प्रेरणा देते, असे हे [ हिंदू ] लोक मानतात.

## ५

# आत्म्याचे भ्रमण आणि पुनर्जन्म

" परमेश्वर हा एकच आहे, त्याशिवाय दुसरा कोणताही ईश्वर नाही आणि मुहम्मद हा त्याचा प्रेषित होय " हे मुसलमानांचे, संकेतत्रयी (Trinity) हे खिश्चनांचे 'सबाथ' हे ज्यूंचे आणि पुनर्जन्म हे हिंदूचे महत्त्वाचे धर्मतत्त्व होय. पुनर्जन्मावर ज्यांचा विश्वास नाही, ते अहिंदू आहेत, असे ते (हिंदू लोक) मानतात.

आत्मा हा काही कारणांस्तव भ्रमण करीत असतो. त्यास पुनर्जन्मही प्राप्त होतो, अशी हिंदूंची समजूत आहे. यासंबंधी त्यांच्या विचारांचा अनुवाद पुढे केला आहे.

" अत्युच्च कोटीचे ज्ञान प्राप्त केल्याशिवाय आत्म्यास ऐहिक गोष्टीचे यथार्थ स्वरूप कळत नाही. यासाठी त्याला या सर्व ऐहिक वस्तूंचे व त्यांच्या विविध अवस्थांचे नीट परीक्षण करावे लागते. या वस्तूची संख्या अपरिमित असल्याने त्यांच्याविषयी चिंतन करण्यासही आत्म्यास बराच कालावधी लागतो. या चिंतनातून त्यास वस्तूसंबंधीचे वा ऐहिक गोष्टीसंबंधीचे नवीन, यथार्थ ज्ञान प्राप्त होते.

तथापि प्रत्येक आत्म्यास ही गोष्ट चटकन साध्य होईलच असे नाही. तीन मूलभूत प्रवृत्तींनुसार आत्म्यांच्या कर्मामध्येही परिवर्तन होत असते मात्र यावरून जगरहाटी ही अनियंत्रित असते असे म्हणता येणार नाही. जगरहाटीवरही कुणाचे तरी (म्हणजे ईश्वराचे) नियंत्रण असून त्यानुसारच जगातील कारभार चाललेले असतात व जग एका नियत दिशेने वाटचाल करीत असते. यानुसारच क्षर देहामध्ये अक्षर आत्मे वास्तव्य करून चांगली किंवा वाईट कर्मे करीत असतात. या कर्मांचा चांगला किंवा वाईट परिणाम कसा होतो, हे दर्शविण्यासाठीच स्वर्ग आणि नरक या स्थानांचा निर्देश करण्यात येतो. पुण्यवान आत्म्यास स्वर्ग आणि पापात्म्यास नरक प्राप्त होतो असे सांगण्यामध्ये त्यास पुण्यकृत्ये करण्याकडे प्रवृत्त करावयाचे असते व पापकृत्यांपासून परावृत्त करावयाचे असते.

आत्म्याचे हे स्थलांतर कनिष्ठ स्थलापासून उच्चतर स्थलाकडे होत असते. याउलट प्रक्रिया मात्र घडत नाही. जीवाच्या कर्मांच्या बरे वाईटपणानुसार त्यास श्रेष्ठ वा कनिष्ठ स्थान प्राप्त होते.

जेव्हा आत्म्यास देहापासून मुक्ती मिळते तेव्हा ध्येयप्राप्तीचा पहिला टप्पा आत्म्याने गाठलेला असतो आणि जेव्हा काही ज्ञान प्राप्त करावयाचे शिल्लक राहिलेले नाही अशी अवस्था प्राप्त होते त्यावेळी त्यांचे अंतिम उद्दिष्ट साध्य होते. त्याचवेळी आत्म्याचे हे भ्रमणही थांबते. हे ज्ञान संपादन केल्यानंतरच देहाचे, ऐहिक वस्तूंचे आणि त्यापासून मिळणाऱ्या सुखाचे वैय्यर्थ्यही त्याच्या लक्षात येते. असे झाले, की आत्मा हा वस्तुजातापासून किंवा 'ऐहिका' पासून परावृत्त होऊ लागतो आणि त्यामुळे त्याचा ऐहिक तत्त्वाचा संबंध संपुष्टात येतो

आत्मा स्वगृही परत येतो. त्यावेळी अर्थातच अशा प्रकारे ज्ञेय, ज्ञान आणि ज्ञाता यांच्यातील वेगळेपणा मुळीच उरत नाही कारण त्या सर्वांमध्येही एक प्रकारचा अभेद प्रस्थापित झालेला असतो.

या मताच्या स्पष्टीकरणासाठी प्रथमतः हिंदूंच्या साहित्यातील आधारभूत प्रमाणे उद्धृत करून त्यासंबंधी अन्य राष्ट्रांत प्रचलित असलेल्या मतांचाही परामर्श घेऊ.

अर्जुनाने युद्धासाठी प्रवृत्त (सिद्ध) व्हावे म्हणून वासुदेव त्यास म्हणतो, "भावी गोष्टी या पूर्वनियोजितच असतात. या तत्त्वावर तुझा विश्वास असल्यास आपले प्रतिपक्षीय व आपण यांपैकी कुणीही मर्त्य नाही हे तुझ्या लक्षात सहज येईल. कारण आत्मे हे अमर असून त्यात परिवर्तन होत नाही. ते एका देहातून दुसऱ्या देहात केवळ स्थलांतर करतात. या देहात शैशव, यौवन आणि वार्धक्य अशी विविध प्रकारची स्थित्यंतरे होतात. वार्धक्याची ही अंतिम अवस्था म्हणजे त्या देहाचा विनाश होय. (आत्म्याचा नव्हे). देहापासून मुक्ती मिळाल्यावर व ज्ञानप्राप्तीनंतर आत्मा स्वस्थानी परत जातो.

जर आत्मा हा मुळातच शाश्वत, जन्म–मृत्यु–विरहित आहे तर आपण मृत्यूचा विचार करणे कितपत उचित ठरेल ! त्यास कुणीही कापू शकत नाही, जाळू शकत नाही किंवा बुडवूही शकत नाही. वायू त्यास उधळून लावू शकत नाही. ज्याप्रमाणे अंगावरील वस्त्र जीर्ण झाले की आपण ते टाकून देतो व नवीन वस्त्र घेतो, त्याप्रमाणे देह जीर्ण झाला की आत्मा दुसऱ्या देहात प्रवेश करतो. (आत्म्याचे भ्रमण हे अशा प्रकारेच चाललेले असते.) तेव्हा जो (आत्मा) अक्षर आहे तो नष्ट होईल त्याबद्दल तू शोक का करतोस ! आणि समज, तो क्षर असता तरी (त्यातील क्षरत्वाच्या वैगुण्यामुळे) त्याचा त्याग करणेच इष्ट ठरले नसते काय ! तथापि आत्म्याऐवजी तुला देहाचेच अधिक आकर्षण वाटत असल्यास आणि तो मृत्यूमुळे तो नष्ट होईल अशी चिंता वाटत असल्यास, जे जे जन्मले आहे ते कधी ना कधी तरी नष्ट होणारच आहे आणि जे नष्ट होते, ते पुन्हा जन्मही घेत असते, हे तू लक्षात ठेव. वस्तुतः, जन्म आणि मृत्यू या गोष्टींशी तुझा काहीच संबंध नाही. त्या परमेश्वराधीन आहेत आणि त्यामुळे तू त्याच्याबद्दल चिंता करण्याचे कारण नाही."

अर्जुनाने ब्रह्माविषयी माहिती विचारली. त्याच्यामध्ये व मानव अवतार धारण केलेल्या कृष्णामध्ये भेद काय, असेही त्याने विचारले. तेव्हा वासुदेव म्हणाला, ' चिरन्तनत्व हे ब्रह्मामधील व आपणा उभयतांतील समान तत्त्व होय. आपण किती तरी वेळा एकत्र राहिलो आहोत, याची कल्पना तुला नसली तरी मला ती निश्चितपणे आहे. माझ्यामध्ये व ब्रह्मात अभेद आहे. तथापि जगाचे कल्याण करण्यासाठी मला अवतार धारण करावा लागतो. अशा वेळी मी एखाद्या देहात प्रवेश करतो. मानव-देह धारण केल्याशिवाय मनुष्यत्व कसे प्राप्त होणार !"

एका राजासंबंधी पुढील आख्यायिका सांगतात : (या राजाचे मला नाव आता आठवत नाही.) ज्या ठिकाणी कुणाचेही प्रेत पुरलेले नाही अशा ठिकाणी आपले शव पुरावे अशी आज्ञा त्याने आपल्या मृत्यूपूर्वी आपल्या सेवकांना दिली. त्याच्या सेवकांनी अशा प्रकारच्या जागेचा खूप खूप शोध केला पण त्यांना तशी जागाच कोठे आढळली नाही. शेवटी समुद्रातून वर आलेला एक खडक पाहिल्यावर त्यांना वाटले की राजाला पुरण्यासाठी ही जागा सोयीची आहे. यावेळी वासुदेव त्यांना म्हणाला,

"या राजाला याच खडकावर किती तरी वेळा जाळण्यात आले आहे. तथापि तुम्हाला हवे ते तुम्ही करू शकता कारण अशा प्रकारची आज्ञा देऊन राजाला जे तत्त्व तुमच्या मनावर बिंबवायचे होते, ते आता तुमच्या लक्षात आलेच आहे."

पुनर्जन्म आणि मुक्ती यासंबंधी विवेचन करताना वासुदेव म्हणतो, "या जगातून सुटका करून घेण्याची व मोक्षप्राप्तीची इच्छा ज्यांच्या मनात असते, पण जे त्या इच्छेनुसार कर्म करीत नाहीत, त्यांना त्यांच्या या सदिच्छेबद्दल चांगले फळ मिळते. तथापि त्यांना त्यांचे उद्दिष्ट, मात्र साध्य करता येत नाही. त्यासाठी त्यांना पुनर्जन्म घ्यावा लागतो. त्यांना बहुधा परमेश्वराच्या भक्तांच्या रूपाने पुन्हा जन्म प्राप्त होतो. त्या जन्मी ते आपले ईप्सित ध्येय प्राप्त करण्यांचा अहर्निश प्रयत्न करतात. उत्तरोत्तर वेगळे देह धारण करीत इच्छा व कृती यांची सांगड घालण्याचाही ते प्रयत्न करतात. अशा प्रकारे शेवटी त्यांना मुक्ती मिळते.

जोपर्यंत आत्मा हा 'ऐहिका'च्या बंधनाने बांधलेला असतो, तोपर्यंत तो 'अ–ज्ञान' (ज्ञानविरहित) असतो. तथापि जेव्हा तो त्यापासून मुक्त होतो, त्यावेळी तो ज्ञानी होतो. आपण ऐहिक वस्तुजाताचेच एक प्रतिनिधी आहोत आणि आपल्यासाठीच जगातील विविध गोष्टींची, कर्मांची योजना केलेली आहे, असे त्याला वाटू लागते. त्यामुळे तो त्यांनाच कवटाळतो. या स्वभावधर्माचे संस्कार त्याच्यावर उमटल्याशिवाय राहात नाहीत. जेव्हा आत्मा देहाचा त्याग करतो, त्यावेळी त्याच्यावर हे ऐहिक संस्कार शिल्लक राहतात. त्या संस्कारांच्या मूलस्थानाचेच त्याला विशेष आकर्षण वाटू लागते, ओढ वाटू लागते आणि तो तेथे परत जातो. आणि मग त्यावर तिन्ही

मूलभूत प्रवृत्तींचा पगडा बसल्यामुळे तो त्यानुसार वागू लागतो. अशा या पंख कापलेल्या अवस्थेत बिचारा ' अ–ज्ञान ' व ' असंस्कृत ' प्रवाहपतित आत्मा तरी आणखी काय करणार ?

जो परमेश्वरावर प्रेम करतो व परमेश्वर ज्याच्यावर प्रेम करतो तोच सर्वश्रेष्ठ मानव होय. ( आपले ध्येय साध्य करण्यासाठी तो कितीतरी वेळा जन्म घेतो आणि मृत्यू पावतो. अहर्निश परिश्रम करून तो स्वतःला परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतो. ( अलौकिक आत्मेही पुनःपुन्हा प्रकट होतात. )"

' विष्णुधर्मा 'त मार्कण्डेयाने ब्रह्मन्, कार्तिकेय, लक्ष्मी, दक्ष, महादेवाची पत्नी उमा हे दिव्य आत्मे या कल्पाच्या मध्यकालात अस्तित्वात असून ते यापूर्वीही रूपात अनेक वेळा प्रकट झाले आहेत, असे म्हटले आहे.

पूर्वकृत्यामुळे पुनर्जन्म प्राप्त होतो याविषयी वराहमिहिरानेही उल्लेख केला आहे. धूमकेतू आणि त्याचे परिणाम या संबंधी माहिती सांगत असताना तो म्हणतो, धूमकेतू प्रकट झाल्यामुळे लोकांना आपली घरेदारे सोडून परागंदा व्हावे लागते व अतोनात कष्ट सोसावे लागतात. त्या कष्टामुळे ते कण्हतात, कुंथतात आणि रडकुंडीला येतात. आपल्या पोराबाळांना हाताशी धरून मार्ग चोखाळीत ते दीनवाणेपणाने हिंडतात आणि एकमेकांना अत्यंत हलक्या आवाजात म्हणतात, " आपल्या राजाने केलेल्या पापांची फळे आपल्याला भोगावी लागत आहेत.. " त्या वेळी इतर लोक त्यांना म्हणतात, " छे ! यात राजाचा काय संबंध ? आपण पूर्वजन्मी केलेल्या पापांची फळंच आपण येथे भोगीत आहोत. "

' मानी ' नामक पंडितानेही पुनर्जन्मासंबंधी माहिती सांगितली आहे. जेव्हा त्याला ईरानशहरातून हद्दपार केले तेव्हा तो भारतात आला. येथे त्याने हिंदूंच्या पुनर्जन्माविषयी सिद्धान्ताचे अध्ययन केले आणि तो विचार त्याने आपल्या विचार-प्रणालीतच समाविष्ट करून घेतला. 'आपल्या गूढ सिद्धांतांसंबंधीच्या ग्रंथात तो म्हणतो, " आत्मे हे अमर असून ते भ्रमण करीत असतात. ते कोणत्याही प्राण्याच्या देहाचा आकार घेतात हे अपासलस् यास माहीत असल्याने त्यांनी येशूला विचारले, " ज्या आत्म्यांना चिरंतन सत्याचे ज्ञान झालेले नाही किंवा ज्यांना आपल्या अस्तित्वाचे आदिकारणही उमगले नाही, त्यांना कोणती गती प्राप्त होणार ? " यावर येशूने उत्तर दिले, " ज्या दुर्बल आत्म्याला स्वतःच्या यथार्थ स्वरूपाचे व अन्तिम सत्याचे ज्ञान झालेले नाही त्याला चिरशांती प्राप्त होणार नाही आणि त्याला दुःख भोगावे लागेल." ' येथे ' दुःख भोगणे ' म्हणजेच ' शिक्षा भोगणे ' असे मानीला सूचित करावयाचे आहे. या ठिकाणी त्या आत्म्याचा विनाश होतो असे त्याला म्हणावयाचे नाही. हीच गोष्ट मानी याने आणखी एका ठिकाणी केलेल्या विवेचनावरूनही स्पष्ट होते. तो म्हणतो, " बर्दसानसच्या मताचा पुरस्कार करणारे लोक म्हणतात की जिवंत आत्मा उत्थापनाचा

प्रयत्न करतो आणि त्याचे शुद्धीकरण मात्र शवात होते. वस्तुतः शव हाच त्याचा शत्रु किंवा त्याच्यासाठी निर्माण केलेला एक तुरुंग आहे, ही गोष्ट त्याला ठाऊक नसते. मानव देहाला खरेखुरे अस्तित्व असते तर या देहाच्या निर्मात्याने त्याला अशा प्रकारे क्लेश सहन करू दिले असते काय? गर्भातील बीजातून पुन्हा जन्म घेण्याची सक्ती केली असती का? मुळीच नाही."

पुनर्जन्माविषयी पतंजलीच्या लेखनातही उल्लेख आढळतो. यासंबंधीचा त्याच्या ग्रंथातील उताराच पुढे उद्धृत करीत आहे—

ज्याप्रमाणे तांदळाच्या दाण्यावर टरफलासारखे आवरण असते, त्याचप्रमाणे आत्म्यावरही अज्ञानाचे आवरण असते. जोपर्यंत तांदळावर हे आवरण असते, तोवर त्यात जन्मापासून पुनर्जन्मापर्यन्तच्या सर्व अवस्था आपल्याला आढळतात. हे आवरण काढून टाकल्यास त्यात भिन्न भिन्न अवस्थांचा प्रत्यय येणार नाही. तो मूळ अवस्थेतच कायम राहील. या तांदळाप्रमाणे आत्म्याचीही अवस्था असते. त्याच्यावरील अज्ञानावरण काढून टाकल्यास त्याचे विविध अवस्थांतील भ्रमण थांबते. आत्म्यास जे फळ मिळते, ते तो ज्या देहात वास्तव्य करून राहिला होता, त्याच्या कर्मानुसार मिळते."

यावर पुन्हा शिष्य गुरूस विचारतो,

"ज्या आत्म्याने कर्म केलेले असते तथापि त्यास त्याच्या कर्माचे फळ मात्र मिळत नाही, अशा वेळी तो कोणत्या अवस्थेत असतो?"

तेव्हा गुरु म्हणतो, "त्या आत्म्याच्या पूर्वकृत्यानुसार त्यास भ्रमण करावे लागते, सुख आणि दुःख या दोन्ही अवस्थांच्या मध्ये तो हेलकावे खात असतो व शेवटी त्यास सुख किंवा दुःख प्राप्त होते."

तेव्हा शिष्य गुरूला विचारतो, एकाद्या विशिष्ट देहावस्थेमध्ये एकाद्या जीवाने काही कर्म केले असेल, त्याचे फल मिळण्यास बराच कालावधी असेल आणि याच वेळी भौतिकतत्त्वाचे–वस्तुजाताचे–ही त्याला विस्मरण झाले असेल तर या मधल्या काळात त्याची अवस्था कशी असते?

यावर गुरु म्हणतो, "येथे देह का केवळ साधनभूत असून कर्म ही त्यामुळे निर्माण झालेली गोष्ट होय. आत्म्यास चिकटून राहणे हा कर्माचा स्वभावधर्म होय. सर्व आत्मिक किंवा आध्यात्मिक गोष्टींच्या बाबतीत विस्मरण हे संभवतच नाही कारण या सर्व गोष्टी कालातीत असतात. कर्म हे आत्म्याशी निगडित असल्याने ते त्याच्या पुढील अवस्थेला अनुरूप असे वातावरण निर्माण करते व त्यानुसार आत्म्याच्या स्वभावाधर्मातही परिवर्तन होऊ लागते. आत्मा हा मुळातच पवित्र असल्याने त्याला स्वतःच्या मूळ स्वरूपाचा कधीच विसर पडत नाही तथापि त्यावर देहाचे आवरण आल्याने तो जोपर्यन्त देहाशी संबद्ध असतो तोपर्यन्त देहाच्या स्वभावधर्माच्या मलिन

आवरणाने आत्म्याचे तेज झाकळू लागते. एखाद्या माणसाला एखाद्या गोष्टीच्या यथार्थ स्वरूपाची कल्पना असूनही वेड लागल्यामुळे, आजारपणामुळे किंवा मद्यपानामुळे ज्ञानेंद्रियांवरील ताबा सुटल्याने त्यास त्या गोष्टीच्या यथार्थ स्वरूपाची त्या विशिष्ट अवस्थेमध्ये आकलन होत नाही, तसेच यावेळी आत्म्याच्या बाबतीतही घडते. ज्यावेळी "औक्षवंत हो बाळ" असे मोठी माणसे म्हणतात त्या वेळी लहान मुलांना आनंद वाटतो व "लवकर मरत देखील नाहीस कार्ट्या!" असे म्हणून ते त्यांना शिव्या देतात, त्यावेळी मुलांना अत्यंत वाईट वाटते, ही गोष्ट तुमच्या लक्षात आलीच असेल. वस्तुतः या अजाण बालकांना असे का वाटावे? त्यांनी पूर्वजन्मी आयुष्याचे सुख वा मृत्यूचे दुःख भोगले नसते तर त्यांना जन्म–मृत्यमधील सुखदुःखाची कल्पना आली असती काय?" (यावरून हिंदूंमध्ये पुनर्जन्माविषयी प्रचलित असलेल्या मताची कल्पना येईल.) हिंदूंच्या एतद्विषयक मतात आणि प्राचीन ग्रीकांच्या मतात बरेच साम्य आढळते. सॉक्रेटिस आपल्या Phaedo नामक ग्रंथात म्हणतो, " प्राचीन ग्रीक लोकांनी ज्या कथा सांगितल्या आहेत, त्यात आत्मा इहलोकातून यमलोकात आणि यमलोकातून इहलोकात येतो असे म्हटले आहे.

अशा प्रकारे मृत्यूतूनही पुन्हा जीवनाची निर्मिती होते आणि त्यामुळेच जे मृत आहेत तेच जिवंत आहेत असेही म्हणता येते. यमलोकातही आत्म्यांना स्वतःचे असे अस्तित्व असतेच. प्रत्येक आत्म्याला विशिष्ट गोष्टीमुळे सुख किंवा दुःख होते व त्याविषयी तो विचारही करीत असतो. यामुळे सुख किंवा दुःख यांचा एक प्रकारचा संस्कार त्याच्यावर होत असतो आणि ही विचारप्रवणता त्यास देहाच्या बंधनात बांधू लागते आणि त्यामुळेच आपण म्हणजेच विशिष्ट देहाकृती होय असे त्यास वाटू लागते.

जो आत्मा अपवित्र असतो त्यास यमलोकातही प्रवेश मिळत नाही. आपल्या देहाचा त्याग करून तो घाईघाईने आपल्यासारख्याच प्रवृत्तीच्या व स्वभावधर्माच्या दुसऱ्या एखाद्या देहात प्रवेश करतो. त्यामुळे त्याला सत्प्रवृत्त आत्म्यांचा सहवासच लाभत नाही (आणि त्यामुळे त्याला आपल्या कर्माचे प्रायश्चित्त घेण्याचीही संधी लाभत नाही.)

आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व मान्य केल्यास आपले ज्ञान म्हणजे दुसरे काहीही नसून पूर्वी आपण जे शिकलो, त्याचीच एक प्रकारची आठवण किंवा स्मृती होय. कारण हा मानवदेह धारण करण्यापूर्वीही आपल्या आत्म्यांनी कोठेतरी वास्तव्य केलेलेच होते. बालपणात काही गोष्टींचे संस्कार आपल्यावर उमटतात व भावी आयुष्यात काही कारणामुळे त्या गोष्टींची आठवण आपल्याला होते. उदा. एखादी झांज पाहिल्यावर तशाच प्रकारची झांज वाजविणारा, आपण लहानपणी पाहिलेला, एखादा मुलगा आपल्याला आठवतो. तत्पूर्वी मात्र आपण त्या मुलाला विसरलेलो असतो तथापि त्या झांजेमुळे भावी आयुष्यातही आपल्याला त्या मुलाची आठवण होते. विस्मृतीमुळे

ज्ञानाचा लोप होतो आणि स्मृतीमुळे ज्ञानाचा पुनश्च उदय होतो, त्याची पुन्हा जाणीव होते. देह-प्रवेश करण्यापूर्वी आत्मा ज्या गोष्टी शिकलेला असतो तेच ज्ञान होय. देहावरणामुळे मात्र त्या गोष्टीवर, ज्ञानावर एक प्रकारचे सावट येते तथापि स्मृतीमुळे आत्मसात केलेल्या ह्या ज्ञानाचा पुढेमागे प्रत्यय येतोच."

प्रोक्लस म्हणतो, "स्मृती आणि विस्मृती ही आत्म्याचे जणू गुणधर्मच होत. मूलतः आत्म्याचे अस्तित्व चिरंतन स्वरूपाचे आहे, तो कालातीत आहे, हे स्पष्ट आहे. त्यास स्मृती असते आणि विस्मृतीही होते, या दोन्ही गोष्टी आपण येथे लक्षात घेतल्या पाहिजेत. जेव्हा तो देहपाशात बद्ध होतो, तेव्हा त्याला या ज्ञानाची विस्मृती होते."

जग हा एक निद्रिस्त आत्मा असून या इहलोकापलीकडील जग म्हणजे जागृत आत्मा होय, असा जो सिद्धान्त सूफी लोक प्रतिपादितात, त्याचे वरील मताशी बरेच साम्य आहे, असे दिसून येईल. त्यांच्या मतानुसार ईश्वर हा विशिष्ट ठिकाणी असतो, (स्वर्गातील सिंहासन हे ईश्वराचे आसन होय व तेथे ईश्वराचे अस्तित्व असते) असे त्यांचे मत आहे. तथापि प्राणी वनस्पती व निर्जीव वस्तू इ. सर्व चराचरांतच ईश्वर हा भरून उरलेला आहे असेही काही विद्वानांचे मत आहे. तेव्हा सर्वांभूतीं आत्मा वसतो, या मतावर ज्यांचा विश्वास आहे, त्यांना आत्म्याचे भ्रमण, पुनर्जन्म इ. कल्पना सहज पटतील, यात नवल काय!

६

# विविध प्रकारचे ‘ लोक ’ : स्वर्ग आणि नरक

हिंदू जगाला ‘ लोक ’ असे म्हणतात. या विविध लोकांची ‘ वरील लोक ’, ‘ मध्यस्थानी असलेला लोक ’ ( जग ) आणि “ खालील लोक ’ अशी प्राथमिक स्वरूपाची विभागणी ते करतात. त्यांना ते अनुक्रमे ‘ स्वर्लोक ’ ‘ मध्यलोक ’ ( किंवा ‘ मनुष्य लोक ’ ) आणि ‘ नागलोक ’ ( किंवा ‘ पाताळ ’ ) असे म्हणतात. मध्यलोकात ( किंवा मनुष्यलोकात ) मानव राहतात व तेथे त्यांनी केलेल्या कर्मानुसार त्यांना पुढे फल मिळते. चांगल्या कर्माचे फल स्वर्लोकप्राप्ती हे असून वाईट कर्माचे फल नरकप्राप्ती हे होय. स्वर्गात त्यांना सुख उपभोगावयास मिळते व नरकात त्यांना शिक्षा भोगावी लागते. यांपैकी कोणत्याही ठिकाणी जावे लागले तरी तेथे केवळ त्या मनुष्याचा देहविरहित आत्माच असतो.

आपल्या कृत्यांबद्दल स्वर्लोक किंवा नरकलोक यांपैकी कशातच ज्यांना प्रवेश मिळत नाही, त्यांचा समावेश ‘ तिर्यगलोका ’त होतो. ‘ तिर्यगलोका ’त वनस्पती व प्राणी इ. अबुद्धिजीवी योनींचा किंवा वर्गांचा समावेश केलेला आहे. या वर्गात किंवा योनीत आत्म्याला लहानापासून मोठ्या वनस्पतीपर्यंतच्या व प्राण्यांपर्यंतच्या अनेक योनींमध्ये क्रमाने मनुष्य–जन्म प्राप्त होईपर्यंत हिंडावे लागते. ( पुनर्जन्म घ्यावा लागतो ).

मानवलोकात आत्मा का येतो, याची अनेक कारणे सांगता येतात. ज्या आत्म्यात स्वर्लोकात जाण्याइतकी पात्रता नसते, त्याला या मनुष्यलोकात राहावे लागते. ज्या कर्मांमुळे नरकलोकात शिक्षा भोगावी लागते अशा प्रकारची कर्मे त्याने केलेली नसल्याने त्यास नरकात जाता येत नाही तर मनुष्यलोकातच राहावे लागते. किंवा नरकातील शिक्षा भोगल्यानंतर त्यास नरदेह प्राप्त झाल्यामुळेही तो या मानवलोकात राहू लागतो. नरकलोकातून मानवलोकात येणाऱ्या आत्म्याला वनस्पती व प्राणी इ. योनींतून वा वर्गांतून क्रमाने पुनर्जन्म घ्यावा लागतो. मग त्याला ‘ मानवलोका ’त नरदेह प्राप्त होतो. तथापि स्वर्लोकातून परतणाऱ्या आत्म्याला इतर योनीत पुनर्जन्म घेत भ्रमण करावे लागत नाही. त्याला नरदेह प्राप्त होतो व तो मानवयोनीत पुनर्जन्म घेतो, अशी हिंदू लोकांची समजूत आहे.

नरक असंख्य आहेत, असे हिंदू लोक मानतात. प्रत्येक प्रकारच्या अपराधासाठी स्वतंत्र नरक असल्याचा निर्देश त्यांच्या ग्रंथात केला असून या सर्व नरकांची नामावळीही त्यात दिलेली असते. ' विष्णुपुराणा 'त नरकांची संख्या ८८,००० असल्याचे सांगितले आहे. या नरकाविषयी ' विष्णुपुराणात ' पुढील माहिती दिली आहे :

" जो मनुष्य खोटा हक्क सांगतो, खोटी साक्ष देतो त्याला ' रौरव ' नरक प्राप्त होतो. या दोहोंना साहाय्य करणाराला आणि लोकांचा उपहास करणारालाही हा नरक प्राप्त होतो. "

जो निरपराध माणसाची हत्या करतो, दुसऱ्याच्या वित्ताचे अपहरण करतो आणि गोहत्या करतो, त्यास ' रोध ' नरक प्राप्त होतो.

ब्रह्महत्या करणारे, सोने चोरणारे, प्रजेची काळजी न वाहणारे ( राजे ), तसेच गुरुपत्नीशी व सासूशी व्यभिचार करणारे लोक ' तप्तकुम्भ ' नरकाप्रत जातात. ज्याच्या आधाशीपणाबद्दल त्याची पत्नीदेखील अधिक्षेप करते, जो बहिणीशी किंवा सुनेशी व्यभिचार करतो, जो आपल्या मुलांना विकतो, जो अत्यंत कवडीचुंबक असतो अशा गृहस्थाला ' महाज्वाला ' नामक नरक प्राप्त होतो.

गुरूचा अपमान करणारा, लोकांचा तिरस्कार करणारा, प्राण्यांशी संभोग करणारा, वेद व पुराणे यांसारख्या धर्मग्रंथांचा तिरस्कार करणारा किंवा या धर्मग्रंथांच्या साहाय्याने धनसंचय करणारा इ. लोकांचा समावेश ' शवल ' नामक नरकात होतो.

जो चौर्यकर्म करतो, चांगल्या वागणुकीचा निषेध करतो, ज्याला देव आणि मानव आवडत नाहीत, परमेश्वराने ज्या रत्नांना दिव्य तेज दिले त्यांच्याबद्दल ज्याला आदर व आस्था वाटत नाही आणि ही रत्ने म्हणजे साधे खडेच आहेत असे जो मानतो त्यास ' कृमीश ' नरक प्राप्त होतो.

आपली मातापितरे व पूर्वज यांच्याविषयी ज्यास आदर वाटत नाही, त्यांच्यासाठी, देवतांसाठी व पितरांसाठी जी कर्मे करावयास हवीत ती कर्मे जो गृहस्थ करीत नाही त्यास ' लालाभक्ष ' नरक प्राप्त होतो.

चाकू आणि तरवारी यांसारखी तीक्ष्ण शस्त्रे तयार करणारे लोक ' विशसन ' नरकात जातात.

संपत्ती दडविणारे, राजाकडून दान किंवा भेटी मिळविण्यासाठी अधाशी झालेले लोक आणि मांस, मसाला, तेल, लोणी व मद्य विकणारे ब्राह्मण ' अधोमुख ' नरकात जातात.

जे लोक कोंबड्या, मांजरे, लहान लहान गुरे, डुकरे व पक्षी पाळतात ते ' रुधिरांध ' नरकात जातात.

बाजारात व सार्वजनिक रस्त्यांवर खेळ दाखविणारे व या खेळात गाणारे लोक, पाणी मिळविण्यासाठी विहिरी खणणारे लोक, धार्मिकदृष्ट्या पवित्र म्हणून मानल्या

गेलेल्या दिवशी आपल्या पत्नीशी संभोग करणारे लोक, दुसऱ्याच्या घराला आग लागावी म्हणून त्यात अग्नी फेकणारे लोक तसेच प्रथम आपल्या मित्राला फसवून पुन्हा संपत्तीच्या लोभाने त्याचे आगतस्वागत करणारे लोक ‘ रुधिर ’ नरकात जातात.

पोळयातून मध काढणाऱ्या लोकांना ‘ वैतरणी ’ नरक प्राप्त होतो. जे लोक आपल्या तारुण्याच्या उन्मादात बळजबरीने परधन व परदारा यांचे अपहरण करतात, त्यांना कृष्ण नरकात जावे लागते. वृक्ष कापणारांना ‘ असिपत्रवन ’, व्याधांना ‘ वन्हिज्वाला ’, आणि रूढी, परंपरा व कायदे यांचे उल्लंघन करणारांना ‘ सदंशक ’ इ. नरक प्राप्त होतात.

हिंदू लोक कोणकोणत्या गोष्टींकडे ‘ पाप ’ म्हणून पाहतात, हे वाचकांच्या लक्षात यावे म्हणूनच वरील तपशील विस्तारपूर्वक दिला आहे.

‘ मर्त्यलोक ’ हा कर्मे करून त्या कर्मांपासून फळे मिळविण्यासाठी असून या लोकाला जन्म प्राप्त होणे हेसुद्धा आपल्याला मिळालेले एक चांगलेच फळ आहे, असे हिंदू लोक मानतात. स्वर्गात जाण्याइतकी पात्रता यामुळे प्राप्त होत नसली तरी नरकापासून अलिप्त राहण्यास मानवजन्म निश्चितच साहाय्य करतो. पूर्वजन्मात पुण्यकृत्ये केल्याचे फळ म्हणूनच आत्म्याला मानवदेह प्राप्त होतो. स्वर्ग ही त्यापुढील पायरी आहे. प्राणी आणि वनस्पती नामक योनींत ( वा वर्गांत ) आत्म्याने भ्रमण करणे ही त्याची अत्यंत कनिष्ठ अवस्था होय असे हे लोक मानतात. प्राणी व वनस्पतींच्या या लोकात जन्म प्राप्त झाल्यास ती पूर्वजन्मातील कर्मांबद्दल भोगावी लागणारी एक प्रकारची शिक्षाच होय असे त्यांना वाटते. अशा प्रकारे विचार करणारे लोक नरकाचे इतर प्रकार मानीत नाहीत. त्यांच्या दृष्टीने मानवजन्मापेक्षा अन्य ( कनिष्ठ ) योनीत जन्म प्राप्त होणे हेच नरकयातना भोगण्यासारखे आहे. जीवाला प्रत्येक कर्माचे फळ मिळत असते व अंतिम ज्ञानाचा व मुक्तीचा मार्ग वाटतो तितका सरळ नसतो. त्यामुळे कर्मानुसार विविध अवस्था भोगूनच जीवाला आपले उद्दिष्ट साध्य करता येते. जीवाला कर्माचे जे फळ मिळते, ते त्या कर्मामागील ( कार्याच्या ) हेतूनुसार मिळत असते, हेही येथे स्पष्ट करायला हवे. माणसाला कर्माचे फळ या लोकात मिळते किंवा त्याने जो जन्म घेतला असेल त्या अवस्थेत मिळते. जीवाने नरलोक सोडला असल्यास पुनर्जन्म घेण्यापूर्वीच्या अवस्थेतही जीवाला त्याच्या कर्मानुसार फल प्राप्त होते. तथापि जीवाला त्याच्या कोणत्याही कर्माचे योग्य ते फळ मिळाल्याशिवाय मात्र राहत नाही, यात शंका नाही.

आपल्या कर्माबद्दल जेथे शिक्षा वा चांगले फल प्राप्त होते, त्या स्थलांविषयी—नरक आणि स्वर्ग याविषयी तपशील देताना मात्र हिंदू लोक तात्त्विक स्वरूपाचा युक्तिवाद सोडून पारंपरिक दंतकथांचा आधार घेऊ लागतात. या ठिकाणी आत्मा शरीरविरहित अवस्थेत असतो व चांगल्या कर्माचे फळ मिळाल्याव मानवदेरह प्राप्त होतो, असेही

त्यांना वाटते.

'सांख्य' नामक ग्रंथाच्या कर्त्याने या ठिकाणी स्वर्ग, नरक इ. विषयी तपशील देताना आपला विरोध नोंदविला आहे. स्वर्ग म्हणजे सत्कर्माचे विशेष फल आहे, या तत्त्वाला तो मान्यता देत नाही कारण या स्वर्गासही मनुष्यलोकाप्रमाणे अन्त हा आहेच. तो चिरंतन नाही. त्यातील जीवनात व इहलोकातील जीवनात बरेच साम्य आहे. येथे नरकलोकाप्रमाणेच महत्त्वाकांक्षा आणि द्वेषादी भावना, त्यांच्या विविध अवस्था आणि आत्म्यांचे विविध प्रकारचे श्रेष्ठ कनिष्ठादी वर्ग इ. गोष्टी आढळतातच.

'सांख्य' मताशी सूफींचे मतही बरेच जुळते. तेही स्वर्गप्राप्ती हे सत्कर्माचे विशेष फल होय असे मानीत नाहीत कारण स्वर्गात अंतिम सत्या (ज्ञाना) ऐवजी– (ब्रह्मानंदाऐवजी) आत्मा इतर सुखातच गुंतून पडतो. या अन्य गोष्टींकडे वा सुखांकडे त्याचे लक्ष वेधल्याने त्यास चिरंतन मुक्ती मिळत नाही, ब्रह्मानंद प्राप्त होत नाही.

स्वर्ग आणि नरक या दोन्ही ठिकाणी आत्म्याला देह नसतो असे हिंदू लोक मानतात, असे मी यापूर्वीच सांगितले आहे. तथापि केवळ सुशिक्षित हिंदू लोकांमध्येच हे मत प्रचलित आहे हे लक्षात ठेवावयास हवे. देहाविना आत्म्यास अस्तित्वच प्राप्त होत नाही असे अशिक्षित हिंदू समाज मानतो. मृत्यूच्या वेळी जीवाची चाललेली धडपड कशासाठी असते, हे स्पष्ट करताना ते म्हणतात, की पुढे जो जन्म घ्यावयाचा त्या जन्माचा देह सिद्ध होईपर्यंत जीवात्म्याला प्रतीक्षा करावी लागते. मातेच्या वा पृथ्वीच्या गर्भातील बीजाने हा देह वा आकार तयार होतो. तो तयार झाला की जीवात्मा त्यात प्रवेश करतो व त्यास पुनर्जन्म प्राप्त होतो.

यापेक्षाही एक मत अधिक जुने व पारंपरिक असल्याचे काही जण मानतात. आपल्या दुर्बलतेमुळेच जीवात्म्याला देहाचा त्याग करावा लागतो. तथापि पुढील जन्मातील देह सिद्ध झालेला नाही म्हणून त्यास प्रतीक्षा करावी लागत नाही. त्यावेळी तो आपल्या देहाचा त्याग करून मूल तत्त्वापासून तयार केलेल्या 'अतिवाहिका' त प्रवेश करतो. कुठल्याही प्रकारचा जन्म न घेता या अतिवाहकाला अस्तित्व प्राप्त होत असते.

'अतिवाहका' त मात्र या आत्म्याला वर्षभर राहावे लागते व त्यानंतर त्याला त्याच्या कर्माचे फल प्राप्त होते. ही अवस्था पारशी लोकांच्या 'बर्झख' प्रमाणेच असावी असे वाटते. यासाठीच हिंदू लोक एकाद्या व्यक्तीच्या निधनानंतर वर्षभरात त्याच्यासंबंधीचे धर्मशास्त्रात सांगितलेले सर्व विधी वा संस्कार करतात. हे सर्व विधी त्या वर्षात झालेच पाहिजेत, या नियमाचे त्याचे वारस कटाक्षाने पालन करतात, कारण त्यानंतरच जीवात्मा त्यापुढील अवस्थेत– स्वर्गात वा नरकात– जात असतो.

एतद्विषयक कल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी हिंदूंच्या ग्रंथातील काही उतारे पुढे दिले आहेत :–

१) विष्णुपुराण : मैत्रेय पराशरास 'नरकाचे प्रयोजन काय ?' असे विचारतो तेव्हा तो त्याला पुढील उत्तर देतो :– "चांगले आणि वाईट, ज्ञान आणि अज्ञान यांतील भेद कळावा, सर्वांना न्याय मिळावा, यासाठी नरकाची आवश्यकता आहे. काही जण पापक्षालनार्थ नरकवास प्राप्त होण्यापूर्वीच प्रायश्चित्त घेतात. प्रत्येक कर्म करताना विष्णूचे अविरत मनन– चिंतन केले पाहिजे, हे त्यामुळे लक्षात येते. जे अशा प्रकारे ईश–चिंतन करीत नाहीत. भक्ती करीत नाहीत, त्यांना घाणेरड्या जीवजंतूंच्या व वनस्पतींच्या रूपाने जन्म घ्यावा लागतो."

२) 'सांख्य' :– ज्याने सत्कर्मे केलेली असतात, तो स्वर्गात जातो व तेथे तो देवांप्रमाणे वास्तव्य करतो. स्वर्गात ज्याचे वास्तव्य असते अशा (आत्म्यांचे) आठ वर्ग आहेत. सत्कर्मे करणारा जीव हा या आठ वर्गांपैकी कोणत्या तरी एका वर्गाचा आहे असे समजले जाते. ज्यास आपल्या पापाबद्दल शिक्षा भोगावयाची असते तो प्राण्यांच्या किंवा वनस्पतींच्या रूपाने जन्मास येतो आणि आपल्या अपराधांबद्दल योग्य ती शिक्षा संपेपर्यंत त्याला या योनीत भ्रमण करावे लागते. जोपर्यंत तो देहाच्या या आवर्तातून आपली सुटका करून घेत नाही, तोपर्यंत त्याचे हे भ्रमण चालूच असते.

३) पुनर्जन्म मानणारा एक धर्मशास्त्रज्ञ म्हणतो, पुनर्जन्माचे चार प्रकार आहेत. ते असे :—

(अ) पहिला प्रकार हा फक्त मानवमात्रापुरताच मर्यादित आहे. यात आत्मा एक देह टाकून दुसरा देह धारण करतो.

(आ) दुसऱ्या प्रकारात 'रूपांतर' होते. मानवांचे रूपांतर वानर, डुक्कर किंवा हत्ती यांसारख्या प्राण्यात होते.

(म्हणजेच मानवदेहधारी आत्मा प्राण्यांचा जन्म घेतो.)

(इ) तिसरा प्रकार म्हणजे एक प्रकारची अविचल, अपरिवर्तनीय अवस्था होय. या प्रकारात आत्म्याला वृक्षांचा जन्म प्राप्त होतो. पर्वताप्रमाणेच वृक्ष चिरकाल त्याच अवस्थेत राहतात आणि म्हणून ही आत्म्याची निःकृष्ट अवस्था मानण्यात येते.

(ई) ज्या वनस्पती उपटून टाकल्यावर त्यांचा वंशच नष्ट होतो, त्यांना जन्म प्राप्त होतो हा पुनर्जन्माचा चवथा प्रकार होय.

"विशिष्ट वर्गाची व्यक्ती त्याच वर्गात पुन्हा जन्म घेते, तथापि पुनर्जन्म घेताना वर्ग–संकर मात्र होत नाही," असे मत सिजिस्तान येथील एक पंडित अब्रू याकूब याने व्यक्त केले आहे.

पुनर्जन्माविषयी प्राचीन ग्रीक लोकांचेही मत असेच होते. "काही आत्मे प्राण्यांच्या देहात वास्तव्य करतील" या प्लेटोच्या मताचा उल्लेख करून जोहानस, ग्रॅमॅटिकसने स्वमत– समर्थनार्थ पायथागोरासच्या काही दंतकथाही सांगितल्या आहेत.

'फिदो' नामक ग्रंथात सॉक्रेटिस म्हणतो, "देह हा पार्थिव व जड असतो.

त्याच्याविषयी ज्या आत्म्यांना आकर्षण वाटते ते प्रेतलोकाभोवती, थडग्यांभोवती वा स्मशानाभोवती घोटाळत असतात. हे आत्मे या ठिकाणी छायेसारखे दिसतात. जे आत्मे पूर्णपणे मुक्त झालेले नसतात व ज्यांच्यामध्ये पार्थिवत्वाचा काही अंश शिल्लक असतो, अशाच आत्म्यांच्या बाबतीत वरील प्रकार घडतो. हे आत्मे सत्कर्मे करणाऱ्या जीवांचे नसून दुष्कृत्ये करणाऱ्या जीवांचे असतात. जोपर्यंत देहाचे आकर्षण सुटत नाही तो-पर्यंत त्यांना देह प्राप्त होतो. तथापि इहलोकातील यांची लक्षणे या नवीन देहातही आढळतातच. उदा. ज्या लोकांना खाद्यपेयांची हाव असते त्यांना गाढवांचा व तत्सम पशूंचा जन्म प्राप्त होतो. जे वाईट कृत्ये करतात, ते लांडग्यासारख्या हिंस्र श्वापदांच्या जन्मास येतात.’ मृत्यूनंतर आत्मे कोठे जातात व आपल्या आत्म्याला कोणती गती प्राप्त व्हावी, याविषयी सॉक्रेटिसाने आपले मत पुढीलप्रमाणे सांगितले आहे :– ज्ञानी, कल्याणकारक देवलोकात मला प्रवेश मिळाला तर ते फारच उत्तम. तथापि तसे न झाल्यास येथील आत्म्यांपेक्षा श्रेष्ठतर अशा मृतात्म्याबरोबर माझा आत्मा राहिल्यास मला धन्यता वाटेल.”

पाप–पुण्याचे फल ज्या लोकात मिळते त्यांचा निर्देश प्लेटोने पुढीलप्रमाणे केला आहे : “एखादा जीव मृत्यू पावतो तेव्हा नरकाचा एक द्वारपाल त्याला न्यायाधीशाकडे नेतो व (त्याच्या कृत्याप्रमाणे) त्याला यमलोकात विशिष्ट काळपर्यंत ठेवण्यात येते. त्यावेळीही ज्यांना देहाचे आकर्षण वाटते, ते तेथून पळत जातात व काही योनींत जन्म घेऊन भ्रमण करतात. तथापि अशा प्रकारे ते तेथून आपली शिक्षा चुकवून पळून गेले असले तरी त्यांना काही काळपर्यंत त्यांना त्या ठिकाणी परत यावेच लागते. पुण्यवान आत्म्यास मात्र देवांचा सहवास लाभतो.

सुष्ट आणि दुष्ट या दोहोंमधील प्रवृत्तीचे आत्मे ह्यांना एका मोठ्या नौकेत राहावे लागते. आपल्या पूर्वकर्माबद्दल आवश्यक ती शिक्षा भोगल्यावर ते पापमुक्त होतात. त्यानंतर त्यांना त्यांच्या सत्कृत्यांनुसार फल मिळते. तथापि जे आपल्या आयुष्यात (देवतांना अर्पण केलेल्या वस्तूंतून काही वस्तू चोरणे, दरोडे घालणे, अकारण हत्या करणे, धार्मिक नियमांचे जाणूनबुजून उल्लंघन करणे यांसारखी) दुष्कृत्ये करतात त्यांना नरकात फेकून देतात आणि तेथून पुन्हा त्यांची सुटका कधीच होत नाही.

ज्यांनी आपल्या मातापितरांना त्रास दिला असेल व ज्यांच्या हातून चुकून एखादी हत्या घडली असेल अशा प्रकारचे लहानसहान अपराध केलेल्या आत्म्यांना किंवा ज्यांना आपल्या अपराधांबद्दल आपल्या आयुष्यातच पश्चात्ताप वाटलेला आहे अशांना, नरकात एक वर्षभर राहून शिक्षा भोगावी लागते. त्यानंतर एका लाटेसरशी यांना तेथून बाहेर फेकण्यात येते. बाहेर पडल्यावर ज्यांच्यावर त्यांनी अत्याचार केलेले असतात त्यांनी आपल्याला यापेक्षा अधिक शिक्षा देऊ नये, अशी ते परो-परीने विनवणी करतात. दोन्ही पक्षांत समेट झाल्यास अपराध्यांची सुटका होते. दुसऱ्या

पक्षाने ही विनंती मान्य केली नाही तर त्या आत्म्यांना पुन्हा नरकात फेकून देतात व तेथे त्यांना पुन्हा शिक्षा भोगावी लागते.

ज्यांच्या हातून काही सामान्य अपराध घडले असले तरी जे आत्मे पापभीरू वृत्तीचे होते अशांना नरकातून पृथ्वीवर पाठविण्यात येते. पृथ्वीवर आल्यामुळे जणू आपली कारावासातून मुक्तता झाली असे त्यांना वाटते. ”

वर उल्लेखिलेला नरक म्हणजे एक प्रचंड दरी आहे. या दरीत अनेक नद्या वाहतात. येथे शिक्षा भोगावी लागणे ही एक महाभयंकर गोष्ट आहे, अशी हिंदू लोकांची समजूत आहे. प्रलयादी गोष्टी घडून आल्यामुळेही पापात्म्यांना नरकसदृश शिक्षा मिळते, .असे ग्रीसमधील लोकांना वाटते. नरक हा प्रचंड ज्वालांचा सागर असून तेथे भोवरे असतात व पापात्मे त्यात अडकून पडतात. अशा प्रकारे त्यांना नरकवास भोगावा लागतो, असे प्लेटोने म्हटले आहे. तथापि यावरून वेगवेगळ्या देशांत वेगळ्या काळात नरकाविषयी अशा प्रकारच्या विविध कल्पना प्रचलित असाव्यात असे दिसून येते.

७

# मुक्तीचे स्वरूप आणि मोक्षप्राप्तीचे विविध मार्ग

इहलोकाच्या बंधनाने आत्मा बद्ध होतो. ही बंधने तोडल्याशिवाय त्याची सुटका होत नाही. हिंदूंच्या मताप्रमाणे ही बंधने म्हणजे अज्ञान असून ते नष्ट करण्यासाठी ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे. वस्तूचे स्थूल व सूक्ष्म स्वरूप लक्षात घेऊन, त्यातील अनावश्यक भागाचा त्याग केल्यास तिचे यथार्थ स्वरूप कळते. आत्मा विविध वस्तूंचे यथार्थ स्वरूपही लक्षात घेतो तेव्हा आपले स्वतःचे यथार्थ स्वरूपही त्याच्या दृष्टोत्पत्तीस येते. वेगवेगळे देह धारण करून झिजण्याऐवजी आपले उदात्त, चिरंतन, शाश्वत स्वरूपच अबाधित राखणे अधिक श्रेयस्कर आहे, याची त्याला जाणीव होते. ज्या ऐहिक गोष्टी सुखद आहेत असे आपण समजत होतो, त्या वस्तुतः दुःखद आहेत, याची आत्म्यास जाणीव होते. अशा प्रकारे अंतिम सत्याचे वास्तव स्वरूप त्याच्या लक्षात येते. म्हणजेच त्याला सत्याचे ज्ञान होते. त्यामुळे तो 'ऐहिका'पासून अलिप्त राहू लागतो व भौतिक तत्त्वापासून आत्मतत्त्व दूर दूर जाऊ लागते.

याविषयी पतंजली एका ग्रंथात म्हणतो, "जेव्हा माणूस ईश्वराच्या एकत्वावर आपले लक्ष केंद्रित करतो, तेव्हा त्याला आपल्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या विविध गोष्टींच्याही पलीकडे जाऊन विचार करता येतो. ईश्वराच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणारांचे दोन गट पडतात : पहिल्या विभागातील लोकांना सर्वांच्या कल्याणासाठी ईश्वराची प्राप्ती व्हावी असे वाटते तर दुसऱ्या विभागातील लोक हे केवळ स्वतःलाच ईश्वर प्राप्त व्हावा म्हणून अविरत प्रयत्न करतात. त्यांच्या सर्व क्रियांतून, एवढेच काय, त्यांच्या श्वासोच्छ्वासातूनदेखील हाच ध्यास प्रकट होतो. जेव्हा माणूस या (दुसऱ्या) अवस्थेप्रत जातो तेव्हा त्याचे आत्मिक बळ त्याच्या शरीर-सामर्थ्यापेक्षा कितीतरी पटींनी वाढलेले असते. त्याच्या शारीरिक सामर्थ्यापेक्षा त्याचे आत्मिक सामर्थ्य अधिक श्रेष्ठ ठरते, त्यामुळे सर्वसामान्य माणसास असाध्य अशा प्रकारच्या पुढील गोष्टीही (शक्ती) त्यास साध्य होतात. —

१. डोळ्यांना दिसणार नाही इतके सूक्ष्म स्वरूप धारण करण्याची शक्ती.

२. देहाचे वजन अत्यंत कमी किंवा हलके करण्याची शक्ती. या शक्तीच्या साहाय्याने

त्यास काट्यावरून किंवा चिखलातून चालता येते व त्यामुळे कुठल्याही प्रकारची इजा त्यास होत नाही.

३. आपल्या देहाचे स्वरूप अत्यंत प्रचंड आहे किंवा अत्यंत भयानक आहे असे भासविण्याची शक्ती.

४. आपली प्रत्येक इच्छा पूर्ण करून घेण्याची शक्ती.

५. प्रत्येक गोष्टीसंबंधीचे ज्ञान प्राप्त करण्याची शक्ती.

६. कोणत्याही धर्माच्या व धर्मसंप्रदायाच्या लोकांवर अधिसत्ता प्रस्थापित करण्याची शक्ती.

७. प्रत्येकावर अधिसत्ता प्रस्थापित करण्याची शक्ती. या शक्तीमुळे सर्वजण या व्यक्तीशी अत्यंत नम्रपणे वागतात व त्याच्या आज्ञेचे पालन करतात.

८. कोणत्याही प्रकारचे भौगोलिक अंतर नष्ट करण्याची शक्ती.

ज्ञान आणि ज्ञानप्राप्ती यासंबंधीची सूफींची कल्पनाही यासारखीच आहे. येथे आत्म्याची द्विविध स्वरूपे अभिप्रेत आहेत. पहिल्या प्रकारच्या स्वरूपात परिवर्तन होत नाही. तो चिरंतन असून त्यास अज्ञान गोष्टीचेही ज्ञान प्राप्त झालेले असते. त्याच्यामध्ये असलेल्या दिव्य सामर्थ्यामुळे तो चमत्कारही करू शकतो. या आत्म्याचे दुसरे स्वरूप हेच मानवी स्वरूप होय. या स्वरूपात विविध अवस्थान्तरे होतात आणि त्याला पुनः-पुन्हा जन्म प्राप्त होतो. ख्रिश्चन लोकांची आत्म्याविषयीची कल्पना जवळ जवळ या कल्पनेसारखीच आहे.

वर उल्लेखिलेल्या शक्ती किंवा सिद्धी प्राप्त झाल्यास आत्मा पुढील अवस्थांमधून पुढे जातो व तो आपले उद्दिष्ट साध्य करण्यास अधिक समर्थ ठरतो, असे हिंदूंचे मत आहे :–

१) या अवस्थेत विविध वस्तूंची नावे, त्यांचे गुणविशेष, त्यांतील वेगळेपण इ. संबंधीचे ज्ञान त्यास प्राप्त होते.

२) ज्यामुळे वस्तू–वस्तूंतील स्वरूप भेद लक्षात येतो, ती (विवेक करण्याची) शक्ती त्यास या अवस्थेत प्राप्त होते.

३) या (विवेकाच्या पलीकडील) अवस्थेत विविध वस्तूंचे स्वरूप एकसमया-वच्छेदेकरून लक्षात येते व या सर्वांचे 'सार' काय तेही लक्षात येते.

४) असे झाले की नामरूपातीत आणि कालातीत अशी अवस्था प्राप्त होते. या अवस्थेत ज्ञेय, ज्ञाता व ज्ञान या तिन्ही गोष्टी एकरूप होतात.

ज्ञानामुळे आत्म्याची मुक्ती कशी होते याविषयी पतंजलीने अशा प्रकारचे विवेचन केले आहे. या मुक्तीस संस्कृत भाषेत 'मोक्ष' असे म्हणतात. (सूर्य किंवा चंद्रग्रहणाच्या वेळी किंवा त्यासारख्या) प्रकाशमान ग्रहांना ग्रहण लागत असतानादेखील हिंदू लोक त्या संदर्भात मोक्ष (म्हणजे अन्त) हीच संज्ञा वापरतात. याचे कारण असे की

यावेळी ज्या दोन प्रकाशमान ग्रहांचा एकमेकांशी संबंध आलेला असतो तो संपुष्टात येऊन हे ग्रह या मोक्षकाली किंवा त्यानंतर एकमेकापासून विलग होतात.

खाणे आणि पिणे या क्रियांनी शरीराचे पोषण होते, संभोगामुळे प्राणिविशेषाची निर्मिती होऊन त्या वर्गाचे वा जातीचे संरक्षण व संवर्धन होते. या दोन्ही गोष्टींत– पोषण आणि संवर्धन या प्रक्रियांत मानवाला विशिष्ट प्रकारचा आनंद किंवा सुख मिळते. असे नसते तर त्यास खाणे, पिणे किंवा संभोग या क्रियांविषयी विशेष औत्सुक्य वा आकर्षण वाटले नसते. ज्ञानेंद्रिये ही आत्मज्ञान मिळविण्यासाठी असतात, असे हिंदूंना वाटते. त्यांच्या साहाय्याने ( जगामागील रहस्याचे ) संशोधन करता येते व या संशोधनापासून एक प्रकारचा अपूर्व आनंद वा सुख मिळते, असेही ते मानतात. या संबंधी ' गीते 'तही अशाच प्रकारचे विवरण केले आहे :

" ज्ञान हे सदासर्वकाळ सारखेच असते. त्याच्या स्वरूपात बदल होत नाही. ज्ञान मिळविण्यासाठीच मानवास जन्म प्राप्त झाला आहे. त्यासाठीच मानवास इंद्रिये दिली आहेत. केवळ कर्मे करण्यासाठीच मानवास जन्म लाभला असता तर ( सत्त्व, रज, तम इ. ) मूलभूत प्रवृत्तींनुसार त्याच्या कर्मांत विविधता निर्माण झाली असती. ज्ञानप्राप्तीऐवजी कर्म करण्याकडेच शरीराचा स्वाभाविक कल असतो. या कर्मांमुळेच आपणास सुख प्राप्त होत असते. ज्याप्रमाणे सूर्यामुळे ( सूर्यप्रकाशामुळे ) मेघ किंवा ग्रहण यांचे सावट नष्ट होते त्याचप्रमाणे ज्ञानामुळे वर उल्लेखिलेले देहधर्म नष्ट होऊन आत्म्यावरील ( अज्ञानरूपी ) अंधःकारही नष्ट होतो. "

गीतेत प्रतिपादिलेल्या या विचाराशी साक्रेटिसाचे मतही बरेच जुळते. तो म्हणतो, " आत्मा हा देहात असताना तो सतत ज्ञानप्राप्तीसाठी धडपडत असतो तथापि त्या वेळी शरीर त्याला फसवीत असते, ठकवीत असते. असे असले तरी विचारशक्तीच्या सामर्थ्यामुळे देहाच्या विविध इच्छा किंवा वासनांचे यथार्थ स्वरूप आत्म्याला कळते. चिंतनामुळे त्याची वृत्ती एकाग्र होऊन त्यास ऐकणे, पाहणे, सुख किंवा दुःख यांपैकी कशाचेच भान उरत नाही, तो या सर्व गोष्टींच्या पलीकडे जाऊ शकतो. तो एकांतात 'आपुलाचि आपणाशी संवाद' करीत असतो. त्यामुळे हे देहधर्म त्याच्या मार्गात व्यत्यय निर्माण करू शकत नाहीत. अशा प्रकारे आपण देहधर्मांच्या पाशातून मुक्त झाल्यास आपले अज्ञान नष्ट होऊन आपणास ज्ञान प्राप्त होते. हे ज्ञान म्हणजेच ( अंतिम ) सत्य होय. "

आता आपण पुन्हा ' गीते 'त यासंबंधी केलेल्या विवेचनाकडे वळू या. आत्म्यास ज्ञानेंद्रियाच्या साहाय्याने अंतिम सत्याचे ज्ञान कसे होते याविषयी ' गीते 'त पुढे म्हटले आहे :– " मानवाची ज्ञानेंद्रियें ज्ञान प्राप्त करण्यासाठी धडपडत असतात. जिज्ञासू आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ज्ञानप्राप्तीसाठी– त्यांचा चांगलाच उपयोग करून घेतो. जणू ही ज्ञानेंद्रिये म्हणजे त्याचे हेरच होत. जेथून जेथून ज्ञान मिळते

तेथून तेथून ती ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतात. तथापि ही इंद्रिये केवळ वस्तूंच्या वर्तमान स्वरूपाचे ज्ञान ग्रहण करू शकतात. मन मात्र वस्तूंच्या भूतकाळातील आणि वर्तमानकाळातील स्वरूपाचे ज्ञान ग्रहण करू शकते आणि या ज्ञानाच्या साहाय्याने (जिज्ञासू साधकाचे) मन भविष्याचाही विचार करू लागते.

कालातीत होऊन या विविध वस्तूंच्या यथार्थ स्वरूपाचे आकलन करण्यास त्याला तर्क आणि विचार या दोन शक्तींचे साहाय्य होते. अशा प्रकारे आत्म्याला यथार्थ ज्ञान प्राप्त करता येते व त्याला विविध वस्तूंच्या यथार्थ स्वरूपाची कल्पना येते."

पुढील तीन प्रकारांनी ज्ञान प्राप्त होते असे हिंदू लोक मानतात :–

१) जन्मतःच ज्ञानी असणे. उदा. कपिल ऋषी हे अशा प्रकारचेच ज्ञानी पुरुष होते.

२) काही कालखंडानंतर ज्ञान प्राप्त होणे. उदा. ब्रह्माचे पुत्र तरुण झाल्यावर त्यांना ज्ञान प्राप्त झाले.

३) (शास्त्रांचे) अध्ययन केल्यानंतर, काही कालखंड लोटल्यावर, ज्ञान प्राप्त होणे.

दुर्गुणांचा त्याग केल्यानेच आत्म्यास मुक्ती मिळते. दुर्गुण अपरिमित आहेत. तथापि लोभ, क्रोध आणि अज्ञान हे प्रमुख दुर्गुण होत. या प्रमुख दुर्गुणांचा त्याग केल्यास, ज्याप्रमाणे वृक्षाचे मूळ कापून टाकल्यावर फांद्याही आपोआप कोसळतात त्याचप्रमाणे इतर दुर्गुण आपोआपच नष्ट होतील. या दुर्गुणामुळे आपल्याला सुख प्राप्त होते, असे वरकरणी वाटत असले तरी वास्तविक ते आपल्याला दुःखाच्या खाईतच लोटत असतात. हे दुर्गुण मानवाचे रूपान्तर पशूत– नव्हे राक्षसात– करतात, असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. लोभ आणि क्रोध यांच्या मायापाशात न गुंतता मानवाने तर्कावर किंवा आपल्या विचारशक्तीवर अधिक भर द्यावयास हवा. असे केल्यास त्याला श्रेष्ठ देवपद प्राप्त होते. यासाठी त्याने प्रापंचिक कर्मांपासून व लोभ–क्रोधादी दुर्गुणांपासून अलिप्त राहणे आवश्यक आहे. दुर्गुणांचे मूळ तुटल्याशिवाय त्याची प्रापंचिक कर्मांची आसक्ती सुटत नाही व त्यामुळे तो प्रपंचातूनही मुक्त होऊ शकत नाही. यासाठीच (सत्त्व, रज, तम या) त्रिविध मूळ प्रवृत्तींपैकी दुसऱ्या प्रवृत्तीचा विनाश करावयाचा असल्यास त्यांच्या मुळाशी जे दुर्गुण आहेत, तेच आधी नष्ट करावयास हवेत.

प्रापंचिक कर्मांपासून अलिप्त राहावयाचे पुढील दोन मार्ग आहेत :–

१) तृतीय मूलभूत प्रवृत्तीमुळे– तमामुळे– जो आळस निर्माण होतो त्यामुळे कर्मांपासून अलिप्त राहता येते. आळसामुळे आपण निष्क्रिय राहतो, हे खरे असले तरी अशा प्रकारे आळस या दुर्गुणाच्या आधीन झालेल्या मानवाचा अन्त अत्यंत भयानक असाच होतो.

२) वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टींची-कर्मांची-तुलना करून श्रेष्ठतर सुख कशात आहे याचा निर्णय घेऊन त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केल्यास डोळसपणे प्रापंचिक कर्मापासून अलिप्त राहता येईल.

जी गोष्ट आपल्या ईप्सित ध्येयाआड येते, तिचा त्याग केल्यानेच जीवास त्यापासून अलिप्त राहाता येते. त्यामुळे आपल्या इंद्रियांवर नियंत्रण ठेवता येते. आपल्याशिवाय इतर कोणत्याही गोष्टीचे अस्तित्व जाणवत नाही. शरीराच्या या सर्व क्रियांवर तो इतके नियंत्रण प्रस्थापित करतो की त्याला श्वासोच्छ्वासाचीही तितकीशी आवश्यकता भासत नाही. एखादा लोभी मनुष्य विशिष्ट गोष्ट प्राप्त करण्यासाठी अतोनात कष्ट करतो, त्यामुळे त्यास थकवा येतो, धाप लागते. अशा प्रकारे हावरेपणाचा, लोभाचा, परिणाम शेवटी धाप लागण्यात होतो. तथापि वर उल्लेखिलेला आत्मा असा लोभसदृश विकारांनी बरबटलेला नसतो. अशा प्रकारच्या साधकाच्या देहधर्माची तुलनाच करावयाची झाल्यास समुद्राच्या तळाशी राहणाऱ्या जलचरांच्या देहधर्माशी करता येईल. या जलचरांच्या श्वासोच्छ्वासाप्रमाणे या साधकाचा श्वासोच्छ्वास असतो. जणू या प्राण्याला श्वासोच्छ्वासाची तितकीशी आवश्यकताच भासत नाही. तथापि त्याची ही क्रिया काहीशी अलिप्तपणे, निरपेक्षपणे, चाललेली असते. अशा वेळी त्याचे चित्त केवळ आपल्या उद्दिष्टावर- आत्म्याच्या मुक्तीवरच- केंद्रित झालेले असते.

यासंबंधी 'गीते'त पुढील विवेचन केले आहे : "ज्याचे चित्त विचलित झाले असूनही ज्याने परमेश्वरावर आपले लक्ष केंद्रित केलेले नाही, अशा माणसाला मुक्ती कशी मिळणार ? अशा माणसाने जर परमेश्वरावर (व त्याच्या उपासनेवरच) आपले लक्ष केंद्रित केले तर शुद्ध तेलाच्या साहाय्याने, घराच्या एकाद्या कोपऱ्यात प्रज्वलित होऊन सर्वत्र प्रकाश देणाऱ्या दिव्याप्रमाणे त्याच्या अंतःकरणाचा प्रकाश सर्वत्र पसरेल. या दिव्यावर घराबाहेरील वाऱ्याचा परिणाम होत नाही. तद्वतच अशा साधकावर ऐहिक सुखदुःखाचा परिणाम मुळीच होत नाही. अंतिम सत्याशिवाय इतर सर्वच गोष्टी व्यर्थ आहेत, याची त्यास प्रचीती येते.

ज्याप्रमाणे सागराला विविध प्रवाह येऊन मिळतात, तथापि त्यांचा परिणाम सागरावर मुळीच होत नाही, त्याचप्रमाणे ज्या साधकाने मोह आणि क्रोध यांसारख्या विकारांवर ताबा मिळविला आहे आणि त्यांना अकार्यक्षम ठरविले आहे, त्यावर जीवनातील सुखदुःखाचा काय परिणाम होणार ? "

जीवाला आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सतत चिंतन आणि मनन करावे लागते. या प्रक्रियांचे- चिंतनाचे आणि मननाचे- सातत्य टिकविणेही आवश्यक आहे. किती वेळ चिंतन वा मनन करावे हे सांगणे कठीण आहे. कारण 'किती वेळ ?' म्हटल्याबरोबर संख्या आली आणि संख्या आली की दोन क्रियांच्या पुनरावृत्तीमध्ये खंड

निर्माण होण्याची शक्यताही गृहीत धरावी लागते. त्यातूनच सातत्य–भंगही सूचित होतो. सातत्य–भंग हा या प्रक्रियेच्या अखंडपणातील व्यत्ययच नव्हे काय? आणि हा अखंडपणा किंवा हे सातत्य असल्याशिवाय चिंतन करणारी व्यक्ती आणि चिंत्य वस्तू यांच्यामध्ये ऐक्य कसे प्रस्थापित होणार? आपल्या ध्येयप्राप्तीसाठी अखंड चिंतन करणे अत्यावश्यक असल्याने त्यातील सातत्याचा भंग झाल्यास साधनेत उणेपणा निर्माण होणार, यात शंका नाही.

जीवाचे हे ध्येय– मुक्ती– त्यास कधी एकाच जन्मात तर कधी अनेक जन्म घेऊन साध्य करावे लागते. आचारशुचितेचे पालन केल्याने त्याला आपले हे उद्दिष्ट लवकर प्राप्त करता येते. या संदर्भात विवेचन करताना हिंदू धर्माच्या प्रणेत्यांनी पुढील 'आचारसंहिता' सांगितली आहे :

१) हिंसा करू नये.
२) खोटे बोलू नये.
३) चोरी करू नये.
४) व्यभिचार करू नये.
५) धनसंचय करू नये.
६) पवित्र धार्मिक आचरण करावे.
७) धर्मात सांगितलेले उपवास करावेत. केवळ गरज भागण्यापुरतीच वस्त्रे नेसावीत.
८) भक्तिभावाने परमेश्वराची उपासना करावी व त्याची करुणा भाकावी.
९) 'ॐ' (विश्वनिर्मितीच्या) मंत्राचा उच्चार न करता त्याचे अंतःकरणात स्मरण करावे, चिंतन करावे.

हिंदूंच्या 'आचारसंहिते'तील 'कोणत्याही प्राण्याची हिंसा करू नये' (नियम क्र. १) या तत्त्वामागील भूमिका आपल्यापासून कोणालाही कसल्याही प्रकारचा त्रास होऊ नये हीच आहे. या व्यापक नियमामध्येच क्र. २ (खोटे बोलू नये) आणि क्र. ३ (चोरी करू नये) या तत्त्वांचाही समावेश करता येईल.

'धनसंचय करू नये' या पाचव्या नियमातून माणसाने अनावश्यक श्रम करू नयेत, हे सुचवावयाचे आहे. ईश्वर आपल्या भक्ताच्या निर्वाहाची सोय करीत असतो, या तत्त्वावर विश्वास असल्यावर अशा प्रकारे संग्रह करण्याची वृत्तीच निर्माण होणार नाही. ज्या माणसाच्या मनात अशा प्रकारे श्रद्धा असते, तो भवपाशातून मुक्त होतो व तो सतत शाश्वत सुख प्राप्त करण्याचाच प्रयत्न करतो.

सहाव्या नियमामुळे मानवाला देहाच्या अमंगलतेची व आत्म्याच्या शुचितेची जाणीव होते. 'केवळ गरजेपुरतीच वस्त्रे नेसावीत' (क्र. ७) ह्या तत्त्वामागे देहाच्या कमीत कमी गरजा पुरवाव्यात, देहाचे चोचले पुरवू नयेत, आपल्या ज्ञानेंद्रियांचा

सदुपयोग करावा, हीच भूमिका आहे. आपल्या देहाला उंची वस्त्रे व बहुमोल दागिने यांच्या साहाय्याने सजविणाऱ्या एका गृहस्थाला पायथागोरास एकदा म्हणाला होता, " स्वतःसाठी या मजबूत साखळ्यांचा तुरुंग निर्माण करण्याच्या कामी तू कोणत्याही प्रकारची कुचराई केलेली नाहीस ! "

आठव्या नियमात सांगितल्याप्रमाणे ईशचिंतन केल्यास त्याच्या साहाय्याने ईश्वराशी एक प्रकारे संवाद करता येतो. यासंबंधी 'सांख्य' नामक ग्रंथात असे म्हटले आहे की, " माणूस ईशचिंतनादी गोष्टीपासून अलिप्त राहू शकत नाही कारण त्यामुळेच त्याचा अभ्युदय होत असतो. "

ईशचिंतनासंबंधी 'गीते'त पुढील उल्लेख आढळतो. " ईश्वराविषयी सतत चिंतन व मनन करण्याचे कार्य मानवाकडे सोपविलेले असून तो नकळतही ते कार्य करीत असतो. देहाचा त्याग केल्यावर आत्मा त्याला प्रिय असलेल्या वस्तूतच परिवर्तित होतो आणि म्हणूनच अंतकाळ हा (शोक करण्याचा काळ नसून) आपल्याला प्रिय असलेल्या वस्तूविषयी चिंतन करण्याचा काल होय. "

तथापि हा अंत म्हणजे आत्म्याचे एखाद्या अन्य क्षर वस्तूशी होणारे मीलन (किंवा आत्म्याचे त्या क्षर वस्तूत होणारे रुपान्तर) नव्हे. त्यास 'परिपूर्ण मुक्ती' म्हणता येणार नाही. 'गीते'त यासंबंधी पुढे म्हटले आहे :

" ईश्वर हाच सर्वत्र भरला असून त्याच्यापासूनच सर्व वस्तूंची निर्मिती झाली आहे, याची जाणीव ज्याला निधनसमयी होते तो संत नसला तरी त्याला मुक्ती मिळते. यासाठी जगापासून व त्यातील दोषांपासून अलिप्त राहा. सद्हेतूने आपले कर्म करा. फलाची आशा न बाळगता प्रामाणिकपणे आपले कर्म करा. त्यामुळेच तुमच्या आत्म्यास मुक्ती मिळेल. "

या सर्व विवेचनाचा खरा अर्थ असा की या जगात वावरताना सर्वच ईश्वराची लेकरे आहेत असे समजून वागा. त्यांच्यामध्ये मित्र आणि शत्रू असा भेदाभेद करू नका. तुम्हाला कोणत्याही स्थितीत आपल्या कर्तव्याचा विसर पडू देऊ नका. ज्यावेळी इतर लोक जागे असतात त्यावेळी आपण झोपल्यास व इतर लोक झोपलेले असतात, त्यावेळी आपण जागे राहिल्यासदेखील आपण आपल्या कर्तव्यात कसूर केली असे होते. कारण असे केल्याने आपण त्यांच्यामध्ये राहूनही खऱ्या अर्थाने त्यांच्यामध्ये नसतो.

या संदर्भातच 'गीते'त पुढे म्हटले आहे : " विकारग्रस्त आत्मा हा आपला शत्रू होय. तथापि निर्मळ आत्म्यासारखा दुसरा चांगला मित्र नाही. विकारग्रस्त आत्म्यापासून आपले संरक्षण करावयास हवे. "

निधनसमयी सॉक्रोटिसाला कुठल्याही प्रकारचे दुःख झाले नाही. उलट निधनानंतर आपण परमेश्वराजवळ जात आहोत, या गोष्टीमुळे त्याला आनंदच वाटला. आणि म्हणूनच की काय तो म्हणाला, " मी हंसापेक्षा खालच्या दर्जाचा आहे, असे कुणीही मानू नये. (हंसाइतकाच मी श्रेष्ठ आहे.)" हंस हा अॅपोलो या देवतेचा पक्षी असून त्यास सर्वच गोष्टींचे ज्ञान असते, असे म्हणतात. असे असल्यामुळेच की काय, आपल्या मृत्यूपूर्वी, लवकरच आपल्या धन्याची भेट होणार या जाणिवेने त्याला अत्यंत हर्ष होतो, आणि म्हणूनच तो गाऊ लागतो. नाचू लागतो, यासाठीच सॉक्रेटीस आपल्या निधनसमयी म्हणतो, " आपल्या ईप्सित ध्येयाची प्राप्ती होणार या भावनेने आता मला जो आनंद होत आहे, तो हंसाच्या मृत्यूसमयी होणाऱ्या आनंदापेक्षा कोणत्याही प्रकारे कमी प्रतीचा आहे, असे मुळीच म्हणता येणार नाही."

पतंजलीच्या एका ग्रंथात मोक्षप्राप्तीच्या त्रिविध अवस्थांविषयी– पुढील विवरण केले आहे :

१) ' क्रियायोगा 'च्या साहाय्याने इंद्रियांना बाह्य जगतापासून हळूहळू परावृत्त करून त्यांस ' अन्तर्जगता 'वर केन्द्रित केल्यास त्यांना ईशप्राप्तीचा ध्यास लागतो. अशा प्रकारच्या योग्याच्या मनात कुठल्याही वस्तूची वासना उरत नाही. आपल्या देहाचेदेखील तो कसेबसे, अगदी गरजेपुरतेच, पोषण करीत असतो, असे त्याच्याबाबतीत फार तर म्हणता येईल."

' विष्णुधर्म ' या ग्रंथातील यासंबंधीचा पुढील उतारा पाहा :

एकदा भृगुवंशातील परीक्ष राजाने शतानीक ऋषीला ईश्वराच्या स्वरूपासंबंधी माहिती विचारली तेव्हा शतानीक ऋषी म्हणाले, " हे (ईश्वरविषयक) ज्ञान ब्रह्माने उशानस याला सांगितले. उशानसाने ते शौनकाला व शौनकाने मला सांगितले. ईश्वर हा आद्यंतविरहित आहे. तो कुणापासूनही जन्मलेला नाही, तर तो स्वयंभू आहे. अमुक एकाच वस्तूत त्याचे अस्तित्व आहे असे सांगता येत नाही त्याचप्रमाणे त्याचे अस्तित्व अमुक एका वस्तूत नाही असेही म्हणता येत नाही. जगातील जे अत्यंत चांगले आहे ते त्याच्या आशीर्वादानेच निर्माण झाले आहे आणि जगातील वाईट गोष्टी त्याच्या क्रोधातून निर्माण झाल्या आहेत. या जगापासून अलिप्त राहून केवळ ईश्वराचे चिंतन व मनन केल्याशिवाय त्याची भक्ती कशी करता येईल !"

या विवेचनासंबंधी पुढील शंका विचारण्यात आली : " मानव हा एक अत्यंत दुबळा प्राणी असून त्याचे जीवन ही एक अत्यंत क्षुद्र बाब आहे हे खरे. तथापि या प्रपंचापासून निवृत्त होणे किंवा अलिप्त राहणे ही त्याच्या दृष्टीने अत्यंत कठीण गोष्ट आहे. त्यामुळे त्याला मुक्तीचा मार्ग चोखाळता येत नाही. आदियुगातील मानवाची आयुर्मर्यादा हजारो वर्षांची असून त्या काळी त्याचे जीवन हे चांगल्या गोष्टींनीच संपन्न झाले होते. वाईट गोष्टींचा स्पर्शही त्याला झालेला नव्हता. त्या काळात तुम्ही

म्हणता त्याप्रमाणे मानवास जीवनातील सुखाचा पुरेपूर प्रत्यय आल्याने त्या जगापासून निवृत्त होता आले असते व तशी अपेक्षाही करणे अनाठायी ठरले नसते. तथापि सध्या आपण शेवटच्या युगात राहात आहोत. या काळात मानवाला तारणारी गोष्ट कोणती ? प्रलयापासून त्याचे रक्षण कसे होईल ?"

यावर ब्रह्माने पुढील उत्तर दिले, "अन्न, वस्त्र, आणि निवारा या मानवाच्या प्राथमिक स्वरूपाच्या गरजा आहेत. त्या त्याने भागविल्यास त्यामुळे त्यास कोणताच अपाय होत नाही. तथापि त्यापेक्षा अधिक सुख ज्या गोष्टींपासून मिळते त्यापासूनच त्याला अधिक कष्ट होत असतात. अशा गोष्टीपासून अलिप्त राहिल्यानेच त्याला 'खऱ्या' सुखाची प्राप्ती होते. यासाठी फक्त ईश्वराचीच भक्ती करा, त्याच्याविषयी आदरभाव बाळगा. त्याला फुले व सुवासिक द्रव्ये वाहण्यासाठी मंदिरात जा. त्याचे स्तवन करा. तुमच्या मनाला त्याच्या प्राप्तीचा असा काही ध्यास लागावयास हवा की त्यामुळे मनाने त्यापासून परावृत्तच होऊ नये. ब्राह्मणांना दान द्या. उपवास करा. इतर प्राणी हे आपल्यापेक्षा वेगळे नाहीत याची जाणीव बाळगा. ही जाणीव तुमच्या मनात निर्माण झाली की त्यांची हत्या करण्याचा अधिकार आपल्याला नाही ही गोष्टही तुम्हास आपोआपच पटेल. सर्वत्र तोच परमेश्वर भरून उरलेला आहे, याची जाण ठेवा. आपले प्रत्येक कर्म ईश्वरासाठीच आहे, या जाणिवेने कर्म केल्यास तुमच्या हातून अनुचित असे काही घडणार नाही. ज्या वेळा ऐहिक सुखाचा उपभोग घ्याल त्यावेळी परमेश्वराच्या उपकाराचे विस्मरण होऊ देऊ नका. त्याचे भय मनात असल्यास तुमच्या हातून वाईट कर्मे होणार नाहीत. त्याची उपासना करा म्हणजे तुम्हास मुक्ती मिळेल; इतर कोणत्याही मार्गाने तुम्हास मुक्ती मिळणार नाही."

'गीते'तही याविषयासंबंधी पुढीलप्रमाणे प्रतिपादन केले आहे—

ज्याला वासनेपासून परावृत्त व्हावे असे वाटते तो केवळ आपल्या आवश्यक तेवढ्याच गरजा भागविण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रकारे केवळ देह जगविण्यासाठी गरजा भागविण्यात ज्यास समाधान वाटते, त्याला कधीही स्वतःची लाज वा तिरस्कार वाटणार नाही. क्षुधा आणि श्रम यांच्या परिहारार्थ मानवास आपल्या काही गरजा भागविणे अपरिहार्य असल्यास त्या किमान पक्षी भागतील व त्याचा व्यत्यय मोक्षप्राप्तीच्या मार्गात येणार नाही याची दक्षताही त्याने घ्यावयास हवी. ज्या ठिकाणी त्यास देहाचे रक्षण करता येईल आणि नीट विश्रांती घेता येईल तसेच जेथे सरपटणाऱ्या प्राण्यांचा वा हिंस्र पशूंचा त्रास होणार नाही, अशा प्रकारचा निवारा त्याला मिळावयास हवा. जेथे कडक थंडी किंवा उष्णता यांचा उपद्रव होणार नाही अशा प्रकारच्या हवामानात त्याने राहावे. या व अशाच स्वरूपाच्या इतर गोष्टी लाभल्यावर त्यांच्या मानसिक शक्ती अधिक कार्यप्रवण होतात व त्यामुळे त्यास ईशचिंतनावर आपले लक्ष केंद्रित करता येते. अन्नवस्त्रादी प्राथमिक गरजा सोडल्यास इतर ऐहिक

गोष्टींपासून जे सुख मिळते, ते सुख नसून प्रत्यक्ष दुःखच आहे, याची जाणीवही त्याला त्यामुळे होते. लोभ आणि क्रोध या दोन शत्रूंवर जो विजय मिळवतो त्यालाच खरे (शाश्वत) सुख प्राप्त होते.

वासुदेव अर्जुनाला म्हणतो, "(१) तुला शाश्वत सत्याचे ज्ञान प्राप्त करावयाचे असल्यास तू देहाच्या नऊ द्वारांवर नियंत्रण ठेवावयास हवे. त्या द्वारांतून आत जाणाऱ्या व बाहेर येणाऱ्या गोष्टीबद्दल तू अत्यंत दक्षता बाळगावयास हवी. आपल्या विचारांची अस्थिरता नष्ट करून त्यांच्यामध्ये स्थैर्य, प्रौढत्व यावे याविषयी तू दक्ष असावयास हवे. लहान मुलाच्या मेन्दूवर प्रथमतः एका पातळ आवरणाचा पापुद्रा असतो. पण पुढे तो टणक झाल्यावर त्याच्या पूर्वावस्थेची (पातळ पापुद्र्याची) काहीच आवश्यकता नव्हती असे आपणास वाटते. त्याचप्रमाणे अस्थिर विचार ही प्राथमिक अवस्था असून विचारातील स्थैर्य हेच याचे खरे सामर्थ्य असल्याने त्या अस्थिरतेची काहीच आवश्यकता नाही हे आपणास (विचारात प्रौढत्व आल्यावर व ते स्थिर झाल्यावर) पटल्यावाचून राहत नाही. इंद्रियांचा मूळ स्वभाव लक्षात घ्यावा त्यांच्या कलाने वागू नये. चित्त एकाग्र करून इंद्रियांवर नियंत्रण प्रस्थापित करावे.

(२) हा झाला मुक्तिमार्गावरील पहिला टप्पा. दुसऱ्या टप्प्यात देहाची नश्वरता व दुष्कर्माचे वैयर्थ्य यांची जाणीव होऊन साधक देहाविषयी व वाईट कर्माविषयी उदासीन होतो. या अवस्थेत आत्मा त्रिगुणांपेक्षाही वरच्य पातळीत गेल्यामुळे त्यावर त्रिगुणांचे वर्चस्व प्रस्थापित होऊ शकत नाही. अशा प्रकारे ज्याला जगाच्या वास्तव स्वरूपाची कल्पना आलेली असते त्याला ऐहिक सुखे ही वास्तविक दुःखेच होत, या गोष्टीचीही जाणीव होते. ऐहिक सुखांचे वरदान म्हणजे एक प्रकारचा शापच आहे, ही गोष्टही त्याच्या लक्षात येते आणि ज्या गोष्टींमुळे वा कृत्यांमुळे या जगातील आपले वास्तव्य अधिक वाढेल किंवा आपण भवपाशात अधिक गुरफटून जाऊ, अशी त्याला शंका वाटते, त्या सर्व गोष्टी व कृत्ये न करण्याचा, त्याच्यापासून अलिप्त राहण्याचा तो प्रयत्न करतो."

यासंबंधी गीतेत पुढील विवेचन केले आहे: "विधिनिषेध करताना मानवाच्या हातून चुका घडतात. चांगली कर्मे कोणती आणि वाईट कर्मे कोणती याचा विवेक त्याच्या ठिकाणी नसला की त्याच्या मुक्तिमार्गात अडथळे निर्माण होतात. वस्तुतः सर्व कर्मांचा त्याग करून त्यांच्यापासून अलिप्त राहणे हेच खरे कर्म होय. ज्ञानाचे पावित्र्य हे अन्य सर्व प्रकारच्या पावित्र्यांपेक्षा श्रेष्ठतम होय कारण त्यामुळे अज्ञानाचे मूळच नष्ट होते. त्यामुळे शंका नष्ट होऊन तिची जागा निश्चयात्मक निर्णय घेतो. जो अज्ञानी असतो, त्याच्या मनात वारंवार शंका येतात, त्यामुळे त्याला कधीच शांती मिळत नाही. त्याचा एकसारखा मानसिक छळ चाललेला असतो. यावरून मोक्ष प्राप्तीच्या मार्गावरील दोन्ही टप्प्यांचा विचार करता दुसऱ्या टप्प्यांच्या पूर्वतयारीला तो

अत्यंत उपयुक्त ठरतो, हे लक्षात येईल.

३ ) मुक्तिमार्गावरील तिसरा टप्पा किंवा तिसरी अवस्था भक्ती ही होय. पहिल्या दोन अवस्थांतून यशस्वीरीत्या पार पडल्यावर साधकाला ही तिसरी अवस्था प्राप्त होते. भक्तीनेच मानवाला मुक्ती मिळते तथापि त्यासाठीही ईश्वराच्या अनुग्रहाची आवश्यकता आहे. जीवाच्या योग्यतेनुसार ईश्वर त्याला विशिष्ट प्रकारचा जन्म देतो. ज्या जन्मात ईश्वरोपासना करण्यास अधिकाधिक वाव मिळू शकेल अशा प्रकारचा जन्म प्राप्त होणे हेही ईश्वराच्या अनुग्रहावरच अवलंबून आहे.

काया, वाचा आणि मन यांच्या साहाय्याने मानवाने भक्ती कशी करावी यासंबंधी ‘ गीते ’ त पुढील विवेचन केले आहे :

साधकाने कायेच्या साहाय्याने उपवास, प्रार्थना, धर्माज्ञांचे पालन, देवतांची उपासना, ऋषींची सेवा, पावित्र्य ( आचारशुचिता ), अहिंसा, परधन व परदारा यांची अभिलाषा न धरणे इ. गोष्टी साधता येतात.

धर्मग्रंथांचे पारायण, ईशस्तुती, सत्य भाषण, लोकांशी सौम्यपणे बोलणे, त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे, सत्कृत्ये करण्याचा उपदेश करणे इ. गोष्टी वाचेच्या साहाय्याने करता येतात.

सद्‌हेतू , तापटपणाचा त्याग, इंद्रियांवर नियंत्रण, उत्साही वृत्तीची जोपासना, विवेकयुक्त आचार इ. गोष्टी साधकाने आपल्या मनाच्या साहाय्याने साधाव्या.

गीताप्रणीत मुक्तिमार्गातील या तीन अवस्थांबरोबरच पतंजलीने आपल्या ग्रंथात ‘ रसायन ’ नामक चवथ्या गोष्टीचाही निर्देश केला आहे. तथापि रसायनाच्या साहाय्याने मोक्ष प्राप्त करता येतो, हा पतंजलीचा विचार भ्रामक स्वरूपाचा आहे. ज्या गोष्टी नैसर्गिकरीत्या घडणे अशक्य आहे असे आपणास वाटते, त्या गोष्टी विशिष्ट द्रवांच्या मिश्रणांच्या क्रियेच्या– साहाय्याने साध्य करण्याची प्रक्रिया म्हणजेच ‘ रसायन ’ होय, याविषयी मी याच ग्रंथात पुढे सविस्तर विवेचन करणार आहे. वस्तुतः मोक्षप्राप्तीशी या रसायनाचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. रसायनाचे यशही ते करणाऱ्या व्यक्तीच्या विशुद्ध हेतूवर, कर्तव्यनिष्ठेवर आणि श्रद्धेवर अवलंबून असते, एवढ्यापुरताच फार तर रसायन आणि मोक्ष यांचा अन्योन्य संबंध आहे असे मानता येईल.

मुक्ती किंवा मोक्ष म्हणजे परमात्म्याशी मीलन अशी हिंदूंची मोक्षासंबंधीची कल्पना आहे. त्याचप्रमाणे परमेश्वर हा साधकाच्या सर्व आकांक्षांची पूर्ती करतो, अशी त्यांची ईश्वरविषयक धारणा आहे. तो अत्यंत सूक्ष्म असून त्याच्याशी ( त्याच्या स्वरूपाशी ) कुणाचीच तुलना करता येत नाही. त्याला कधी ज्ञान प्राप्त झाले अशी अवस्थाच सांगता येणार नाही कारण त्यापासून ज्ञान असे वेगळे नव्हते व नाही. जेव्हा हिंदू लोक मुक्त हा ईश्वराप्रमाणेच असतो असे म्हणतात, त्या वेळी तो ( मुक्त ) प्रारंभा-

खेरीज ( म्हणजे जन्माखेरीज ) अन्य बाबतीत ईश्वरासारखाच असतो असे ते मानतात असे दिसते.

मोक्षाच्या स्वरूपाविषयी शिष्याने विचारलेल्या प्रश्नास पतंजलीने आपल्या ग्रंथाच्या शेवटी पुढील उत्तर दिले आहे : " मोक्षप्राप्तीमुळे त्रिविध मूलभूत प्रवृत्ती ( त्रिगुण ) संपुष्टात येतात. त्या जेथून आलेल्या असतात त्याच ठिकाणी त्या परत जातात. मुक्ती वा मोक्ष प्राप्त झालेला आत्मा हा ज्ञात्याच्या रूपाने स्वगृही परत येतो, असेही म्हणता येईल – त्यावेळी त्याला स्वतःच्या यथार्थ स्वरूपाचे ज्ञान झालेले असते. "

' सांख्य ' विषयक ग्रंथात मोक्षाविषयी विवरण आले आहे. त्याबाबतीत चर्चा करताना गुरु आणि शिष्य यांच्यामध्ये मतभेद होतो. " मुक्तीच्या अवस्थेत कर्म केले जात नाही, तेव्हा ती अवस्था ही मृत्यूची अवस्था होय असे का म्हणू नये ? " या प्रश्नाला गुरूने पुढील उतर दिले आहे :

" एखाद्या गोष्टीचे कारण नष्ट झाले तरी त्या कारणाचा परिणाम काही काळपर्यंत टिकून राहतो. रेशीम गुंडाळल्या जाणाऱ्या चरख्याला एकदा गती दिल्यावर चरख्याची मूठ न फिरवताही बराच वेळपर्यंत तो चालूच राहतो त्याचप्रमाणे आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर व मुक्ती मिळाल्यावरदेखील देह आणि आत्मा विलग होत नाहीत. ज्या वेळी हा परिणाम नष्ट होतो त्याच वेळी देह आणि आत्मा हे दोन्हीही एकमेकांपासून पूर्णतया विलग होतात. "

पतंजलीने याविषयी पुढील विचार व्यक्त केले आहेत : " जेव्हा कासव घाबरते तेव्हा ते आपल्या सर्व अवयवांचा संकोच करते त्याप्रमाणेच काही जण आपल्या इंद्रियांचा अधिक उपयोग न करता, त्यांचा संकोच करतात, ते त्यांच्या कमीत कमी वासना भागविण्याचा प्रयत्न करतात. अशा माणसांविषयी पतंजली म्हणतो की " ह्या लोकांचे पाश तुटले असले व ते बद्ध नसले तरी त्यांची मुक्तताही झालेली नसते. कारण तो देहापासून विलग झालेला नसतो. "

तथापि वरील मुक्तीविषयक कल्पनेशी न जुळणारी अशी एक कल्पनाही पतंजलीने आपल्या ग्रंथात सांगितली आहे, ती अशी : " मानवाला विशिष्ट देह किंवा योनी प्राप्त होते याचे कारण असे, की ती योनी वा तो देह हे त्याच्या पूर्वकर्मांचे फळ असते. अशा प्रकारे सर्व सत्कर्मांचे फळ प्राप्त झाल्यावर त्यास मुक्ती मिळते व तो देहापासूनही मुक्त होतो. यावरून देह पूर्वकर्मांचे फळ उपभोगण्याचे एक साधन होय हे लक्षात येईल.

मुक्तात्मा हा कोठेही संचार करू शकतो. मृत्यूचीदेखील त्याच्यासमोर मात्रा चालत नाही. तेव्हा देहाच्या पाशाचा तर त्याच्याबाबतीत विचारच करायला नको.

सूफी लोकांमध्येही अशाच प्रकारची विचारसरणी रूढ आहे. मुक्तात्म्याला मृत्यूचे बंधन उरत नाही. तो मुक्त संचार करू शकतो, यासंबंधी एका सूफी लेखकाने सांगित-

लेली पुढील आख्यायिका लक्षात घेण्याजोगी आहे. तो म्हणतो, "एकदा काही सूफी लोक आमच्या गावात आले आणि आमच्यापासून थोड्या अंतरावर येऊन ते तेथे बसले. त्यांच्यापैकी एक जण प्रार्थनेसाठी उठला. प्रार्थना संपल्यानंतर त्याने मला विचारले, "काय हो, जेथे सहज मृत्यू येईल अशी एकादी जागा येथे आहे काय!" त्याच्या 'मृत्यू 'या शब्दाचा अर्थ 'झोप' असा असावा असे वाटल्याने मी त्याला समोरची एक जागा दाखविली. तो गृहस्थ तेथे जाऊन झोपला व थोड्याच वेळात तो कोणत्याही प्रकारची हालचाल करीनासा झाला. त्याच्याजवळ जाऊन मी त्याला उठविण्याचा खूप प्रयत्न केला, पण छे! तो अगदी थंड गोळा होऊन पडला होता." या संदर्भात मुक्तात्म्यासंबंधीचा सूफी लोकांचा आणखी एक विचारही लक्षात घ्यावयास हवा. "आम्ही त्याच्यासाठी पृथ्वीवर जागा करून ठेवली आहे" या पवित्र कुराणतील (सूरा १८ : २३) वचनाचे स्पष्टीकरण सूफी लोक पुढीलप्रमाणे करतात : "त्याची (मुक्तात्म्याची) इच्छा असल्यास पृथ्वी त्यास आपल्या पोटात घेते, तो पाण्यावर किंवा हवेत चालू शकतो. त्यास पर्वतातून जावयाचे असल्यास पर्वतही त्याला विरोध करीत नाही."

काही लोक मोक्ष प्राप्त करण्यासाठी अनेक प्रकारे कष्टतात पण त्यांना मोक्ष प्राप्त होत नाही. अशा लोकांविषयी पुढे माहिती देत आहे. त्यांच्याविषयी 'सांख्य' नामक ग्रंथात पुढील उल्लेख आढळतो : "पूर्वजन्मात केलेल्या सत्कृत्यांचे फळ काही जणांना पुढील जन्मात मिळते. अशा प्रकारे त्यांना मुक्ती मिळते तथापि ज्यांना ज्ञान प्राप्त झालेले नसते व जे केवळ धर्मात सांगितलेली पवित्र कर्तव्यकर्मे करतात, त्यांना त्या सत्कर्माचे फळ मिळते, मात्र मुक्ती मिळत नाही. धर्माज्ञांचे पालन हाच मोक्ष अशी ज्याची समजूत असेल तो त्यापेक्षा वरच्या अवस्थेत मुळीच जाऊ शकणार नाही व त्यामुळे त्याला मोक्षही मिळणार नाही. (ज्ञानप्राप्तीशिवाय या बाकीच्या गोष्टींचा काय उपयोग!)"

साधकाला ज्ञानप्राप्तीच्या विविध अवस्थांतून कसे जावे लागते यासंबंधी पुढील आख्यायिका येथे प्रचलित आहे : "उत्तररात्रीच्या वेळी एक शिक्षक आपल्या शिष्यांसह प्रवास करीत होते. त्यांना समोर एक वस्तू ताठ उभी असल्याचे दिसले. ती वस्तू काय असावी, असा प्रश्न त्या शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांना विचारला. तेव्हा पहिला विद्यार्थी म्हणाला "काय आहे कुणास ठाऊक!" दुसरा विद्यार्थी म्हणाला, "ती वस्तू काय हे मला माहीत नाही आणि तिच्याविषयीची माहिती मिळविण्याचे कोणतेही साधन मजजवळ नाही."

तिसरा विद्यार्थी म्हणाला, "या वेळी ती वस्तू काय आहे हे शोधण्याचा प्रयत्न करणे निरर्थक आहे. ती वस्तू भयानक असल्यास सूर्योदयाबरोबरच ती अदृश्य होईल. आणि समजा तसे नसले तर तिचे स्वरूप काय आहे हे दिवस उगवताच

आपल्या लक्षात येईल. ”

या तिन्ही विद्यार्थ्यांपैकी एकालाही त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान प्राप्त झालेले नाही— त्या वस्तू स्वरूपाचे आकलन झालेले नाही— हे उघड आहे. यांपैकी पहिला अज्ञानी आहे, दुसऱ्याजवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नाही आणि तिसरा आळशी असून त्याने आपले अज्ञान प्रकट केले आहे.

चवथ्या विद्यार्थ्याने मात्र काहीच उत्तर दिले नाही. तो त्या वस्तूजवळ गेला व त्याने तिला स्पर्श केला. तेव्हा त्या ठिकाणी भोपळ्याच्या वेलावर कसला तरी थर साचल्याची जाणीव त्याला झाली. जिवंत मनुष्य अशा अवस्थेत निश्चल उभा असणे शक्य नाही हे त्याच्या लक्षात आल्यामुळे समोरची वस्तू निर्जीव असली पाहिजे, हेही त्याने चटकन् ओळखले. तसेच ती जागा म्हणजे एकादा उकिरडा असावा अशी त्याला शंका आली म्हणून तो त्या वस्तूच्या जवळ गेला. तिच्यावर त्याने लाथ मारली आणि त्यावेळी ती वस्तू कोसळली. ( अशा प्रकारे उकिरड्यावरील त्या वेलीची त्याला यथार्थ कल्पना आली. या चारही शिष्यांमध्ये शेवटचा शिष्य हा खरा ज्ञानी आहे, हे त्यांच्या उत्तरावरून व कृत्यावरून लक्षात येईल. ) ”

प्राचीन ग्रीकांमध्येही यासारख्याच मोक्षविषयक कल्पना रूढ होत्या. अमोनियसने पायथागोरसचे यासंबंधीचे एक मत उद्धृत केले आहे, ते असे :

“ या विश्वाचे जे आदिकारण आहे, त्याच्याशी मीलन व्हावे म्हणून तुम्ही सतत परिश्रम करावयास हवेत. तुमच्या आशा– आकांक्षांतही सतत तोच ध्यास प्रकट व्हावयास हवा. त्यामुळे तुमचा अधःपात किंवा ऱ्हास होणार नाही आणि तुम्हाला चिर आनंद, चिरंतन सुख प्राप्त होईल.

तथापि जोवर तुमच्यावर या देहाचे आवरण आहे तोवर तुम्हास मोक्ष कसा मिळणार ! ”

अमोनियस पुढे म्हणतो, “ जोवर ऐहिक आत्मे वैश्विक आत्म्याकडे साहाय्याची याचना करीत नाहीत, तोवर ते या ऐहिक जगातच गुरफटून गेलेले असतात, असे एम्पेडॉक्लिस याचे व त्याच्या अनुयायांचेही मत होते. विश्वातील आत्मा जगन्नियंत्यापासून ज्ञान प्राप्त करतो. व्यक्तिमात्रातील आत्म्याला विश्वातील आत्म्याच्या द्वारा हे ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे विश्वातील आत्म्याशी स्वतःचे जे जवळचे नाते आहे, त्याची कल्पना व्यक्तिमात्रातील आत्म्याला येते आणि मग तो विश्वातील आत्म्याशी एकरूप होतो. ही प्रक्रिया आपला वाटते तितकी चटकन घडत नाही. ती पूर्ण होण्यास अनेक युगे लागतात. त्यानंतर आत्म्यास स्थलकालाची बंधने उरत नाहीत. या वेळी तो सुखदुःखातीत अशा एका अपूर्व अवस्थेचा अनुभव घेत असतो. ”

बुद्धिमत्तेची व्याख्या करताना सॉक्रेटीस म्हणतो, “ शुचिता आणि आत्मा यांचा परस्पर संबंध आहे. जेव्हा आत्मा आपल्या ( ऐहिक ) स्थलाचा त्याग करून शुचित्वा-

भोवती भ्रमण करू लागतो त्यावेळी त्याच्यावर शुचित्वाचे संस्कार होऊ लागतात व शेवटी त्याचे शुचित्वातच रूपान्तर होते. आत्म्यावर शुचित्वाचे हे जे संस्कार होतात, त्यांनाच आपण बुद्धिमत्ता असे म्हणतो.

आपल्याला ज्ञात असलेल्या गोष्टींपैकी आत्मा हीच एक अशी गोष्ट आहे की जी शाश्वत असते, तिचा कधीही विनाश होत नाही. देह 'क्षर' असल्याने तो मात्र नाश पावत असतो. जेव्हा देह आणि आत्मा यांची युती होते तेव्हा निसर्ग देहाला आत्म्याच्या आज्ञेनुसार वागायला सांगतो. तथापि त्यांचा वियोग झाल्यावर मात्र देह ज्या ठिकाणी जातो त्या ठिकाणी आत्मा मुळीच जात नाही. ते दोघेजण वेगवेगळ्या ठिकाणी जातात. देहापासून विलग झाल्यावर आत्मा अत्यंत सुखी असतो. अज्ञान, उतावळेपणा किंवा संयमहीनता, प्रीती, भय आणि तत्सम मानवी दोषांपासून तो मुक्त असतो. देहाच्या वासना वा त्यांच्यापासून मिळणारी तात्कालिक वा तथाकथित सुखे यांच्या पाशात आपण गुरफटलो की आपणास आपल्या उच्चतर सुखास वा ध्येयाला मुकावे लागेल याची आत्म्याला सतत जाणीव असल्याने तो देहापासून अलिप्त राहतो.

प्रोक्लस नामक ग्रीक विद्वानानेही देह आणि आत्मा यांच्याविषयी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे. तो म्हणतो, "ज्या देहात ज्ञानमय आत्मा वास्तव्य करतो, त्या देहाचा आकार आकाशाप्रमाणे असतो ज्ञानमय आणि अज्ञानमय अशा दोन्ही प्रकारचे आत्मे ज्या देहात वास्तव्य करतात, त्या देहाची आकृती माणसासारखी ताठ असते. ज्या देहात केवळ अज्ञानमय आत्मे वास करतात त्या देहात ताठपणा आणि वक्रता या दोहोंचे संमिश्रण झालेले असते. ज्या देहात वरील सर्वच गोष्टी नसतात, त्याच्या आकृतीत ताठपणाबरोबरच वक्रता तर असतेच तथापि डोके खाली व पाय वर अशा प्रकारे त्यांची वनस्पतीप्रमाणे स्थिती झालेली असते. या वनस्पतीचे डोके ( मुळ्या ) जमिनीत रुतले असून त्याखालील तिचे शरीर ( फांद्या ) मात्र वर आकाशात गेलेले असते. खऱ्या मानवाची अवस्था अशी नसते. त्याचे डोके वर असून पाय जमिनीवर असतात, त्याचे डोके आकाशाकडे झेप घेण्याचा प्रयत्न करीत असते तर वनस्पतीचे डोके तिच्या उद्दिष्टांकडे म्हणजे धरेकडे जाण्याचा प्रयत्न करीत असते."

हिंदूंच्या तत्त्वज्ञानातील काही कल्पनांचे या विचाराशी बरेच साम्य असल्याचे आढळते. ( अश्वत्थ वृक्षाची हिंदू तत्त्वज्ञानातील एक कल्पनाही यासारखीच एक महत्त्वपूर्ण कल्पना आहे. ) "ब्रह्माचे या जगातील कोणत्या गोष्टीशी सादृश्य आहे ? असा प्रश्न अर्जुन वासुदेवाला विचारतो, तेव्हा तो म्हणतो की, "ब्रह्म हे अश्वत्थ वृक्षाप्रमाणे असते." अश्वत्थ हा एक प्रचंड वृक्ष असून त्याची मुळे वर असतात व फांद्या मात्र खाली असतात, अशी हिंदूंची समजूत आहे. या वृक्षाचे चांगले पोषण झाल्यास त्याच्या फांद्या व त्याची मुळ्या यांचा इतका काही प्रचंड विस्तार होतो की त्याच्या फांद्या कोणत्या आणि मुळ्या कोणत्या, हेदेखील कळत नाही.

या वृक्षाच्या वरील भागास असलेल्या मुळ्या म्हणजे ब्रह्म होय, त्याचा बुंधा म्हणजेच वेद आणि त्याच्या वेगवेगळ्या फांद्या म्हणजे वेदांच्या विविध शाखा–उपशाखा होत. या फांद्यांची पाने म्हणजे वेदातील विविध सिद्धान्तांवरील भाष्ये-उपभाष्ये होत. त्रिगुणांमुळे या वृक्षाचे पोषण होते. ज्ञानेंद्रियांच्या साहाय्यानेही वृक्ष चांगला पोसला जातो. हा वृक्ष जेथे उगवला व वाढला त्या ठिकाणी वास्तव्य करण्याचा प्रयत्न ज्ञानी पुरुष करीत असतो, असे केल्याने त्यास कधीही पुनर्जन्म प्राप्त होत नाही. सूर्याची उष्णता व चंद्राची शीतलता यांच्यापासून तो दूर दूर जातो. त्याला दिव्य असा प्रकाश मिळतो."

अंतिम सत्यावर (परमेश्वरावर) चित्त केन्द्रित करून एकाग्रतेत त्याचे चिन्तन व मनन करण्याविषयीच्या पतंजलीच्या सिद्धांतासारखाच सूफींचाही एक सिद्धांत आहे. ते म्हणतात "(तुमची साधना इतकी पराकोटीला जायला हवी की) तुम्ही आणि (अंतिम) सत्य यांत वेगळेपणच उरता कामा नये. जोवर तुम्ही त्याशिवाय अन्य गोष्टीचा निर्देश करता तोवर तुम्ही अद्वैती आहात असे म्हणता येणार नाही."

सूफी लोक हेदेखील अद्वैती आहेत, हे त्यांनी प्रतिपादिलेल्या तत्त्वज्ञानातील विविध विचारांवरून प्रत्ययाला येते. सत्य (परमेश्वर) म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात, जी वस्तू मजमध्ये असूनही अन्यत्र मी नसलेल्या अवकाशातही असते, तिचे ज्ञान मला होणे कसे शक्य आहे ? मला अस्तित्व प्राप्त झाले की माझा व त्या वस्तूचा वियोग होतो. मला पुनर्जन्म प्राप्त होत नाही– म्हणजेच, माझे त्या वस्तूशी मीलन होते.

एकाग्रतेद्वारा अन्तिम तत्त्वाशी मीलन कसे होते, याविषयी अबू बक्र अशूशिब्लीनेही पुढील विचार व्यक्त केले आहेत: "सर्वसंगपरित्याग केल्यावर तुला माझी प्राप्ती होईल. (तुझे माझ्याशी मीलन होईल.) असे झाले म्हणजे तुझी आणि माझी कृत्ये यांत एक प्रकारचा अभेद निर्माण होईल. अशा प्रकारे तुला अस्तित्व प्राप्त होईल. (पण ते अस्तित्व आणि माझे अस्तित्व यात वेगळेपण उरणार नाही.)

एकदा अबू यझीद अल्बिस्तामी याला 'आपण सूफीत्वाची अवस्था कशी प्राप्त केली ?' असा प्रश्न कुणीतरी विचारला असता तो म्हणाला, 'ज्याप्रमाणे साप कात टाकतो त्याप्रमाणे मी स्वतःच्या अस्तित्वाचा त्याग केला. आणि जेव्हा माझ्यातील 'स्व' संबंधी विचार करू लागलो तेव्हा तो आणि परमात्मा हे दोघेही एकच असल्याचे माझ्या प्रत्ययाला आले."

तेव्हा आम्ही म्हणालो, "तिच्या साहाय्याने त्याच्यावर प्रहार करा." या कुराणांतील एका वचनाचे (सूरा २, ६८) सूफी लोक पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करतात, "शरीराचे अस्तित्व नाममात्र उरले आहे, अशी जाणीव होण्याइतकी विरक्तीची अवस्था आपल्याला प्राप्त व्हावयास हवी. असे झाल्याशिवाय मन ज्ञानाच्या प्रकाशाने

उजळून निघत नाही, त्याचे पुनरुज्जीवन होत नाही. तथाविही अवस्था प्राप्त झाली म्हणजे अन्तःकरणावर कोणत्याही ऐहिक गोष्टींचा परिणाम होत नाही. यासाठीच मुक्तीच्या या अवस्थेचे वर्णन एकाद्याला मारून त्यास पुन्हा जगविणे " या शब्दांत केले आहे.

मानव व ईश्वर यांच्यामध्ये प्रकार आणि अंधःकार याच्या सहस्त्रावधी अवस्था आहेत. मानव सतत अंधारातून प्रकाशाकडे जाण्यासाठी धडपड करीत असतो व एकदा त्यास प्रकाश मिळाला की मग मात्र तो तेथून परत येत नाही व असेही सूफी लोकांनी मुक्तीचे किंवा मोक्षाचे वर्णन केले आहे.

८

# जीवांचे विविध वर्ग

प्रस्तुत विषयाचे विवेचन करणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. मुसलमानांनी केवळ याच्या बाह्यांगाचा विचार केला आहे व हिंदूंच्या एतद्विषयक विवेचनात शास्त्र- दृष्ट्या परिपूर्णता आलेली नाही. तथापी या विषयाची माहिती देणे अत्यावश्यक असल्याने आजतागायत मला यासंबंधी भारतात जितकी माहिती उपलब्ध झाली ती पुढे देत आहे.

१ ) सांख्य– याविषयी प्रथमतः ' सांख्य ' नामक ग्रंथातील माहिती पुढे उद्धृत करीत आहे. : सजीव प्राण्यांचे वर्ग किती आहेत ? " या प्रश्नास ऋषींनी पुढील उत्तर दिले, " त्यांचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन वर्ग आहेत. विश्वातील अत्युच्च स्थानी दिव्य आत्मे राहतात. मध्यभागी मानव व विश्वाच्या खालील भागी– तळास- प्राणी राहतात. त्यांच्या एकूण १४ जाती आहेत. यांपैकी पहिल्या प्रकारात ब्रह्म, इंद्र, प्रजापति, सौम्य, गंधर्व, यक्ष, राक्षस आणि पिशाच्च या आठ जातींचा समावेश होतो. प्राण्यांमध्ये गुरे, हिंस्र पशू, पक्षी, सरपटणारे प्राणी आणि वृक्ष या पाच जातींचा समावेश होतो. आणि उरलेली एक जात म्हणजेच मानव ही होय. "

याच ग्रंथकाराने आपल्या ग्रंथात इतर या ( पहिल्या वर्गातील ) जातींची पुढील यादी दिली आहे :– ब्रह्म, इंद्र, प्रजापति, गंधर्व, यक्ष, राक्षस, पितरस् , पिशाच्च. आणि प्रस्थापित केलेली एकच व्यवस्था हिंदू लोक कायम ठेवीत नाहीत. तिच्यामध्ये बऱ्याच वेळा लहरीपणा असल्याचे आढळते. त्यामुळे त्यांनी दिलेल्या माहितीत कृत्रि- मपणाही येऊ लागतो. एकाच वस्तूस ते वेळोवेळी नवीन नवीन नावे देतात व त्यांची भर आपल्या पूर्वीच्या याद्यांमध्ये घालतात. याबाबतीत त्यांना प्रतिबंध तरी कोण करणार ?

२ ) गीता : या ग्रंथात वासुदेवाने प्रस्तुत विषयासंबंधी पुढील माहिती सांगितली आहे :

विश्वात तीन आदिशक्ती किंवा ( गुण ) मूल प्रवृत्ती आहेत. प्रथम प्रवृत्तीमुळे बुद्धीचा विकास होतो, ज्ञानेंद्रिये पवित्र होतात आणि त्यामुळे आपण देवांच्यासाठी

पवित्र कृत्ये करू लागतो. या प्रवृत्तीच्या साहाय्याने मुक्ती प्राप्त होते दुसऱ्या प्रवृत्तीमुळे लोभ वाढतो, तिच्यामुळे आपण यक्ष आणि राक्षस यांच्याप्रीत्यर्थ कर्मे करतो. या प्रवृत्तीमुळे शेवटी थकवा येतो.

तिसऱ्या प्रवृत्तीमुळे अज्ञान वाढीस लागते. मनःपूत संचारास किंवा वागणुकीला हीच प्रवृत्ती कारणीभूत असते. तिच्यामुळे आळस व निद्रा यते आणि आपण कर्तव्य–पराङ्मुख होतो. भूत आणि पिशाच्च यांची कामे आपण करू लागतो. या प्रवृत्तीस बळी पडल्यास आपल्याला प्राणी किंवा वनस्पती यांचा जन्म प्राप्त होतो व अशा प्रकारे आपल्याला आपल्या दुष्कृत्याबद्दल शिक्षा भोगावी लागते.

याच ग्रंथात अन्यत्र पुढील माहिती सांगितली आहे : "सत्प्रवृत्त आत्म्यांचे वर्तन देवाप्रमाणे असते. त्यामुळे चांगली कर्मे करण्याची इच्छा बाळगणारे लोक देवांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवतात व त्यानुसार ते वागतात. राक्षस आणि असुर यांच्यामध्ये दुर्गुणांचा प्रकर्ष आढळतो. त्यांचे अनुकरण करणाऱ्या माणसाची ईश्वरावर श्रद्धा नसते आणि तो त्याच्या आज्ञांचे पालन करीत नाही. राक्षस किंवा असुर हाच त्याचा आदर्श असल्यामुळे तो त्यांच्यासारखीच (राक्षसाच्या कृत्यांसारखी) कृत्ये करतो. जग हे ईश्वरविरहित असावे आत्याला वाटते. त्यामुळे त्याला इहलोकात व परलोकात अतोनात दुःख सोसावे लागते."

गीतेतील वर उल्लेखिलेल्या दोन उताऱ्यांची तुलना केल्यास त्यातील दोन्ही वर्गीकरणात साम्य नसल्याचे लक्षात येते. त्याचप्रमाणे दोन्ही उताऱ्यांत वेगवेगळ्या वर्गांत ज्या नावांचा निर्देश केला आहे त्यातही सारखेपणा आढळत नाही.

बहुसंख्य हिंदू लोक जीवांचे पुढील आठ वर्ग असल्याचे मानतात :

१) **देव** : – हे उत्तरेकडे राहतात. देव हे खास हिंदूचेच आहेत, असे त्यांना वाटते. झोरोस्तर याने बौद्धांच्या सर्वोच्च देवतेस 'देव' (म्हणजे सैतान) असे नामाभिधान दिल्याने त्याच्यामध्ये आणि बौद्धांमध्ये वितुष्ट निर्माण झाले, असे लोक म्हणतात. फार्सी भाषेत 'देव' या शब्दाचा 'सैतान' हा अर्थ फार प्राचीन काळापासून रूढ आहे.

२) **दैत्य किंवा दानव** – हे दक्षिणेत राहतात जे लोक हिंदूंना विरोध करतात व गाईचा छळ करतात, त्यांचा समावेश या वर्गात केला जातो. देव आणि दानव यांच्यामध्ये नेहमी संघर्ष चाललेला असतो, अशी हिंदू लोकांची समजूत आहे.

३) **गंधर्व** – देवांच्या गायकांचा वर्ग. यांच्या गायन प्रसंगी ज्या नर्तिका नृत्य करतात, त्यांना 'अप्सरा' असे म्हणतात.

४) **यक्ष** – देवांच्या संपतीचे रक्षण करणारांचा वर्ग.

५) **राक्षस** – हे अत्यंत कुरूप व ओंगळ दिसतात.

६) **किन्नर** –मानवदेहावर घोड्याचे शिर ठेवल्यास जशी आकृती दिसते तशा

प्रकारचे रूप यांना प्राप्त झालेले असते. ग्रीकांच्या Centaur मध्ये मात्र उलट प्रकार आढळतो. Centaur चा खालील अर्धा भाग घोड्याचा व वरील अर्धा भाग मानवाचा असतो. हीच ग्रीकांच्या Arcitenens या राशीची प्रतिमा होय.

७) नाग–हे सर्पासारखे दिसतात.

८) विद्याधर– हे मंत्रतंत्र करतात व त्यांना चेटूक करण्याची अघोरी विद्या प्राप्त झालेली असते. त्यांच्या या विद्यांचा परिणाम केवळ तात्कालिक स्वरूपाचा असतो.

वरील वर्गात देवांचे स्थान सर्वांत वरचे असून दानवांचे स्थान सरतेशेवटी आहे मूल प्रकृतीनुसार व पूर्वकर्मानुसार इतर वर्गांना या वर्गीकरणात स्थान दिले आहे. हे जीव दीर्घायुषी असून त्यांना कुठल्याही प्रकारचे दुःख भोगावे लागत नाही. हे जीव मानवाला अशक्य वाटणाऱ्या गोष्टी लीलया करतात. ते मानवाच्या सन्निध असून त्याच्या इच्छेनुसार त्याला साहाय्य करतात. तथापि 'सांख्य' नामक ग्रंथातून जो उतारा वर उद्धृत केला आहे, त्यावरून वरील माहिती चुकीची आहे असे दिसते. कारण ब्रह्म, इंद्र आणि प्रजापती हे जीवाचे वर्ग नसून व्यक्तिनामे होत. ब्रह्म आणि प्रजापती या दोन्ही नामांचा अर्थही जवळजवळ सारखाच आहे. काही गुणविशेषांच्या कमीअधिकपणामुळे त्यांना वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या नावांनी संबोधण्यात येते.

इंद्र हा जगांचा अधिपती होय. वासुदेवाने यक्ष आणि राक्षस यांची गणना दानवांच्या एकाच वर्गात केली आहे तर यक्ष देवतांचे रक्षक होत, असे पुराणात म्हटले आहे.

या सर्व दिव्य आत्म्यांचा समावेश एकाच वर्गात करण्यास प्रत्यवाय नसावा. या सर्वांनी मनुष्यजन्मात केलेल्या कर्मांमुळे त्यांना त्यापुढील उच्च अवस्था प्राप्त झाली त्यांनी आपले देह मात्र टाकून दिले आहेत कारण देहामुळे जीवाची आयुर्मर्यादा व सामर्थ्य कमी होते. त्यांच्यामध्ये वेगवेगळ्या गुणांचे ज्या प्रमाणात प्राबल्य आढळते त्यानुसार त्यांच्यामधील वेगळेपण लक्षात येते. पहिल्या प्रवृत्तीचा प्रकर्ष देव-वर्गात आढळतो, त्यामुळे त्यांना वरदान मिळून शांती लाभते. वस्तुनिरपेक्षता हा मानवी मनाचा स्थायिभाव होय. तिसरी प्रवृत्ती मुख्यत्वे भूत–पिशाच्चांच्या वर्गात आढळते आणि दुसरी प्रवृत्ती या दोहोंमधील वर्गात आढळते.

देवांची संख्या तेहतीस कोटी आहे, असे हिंदू लोक मानतात. यांपैकी ११ कोटी देवांवर महादेवाची अधिसत्ता असते. त्यांची अधिसत्ता इतक्या देवांवर असल्यामुळेच त्यास 'महा देव' असे संबोधण्यात येते.

मानवाप्रमाणेच खाणे, पिणे, संभोग, जीवन. मरण इ. गोष्टी देवांच्याबाबतीतही संभवतात, असे हिंदूंना वाटते. नंदिकेश्वराने महादेवाला अनेक वस्तू अर्पण केल्या म्हणून त्याला मानव देहावस्थेतच स्वर्गप्राप्ती झाली आणि इंद्राने नहुष नामक ब्राम्हणाच्या पत्नीशी व्यभिचार केल्याने त्याला सर्पयोनीत जन्म घ्यावा लागला, असे दाखले पतंजलीने आपल्या ग्रंथात दिले आहेत.

देवानंतर मृत पूर्वजांचा किंवा पितरांचा वर्ग व त्यानंतर भूतांचा वर्ग येतो. पितर आणि मानव यांच्यामध्ये हा भूतांचा वर्ग असतो. जे आपल्या ज्ञानाने व कर्माने देव-पदवीप्रत पोहोचलेले असतात, तथापि ज्यांची देहापासून मुक्तता झालेली नसते त्यांना 'ऋषी', ' सिद्ध ' किंवा ' मुनी ' असे म्हणतात. या तिघांमध्येही त्यांच्या गुणवत्तेनुसार भेद आहेत.

, सिद्ध पुरुषाला आपल्या इच्छेनुसार या जगात काही गोष्टी करण्याची शक्ती– 'सिद्धी'-प्राप्त झालेली असते. तथापि त्याला एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जाण्याची व मुक्ती प्राप्त करण्याची महत्त्वाकांक्षा नसते तथापि त्याने प्रयत्न केल्यास त्यास ऋषिपद प्राप्त करता येते. एकाद्या ब्राह्मणाला हे पद प्राप्त झाल्यास त्याला ' ब्रह्मर्षि ' आणि क्षत्रियाला प्राप्त झाल्यास त्यास ' राजर्षि ' असे म्हणतात. तथापि त्याखालील वर्णांना मात्र हे पद प्राप्त करता येत नाही. वस्तुतः ऋषी हे मानव साधू असतात व आपल्या ज्ञानामुळे त्यांना कधी कधी देवापेक्षाही अधिक योग्यता प्राप्त होते. आणि म्हणूनच देव त्यांच्याजवळ विद्यार्जन करतात. एक ' ब्रह्म ' सोडल्यास दुसरी कोणतीही देवता ऋषीपेक्षा श्रेष्ठ नाही.

ब्रह्मर्षी आणि राजर्षी यांच्यानंतर सर्वसामान्य जनतेतील विविध वर्ग आणि जाती यांचा क्रम येतो. त्यांच्याविषयी स्वतंत्र प्रकरणात माहिती दिलीच आहे. या वर्गांचा समावेश वस्तुजातात होतो तथापि ' लौकिक ' आणि ' पारलौकिक ' यांच्यामध्ये एक विशिष्ट विभाग कल्पिला आहे. त्यात उपरिनिर्दिष्ट मूलभूत प्रवृत्ती असतात. जणू हा विभाग म्हणजे लौकिक आणि पारलौकिक यांना जोडणारा दुवाच होय. या तीन प्रवृत्तींपैकी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय प्रवृत्तीचा प्रभाव अनुक्रमे ब्रह्मा किंवा प्रजापती, नारायण आणि महादेव यांच्यात आढळतो, असे हिंदू धर्मशास्त्र व परंपरा सांगते. ब्रह्मा हा सृष्टी निर्माण करतो, नारायण तिचे पालन करतो व महादेव (शंकर वा रुद्र) तिचा विनाश करतो, हे तिघे वर व खाली भ्रमण करीत असताना त्यांनी केलेल्या कर्मानुसार त्यांना वेगवेगळी नावे देण्याची ही प्रथा आहे. तथापि या तिघांचाही मूलस्रोत ' विष्णू ' हा असून त्यातच या तिन्ही मूलभूत प्रवृत्तींचा वा शक्तींचा समन्वय झाला आहे. वस्तुतः विष्णूमध्ये दुसऱ्या प्रवृत्तीचा प्रकर्ष आढळतो. तथापि ते बहुधा प्रथम आणि द्वितीय प्रवृत्ती ज्यांच्यामध्ये आढळतात त्या ब्रह्मा आणि विष्णू यांच्यामध्ये फारसा भेद करीत नाहीत, येथे हिंदू आणि ख्रिश्चन लोक या त्रिमूर्तींपैकी एक पिता दुसरा पुत्र आणि तिसरा देवदूत आहे असे मानतात.

हिंदूंच्या धार्मिक सिद्धांताचे अत्यंत काळजीपूर्वक सूक्ष्म अध्ययन केल्यावर वरील निष्कर्ष निघतात. त्यांच्या रूढींमध्ये मात्र मूर्ख कल्पनांचा भरणा झाला आहे. त्या-विषयीही पुढे विचार करू. हिंदूंच्या पारंपरिक कथांमध्ये किंवा पुराणांमध्ये देवांच्या-संबंधी ज्या कल्पना सांगितल्या आहेत त्यांतील काही कल्पना आक्षेपार्ह आहेत. त्या-

मुळे देवाची वा देवदूतांची अप्रतिष्ठा होते, असे इस्लामी धर्मशास्त्रज्ञ निश्चितपणे म्हणतील, यात शंका नाही. तथापि ग्रीकांच्या धर्मविषयक कल्पनांशी या कल्पनांची तुलना केल्यास मात्र या कल्पना तुम्हाला चमत्कारिक वाटणार नाहीत. ते लोकही देवदूतांनाच 'देव' म्हणतात, या गोष्टीचा निर्देश या पूर्वीच आहे. या ठिकाणी त्यांच्या पुराणातील जीऊसविषयक कथांचा विचार केल्यास वरील विधानाची सत्यता पटेल. या देवांना किंवा देवदूतांना सगुण रूप असून त्यांत सजीव प्राण्यांची विविध वैशिष्ट्ये आढळतात असेही ते मानतात. एका देवतेसंबंधी एका ग्रीक आख्यायिकेमध्ये पुढील उल्लेख आढळतो, त्यावरून देवतांच्या सगुण स्वरूपावरील त्यांची श्रद्धा प्रकट होते. "जेव्हा ही देवता जन्मली, त्यावेळी तिला खाऊन टाकावे अशी तिच्या पित्याला इच्छा झाली. तेव्हा तिच्या मातेने एका दगडावर कापडाच्या चिंध्या गुंडाळून तो दगड त्याला खायला दिला. मग त्या देवतेचा पिता तेथून निघून गेला."

याविषयी जालीनूस यानेही आपल्या भाषणांच्या संग्रहात उल्लेख केला आहे. त्यात त्याने फीलोच्या कवितेत वर्णिलेली देवतांच्या पूजेची एक गूढ प्रक्रियाही सांगितली आहे तो म्हणतो, "सुवासिक तांबडे केस आणि मानसिक वा बौद्धिक शक्तींच्या वजनाइतके रक्त घेऊन ते देवतांना अर्पण करा." येथे देवतांना अर्पण करण्यासाठी "पाच शेर केशर घ्या" असे सांगावयाचे आहे असे दिसते. मानवाला पाच ज्ञानेंद्रिये आहेत. त्यावरून "देवतांना अर्पण करण्यासाठी पाच शेर केशर घ्या" असे येथे कवीला सांगावयाचे आहे असे दिसते. या मिश्रणातील अन्य घटकांचाही त्याने अशाच गूढ रीतीने उल्लेख केला आहे. त्यावरही जालीनूस याने भाष्य केले आहे. जीऊसने अनेक स्त्रियांशी विवाह केला व कित्येक स्त्रियांशी संभोग केला. त्याने ज्या स्त्रियांशी विवाह न करता त्यांच्यावर बलात्कार केला, त्यांतच फिनिक्सची मुलगी यूरोपा हिचाही उल्लेख केला जातो. पुढे यूरोपा हिला दोन मुले झाली. तिने त्यांची नावे मिनॉस आणि ऱ्हॅडमॅंथस् अशी ठेवली. इस्राईल लोकांनी पॅलेस्टाइनमध्ये प्रवेश करण्यापूर्वीच ही घटना घडली असे म्हणतात.

याशिवाय जीऊसविषयी पुढील आख्यायिकाही सागतात: जीऊस हा ७८० वर्षांचा झाल्यावर तो (सॅम्सनच्या कालखंडातच) मृत्यू पावला व त्याला क्रेट येथेच पुरण्यात आले. जीऊस याचे पूर्वीचे नाव 'डिऑस' (Dios) असे असून तो वृद्ध झाल्यावर त्याला 'जीऊस' या नावाने संबोधिले जाऊ लागले. अॅथेन्सचा पहिला सम्राट कक्रोपस् (Cecrops) याने त्याला हे नाव दिले.

कुठल्याही प्रकारचा संयम न बाळगता वासनाधीन होणे व वासना पूर्ण करणे या गोष्टी या लोकांमध्ये सर्रास प्रचलित होत्या असे दिसते.

अथेनियनांच्या दुर्गुणांचे मूळ कक्रोपस् (Cecrops) आणि त्याचे वंशज यांच्या वर्तनात आढळते, अशा प्रकारचा उल्लेख प्राचीन इतिहासकारांनी केला आहे. अॅलेक्झॅन्डरच्य

चरित्रातही अशा प्रकारच्या दुर्वर्तनाचा उल्लेख आढळतो. ईजिप्तचा राजा नेक्टनेनास हा अर्टाक्सस याच्या भयाने मसिडोनियाच्या राजधानीत दडून बसला होता. तेथे त्याने भविष्यकथनास प्रारंभ केला. राजा फिलिप याच्या अनुपस्थितीत त्याची पत्नी ऑलिम्पिआस हिच्याशी, [ दोन फण्या–असलेल्या सर्पासारख्या दिसणाऱ्या 'ॲमॉन' ( Ammon ) नावाच्या देवतेचे रूप घेऊन ] आपणच ॲमॉन ही देवता आहोत असे भासवून, त्याने संभोग केला तेव्हा ती गर्भवती झाली. पुढे तिला जो मुलगा झाला, त्याचेच नाव ॲलेक्झॅन्डर. परत आल्यावर फिलिप राजा "हे आपले मूल नव्हे," असे सांगणार तोच त्याला ॲलेक्झॅन्डर हा 'ॲमॉन' नामक देवतेचा पुत्र असल्याचा दृष्टान्त झाला. तेव्हा "मानव देवांना प्रतिकार करू शकत नाही" असे म्हणून त्याने ॲलेक्झॅन्डर हा आपलाच मुलगा म्हणून मानले. आपल्या पुत्राच्या हातून आपला वध होणार, असे नेक्टनाबसच्या भविष्यात लिहिले असल्याने पुढे अलेक्झांडरने त्याच्या मानेवर शस्त्राने प्राणांतिक वार केल्यावर 'हाच आपला पुत्र होय' ही गोष्ट नेक्टनाबसच्या लक्षात आली.

ग्रीकांच्या अन्य पौराणिक आख्यायिकांत अशाच तऱ्हेचे उल्लेख आढळतात. याच प्रकारचे उल्लेख हिंदूंच्या पौराणिक कथांतही आढळतात. त्यांच्या विवाहपद्धती-विषयी विवरण करताना याविषयी माहिती सांगेन. असो. आपण आता पुन्हा आपल्या मूळ विषयाकडे वळू. जीऊसच्या चरित्रातील मानवतेवर अलौकिक अंशाचे स्पष्टीकरण करताना जीऊस हा शनीचा पुत्र बृहस्पती होय, असे ग्रीक लोक मानतात कारण शनी हाच चिरंतन किंवा शाश्वत आहे. [ आणि त्यामुळेच त्याचा पुत्र जीऊस हाही अमर ( चिरंजीव ) आहे. ] जालीनूस यानेही आपल्या ग्रंथात असेच मत मांडले आहे. या मताला अराटस याच्या ग्रंथात आधार असल्याचे आढळते. जीऊसची स्तुती करताना तो म्हणतो,

"त्याच्याशिवाय जगणे अशक्य आहे. मानवजात त्याचा त्याग मुळीच करू शकत नाही. सर्व रस्ते त्यानेच व्यापलेले आहेत. तो मानवप्राण्यांवर दया करतो. तोच त्यांना लागणाऱ्या सर्व वस्तू निर्माण करतो. तो मानवांना जीवनाच्या विविध गरजांची जाणीव करून देतो व त्यासाठी इष्ट असे कर्म करण्याची प्रेरणा देतो. जमिनीची मशागत करण्यास योग्य असा काळ कोणता, याचीही पूर्वसूचना तो लोकांना देतो. त्याच्या अनुग्रहामुळे ग्रह आणि राशी यांना त्यांचे स्थान प्राप्त झाले आहे. यासाठीच सर्व कृत्ये करण्यापूर्वी ती कृत्ये केल्यानंतर आपण त्यास वंदन करतो."

ज्या पद्धतीने ग्रीक लोक झेऊसचे वर्ण करतात त्याच पद्धतीने हिंदू लोकही ब्रह्माचे वर्णन करतात.

अराटासच्या ग्रंथावर टीका लिहिणारा एक भाष्यकार म्हणतो, " ग्रंथारंभी देवांचे स्तवन करताना अराटसने पारंपरिक धोरण सोडून एक वेगळेच धोरण स्वीकारलेले दिसते. तसेच त्याला कोणता ' जीऊस ' अभिप्रेत आहे हे कळत नाही. त्यास मानव-देहधारी जीऊस अभिप्रेत आहे की दैवी जीऊस अभिप्रेत आहे, हे समजून घ्यावयास हवे; कारण होमरनेही एके ठिकाणी जीऊस हाच जणू आकाश असल्याचा निर्देश केला आहे. तेथे " जणू जीऊसपासून कापून अलग केलेले हे बर्फाचे तुकडेच होत " अशा शब्दांत त्याने ' जीऊस म्हणजे आकाश ' ही कल्पना स्पष्ट केली आहे. "

" रस्ते व भेटीगाठीची ठिकाणेही जीऊसने व्यापली आहेत. आपण कित्येक श्वासा-बरोबर त्यालाच ( जीऊसलाच ) आपल्यामध्ये सामावून घ्यावयास हवे. " असे ज्या वेळी अराटस म्हणतो, त्यावेळी त्याला जीऊस म्हणजे वायू असे म्हणावयाचे आहे असे दिसते.

यावरून स्टो ( Stoa ) येथील तत्त्वज्ञांना जीऊस म्हणजे नैसर्गिक शक्ती असलेल्या आत्मा असे वाटते.

थोडक्यात, निसर्गाची सर्व वस्तूंवर सत्ता असते, असे त्यांना म्हणायचे आहे. जे जे हितप्रद आहे ते त्याने निर्माण केलेले असल्याने तो ( जीऊस ) दयाळू आहे, तसेच मानवांप्रमाणे देवांचीही त्यानेच निर्मिती केली असे अराटस याला वाटते, असे वरील उताऱ्यावरून सिद्ध होते व त्यावरून ग्रीकांमध्ये प्रचलित असलेल्या एतद्विषयक मतांची कल्पना येते.

९

# वर्णव्यवस्था

एखाद्या महत्त्वाकांक्षी व कर्तृत्ववान राज्यकर्त्याने एखादी नवीन धर्तीची समाज-व्यवस्था प्रस्थापित केली आणि सुदैवाने त्या राष्ट्रानेही त्या व्यवस्थेला मान्यता दिली तर ती व्यवस्था एखाद्या अढळ पर्वताप्रमाणे त्या राष्ट्रात चिरस्थायी होते. काही काळ लोटल्यावर एखाद्या सर्वसामान्य कायद्याप्रमाणे ही समाजव्यवस्था त्या राष्ट्रात रूढ होते. ही समाजव्यवस्था वा शासनव्यवस्था, अंशतः का होईना, धार्मिक तत्त्वज्ञानावर अधिष्ठित असल्यास, त्या राष्ट्रात शासन आणि धर्म यांची युती होऊन मानव संस्कृतीच्या विकासाची पदचिन्हे तेथे स्पष्टपणे लागतात.

इतिहासाकडे एक दृष्टिक्षेप टाकल्यास, प्राचीन काळातील कर्तव्यदक्ष राज्यकर्त्यांनी, आपल्या राज्यातील विविध सामाजिक घटक एकमेकांत मिसळून, त्यांच्यामध्ये संकर होऊ नये, त्यामुळे समाजात अव्यवस्था व गोंधळ होऊ नये व आपल्या राष्ट्रातील बचावाची घडी नीट बसावी, यासाठी अत्यंत दक्षतेने पावले टाकल्याचे दिसते. त्यांनी समाजाचे विविध वर्ग पाडले व प्रत्येक वर्गाने त्यास नेमून दिलेले कार्य करावे, असा दंडकही घातला. एका वर्गातील लोकांनी दुसऱ्या वर्गातील लोकांशी बेटीव्यवहार करू नयेत अशा प्रकारचे कडक नियमही त्यांनी घालून दिले होते. या नियमांचे पालन काटेकोरपणे व्हावे, याकडेही या राज्यकर्त्यांनी विशेष लक्ष दिले. या व्यवस्थेचा किंवा नियमांचा भंग करणाऱ्यांना कडक शासन केले जाई.

याच पद्धतीने, खुसरूंनी प्रस्थापित केलेल्या समाजव्यवस्थेचे कित्येक दाखले प्राचीन काळच्या इतिहासात आढळतात. त्यांनी निर्माण केलेल्या मार्गाने ढवळाढवळ करता येत नसे किंवा त्या व्यवस्थेच्या नियमांचे पालन करण्याच्या बाबतीत कुणालाही कोणत्याही प्रकारची सवलत दिली जात नसे. अर्देशीर बिन बाबक याने आपल्या राज्यातील विविध समाज–घटकाची पुढीलप्रमाणे विभागणी केली होती :

**पहिला वर्ग** : राजे आणि सरदार

**दुसरा वर्ग** : कायदेपंडित, साधू आणि अग्निपूजक.

**तिसरा वर्ग** : वैद्य, खगोलशास्त्रज्ञ आणि इतर वैज्ञानिक

**चवथा वर्ग** : कृषिवल, कलावंत.

याशिवाय या वर्गांत वेगवेगळे उपवर्ग होते आणि त्या प्रत्येक उपवर्गाची व्यवच्छेदक लक्षणेही प्रतिपादिलेली होती.

अशा प्रकारची नवीन समाजव्यवस्था ज्याने प्रस्थापित केली, त्याची माहिती लोकांना काही काळपर्यंत असते. 'एका नवीन समाजव्यवस्थेचा जनक' म्हणून लोकांना त्यावेळी त्याचे स्मरण राहते तथापि काळ लोटल्यावर ही नवीन समाजव्यवस्था त्या राष्ट्राचा सांस्कृतिक वारसा म्हणूनच लोकांच्या लक्षात राहते आणि नवसमाजव्यवस्थेच्या निर्मात्याच्या नावाची विस्मृती लोकांना होऊ लागते. शतकामागून शतके आणि युगामागून युगे लोटल्यावर अशा प्रकारचे विस्मरण होणे त्यांना अगदी स्वाभाविकच असते.

हिंदूमध्ये अशा प्रकारच्या सामाजिक संस्थांचे वैपुल्य असल्याचे आढळते. आपल्या मुस्लिम समाजाचे मात्र असे नाही. हिंदू आणि मुस्लिम समाजांत या बाबतीत परस्परविरोधी असे दृश्य आढळते. आपण सर्व मानवमात्रांना समान लेखतो. केवळ धर्मश्रद्धेच्याबाबतीतच साम्य–वैषम्याची जाणीव आपणास होते. मुस्लिम आणि हिंदू यांच्यामध्ये समाजव्यवस्थेच्या संदर्भात मूलभूत स्वरूपाचे मतभेद असल्यानेच या दोन्ही समाजांतील लोकांत एकमेकाविषयी सद्भावना निर्माण होण्याच्या बाबतीत कित्येक अडथळे निर्माण होतात आणि ते मोकळेपणाने एकमेकांची मनेही समजून घेऊ शकत नाहीत.

हिंदू लोक आपल्या समाजातील विविध वर्गांना 'वर्ण' असे म्हणतात. वंशपरंपरेच्या संदर्भात ते या वर्गासाठी जातक ( : जन्म) ही संज्ञा वापरतात.

प्रारंभापासूनच हिंदू समाज पुढील चार वर्णांत विभागलेला आहे :

(१) ब्राह्मण– हा हिंदू समाजातील अत्युच्च व श्रेष्ठ वर्ण असून तो ब्रह्माच्या शीर्षातून निर्माण झाला आहे, असे हिंदूंच्या धर्मग्रंथात म्हटले आहे.

(२) क्षत्रिय– ब्रह्माच्या स्कंधापासून व हातापासून 'क्षत्रिय' नामक दुसरा वर्ण निर्माण झाला. त्यांच्या श्रेणीमध्ये आणि ब्राह्मणांच्या श्रेणीमध्ये फार अंतर नाही.

(३) वैश्य– नामक तिसरा वर्ण ब्रह्माच्या मांडीपासून निर्माण झाला आणि

(४) शूद्र– हे त्याच्या पायापासून निर्माण झाले, असे हिंदू लोक मानतात.

वैश्यांच्या श्रेणीत आणि शूद्रांच्या श्रेणीत फारसे अंतर नाही. ह्या वेगवेगळ्या वर्णांचे लोक एकाच खेड्यात किंवा शहरात राहतात. प्रत्येक वर्णाच्या लोकांमध्ये स्ववर्णियांत राहण्याचीच प्रवृत्ती मुख्यत्वेकरून आढळते त्यामुळेच प्रत्येक गावात प्रत्येक वर्णाची स्वतंत्र वस्ती असल्याचे आढळते.

शूद्रांनंतर अंत्यज नामक लोकांचा क्रम येतो. हे लोक विविध प्रकारे समाजाची सेवा करतात. अंत्यज लोकांचा समावेश कोणत्याही विशिष्ट जातीत केला जात नाही. ते केवळ व्यावसायिक किंवा धंदेवाईक लोक आहेत, असे मानण्यात येते. या अंत्यज

लोकांचे आठ उपवर्ग असून त्यांच्यामध्ये बेटीव्यवहार होतात तथापि साळी, कापडास खळ लावणारे लोक आणि चांभार यांचा यास अपवाद आहे. त्यांच्याशी अशा प्रकारचे सामाजिक संबंध ठेवल्यामुळे किंवा व्यवहार केल्यामुळे आपला दर्जा खालावतो अशी इतर जमातींतील लोकांची समजूत आहे. या आठ प्रकारच्या व्यावसायिकांत कपड्यांना खळ देणारे लोक, चांभार, गारुडी, टोपल्या विणणारे व ढाली तयार करणारे, खलाशी, कोळी, साळी आणि पक्षी व हिंस्र पशू यांची शिकार करणारे शिकारी यांचा समावेश होतो. हिंदू समाजातील चार वर्णांचे लोक एकत्र राहात नाहीत, याचा वर उल्लेख केलाच आहे. अंत्यज लोक गावाबाहेर ( चार वर्णांचे लोक जेथे राहतात, त्या वस्तीपासून दूर अंतरावर ) राहतात.

हाडी, डोम ( डोंब ), चांडाळ, बधतौ यांचा समावेश मात्र कोणत्याही वर्णात वा व्यावसायिकांत केला जात नाही. गावाची साफसफाई करण्यासारखी गलिच्छ कामे त्यांना करावी लागतात. अशा प्रकारची कामे करणारांचा एक स्वतंत्र वर्ग असून ते जी सामाजिक कामे करतात, त्यावरूनच त्यांचे समाजातील वेगळेपण ठरते. अनैतिक संबंधातून जन्मलेल्या संततीप्रमाणे त्यांना या समाजात वागणूक दिली जाते. शूद्र पिता आणि ब्राह्मण माता यांच्यापासून या वर्गाचे लोक जन्मले असा सर्वसामान्य हिंदू लोकांत समज प्रचलित असून या वर्गाच्या लोकांचा समावेश अधःपतित जमातीत केला जातो.

चार वर्णांतील लोकांना सर्वसामान्यपणे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ही नावे असली तरी प्रत्येक वर्णातील व्यक्ती जे विशिष्ट कार्य करते त्यावरूनही तिच्यासाठी वेगळे नामाभिधान वापरले जाते. उदा. जो ब्राह्मण केवळ आपल्या घरी आपल्या वर्णानुसार कर्म करीत असतो, त्याला सर्व साधारणपणे 'ब्राह्मण' असे म्हणतात. जो ब्राह्मण यजमानाकडे यज्ञकर्म करतो त्याला 'इश्तिन्' असे म्हणतात. ब्राह्मण तीन यज्ञांचे कार्य करतो त्यास 'अग्निहोत्रिन्' असे म्हणतात आणि यज्ञात आहुती देणाऱ्या ब्राह्मणास 'दीक्षित' असे म्हणतात. ब्राह्मणांप्रमाणेच इतर वर्णांतही अशा प्रकारे विशिष्ट कार्य करणाऱ्यास त्यानुसार संज्ञा किंवा नामाभिधान उपयोजण्याची प्रथा आहे.

हिंदू समाजात या चार जातींच्या खाली जे कनिष्ठ वर्गाचे लोक आहेत, त्यांपैकी 'हाडी' नामक लोक त्यातल्या त्यात बरे आहेत, असे हिंदू लोक मानतात कारण हे लोक अपवित्र कार्ये करीत नाहीत. ते शक्यतो अशा कार्यांपासून अलिप्त राहतात. त्यांच्यानंतर 'डोम' लोकांचा क्रम येतो. हे लोक वीणा वाजवितात त्यांना गायनकलाही चांगली अवगत असते. त्यानंतर शिक्षेप्रीत्यर्थ हत्या करणाऱ्या– फाशी देणाऱ्या लोकांच्या–वर्गाचा क्रम त्यानंतर येतो. आणि 'बधतौ' नामक वर्गाचे लोक तर त्याहूनही कनिष्ठ प्रतीचे असतात. ते मेलेल्या जनावरांचे मास खातात. एवढेच नव्हे, तर ते कुत्र्यांचे आणि अन्य हिंस्र पशूंचेही मास खातात.

पंगतीच्या वेळी आपापल्या वर्णाच्या लोकांबरोबर भोजन करण्याची प्रथा या चारही वर्णांच्या लोकांमध्ये आहे. दोन वेगवेगळ्या वर्णांच्या व्यक्तींना एकत्र एका पंगतीत जेवता येत नाही. दोन ब्राह्मणांचे एकमेकांशी पटत नसेल तर त्या दोहोंच्यामध्ये एकादे वस्त्र किंवा लाकडाचा तुकडा ठेवतात. त्यामुळे ते दोघेजण वेगळे–विलग झाले आहेत असे मानले जाते. कधी कधी तर त्या दोघांच्यामध्ये केवळ एक रेषा ओढून ही गोष्ट दर्शविण्यात येते. जेवणातील उष्टे खाणे निषिद्ध मानले असल्याने स्वतःला हवे तेवढेच अन्न ( पानात ) घ्यावे लागते.

हिंदूंचे चार वर्ण अशा प्रकारचे आहेत :

या चार वर्णांचे व्यवच्छेदक गुणविशेष कोणते असा प्रश्न अर्जुनाने वासुदेवाला विचारला तेव्हा वासुदेवाने त्याला पुढील उत्तर दिले–

" ब्राह्मण हा अत्यंत बुद्धिमान, शांत मनाने विचार करणारा, सत्यभाषणी निष्ठेने ईश्वर–भक्ती करणारा संयमी, इंद्रियांच्या आहारी न जाणारा, पवित्र व न्यायप्रिय असतो. त्याच्यामध्ये धार्मिक वृत्ती प्रकर्षाने आढळते.

क्षत्रिय हा अत्यंत शूर व उदात्त वृत्तीचा असतो. शत्रूंना त्याचा धाक व दरारा वाटतो. तो हजरजबाबी असतो. औदार्य व निर्भीडपणा हे त्याचे गुणविशेष असून तो लोककल्याणार्थ महत्त्वाची कार्ये हाती घेऊन ती अत्यंत यशस्वी रीतीने पार पाडतो.

वैश्य वाणिज्य, कृषी व तत्सम अन्य व्यवसाय करतो.

शूद्र वरील त्रिवर्णांची सेवा करतो.

प्रत्येक वर्णाच्या लोकांनी आपापली नेमून दिलेली कामे करून सामाजिक परंपरेचे पालन केल्यास व नेमाने ईश्वराची भक्ती केल्यास त्यांना ईप्सित सुख प्राप्त होते. जे लोक आपल्या वर्णाची कामे सोडून इतर वर्णांची कामे करतात, त्यांना मात्र धार्मिक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे, पाप लागते. "

यानंतर अर्जुनाला युद्ध करण्याला प्रवृत्त करण्यासाठी वासुदेव म्हणतो, " हे आजानुबाहु पुरुषा, तू एक क्षत्रिय आहेस, याची तुला जाणीव आहे काय ? आपल्या काळातील विविध स्थित्यंतरांना विशेष महत्त्व न देता पुढे घडणाऱ्या वाईट गोष्टींचे आधीच पारिपत्य करण्यासाठी तू धावून जावेस यासाठीच (परमेश्वराने) तुझे क्षत्रियकुळ निर्माण केले आहे. क्षत्रियाने युद्धात विजय मिळविला तर त्याला सत्ता व वैभव प्राप्त होते आणि रणात मृत्यू आल्यास त्याला स्वर्गप्राप्तीचे वरदान मिळते. चार हातांवर शत्रू उभा असता तू त्याच्यापुढे दुर्बलतेचे प्रदर्शन करीत आहेस. शत्रूच्या इच्छेच्या कल्पनेनेच तुला वेदना होत आहेत, तथापि तू शत्रूचे पारिपत्य केले नाहीस तर तू भ्याड आहेस हेच सिद्ध होणार नाही का ? यापेक्षा एका क्षत्रियाचा अधिक दुर्लौकिक तो कोणता ! अशा दुर्लौकिकाइतकी दुसरी कोणती भयानक शिक्षा असेल, असे मला

वाटत नाही. या दुर्लौकिकापेक्षा मृत्यू बरा. परमेश्वराने तुला व तुझ्या वर्णाला युद्ध करण्यासाठीच निर्माण केले आहे. यासाठी तू परमेश्वराची आज्ञा शिरसावंद्य मानून तिचे पालन अवश्य करायला हवे."

या चार वर्णांपैकी कोणकोणत्या वर्णांना मोक्ष प्राप्त होतो याविषयीही हिंदू लोकांमध्ये मतभेद आहेत. ब्राह्मण व क्षत्रिय यांना वेदपठणाचा अधिकार असल्याने केवळ या दोन वर्णांनाच मोक्ष प्राप्त होतो, असे काही जण मानतात तर सद्हेतूने कर्म केल्यास सर्व वर्णांच्या लोकांना– एवढेच नव्हे तर यच्चयावत् मानवजातीला मोक्ष-प्राप्तीचा अधिकार आहे, असे हिंदू तत्त्वज्ञांचे मत आहे. "(येथे सांगितलेलेली) पंचवीस कार्ये चांगल्या रीतीने केल्यानंतर कोणत्याही धर्माचा स्वीकार केल्यास मोक्ष प्राप्तीत बाधा येणार नाही." असे व्यासाने एके ठिकाणी म्हटले आहे. वासुदेव हा हा शूद्र कुळातील असून त्याने अर्जुनाला या संदर्भात केलेला पुढील उपदेशही लक्षात घेण्याजोगा आहे. तो म्हणतो, "परमेश्वर कोणावरही, कुठल्याही प्रकारचा अन्याय न करता तसेच कोणाच्याही बाबतीत पक्षपात न करता, प्रत्येकाला योग्य फल देतो. सद्वर्तनी लोकांना त्याचे विस्मरण पडल्यास तो त्यांच्या सत्कृत्यांचे दुष्कृत्यांत रूपांतर करतो–मग ते दुराचरणी लोक वैश्य असोत, शूद्र असोत की स्त्रिया असोत. तेव्हा, ब्राह्मण किंवा क्षत्रिय यांनी परमेश्वरांची स्मरणपूर्वक भक्ती केल्यास त्यांना किती तरी अधिक लाभ होईल, हे सांगण्याची आवश्यकता आहे काय!"

: १० :

# धार्मिक व नागरी कायदे

ग्रीस देशातील धार्मिक व नागरी कायद्यांच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास या या कायद्यांच्या निर्मितीचे श्रेय सोलन, ड्रॅको, पायथागोरस, मिनॉस यांसारख्या विद्वानांकडे जाते. या व्यक्तींमध्ये दैवी सामर्थ्य असावे, अशी ग्रीक लोकांची समजूत होती. काही राज्यकर्त्यांकडेही ग्रीसमधील कायदे निर्माण करण्यचे श्रेय जाते. उदा. मियानस (Mianos) नामक राजाने मूसानंतर दोनशे वर्षांनी क्रेटन्सवर आणि समुद्रातील काही बेटांवर राज्य केले. त्यावेळी त्याने आपल्या प्रजाजनांसाठी काही कायदे केले. हे कायदे आपल्याला जीऊस (Zeus) ने दिले, असे त्याने लोकांना भासविले.

कायरसनंतर गादीवर बसलेल्या पहिल्या डरायसच्या काळी रोमन लोकांनी अथेनियन लोकांकडून १२ ग्रंथांत निवेदिलेले अथेनियनांचे कायदेशास्त्र मागवून घेतले. पॉम्पीलियस राजाच्या कारकीर्दीपर्यंत रोमन लोकांमध्ये हेच कायदे रूढ होते. पुढे पॉम्पीलियसने त्यांच्यासाठी नवीन कायदे केले. दहा महिन्यांऐवजी बारा महिन्यांचे वर्ष मानण्याची प्रथा त्यानेच सुरू केली. चांदीऐवजी मातीची भांड्यांचा आणि चामड्याचा उपयोग व्यापारासाठी चलनाप्रमाणे करावा, असेही त्याने ठरविले. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणूनच की काय त्याच्या प्रजाजनांत क्षोभ निर्माण झाला.

प्लेटोच्या ‘ कायदेशास्त्रा ’त एका ॲथेनियनाने रोमन लोकांना पुढील प्रश्न विचारल्याचा उल्लेख आढळतो– ‘ तुम्हाला हे कायदे कुणी दिले ! देवतांनी की मानवाने ! त्यावर त्याला उत्तर मिळाले, “ देवतांनीच आम्हाला हे कायदे दिले. आमच्यापुरतेच बोलावयाचे झाल्यास, आम्हाला हे कायदे जीऊसने दिले तथापि अपोलोपासून आपल्याला कायद्याची संहिता प्राप्त झाली, असे लॅकाडेमोनियन लोक मानतात. ”

कायद्यांच्या परंपरेमागील दैवी प्रेरणेचा निर्देश करून प्लेटो आपल्या ग्रंथात पुढे म्हणतो, “ ज्याला दैवी प्रेरणा प्राप्त झाली आहे त्या कायदेपंडितावर एक मोठी जबाबदारी असते. सर्वोच्च न्यायमूल्यांचे पालन आणि जीवनातील उदात्त मूल्यांची जपणूक हे त्याच्या कायद्यांचे अंतिम उद्दिष्ट असावयास हवे. ”

परमेश्वराच्या इच्छेनुसार वागल्यास मानवी जीवनात सुखसमृद्धी लाभते. अशा प्रकारे क्रेटन लोकांनी ईश्वरेच्छेनुसार सामाजिक नियम, कायदे इ. केल्याने त्यांचे जीवन अत्यंत समृद्ध झाले आहे, असेही त्याने पुढे म्हटले आहे.

मानव जीवन कष्ट, ताप, दुःख यांनी भरले आहे. मानवाला या तापातून मुक्त करण्यासाठी देवतांनी त्यांच्याप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या मेजवान्यांची योजना केली आहे. या संदर्भात मूसेस, अपोलो, डिऑनसॉस या देवतांसाठी दिल्या जाणाऱ्या मेजवान्यांचा निर्देश करता येईल या देवतांनी मानवाला कष्टांचा विसर पडावा व त्यास सुख मिळावे म्हणून मद्य, नृत्य व संगीत यासारख्या गोष्टींची निर्मिती केली. मद्यामुळे वृद्धासही तरुणासारखा उत्साह वाटतो. नृत्यातील त्रासामुळे थकवा कुठल्याकुठे नाहीसा होतो आणि या नृत्याच्या साथीला जे संगीत असते, त्यात मानव देवतांसंबंधी कृतज्ञताबुद्धीने स्तुतिस्तोत्रे गातो. ”

प्राचीन ग्रीकांची कायदेशास्त्राच्या उत्पत्तीविषयीची कल्पना आणि हिंदूंची कायदेशास्त्राच्या उत्पत्तीविषयीची कल्पना यांच्यामध्ये बरेच साम्य आढळते. धर्माचे आधारस्तंभ असलेल्या ऋषींनी आपले कायदे निर्माण केले, असे हिंदू लोक मानतात. तथापि पापांची परमावधी झाल्यावर जगदुद्धारासाठी मानवी अवतार घेतलेल्या नारायणासारख्या ‘प्रेषिता’चा कायद्यांच्या निर्मितीशी काही संबंध असेल असे त्यांना वाटत नाही. ते कायद्यांच्या मूलभूत स्वरूपात बहुधा परिवर्तन करीत नाहीत. तसेच, एखाद्या कायद्याऐवजी दुसऱ्या कायद्याचा स्वीकारही ते बहुधा करीत नाहीत.

तथापि हिंदूंच्या परंपरागत कायद्यांतील कोणतेच कायदे रद्द झाले नाहीत, असा मात्र याचा अर्थ नाही. कालमानानुसार अनावश्यक किंवा निषिद्ध वाटणारे कायदे हिंदूंनी आपल्या पारंपरिक कायदेशास्त्रातून काढून टाकले आहेत. ‘वासुदेव’–अवतारापूर्वी गोमांस–भक्षणासारख्या काही प्रथा समाजात प्रचलित होत्या. या प्रथा व काही कायदे पुढे निषिद्ध मानण्यात आले. मानवाच्या स्वभावातील परिवर्तनामुळे किंवा विधिपालनाचे अवजड जू ओढण्याचे सामर्थ्य उत्तरोत्तर कमी होऊ लागल्याने समाजातील काही कायद्यांचा अशा प्रकारे हळुहळू लोप होतो किंवा त्यांच्यामध्ये परिवर्तन होऊ लागते. हिंदूंच्या विवाहविषयक किंवा वारसाहक्काविषयीच्या कायद्यांमधील परिवर्तनाचा उलगडा या तत्त्वानुसार सहज करता येईल.

प्राचीन काळी पुढील तीन पद्धतींनी वारस ठरवीत असत :–

१) एखाद्या गृहस्थाचे ज्या स्त्रीशी यथाविधी लग्न झाले असेल, त्या स्त्रीपासून त्याला होणारे मूल हे त्या गृहस्थाचे–पित्याचे–मूल असते. याबाबतीत आपल्या व हिंदूंच्या विवाहविषयक कायद्यात साम्य आढळते.

२) विवाह करताना एखाद्या गृहस्थाने आपली संतती ही आपल्या सासऱ्याची संतती आहे अशी अट मान्य केलेली असल्यास त्याची संतती ही वंशपरंपरेने त्याच्या

सासऱ्याची असल्याचे मानतात.

३) एखाद्या परक्या इसमापासून एखाद्या विवाहित स्त्रीला संतती झाल्यास ती संतती तिच्या पतीची आहे असे मानण्यात येते. या ठिकाणी परक्या इसमाशी विवाहित स्त्रीने जो संभोग केला त्याला तिच्या पतीची अनुमती होती, असे गृहीत धरले जाते.

या वारसाहक्काच्या तिसऱ्या पद्धतीनुसारच पंडू हा 'शांतनु' राजाचा पुत्र असल्याचे मानीत असत. शांतनूची कथा पुढीलप्रमाणे आहे :–

एका ऋषीच्या शापामुळे शांतनु राजा नपुसक झाला. आपल्या राण्यांशी तो संभोग करू शकत नसे. त्यास मूलबाळ नसल्याने तो फार कष्टी झाला व त्याने पराशरपुत्र व्यास यास आपल्यासाठी संतती निर्माण करण्याची विनंती केली. शांतनूने आपली पहिली राणी व्यासाकडे पाठविली. ती व्यासाशी संभोग करताना भीतीने अत्यंत घाबरू लागली. तिच्या अंगाचा थरकाप होऊ लागला. परिणामी, तिने एका पीतवर्णी पुत्राला– पंडूला– जन्म दिला. नंतर राजाने आपल्या दुसऱ्या राणीला व्यासाकडे पाठविले. तिला व्यासाविषयी अत्याधिक आदर होता, त्यामुळे व्यासाशी संभोग करताना तिने आपले डोळे मिटून घेतले. तिने ज्या पुत्राला– धृतराष्ट्राला– जन्म दिला तो आंधळा होता. त्यानंतर राजाने तिसऱ्या राणीला व्यासाकडे पाठविले. व्यासाबद्दल कुठल्याही प्रकारची भीती किंवा आदराची भावना न बाळगता तिने त्याच्याशी संभोग करावा अशी आज्ञा राजाने आपल्या तृतीय पत्नीला दिली होती. ती अत्यंत उत्साहाने व्यासाकडे गेली आणि पुढे तिने एका अत्यंत सुंदर देखण्या बालकास जन्म दिला.

वर उल्लेखिलेल्या तत्त्वानुसार पंडू हा शांतनूचा पुत्र आहे, असे मानतात. पंडूच्या चारी पुत्रांना एकच पत्नी होती. या चार जणांपैकी प्रत्येकाबरोबर ती एक एक महिना राहत असे.

ज्या व्यासांविषयी वर माहिती सांगितली आहे, त्यांच्या जन्माची कथा हिंदूंच्या काही ग्रंथांत पुढीलप्रमाणे दिली आहे :

एकदा पराशर ऋषी नौकेने प्रवास करीत होते. नौकेत नाविकाची मुलगीही बसलेली होती. पराशराचे तिच्यावर प्रेम बसले. त्याने तिचा अनुनय केला व त्यात तो यशस्वी झाला. तिनेही त्याच्या प्रेमाचा स्वीकार केला. एकांतासाठी त्यांना नदीच्या काठावर एखाद्या वृक्षाचा आश्रय घ्यावयाचा होता. तथापि तेथे एकही वृक्ष त्यांना दिसला नाही. तेव्हा अचानक त्या नदीच्या काठावर ताडवृक्षासारखा एक वृक्ष निर्माण झाला. त्या वृक्षाआड त्या दोघांनी संभोग केला. त्यापासूनच नाविकाच्या मुलीला पुढे 'व्यास' नामक सुंदर पुत्र झाला.

या वेगवेगळ्या कथांमध्ये ज्या विविध सामाजिक रूढी आढळतात. त्या आता हिंदू लोकांमध्ये विशेषकरून आढळत नाहीत. यावरून परंपरागत पाळले जाणारे

कायदे कालमानानुसार रद्द करण्यास हिंदू समाज मान्यता देत असे, हे दिसून येते.

रानटी अरबांच्या काळी जसे अनैसर्गिक विवाह होत असत, तसेच आजही होतात हे मान्य करावयास हवे. कश्मीरच्या शेजारच्या प्रदेशातील डोंगराळ भागात राहणाऱ्या 'पंचीर' नामक लोकात अनेक भाऊ एकाच स्त्रीशी विवाह करतात.

असंस्कृत अरब लोकांत झालेल्या अशा प्रकारच्या अनैसर्गिक शरीर-संबंधाची काही उदाहरणे पुढे देत आहे–

१) एका अरबाने आपल्या पत्नीला दुसऱ्या एका अरबाकडे पाठविले आणि तिला चागली संतती व्हावी म्हणून ती गर्भवती असताना त्याने तिच्याशी संभोग केला नाही. यापूर्वी हिंदू वारसाच्या संदर्भात उल्लेखिलेल्या तिसऱ्या प्रकाराशी या प्रकारच्या शरीरसंबंधाचे साम्य आढळते.

२) आणखी दुसरा एक प्रकार पाहा : एक अरब दुसऱ्याला म्हणाला "तू आपल्या पत्नीशी मला संभोग करू दे. मग मी माझी पत्नी तुझ्याकडे संभोगासाठी पाठवीन." अशा प्रकारे त्यांनी आपल्या पत्नीची अदलाबदल केली.

३) अनेक जणांनी एकाच स्त्रीशी संभोग केला. जेव्हा ती प्रसूत झाली तेव्हा तिने मुलाच्या पित्याचे नाव सांगितले. तिने ते सांगितले नसते तर ज्योतिषांनी ही माहिती सांगितली असती.

४) 'निकाह्–अल्मक्त':– आपल्या पित्याच्या किंवा मुलाच्या विधवा पत्नीशी विवाह केल्यास त्या विवाहापासून होणाऱ्या संततीस 'दैजन' असे म्हणतात. ज्यू लोकांमध्येही अशाच प्रकारची एक विवाहपद्धती आहे.

एखादा निपुत्रिक गृहस्थ वारल्यास त्याच्या भावाने त्याच्या पत्नीशी विवाह करून त्याचा (मृत भावाचा) वंश पुढे चालवावा, अशी त्यांच्यामध्ये प्रथा आहे. यासंबंधापासून होणारी संतती ही त्या निधन पावलेल्या गृहस्थाची संतती आहे, असे मानण्यात येते. अशा प्रकारे मृत गृहस्थाची स्मृती नष्ट होऊ नये, याविषयी ते दक्षता बाळगतात. या पद्धतीने ज्याचा विवाह होतो, त्या माणसाला हिब्रू लोक 'याभाम' असे म्हणतात.

मॅग लोकांमध्येही यासारखी प्रथा असल्याचा उल्लेख तौसरच्या एका ग्रंथात आढळतो. एखादा निपुत्रिक गृहस्थ निधन पावल्यास ते त्याच्या पत्नीचे लग्न त्या (निधन पावलेल्या) गृहस्थाच्या जवळच्या नातेवाइकाशी लावून देतात. निधन पावलेल्या गृहस्थाची पत्नीही जिवंत नसल्यास ते त्याच्या मुलीचे (किंवा त्याच्या पत्नीच्या जवळच्या नात्यातील एकाद्या मुलीचे) लग्न त्याच्या नात्यातील एकाद्या मुलाशी लावून देतात मृताच्या घराण्यात कुणी स्त्री न आढळल्यास मृताच्या संपत्तीचा विनियोग करून ते एकादी स्त्री मिळवितात व तिचे लग्न मृताच्या नात्यातील एकाद्या पुरुषाशी लावतात. या संबंधातून जी संतती होते, ती त्या निधन पावलेल्या गृहस्थाची संतती

आहे, असे ते मानतात. असे केले नाही तर मृतात्म्याची वंशपरंपरा खुंटते व असंख्य जीव नष्ट केल्याचे पाप लागते, अशी त्यांची समजूत आहे.

विवाहविषयक कायदे व प्रथा यांच्या संदर्भात इस्लामची तत्त्वे आणि अन्य धर्मांची तत्त्वे यात तुलना करता यावी, यासाठी वरील माहिती दिली आहे. त्यावरून याविषयी इस्लामची तत्त्वे व इस्लामी प्रथा किती श्रेष्ठ आहेत, हे लक्षात येईल.

# ११

# मूर्तिपूजा

सर्वसाधारण समाजातील लोकांच्या मनाचा कल इंद्रियगम्य गोष्टींकडेच असतो. या समाजास अमूर्त गोष्टींची कल्पना येत नाही तथापि असे असले तरी समाजात विद्वान ज्ञानसाधकांचाही एक गट असतो. या गटातील लोकांना या अमूर्त गोष्टींचे वा तत्त्वांचे आकलन होते. एखादे अमूर्त तत्त्व सर्वसाधारण थरातील लोकांना चित्राच्या वा प्रतिमेच्या साहाय्याने अधिक स्पष्ट करता येते. शाश्वत तत्त्व स्पष्ट करण्यासाठी प्रतिमेचा उपयोग करणे ही गोष्ट चुकीची असूनही काही ख्रिश्चन, ज्यू इ. धर्मगुरूंनी या मार्गाचा अवलंब केला. त्यांनी आपल्या धर्मग्रंथांत व प्रार्थना-मंदिरांत या प्रतिमांचा उपयोग केला. हा मार्ग चुकीचा कसा, ही गोष्ट पुढील उदाहरणाने सिद्ध होईल. हजरत पैगंबर, मक्का किंवा काबा यांची चित्रे काढून ती अशिक्षित समाजास दाखविली असती तर आपण चित्रे पाहत नसून मूळ व्यक्ती वा पवित्र स्थळच पाहत आहोत, असे त्यांना वाटले असते. त्यांनी या चित्राचे चुंबन घेतले असते, त्यांच्यापुढे लोटांगण घातले असते. धार्मिक स्थळी अशा प्रकारची चित्रे लावली असती तर लोकांनी या प्रतिमापुढे सर्व प्रकारचे धार्मिक विधी केले असते. अशा प्रकारे तथे मूर्तिपूजेला प्रारंभ झाला असता.

आपल्याला ज्यांच्याविषयी आत्यंतिक आदरभाव वाटतो किंवा श्रद्धा वाटते, अशा व्यक्ती, प्रेषित, ऋषी व देवता यांची स्मृती त्यांच्यानंतर चिरकाल मनात राहावी, म्हणून लोक त्यांच्या प्रतिमा तयार करतात, स्मारके उभारतात. मूर्तीच्या निर्मिती-मागील खरी प्रेरणा हीच आहे. तथापि बराचसा कालावधी लोटल्यावर युगानुयुगे व शाही पिढ्या लोटल्यावर लोकांना मूर्तींच्या निर्मितीमागील कारणांचा विसर पडतो आणि त्यास एकाद्या परंपरेचे किंवा रूढीचे व प्रघाताचे स्वरूप प्राप्त होते आणि त्या परंपरेबद्दल लोकांच्या मनात एक प्रकारची श्रद्धाही निर्माण होते. समाजमनात मूर्ती-विषयीची ही श्रद्धा चांगलीच रुजली असल्याने धर्मशास्त्रकारांनी शाश्वत सत्याचे तत्त्व लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठी याच नाजुक दुव्याचा आपल्या शास्त्रासाठी उपयोग करून घेतला. त्यामुळे अमूर्त सत्तत्व मूर्तींच्या, चित्रांच्या वा प्रतिमांच्या रूपांनी साकार

झाले. या मूर्तींची पूजा करायला हवी, या मताचाही त्यानंतर पाठपुरावा करण्यात येऊ लागला. महाप्रलयापूर्वीच्या त्यानंतरच्या काळात मूर्तिपूजा प्रचलित होती, या गोष्टीचे दाखले मिळतात. एवढेच नव्हे, तर मानवलोकात देवांनी अवतार घेण्यापूर्वी सम्पूर्ण मानवजात हीच एक प्रचंड मूर्ती होती, असे म्हणण्यापर्यंत काही जणांची मजल जाते.

अब्राहामचा पणजा सेरूख याच्या काळात मूर्तिपूजेस प्रारंभ झाला, असे ‘थोरा’चे अनुयायी मानतात. मूर्तिपूजेचा प्रारंभ कसा झाला याविषयी रोमन लोक पुढील आख्यायिका सांगतात :—

रोमुलस आणि रोमनस या नावाचे दोन भाऊ होते. गादीवर बसल्यावर त्यांनी रोम हे शहर बसविले. काही दिवसांनंतर रोमुलसने आपल्या भावाला ठार मारले. या कृत्याबद्दलचा दैवी प्रकोप म्हणूनच की काय, त्या देशात पोटाच्या विकाराची साथ उद्भवली व अनेक युद्धे झाली. तेव्हा आपल्या कृत्याबद्दल रोमुलस याला अत्यंत पश्चात्ताप वाटला. तुझ्या भावाला तू पुन्हा गादीवर बसविल्याशिवाय तुझ्या राज्यात शांतता व सुबत्ता नांदणार नाही, असा त्याला स्वप्नातील दृष्टान्तात आदेश मिळाला. तेव्हा त्याने आपल्या भावाची एक प्रतिमा तयार करून ती राजसिंहासनावर बसविली. कुणाला ही आज्ञा देतानाही तो “ आम्ही अशी आज्ञा देतो की....”अशा शब्दांत स्वतःचा व आपल्या भावाचा उल्लेख करू लागला. यामुळेच पुढे राजेलोक स्वतःचा उल्लेख एकवचनी न करता अनेकवचनी करू लागले. रोमुलसने अशा प्रकारे प्रायश्चित्त घेतल्यामुळे त्याच्या राज्यात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली व तेथे सुबत्ता नांदू लागली. भावाचा वध केल्याबद्दल जे लोक त्यास दूषणे देत होते, त्यांना आपलेसे करण्यासाठी त्याने एक मोठी मेजवानी दिली व त्यांच्या मनोरंजनासाठी एक नाटकही बसविण्यात आले. याशिवाय या प्रसंगाच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्याने सूर्यापर्यन्त पोहोचणारे एक प्रचंड स्मारक उभारले. या स्मारकातील चार घोड्यांच्या प्रतिमांवर चार मूर्ती होत्या. पृथ्वीसाठी हिरवी प्रतिमा पाण्यासाठी निळी, अग्नीसाठी तांबडी आणि वायूसाठी पांढरी शुभ्र प्रतिमा त्याने तयार केली होती आजही रोम शहरात हे स्मारक उभे आहे.

असो. येथे हिंदूंच्या मूर्तिपूजेविषयी विवेचन करावयाचे आहे. यासंबंधी त्यांच्या काही कल्पना हास्यास्पद वाटण्याची शक्यता आहे. त्यासाठी एक खुलासा आधीच करून ठेवतो. ही मते केवळ अशिक्षित, सर्वसाधारण थराच्या हिंदू समाजातच आढळतात, हे येथे लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यांनी धर्मशास्त्राचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आहे व ज्यांना या जगामागील अंतिम सत्य (त्यांच्या शब्दात, ‘सार ’) कळले, ते विद्वान हिंदू पंडित मात्र मूर्तिपूजेसारख्या गोष्टीवर विश्वास ठेवीत नाहीत व तिचा स्वप्नातही पुरस्कारही करीत नाहीत. ते केवळ ईश्वराचीच भक्ती

करतात. याविषयी शौनकाने परीक्ष राजाला सांगितलेली आख्यायिका लक्षात घेण्याजोगी आहे.

अंबरीष राजाने अत्यंत विशाल असे साम्राज्य मिळविले. काही काळानंतर त्याला आपल्या सत्तेचे व राज्याचे विशेष आकर्षण वाटेनासे झाले. तेव्हा विरक्त होऊन तो सर्व काळ ईशभक्तीत व्यतीत करू लागला. त्यावर प्रसन्न होऊन परमेश्वराने इंद्राच्या रूपाने त्याला दर्शन दिले. 'तुला हवा तो वर माग' असे इंद्राने सांगितल्यावर तो म्हणाला, "तुमचे दर्शन झाले याबद्दल आणि तुम्ही मला देऊ केलेल्या वरदानाबद्दल मला अत्यंत धन्यता वाटते. तथापि मला जे मागावयाचे आहे ते मी तुमच्याजवळ न मागता तुम्हाला ज्याने निर्माण केले, त्याच्याजवळ मागेन."

इंद्र : चांगले फल मिळवणे हेच उपासनेचे उद्दिष्ट असते. तेव्हा तुला काय हवे आहे याविषयी पूर्ण विचार करून मला सांग म्हणजे तुला हवा असलेला वर मी देईन. मला हे फल तुमच्यापासून घ्यावयाचे नाही, इतरापासून घ्यावयाचे आहे, असे सांगण्यात काय अर्थ आहे ?

राजा : मला संपूर्ण पृथ्वीचे राज्य मिळाले होते. या पृथ्वीवरील कोणत्याही वस्तूबद्दल मला कुठल्याही प्रकारचे आकर्षण वाटत नाही. साक्षात् परमेश्वराचे दर्शनच मला हवे आहे व ही गोष्ट तर तुम्ही देऊ शकत नाही. तेव्हा मला जे हवे ते तुमच्यापासून कसे मिळणार ?

इंद्र : संपूर्ण जग माझ्या आज्ञेचे पालन करते. माझा वर नाकारून माझ्या आज्ञेचा अवमान करण्याचे साहस तू केलेस तरी कसे !

राजा : तुमच्या आज्ञेचा अवमान करण्याचा विचारही मला शिवलेला नाही. मी ज्याची उपासना करतो, त्याच्यापासूनच तुम्हाला हे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. तो यच्चयावत् विश्वाचा स्वामी आहे त्यानेच बळी आणि हिरण्याक्ष यांच्यापासून तुमचे रक्षण केले. तेव्हा मला जे करावयाचे आहे ते करू द्यावे आणि आपण माझा निरोप घ्यावा हे बरे.

इंद्र : तू माझे म्हणणे न ऐकता मला विरोध केलास तर मी तुझा वध करीन व तुला भस्म करून टाकीन.

राजा : लोकांना जसे सुख हवेसे वाटते तसे दुःख मात्र वाटत नाही. जो माणूस जगाचा निरोप घेतो तो मुक्त होत असल्याने देवांनाही त्याचा हेवा वाटतो व ते त्याला त्याच्या मार्गापासून विचलित करण्याचा प्रयत्न करतात. ज्यांनी जगाचा कायमचा निरोप घेतला आहे, अशा लोकांपैकीच मीही एक आहे. मी आपले जीवन पूर्णपणे ईश्वरोपासनेला वाहिले आहे आणि जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत मी ह्या उपासनेचा त्याग करणार नाही. मला देहान्त प्रायश्चित्त मिळावे अशा प्रकारचा कोणताही अपराध माझ्या हातून

घडलेला नाही. मीं कोणताही अपराध केलेला नसतानाही तुम्ही माझी हत्या करणार असाल, तर त्या हत्येची पूर्ण जबाबदारी तुमच्या शिरावरच राहील. माझ्यापासून तुम्हाला काहीही हिरावून घेता येणार नाही कारण माझे सर्वस्व मी ईश्वरोपासनेलाच वाहिले आहे आणि यापुढेही मी ही उपासनाच करीत राहणार आहे.

राजा पुन्हा ईश्वराची भक्ती करू लागला. तेव्हा त्यावर प्रसन्न होऊन परमेश्वराने त्याला दर्शन दिले. त्याचा वर्ण तांबूस कमळाप्रमाणे असून त्याला चार हात होते. त्यांपैकी एका हातात शंख, दुसऱ्या हातात चक्र, तिसऱ्या हातात मंत्रसिद्ध ताईत आणि चवथ्या हातात पद्म ( तांबडे कमळ ) होते. जेव्हा राजाने परमेश्वराला पाहिले तेव्हा त्याला आनंदाचे भरते आले आणि त्याने परमेश्वरावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला. ईश्वराने त्यास हवा असलेला वर मागण्यास सांगितले. त्यावर राजा म्हणाला, " देवा, मला कुणाशीही युद्ध न करता प्रचंड असे राज्य मिळाले होते. राज्य कसले ! जणू मला संपूर्ण विश्वाचेच साम्राज्य मिळाले होते. माझ्या जीवनात मला कोणत्याही प्रकारची व्याधी झाली नाही. जगातील सर्व सुखे मला मिळाली तथापि या पार्थिव वस्तू जरी चांगल्या वाटल्या तरी त्या परिणामी दुःखदायकच आहेत. याची मला जाणीव झाली आहे. तेव्हा आज मजजवळ जे आहे, त्यापेक्षा मला अधिक काही नको. हे परमेश्वरा, मला आता या भवपाशातून मुक्त कर, मला मुक्ती दे."

ईश्वर : जगापासून अलिप्त राहून चिंतन व मनन यांच्या साहाय्याने इंद्रियांवर विजय प्राप्त केल्यास तुला मुक्ती मिळेल.

राजा : ज्यांना ईश्वराने काही विशेष आत्मिक सामर्थ्य दिले आहे, त्यांना कदाचित् अशा प्रकारची साधना करता येईल तथापि ज्या सर्वसामान्य माणसांना अन्न-वस्त्रादी गरजा भागवून दैनंदिन प्रपंच करावा लागतो, त्यांना अशा प्रकारे साधना करणे कसे शक्य आहे ! त्यांना मुक्ती कशी मिळेल !

ईश्वर : तू आपल्या राज्याचा कारभार अत्यंत दक्षतेने व सचोटीने कर. आपल्या राज्यातील लोकांवर चांगले संस्कार करीत असताना, त्यांचे संरक्षण करताना त्यांना दान देताना व अन्य कार्ये करीत असताना माझेच स्मरण कर. मानवस्वभावानुसार तुला माझे विस्मरण होण्याची शक्यता आहे. असे होऊ नये म्हणून तू माझी प्रतिमा तयार करून तिला नित्यनेमाने फुले व सुगंधी द्रव्ये अर्पण कर. या प्रतिमेत तुला माझे रूप दिसेल व तिच्यामुळे तुला माझे सतत स्मरण करता येईल. बोलताना, विचार करताना व कोणतेही काम करताना तू नेहमी माझे स्मरण कर.

राजा : मुक्ती कशी मिळवावी, याची स्थूल कल्पना आता मला आली तथापि तुम्ही याविषयी सविस्तर स्पष्टीकरण केले, तर अधिक बरे होईल.

ईश्वर : ते मी यापूर्वीच केले आहे. वसिष्ठास या सर्व गोष्टी मी तपशीलासह सांगितल्या आहेत. त्याच्याकडून तुला ज्ञान प्राप्त होईल.

त्यानंतर परमेश्वर अदृश्य झाला. मग राजा आपल्या राजवाड्यात परत गेला व परमेश्वराच्या आज्ञेनुसार वागू लागला.

या वेळेपासून लोक परमेश्वराच्या मूर्ती तयार करू लागले असे लोक म्हणतात. यापैकी काही मूर्तींना दोन हात असतात तर काही मूर्तींना चार हात असतात.

मूर्तिपूजेला प्रारंभ कसा झाला याविषयी आणखी एक आख्यायिका येथे सांगितली जाते, ती अशी —

ब्रह्माला नारद नावाचा एक मुलगा होता. त्यास परमेश्वराच्या दर्शनाचा ध्यास लागलेला होता. तो नेहमी घराबाहेर पडताना आपल्या हातात एक काठी घेत असे. ती काठी खाली (जमिनीवर) ठेवली की तिचे रूपान्तर एका सर्पात होत असे. याच काठीच्या साहाय्याने तो किती तरी चमत्कार करून दाखवीत असे. परमेश्वराचे दर्शन घडावे या उद्देशाने, त्याचे चिंतन करीत इतस्ततः भटकत असताना नारदाला एके ठिकाणी अग्नी दिसला. त्या अग्नीतून त्याला पुढील उद्‌गार ऐकू आले, "तुझी इच्छा पूर्ण होणे अशक्य आहे. या अग्नीतच तुला माझे रूप पाहता येईल. त्या (अग्नी)शिवाय केवळ माझे रूप तुला मुळीच पाहता येणार नाही. जेव्हा त्याने अग्नीकडे पाहिले त्यावेळी त्याला तेथे अग्नीने अवगुंठित झालेली एक मानवाकृती दिसली. या वेळेपासूनच ईश्वराच्या वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिमा किंवा मूर्ती करण्याचा प्रघात पडला.

मुलतान येथे आदित्याची (सूर्याची) एक प्रचंड मूर्ती होती. ही मूर्ती लाकडापासून तयार केलेली असून तिच्यावर तांबड्या चामड्याचे आवरण चढविले होते. या मूर्तीच्या दोन डोळ्यांना दोन माणके बसविलेली होती. ही मूर्ती कृतयुगात तयार केली, असे म्हणतात. कृतयुगाच्या अखेरच्या कालखंडात या मूर्तीची निर्मिती झाली असे मानले तरी ती २१६, ४३२ वर्षांपूर्वीची आहे, असे मानावे लागते. मुहम्मद इब्न कासिम इब्न मुनब्बिह याने मुलतान शहर जिंकले तेव्हा ते (शहर) इतके भरभराटीस कसे आले याविषयी त्याने माहिती विचारली. आदित्याच्या या मूर्तीमुळेच हे शहर इतके समृद्ध झाल्याचे त्याला सांगण्यात आले कारण या आदित्याच्या मूर्तीमुळे त्या शहराचे रूपांतर एका तीर्थक्षेत्रात झाले. देशाच्या सर्व भागातील लोक या ठिकाणी तीर्थयात्रेसाठी येऊ लागले. त्यामुळे त्या शहराचे वैभवही दिवसेंदिवस वाढले. त्याने ती मूर्ती तेथून हलविली नाही. तथापि या मूर्तिपूजेचा उपहास करण्यासाठी त्याने तिच्या गळ्याभोवती गोमास लावून ठेवले. पुढे याच ठिकाणी एक मशीद उभारण्यात आली. काही कालखंडानंतर, जालम इब्न शैवान याने मुलतानवर आपली सत्ता

प्रस्थापित केली. त्याने ही मूर्ती फोडून तिचे तुकडे तुकडे केले व तेथील पुजाऱ्यांना ठार मारले. त्याच ठिकाणी एका उंच टेकडीवर त्याने आपला राजवाडा बांधला. उमय्या घराण्यातील खलीफांबद्दल व त्यांच्या वंशजाबद्दल त्याला अत्यंत तिरस्कार वाटत असल्याने त्याने पूर्वी बांधलेली मशीद बंद केली आणि नवीन मशीद बांधली. पुढे या ठिकाणी महमूद बादशहाचा अंमल प्रस्थापित झाल्यावर पूर्वीच्या मशिदीचा जीर्णोद्धार झाला आणि त्या ठिकाणी पुन्हा लोक प्रार्थनेसाठी येऊ लागले. दुसरी मशीद मात्र आता उध्वस्त होऊ लागली आहे.

वरील आदित्याच्या मूर्तीविषयीच्या निर्देशात ती २१६, ४३२ वर्षांपूर्वीची आहे असे म्हटले आहे तथापि यातील शेवटचा ४३२ हा किरकोळ आकडा सोडून दिला तरी २१६००० वर्षे उरतात. आणि एवढ्या प्रचंड काळावरही या दमट प्रदेशामध्ये या मूर्तीच्या लाकडाने कशी मात केली, हे त्या एका परमेश्वरालाच ठाऊक.

तानेशर हेही हिंदूचे एक पवित्र स्थान आहे. येथे ' चक्रस्वामिन् ' ची मूर्ती होती, ' चक्रस्वामिन् ' या शब्दाचा अर्थ, ' चक्र धारण करणारा ' किंवा ' चक्राचा स्वामी. ' असा आहे. ' चक्र ' नावाच्या शस्त्राबद्दल यापूर्वीचा माहिती सांगितलेलीच आहे. ही मूर्ती ब्रॉंझ धातूची असून ती एक पुरुष उंच आहे. सध्या ही मूर्ती गझना येथील शर्यतीच्या मैदानावर सोमनाथाच्या लिंगाकार मूर्तीबरोबर ठेवली आहे. हे लिंग म्हणजे महादेवाच्या लिंगाची प्रतिमा होय. सोमनाथाविषयी मी याच ग्रंथात अन्यत्र माहिती सांगणार आहे. ' चक्रस्वामिन् ' ची मूर्ती महाभारतीय युद्धाच्या काळी स्मारक म्हणून केली असे म्हणतात.

कश्मीरच्या राजधानीपासून बेलोरे पर्वताच्या दिशेने एक दिवस प्रवास केल्यावर ' शारदा ' ( नावाच्या देवतेची ) एक मूर्ती आढळते. या मूर्तीबद्दलही लोकांना अत्यंत आदर वाटतो व या ठिकाणी कित्येक यात्रिक दर्शनार्थ येतात.

मूर्तीविषयी ' संहिता ' नामक ग्रंथात बरेच विस्तृत विवेचन केले आहे. वाचकांना प्रस्तुत विषयाची नीट कल्पना यावी यासाठी या ग्रंथातील एका प्रकरणाचा महत्त्वाचा भाग मूळातून पुढे उद्धृत करीत आहे. या ग्रंथात विविध मूर्तींची मोजमापे पुढील-प्रमाणे दिली आहेत :–

१ ) वराहमिहिर म्हणतो, दशरथाचा पुत्र राम किंवा विरोचनाचा पुत्र बळी यांच्या मूर्तीची उंची १२० मूर्ति– परिमाणांइतकी असावी. ( मूर्तीसाठी उपयोजिलेली मापे आपल्या नेहमीच्या मापांपेक्षा $1\frac{1}{6}$ पट कमी असतात. )

२ ) विष्णूच्या मूर्तीस आठ, चार किंवा दोन हात असावेत. या मूर्तीच्या डाव्या बाजूस छातीजवळ ' श्री ' नावाच्या स्त्रीची मूर्ती असावी. विष्णूच्या या मूर्तीला आठ हात असल्यास उजव्या बाजूकडील तीन हातांमध्ये प्रत्येक एक तलवार, सोन्याची किंवा लोखंडाची गदा, बाण देऊन चवथ्या हाताने तो पाणी काढीत आहे असे

दाखवावे. डाव्या बाजूकडील चार हातांत ढाल, धनुष्य, चक्र व शंख इ. गोष्टी असाव्या.

विष्णूची चार हातांची मूर्ती केलेली असल्यास धनुष्य, बाण, ढाल व तरवार ही शस्त्रास्त्रे वगळावीत. दोन हातांची मूर्ती केल्यास उजव्या हाताने विष्णू पाणी काढीत असून त्याने आपल्या डाव्या हातात चक्र धारण केले आहे असे दाखवावे.

३ ) नारायणाचा भाऊ बलदेव याच्या मूर्तीच्या कानांत कर्णभूषणादी अलंकार असून मूर्तीचे डोळे मद्यपान केलेल्या माणसाच्या डोळ्यांसारखे असल्याचे दाखवावे.

४ ) नारायण व बलदेव या दोहोंच्या मूर्ती केल्या असल्यास त्याबरोबरच त्यांची बहीण भगवती ( दुर्गा ) हिचीही मूर्ती करावी. तिचा डावा हात कंबरेच्या मागील बाजूस टेकलेला असून उजव्या हातात तिने कमळ धारण केले आहे असे दाखवावे. भगवतीची मूर्ती चार हातांची असल्यास उजव्या बाजूकडील एका हाताने ती पाणी काढीत असून दुसऱ्या हातात एक जपमाळ ( स्मरणी ) आहे असे दाखवावे. डाव्या बाजूकडील हातात एक ग्रंथ व एक कमळ असावे.

भगवतीची आठ हातांची मूर्ती केल्यास डाव्या बाजूकडील हातात कमंडलू, कमळ, धनुष्य व एक ग्रंथ असावा. उजव्या बाजूकडील तीन हातात स्मरणी, आरसा, बाण असून चवथ्या हाताने ती पाणी काढीत आहे, असे दाखवावे.

५ ) विष्णुपुत्र सांब यांच्या मूर्तीच्या उजव्या हातात फक्त एक गदा असावी. विष्णुपुत्र प्रद्युम्नाच्या मूर्तीच्या उजव्या हातात बाण व डाव्या हातांत धनुष्य द्यावे. या दोहोंच्या स्त्रियांच्या मूर्ती त्यांच्याबरोबर असल्यास या विष्णुपुत्राच्या उजव्या हातात तरवार व डाव्या हातात ढाल असल्याचे दाखवावे.

६ ) ब्रह्माच्या मूर्तीला चार हात असून तो कमळाच्या आसनावर बसलेला आहे असे दाखवावे.

७ ) महादेवपुत्र स्कंद हा मयूरावर बसलेला असून त्याने आपल्या हातात तरवारी-सारखे ‘ शक्ती ’ नामक दुधारी शस्त्र धारण केले आहे असे दाखवावे.

८ ) इंद्राच्या मूर्तीच्या हातात रत्नाचे ‘ वज्र ’ नामक शस्त्र असावे. या शस्त्राची मूठ शक्तीप्रमाणेच असून तिच्या ( मुठीच्या ) दोन्ही बाजूला दोन तरवारी असतात. या मूर्तीच्या कपाळावर तृतीय नेत्र असून चार दात असलेल्या पांढऱ्या हत्तीवर ती आरूढ झालेली आहे असे दाखवावे.

९ ) महादेवाच्या मूर्तीत वरीलप्रमाणेच तृतीय नेत्र असावा. या मूर्तीच्या डोक्यावर अर्धचन्द्र असून तिच्या हातात ‘ शूल ’ नामक शस्त्र असावे. ( ‘ शूल ’ हे गदेसारखे एक शस्त्र असून त्यास वरील बाजूला तीन अणकुचीदार टोके असतात. ) त्याच्या डाव्या बाजूला त्याची पत्नी गौरी– हिमवंताची मुलगी ही असून तो तिच्या वक्ष-स्थळास आपल्या डाव्या हाताने स्पर्श करीत असल्याचेही दाखवावे.

१० ) जिन किंवा बुद्ध याच्या मूर्तीचा चेहरा व अन्य सर्व अवयव अत्यंत देखणे व रेखीव असावेत. त्याच्या तळहातावरील व तळपायावरील रेषा कमळावरील रेषांप्रमाणे असाव्यात. तो कमलासनावर बसलेला असून त्याचे केस करड्या रंगाचे असावेत. आपणच सर्व रचना–सृष्टिनिर्मिती– केली आहे अशा प्रकारचे भाव त्याच्या मुद्रेवर रेखाटावेत.

'अरहन्त' ही बुद्धाची आणखी एक मूर्ती होय. या मूर्तीतील आजानुबाहू पुरुष सुंदर नग्न तरुण असून त्याच्या डाव्या बाजूला वक्षाजवळ, त्याची पत्नी 'श्री' ही असल्याचेही दाखवावे.

११ ) सूर्यपुत्र 'रेवन्त' हा शिकाऱ्याच्या वेशात अश्वारूढ असल्याचे दाखवावे.

१२ ) 'यम' ही मृत्यूची देवता म्हशीवर बसलेली असून तिच्या हातात एक गदा आहे असे दाखवावे.

१३ ) 'कुबेरा'च्या डोक्यावर मुकुट असतो. त्याचे पोट मोठे एका मनुष्यावर आरूढ झाल्याचे दाखवावे.

१४) सूर्याच्या मूर्तीचा चेहरा तांबड्या कमळाच्या वर्णासारखा असावा. त्याचे किरण रत्नाप्रमाणे चमकणारे असावेत. या मूर्तीच्या कानात ( कर्ण ) भूषणे, गळ्यात छातीपर्यंत लोंबणारी मोत्याची माळ व डोक्यावर मुकुट तिच्या हातात दोन कमळे असतात. या मूर्तीचा वेश उत्तरेकडील लोकांच्या वेशाप्रमाणे असतो.

१५ ) 'सप्त माता' एकाच मूर्तीत चित्रित करता येतात. यांतील 'ब्राह्मणी'ला चार मुखे असून ती चार दिशांकडे पाहत असतात. 'कौमारी'ला सहा मुखे, वैष्णवीला चार हात, 'वाराही'च्या मूर्तीत मानवाच्या धडावर सूकराचे डोके, 'इन्द्राणी'ला असंख्य डोळे असून तिच्या हातात एक गदा असल्याचे दाखवावे. भगवती (दुर्गा) बसलेली आहे असे दाखवावे.

चामुंडेचे दात पुढे आलेले असून तिची कंबर अत्यंत बारीक असते. त्यामुळे ती अत्यंत कुरूप दिसते. या सात मातांबरोबरच महादेवाचे पुत्रही असतात. 'क्षेत्रपाला'ची आकृती कुरूप असते. विनायकाच्या मूर्तीत मानवदेहावर हत्तीचे मुख असून त्याला चार हात असल्याचे दाखवावे.

मूर्तिपूजा करणारे लोक या मूर्तींपुढे मेंढ्या आणि म्हशी कापतात. बहुधा ते अगळे वीत किंवा हात इ. परिमाणाने या मूर्ती तयार करतात. हाताच्या या परिमाणांबद्दल कधी कधी त्यांच्यामध्ये मतभिन्नता असल्याचेही आढळते. मूर्तिकाराने कमी अधिक मोजमाप न वापरता प्रमाणबद्ध मूर्ती तयार केल्यास त्यावर देवतेचा कोप होत नाही.

मूर्तिकाराने दोन हात उंच असलेल्या सिंहासनावर एक हात उंचीची मूर्ती स्थापन केल्यास त्यास आरोग्य व संपत्ती प्राप्त होते. यापेक्षाही अधिक उंचीवर मूर्तीची प्रतिष्ठापना मूर्तिकार अधिक प्रशंसेस पात्र ठरतो, असे हिंदूंच्या ग्रंथात म्हटले आहे.

तथापि सूर्याची फार मोठी मूर्ती केल्यास तिच्यामुळे राज्यकर्त्याला आणि ती अत्यंत लहान असल्यास मूर्तिकाराला अपाय होण्याची शक्यता असते. मूर्तीचे पोट अत्यंत लहान असल्यास देशात दुष्काळ पडतो. मूर्तीचे पोट पाठीला लागलेले असल्यास दारिद्र्य प्राप्त होते.

कलावंताच्या हातून मूर्तीवर चुकून ओरखडा पडल्यास त्याला त्यासारखीच प्राणांतिक जखम होते.

मूर्ती प्रमाणबद्ध नसल्यास, तिचा एकादा खांदा वर आणि दुसरा खाली असल्यास मूर्तिकाराची पत्नी मरण पावते. मूर्तीचे डोळे केवळ वरच पाहत आहेत, अशा प्रकारे ते रेखाटल्यास कलावंत आंधळा होतो व मूर्तीचे डोळे केवळ खाली पाहत आहेत, असे त्याने चित्रित केल्यास त्यावर (कलावंतावर) अनेक संकटे कोसळतात. मातीपेक्षा लाकडाची आणि लाकडापेक्षा रत्नांची मूर्ती अधिक श्रेष्ठ प्रतीची होय. रत्नखचित मूर्ती राज्यातील सर्व लोकांना लाभदायक असते. जो सुवर्णाची मूर्ती तयार करतो, त्यास अधिक राज्य प्राप्त होते, चांदीची मूर्ती तयार करणारास नावलौकिक प्राप्त होतो, ब्राँझची मूर्ती करणाराचे राज्य अधिक सामर्थ्यसंपन्न होते आणि पाषाण मूर्तीची प्रतिष्ठापना करणारास स्थावर मालमत्ता किंवा शेती याच्या रूपाने धनलाभ होतो.

ज्या धातूंच्या वा वस्तूंच्या साहाय्याने या मूर्ती निर्माण केल्या जातात, त्या धातूंमुळे त्या मूर्तींना महत्त्व प्राप्त होत नसून ज्यांच्या प्रतिमा त्या मूर्तीत साकार झालेल्या असतात त्या देवतांबद्दल हिंदूंना आदरभाव वाटत असल्याने त्यांच्या मनात त्या मूर्तींबद्दलही श्रद्धा वसत असते. मुलतान येथील मूर्ती लाकडाची असूनही तिला भारतात किती महत्त्व होते याविषयी मी पूर्वी माहिती सांगितलीच आहे. राक्षसांशी युद्ध करून त्यांना पराभूत केल्यानंतर रामाने आपल्या हाताने जे 'लिंग' स्थापन केले होते ते तर (लाकडाचे किंवा मातीचे नसून) केवळ वाळूच्या ढिगांचेच होते.

मूर्तीची प्रतिष्ठापना करताना शुभ मुहूर्तही पाहिला जात असे. मूर्तीभोवती बांधले जाणारे देऊळ, सभामंडप व त्यातील खांबांची रांग, प्रतिष्ठापनेच्या वेळी करावयाचे वेगवेगळे धार्मिक विधी व हे विधी करणारा विशिष्ट पुजाऱ्यांचा वर्ग याविषयी अनेक सूचना हिंदूंच्या ग्रंथांत बऱ्याच विस्ताराने सांगितल्या आहेत. भागवतांनी विष्णूची आणि मगांनी सूर्याची उपासना करावी. लांब केस असलेल्या अंगाला राख फासणाऱ्या, गळ्याभोवती मृतांची हाडे लावणाऱ्या साधूंनी महादेवाची उपासना करावी. ब्राह्मणांनी अष्ट मातांची शमनियनांनी बुद्धाची आणि नग्नांनी अर्हन्ताची सेवा करावी. अशा प्रकारे या विविध मूर्तींची समाजाच्या विविध थरांतील लोकांनी उपासना करीत जावी.

भारतीय मूर्तींची यथार्थ कल्पना यावी, यासाठीच हा सर्व तपशील दिला आहे.

( भारतातील ) कोणतीही मूर्ती पाहिल्यास ती कुणाची ( कोणत्या देवतेची ) आहे, हे यावरून चटकन् लक्षात येईल. या मूर्ती केवळ अशिक्षित समाजासाठीच निर्माण केल्या आहेत. देवतांपेक्षा खालच्या प्रतीच्या दैवी व्यक्तींच्या मूर्ती मात्र हिंदूंनी कधीही तयार केल्या नाहीत हे येथे स्पष्ट करायला हवे. प्रत्यक्ष परमेश्वराची मूर्तीही त्यांनी केली नाही. वेगवेगळ्या मूर्तींच्या गोतावळ्यात व त्यांच्या नित्यनैमित्तिक विधींमध्ये सर्वसामान्य समाजास गुंतवून ठेवण्याचे धूर्त कार्य पुजाऱ्यांनी अत्यंत कुशलतेने केले. त्यामुळे अशिक्षित समाज मूर्तींच्या दास्यात अडकून पडला. यासाठीच ( परमेश्वराने ) 'गीते'त म्हटले आहे : " जे माझ्या खऱ्या स्वरूपापेक्षा कितीतरी वेगळे आहे अशा माध्यमाद्वारा लोक मला प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात. माझ्याऐवजी त्याला ( माध्यमाला ) नैवेद्य दाखवून, त्याची स्तुतिस्तोत्रे गाऊन ते माझा अनुग्रह संपादन करण्याचा प्रयत्न करतात आणि असे असूनही मी त्यांच्यावर अनुग्रह करतो. "

याच ग्रंथात वासुदेव अर्जुनाला म्हणतो, " जगातील कितीतरी लोक आपल्या ईप्सित ध्येयाच्या सिद्धीसाठी सूर्यचंद्रादी ग्रहांची व अन्य दैवी गोष्टींची उपासना करतात, हे तू नेहमी पाहत नाहीस काय ! वस्तुतः ईश्वराला अशा प्रकारच्या गोष्टींची आवश्यकता नाही. असे असूनही आपल्या इच्छेच्या पूर्तीसाठी जे लोक मूर्तींना ईश्वर मानून त्यांची उपासना करतात, त्यांचीही इच्छा तो पूर्ण करतो. तथापि यामुळे मूर्तींच्या उपासनेमुळेच आपली इच्छा पूर्ण झाली असा उपासकांचा भ्रम किंवा ग्रह होण्याची शक्यता आहे. तसा चुकीचा समज झाल्यास ते ईश्वराऐवजी ईश्वराचे प्रतीक असलेल्या त्या मूर्तींचीच उपासना करू लागतील. तथापि अशा प्रकारच्या उपासनेने जे फळ प्राप्त होते ते मर्यादित स्वरूपाचे असून ते फार काळ टिकत नाही कारण उपासकाची उपासना विशिष्ट वासनेशी किंवा इच्छेशी संबद्ध असते. परमेश्वराची निष्काम उपासना केल्यानेच अंतिम सुख किंवा मोक्ष प्राप्त करता येतो, " असे वासुदेवाचे मत आहे.

योगायोगाने एकदा लाभ झाला की त्याचा संबंध उपाध्ये व पुजारी लोक मूर्तींच्या उपासनेशी लावतात व अज्ञानी लोकांचा यावर विश्वास बसतो. त्यामुळे त्यांचे अज्ञान वाढीस लागते. मग आपल्या शरीराचे रक्त मूर्तीला अर्पण करण्यापर्यन्त काही उपासकांची मजल जाते.

प्राचीन ग्रीक लोकदेखील प्रतिमा किंवा मूर्ती ह्या मानव आणि ( विश्वनिर्मितीचे ) आदिकारण ( ईश्वर ) यातील मध्यस्थ होत, असे मानतात. या मूर्तींना ते ग्रहादिकांची नावे देऊन त्यांची उपासना करीत असत. या आदिकारणाचे स्वरूप कसे आहे, याचे अस्तिपक्षी वर्णन न करता नास्तिपक्षी करतात. याचे कारण असे की या आदिकारणाचे वर्णन मानवी गुणाविशेषांच्या साहाय्याने करता येणार नाही कारण आदिकारणाचे स्वरूपच त्यापेक्षा अधिक उदात्त व भव्य आहे. तेव्हा अशा प्रकारे अस्तिपक्षी केल्याने विवरण परिपूर्ण असलेल्या आदिकारणाचे अपरिपूर्ण किंवा तोटके

वर्णन केल्याचा दोष आपल्या पदरी येऊ नये यासाठी कदाचित् त्यांनी ही दक्षता घेतली असावी असे वाटते. त्यामुळेच ते या आदिशक्तीला–परमेश्वराला–कोणत्याही नावाने वा विशेषणाने संबोधून त्याची उपासना करीत नसत.

रानटी अरब लोकांनीही सीरियामधून काही मूर्ती आणल्या होत्या. या मूर्तींची उपासना केल्याने आपल्याला परमेश्वराची प्राप्ती होईल असे त्यांना वाटे.

आपल्या कायद्यांविषयीच्या ग्रंथाच्या चवथ्या प्रकरणात प्लेटो म्हणतो, परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा असलेल्या माणसाने त्याच्या व 'सकीनात' च्या रहस्याला बाधा येईल, असे कोणतेही कृत्य करू नये. जर तो मूर्तींना आपल्या पितरांपेक्षाही अधिक महत्त्व देऊ लागला तर तीही त्याची चूकच आहे, असे म्हणावे लागेल. शिवाय आपले आईवडील जिवंत असताना त्यांच्याशीही त्याने अत्यंत आदरानेच वागावयास हवे."

येथे 'रहस्य' या शब्दात प्लेटोला 'विशिष्ट प्रकारची उपासना' च अभिप्रेत आहे. हर्रान येथील साबियन लोक, मॅनिशियन लोक आणि हिंदू धर्मशास्त्रज्ञ याच संदर्भात तो शब्द बहुधा वापरतात. जालीनूसच्या De Indale Animae या ग्रंथात मूर्तींविषयी पुढील उल्लेख ओढळतो :

"अलेक्झॅन्डरनंतर सुमारे ५०० किंवा ५१० वर्षांनंतर कमोडस नावाचा राजा होऊन गेला. त्याच्या काळात पुढील घटना घडली :–

दोन गृहस्थ एका मूर्ति-विक्रेत्याकडे गेले व त्यांनी त्या विक्रेत्याकडून हर्मसची एक मूर्ती विकत घ्यावयाचे ठरविले. या दोन गृहस्थांपैकी एकास ती मूर्ती हर्मसची प्रतिमा म्हणून एका प्रार्थनामंदिरात ठेवावयाची होती तर दुसऱ्याला ती थडग्यांवर मृताचे स्मारक म्हणून उभारावयाची होती. त्या दोघांमध्ये त्या मूर्तीवरून वाद झाला तेव्हा रात्री ती मूर्ती विक्रेत्याच्या स्वप्नात येऊन त्याला म्हणाली, "भल्या माणसा! तू मला घडविलेस. मी तुझीच कलाकृती आहे. तुझ्या हाताच्या स्पर्शामुळे मला एक ग्रहाचा आकार प्राप्त झाला आहे. आता मी दगड नसून रोममधील सुप्रसिद्ध देवता –बुध ग्रह–आहे. आणि त्याच नावाने लोक मला यापुढेदेखील ओळखतील. तेव्हा माझा समावेश क्षर वस्तूत करावयाचा की अक्षर वस्तूत करावयाचा हे तूच ठरव."

अलेक्झॅन्डरने मूर्तींच्या संदर्भात उपस्थित होणाऱ्या काही प्रश्नांची उत्तरे विचारण्यासाठी काही ब्राह्मणांना ॲरिस्टॉटलकडे पाठविले होते. त्यांना ॲरिस्टॉटलने पुढील उत्तर दिले होते, तेही येथे लक्षात घ्यायला हवे. तो त्या ब्राम्हणांना म्हणाला, "मूर्ती बोलतात, लोक त्यांना काही वस्तू नैवेद्य म्हणून अर्पण करतात आणि या मूर्तींमध्ये दैवी अंश असतो इ. गोष्टी ग्रीक लोक मानतात की नाही याविषयी मला काहीच माहिती नाही. आणि ज्याविषयी आपल्याला काही माहिती नाही, त्याविषयी मी आपले मत तरी कसे व्यक्त करणार!" मूर्तीविषयी श्रद्धा बाळगणाऱ्या अशिक्षित व

अज्ञानी लोकांची संभावना ॲरिस्टॉटलने या शब्दांत केली आहे. यावरून अशा गोष्टीवर आपला मुळीच विश्वास नाही हेच त्यास सूचित करावयाचे आहे, हे उघड आहे.

यावरून प्रथमतः मृतांची स्मृती चिरकाल टिकावी म्हणून त्यांच्या स्मारकाच्या रूपाने मूर्तींची कल्पना निर्माण झाली असावी व उत्तरोत्तर तिचा विपर्यास होऊन या कल्पनेला सध्याचे स्वरूप प्राप्त झाले असावे, असे वाटते.

मुआविआ नावाच्या खलीफानेदेखील 'मूर्ती म्हणजे स्मारकेच होत' असे मत प्रतिपादिले आहे. हिजरी सनाच्या ५३ व्या वर्षी सिसिली देश पादाक्रान्त केल्यावर सिसिलीच्या विजेत्यांनी खलीफाकडे सिसिलीमध्ये मिळालेल्या रत्नखचित सुवर्ण मूर्ती पाठविल्या. तेव्हा या मूर्ती सिंधमध्ये विकाव्यात असा आदेश खलीफाने दिला, कारण केवळ मूर्ती म्हणून त्या जपून ठेवण्यापेक्षा त्यांची दीनारांमधील किंमतच त्याला अधिक महत्त्वाची वाटली. सिंधमध्ये या मूर्तींना चांगली किंमत येईल. हे पाहूनच त्याने त्या मूर्ती सिंधमध्ये पाठविल्या. यावरून त्या मूर्तींच्या धार्मिक माहात्म्याऐवजी त्यांचे व्यावहारिक मूल्यच त्याने लक्षांत घेतले हे स्पष्ट होत नाही काय ?

## १२

# वेद, पुराणे इ० राष्ट्रीय साहित्य

ज्याविषयी पूर्वी काहीच माहिती नव्हती, त्याविषयीचे ज्ञान म्हणजे वेद. या वेदांतील तत्त्वज्ञान ईश्वरनिर्मित असून परमेश्वराने ते ब्रह्माच्या मुखातून वदविले असे हिंदू लोक मानतात. वेद-पठणाची परंपराच ब्राह्मणवर्गात आढळते. त्यांच्यापैकी थोडे फार लोकच वेदांचा अर्थ समजून घेऊन ते पाठ करतात. इतर लोक अर्थ न उमगताही ते पाठ करतात. त्यामुळे वेदातील धार्मिक तत्त्वज्ञानाची यथार्थ कल्पना फारच थोड्या लोकांना असते आणि त्यात नैपुण्य संपादन केलेल्या विद्वानांची संख्या तर त्याहून कमी असते.

ब्राह्मण क्षत्रियांना वेद शिकवितात. क्षत्रियांना वेदाध्ययनाचा अधिकार असला तरी वेदाध्यापनाचा मात्र नाही. एखाद्या ब्राह्मणालाही क्षत्रियांनी वेद शिकवू नये असा दंडक आहे. वेदाध्ययन किंवा वेदपठण तर दूरच राहो, वैश्य आणि शूद्र यांना तर वेद-श्रवणाचाही अधिकार नाही. याविरुद्ध वर्तन केल्यास गुन्हेगाराची जीभ छाटून त्यास शिक्षा दिली जाते.

वेदांमध्ये विशिष्ट कर्मांचा पुरस्कार करण्यासाठी वा त्या कर्मांचा निषेध करण्यासाठी, त्या त्या कर्मांचे फल कोणते याविषयी तपशीलवार माहिती सांगितली आहे. त्याचप्रमाणे स्तुतिस्तोत्रे आणि विविध प्रकारच्या आहुती यांनीही वेदांचा बराचसा भाग व्यापला आहे.

वेदपठणाच्या विशिष्ट आरोह-अवरोहात्मक पद्धती आहेत. त्यानुसार मूळ वेद-संहिता लिहिल्या गेल्या आहेत. तथापि पुनर्लेखनात या सर्व गोष्टी अचूकपणे पाळल्या जातील की नाही, याबद्दल साशंकता असल्याने वेदांचे पुन्हा लेखन करण्यास हिंदू लोक अनुमती देत नाहीत. पुनर्लेखनाऐवजी केवळ पाठांतरावर भर दिल्याने काही भाग विस्मृत झाला आहे व काही भाग काळाच्या ओघात नष्टही झाला आहे. या संदर्भात पुढील उतारा लक्षात घेण्याजोगा आहे. परमेश्वर व ब्रह्म यांच्यामध्ये सर्व वस्तूंच्या प्रारंभाविषयी संभाषण होते. त्यात परमेश्वर ब्रह्माला म्हणतो, " प्रलय झाल्यावर तुम्हाला वेदांचे विस्मरण होईल. त्या वेळी वेद रसातळास जातील आणि मत्स्याशिवाय इतर

कुणीही त्यांना वर काढू शकणार नाही. या कार्यासाठी मी मत्स्याची नियुक्ती करीन व तो हे वेद काढून तुम्हाला देईल. आणि मी वराहाला पृथ्वी जलाबाहेर काढण्याची आज्ञा देईन." ब्रह्मा आणि परमेश्वर यांच्यामधील या संदेशाची वार्ता शुक्राकडून शौनकास कळली, असे हिंदू लोक मानतात.

द्वापारयुगामध्ये वेदाबरोबरच देशातील सर्व धर्म-संस्कारांचाही लोप झाला होता, पराशराचा पुत्र व्यास याने त्यांचा पुनरुद्धार केला, अशीही एक समजूत हिंदू समाजात प्रचलित आहे. त्या द्वापारयुगाविषयी या ग्रंथात पुढे योग्य त्या ठिकाणी विवेचन करूच.

या संदर्भात 'विष्णुपुराणा'त पुढील माहिती सांगितली आहे. "प्रत्येक मन्वंतराच्या प्रारंभी परमेश्वर एक अवतार घेईल. त्याची संतती पृथ्वीवर राज्य करील. परमेश्वर प्रत्येक मन्वन्तरासाठी देवता आणि वराह यांचीही नियुक्ती करील. त्या त्या मन्वन्तराच्या देवतेची उपासना लोक आहुती देऊन करतील आणि वराह त्या मन्वन्तराचा अन्त झाल्यावर प्रलयकाळी वेदांचे रक्षण करील.

आजवर वेदांचे लेखन का झाले नाही, याची काही कारणे वर सांगितली आहेत. या लेखनाचा अभाव तीव्रतेने जाणवल्यामुळेच की काय वसुक्र नामक कश्मिरी पंडिताने वेदांचे लेखन व विवेचन करण्याचे महत्कार्य अंगिकारले. उत्तरोत्तर मानवाच्या वृत्ती अधिकाधिक हीन होत आहेत. सद्‌गुण आणि कर्तव्य यांचा त्याला विसर पडत आहे. यामुळे हळूहळू लोकांना वेदांचे विस्मरण होईल व ते नष्ट होतील असे वसुक्रास वाटले आणि म्हणूनच तो वेदांच्या लेखनास प्रवृत्त झाला.

घरात वेदपठण केल्याने स्त्रिया आणि गाई त्यांचा गर्भपात होतो, अशी हिंदूंची समजूत असल्याने ते घराबाहेर, मोकळ्या जागी, शेतात जातात व तेथे वेदपठण करतात.

अरबी भाषेतील 'रजझ' नामक काव्याप्रमाणे हिंदूंचे बहुसंख्य ग्रंथ छंदोबद्ध आहेत. हिंदूंचे बहुतेक ग्रंथ श्लोकबद्ध असल्याचे आढळते. छंदोबद्ध रचना ही अत्यंत उपयुक्त असते, असे जालिनूस नामक विद्वानाचेही मत आहे. आपल्या ग्रंथात आपल्या या मताचे समर्थन करताना तो म्हणतो, "वैद्यकीय ग्रंथाची प्रत करताना त्यातील औषधांची परिमाणे दर्शविणाऱ्या खुणांमध्ये बदल होण्याची दाट शक्यता असते. छंदोबद्ध रचनेत अशा प्रकारच्या विकृतीला फारसा वाव नसतो आणि म्हणूनच इतर वैद्यक ग्रथांपेक्षा आपण ग्रीक छंदात रचलेले डेमोक्रेटिस याचे वैद्यकग्रंथ अधिक प्रमाण आहेत असे मानतो. अशा प्रकारे सर्व गंथाचे छंदोबद्ध लेखन झाले असते तर किती बरे झाले असते!" तथापि वेदांमध्ये मात्र श्लोकरचना आढळत नाही त्यांची रचना इतर छंदांत केली आहे. एकाच छंदामध्ये प्रदीर्घ रचना करता येत नाही, असा हिंदूंचा समज आहे. तथापि त्यांच्यामधील काही विद्वानांनी याविरुद्ध मत व्यक्त केले आहे.

व्यासाने वेदांचे पुढील चार विभाग केले, असे हिंदू लोक मानतात. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे ते चार विभाग होत. व्यासाने पैल, वैशंपायन, जैमिनी आणि सुमंत या आपल्या शिष्यांना वेद शिकविले. प्रत्येक शिष्याला त्याने (क्रमाने) एक एक वेद शिकविला. व्यासाच्या शिष्यांनी हे वेद पाठ केले.

या चारही वेद पठण करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. 'ऋग्वेद' हा यांपैकी पहिला ग्रंथ असून त्यांची रचना ऋचांनी झाली आहे. अग्नीला द्यावयाच्या आहुतीं-विषयीचे विवरण त्यात केले आहे. तीन वेगवेगळ्या पद्धतींनुसार ऋग्वेदाचे पठण करतात. त्या पद्धती पुढे दिल्या आहेत :–

१) **पहिली पद्धती** : आपण ज्या पद्धतीने सर्वसाधारणपणे इतर ग्रंथ पाठ करतो, त्याच पद्धतीचा अवलंब या पद्धतीत केला जातो.

२) **दुसरी पद्धती** : या पद्धतीत प्रत्येक शब्दानंतर काही काळ थांबून मग पुढचा शब्द म्हणतात.

३) **तिसरी पद्धती** : या पद्धतीत प्रथम त्या ग्रंथातील एक उतारा म्हणतात. त्यानंतर पुन्हा त्या उताऱ्याबरोबरच पुढील काही भाग जोडून तो म्हणतात. त्यानंतर पहिला उतारा सोडून केवळ त्यानंतर म्हटलेला दुसऱ्या उताऱ्यातील भाग पुन्हा म्हणतात. त्यानंतर त्या भागापुढील काही भाग दुसऱ्या उताऱ्याला जोडून तो पाठ करतात. ज्या भागाचे पठण करावयाचे, त्यातील प्रत्येक शब्द अत्यंत स्पष्टपणे उच्चारला जात आहे की नाही, याबाबत या पाठांतर–पद्धतीत विशेष दक्षता बाळगतात. या पद्धतीमुळे एका ग्रंथाचे आपोआपच दोनदा पारायण होते. वेद–पठणाची ही पद्धती सर्वोत्कृष्ट असून तिचा अवलंब केल्याने अनेक प्रकारची पुण्यप्रद फळे मिळतात, असे म्हणतात.

यजुर्वेदाची रचना कण्दिनसमूहांनी झाली आहे. ऋग्वेद आणि यजुर्वेद या दोहों-तही अग्नी आणि त्यास द्यावयाच्या आहुती याविषयी विवेचन केले आहे. तथापि या दोहांच्या पठणपद्धतीत मात्र फरक आहे. संधिनियमानुसार यजुर्वेदाचे वाचन-पारायण करता येते, तसे ऋग्वेदाचे करता येत नाही.

संधिनियमानुसार ऋग्वेद का म्हणता येत नाही, याविषयी मी भारतात पुढील हकीगत ऐकली आहे :

याज्ञवल्क्य अध्ययनासाठी आपल्या गुरुच्या आश्रमात राहत असे. एकदा त्याच्या गुरूच्या मित्राला परगावी जावयाचे असल्याने आपल्या अनुपस्थितीत आपल्या घरी होमहवनादी दैनंदिन धार्मिक विधी करण्यासाठी रोज एकाद्या शिष्याला पाठवावे, अशी विनंती याज्ञवल्क्याच्या गुरूला त्यांच्या त्या ब्राह्मण मित्राने केली. त्याप्रमाणे एके दिवशी याज्ञवल्क्याचीही पाळी आली. त्याने आपल्या गुरुमित्राच्या घरी जाऊन नित्यनैमित्तिक धार्मिक विधी करण्यास प्रारंभ केला. याज्ञवल्क्य हा मूळातच अत्यंत देखणा असून त्याने त्या दिवशी अत्यंत आकर्षक वेष परिधान केला होता. त्यावेळी

त्या ठिकाणी त्या यजमानाची पत्नी उपस्थित होती. तिला त्याच्या पोशाखाबद्दल व एकूण राहणीबद्दल अत्यंत तिरस्कार वाटला. तिने ही गोष्ट स्पष्टपणे बोलून दाखविली नसली तरी याज्ञवल्क्यास ती निश्चितपणे जाणवली. धार्मिक कार्य संपल्यावर याज्ञवल्क्याने तिच्या डोक्यावर शिंपडण्यासाठी पाणी घेतले. (मंत्र म्हटल्यावर फुंकर मारणे, ही क्रिया हिंदूंमध्ये अपवित्र असल्याचे मानतात. त्याऐवजी ते पाणी शिंपडतात.) तेव्हा ती स्त्री म्हणाली, "माझ्याऐवजी या खांबावर त्या पाण्याचा अभिषेक करा." याज्ञवल्क्याने खांबावर पाणी शिंपडताच तो खांब हिरवागार झाला. तेव्हा त्या धार्मिक विधीपासून प्राप्त होणाऱ्या फलास आपण पारखे झालो, या विचाराने ती स्त्री पश्चात्ताप-दग्ध झाली. दुसऱ्या दिवशी ती स्त्री याज्ञवल्क्याच्या गुरूकडे गेली व आदल्या दिवशी आपल्याकडे धार्मिक विधी करण्यासाठी पाठविलेल्या शिष्यालाच पुन्हा आजही पाठवावे अशी तिने विनंती केली. याज्ञवल्क्याने या विनंतीचा अव्हेर केला. आपल्या गुरूच्या क्रोधाची यत्किंचितही तमा न बाळगता तो म्हणाला, "तुम्ही मला जी विद्या शिकविली, तीही हवी असल्यास परत घ्या." ते हे शब्द उच्चारतो न उच्चारतो, तोच शिकलेल्या सर्व विद्येचे त्यास विस्मरण झाले. तेव्हा याज्ञवल्क्य सूर्याकडे गेला व आपणास वेदविद्या शिकवावी, अशी विनंती त्याने सूर्याला केली. सूर्य म्हणाला, "हे याज्ञवल्क्या, मला सतत हिंडावे लागते. तू माझ्याबरोबर एकसारखा प्रवास कसा करणार ? आणि तसे झाले नाही, तर तुझे उद्दिष्ट तुला कसे साध्य करिता येईल ?" हे ऐकल्यावर याज्ञवल्क्य सूर्याच्या रथावर चढला व तेथेच तो वेदाध्ययन करू लागला. रथाच्या कमीजास्त होणाऱ्या गतीमुळे त्यांना अधेमध्ये थांबावे लागत असे. वेळो-वेळी असा खंड पडल्यामुळे याज्ञवल्क्याच्या वेदाध्ययनात बराच व्यत्यय आला.

संधिनियमांनुसार ऋग्वेदाचे पारायण करता येते. हा समज हिंदूंमध्ये का पसरला असावा यासंबंधी या पौराणिक कथेमुळे काहीसा प्रकाश पडतो, यात वाद नाही. साम-वेदात विधिनिषेधधर्माविषयी व आहुतीविषयी विवेचन केले आहे. या वेदाचे पारायण मंत्राच्या पारायणाप्रमाणे विशिष्ट स्वरात केले जाते. 'सामन्' म्हणजे पारायणातील किंवा गायनातील माधुर्य. 'सामन्' या शब्दावरून 'सामवेद' हा शब्द सिद्ध झाला. या संदर्भात एक आख्यायिकाही सांगितली जाते : नारायण वामनावतार घेऊन पृथ्वीवर अवतरला आणि बळीराजाकडे जाऊन त्याने अत्यंत मधुर स्वरात सामवेदाच्या पारायणास प्रारंभ केला. त्याच्या या सुस्वर गायनाचा राजावर अत्यंत प्रभाव पडला. आणि त्याचा परिणाम म्हणूनच की काय, पुढे बळीराजाची 'ती' सुप्रसिद्ध कथा घडली.

'अथर्ववेद' हा संधिनियमांशी निगडित आहे. याची रचनापद्धती 'ऋग्वेद' किंवा 'यजुर्वेद' यांच्याप्रमाणे नसून 'भर' नामक तिसऱ्याच एका प्रकारची आहे. सानुनासिक स्वरात हा ग्रंथ म्हटला जातो. यात विविध प्रकारच्या आहुती आणि

अंत्यसंस्कार याविषयी या ग्रंथात माहिती दिली आहे.

यानंतर पुराणांविषयी विवेचन करतो. 'पुराण' या शब्दाचा अर्थ 'आदि' किंवा 'सनातन' असा आहे. पुराणांची एकूण संख्या अठरा असून त्यात मानव, प्राणी किंवा देवता यांच्या कथा सांगितल्या आहेत. ज्या प्राणिमात्राची, मानवाची किंवा देवतेची कथा पुराणात सांगितली असेल, तिचे नाव बहुधा त्या त्या पुराणास दिले आहे.

पुराणे ही मानव-निर्मित आहेत त्यांची रचना ऋषींनी केली आहे. मी या पुराणांची यादी जशी ऐकली तशीच पुढे उद्धृत करीत आहे :

१) आदिपुराण, २) मत्स्यपुराण, ३) कूर्मपुराण, ४) वराहपुराण, ५) नरसिंह-पुराण, ६) वामनपुराण, ७) वायुपुराण, ८) नंदपुराण, ९) स्कंदपुराण, १०) आदित्य पुराण, ११) सोमपुराण, १२) साम्बपुराण, १३) ब्रह्मांडपुराण, १४) मार्कण्डेय-पुराण, १५) तार्क्ष्यपुराण, १६) विष्णुपुराण, १७) ब्रह्मपुराण, १८) भविष्यपुराण यापैकी मी मात्र मत्स्य, आदित्य आणि वायु नामक पुराणांचा काही भागच तेवढा पाहिला आहे.

पुराणांची थोडीफार वेगळी यादी मला विष्णुपुराणातून वाचून दाखविण्यात आली, तीही मी पुढे देत आहे. एकाद्या विषयासंबंधी लेखन करीत असताना, त्यासंबंधीच्या सर्व परंपरा शक्यतो मूळातून उद्धृत करणे हे त्या लेखकाचे आद्य कर्तव्य असते. हे लक्षात घेऊनच पुढील यादीही उद्धृत करीत आहे :

१) ब्रह्म, २) पद्म, ३) विष्णु, ४) शिव, ५) भागवत, ६) नारद, ७) मार्कण्डेय, ८) अग्नि, ९) भविष्य, १०) ब्रह्मवैवर्त, ११) लिंग, १२) वराह, १३) स्कंद, १४) वाम, १५) कूर्म, १६) मत्स्य, १७) गरुड, १८) ब्रह्मांड.

वेद व पुराणे याशिवाय स्मृतिग्रंथाचाही हिंदूंच्या राष्ट्रीय साहित्यात अंतर्भाव होतो. 'स्मृति' हा ग्रंथ वेदांपासून सिद्ध झाला आहे. हा ग्रंथ ब्रह्माच्या वीस पुत्रांनी रचला असून त्यात विधिनिषेधविषयक विवरण केले आहे. या वीस पुत्रांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :

१) आपस्तम्ब, २) पाराशर, ३) शातातप, ४) सम्वार्त, ५) दक्ष, ६) वसिष्ठ, ७) अंगिरस, ८) यम, ९) विष्णु, १०) मनु, ११) याज्ञवल्क्य, १२) अत्रि, १३) हारीत, १५) लिखित, १५) शंख, १६) गौतम, १७) बृहस्पति, १८) कात्या-यन, १९) व्यास, २०) उशासन.

न्यायशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, तपश्चर्या, जीवन्मुक्त होऊन परमात्मस्वरूपात विलीन होण्याची प्रक्रिया इत्यादि विषयांवरही हिंदूंनी विपुल लेखन केले आहे. उदाहरणादाखल पुढील ग्रंथांचा निर्देश करता येईल. गौड नामक पंडिताचा ग्रंथ, कपिलाचा 'सांख्य' हा दर्शन-ग्रंथ, मुक्ती (चिंतनविषय असलेल्या परमात्मतत्त्वाशी मीलन) विषयी पतंजलीने लिहिलेला ग्रंथ, वेदविषयक विवरण करणारा कपिलाचा

'न्याय-भाषा' हा ग्रंथ, याच विषयावरील जैमिनीचा 'मीमांसा' नामक ग्रंथ, ज्ञानेंद्रियापासून लाभणाऱ्या सुखावर भर देणारा बृहस्पतीचा 'लोकायत', ज्ञानेंद्रियांपासून लाभणारे ज्ञान आणि परंपरेने आलेले ज्ञान यांचा मेळ घालणारे अगस्त्याचे 'अगस्त्यमत' आणि 'विष्णुधर्म' हा ग्रंथ. ('विष्णुधर्म' या शब्दाचा अर्थ 'परमेश्वरप्रणीत धर्म' किंवा 'नारायणाचा धर्म' असा होतो.) इत्यादि. याशिवाय देवल, शुक्र, भार्गव, बृहस्पति, याज्ञवल्क्य आणि मनु या व्यासांच्या सहा शिष्यांचे ग्रंथही उपलब्ध आहेत. विज्ञानाच्या शाखोपशाखांविषयी हिंदूंनी कितीतरी ग्रंथ लिहिले आहेत. तथापि हिंदू नसलेल्या एकाद्या विदेशी गृहस्थाला त्या सर्वांची नावे कशी सांगता येणार ! याशिवाय हिंदूंच्या आणखी एका महत्त्वपूर्ण ग्रंथाचा उल्लेख करावयास हवा. इतर सर्व ग्रंथांत जे ज्ञान आढळते, ते तर या ग्रंथांत आहेच तथापि या ग्रंथांत जे जे सांगितले आहेत ते मात्र इतर सर्व ग्रंथांत आहेच असे नाही. या ग्रंथाचे नाव 'भारत' असे आहे. 'पांडु' आणि 'कुरु' नामक राजांच्या पुत्रांमध्ये जे महायुद्ध झाले, त्यावेळी पराशराचा पुत्र व्यास याने हा ग्रंथ लिहिला. १८ पर्वांत हा ग्रंथ १००, ००० श्लोकांत लिहिला आहे. या पर्वांची यादी व त्यातील थोडक्यात आशय किंवा पर्वनाम कशावरून पडले याविषयीचा संदर्भ पुढे देत आहे :

| पर्वनाम | संदर्भ वा अर्थ |
|---|---|
| १) सभा | : राजाचे वास्तव्यस्थान |
| २) अरण्यपर्व | : पांडवांचा अज्ञातवास |
| ३) विराट | : अज्ञातवासात पांडवांनी ज्या राजाकडे वास्तव्य केले त्याचे नाव विराट असे होते. |
| ४) उद्योग | : युद्धासाठी सिद्धता. |
| ५) भीष्म | : |
| ६) द्रोण | : द्रोण नामक ब्राह्मण |
| ७) कर्ण | : सूर्याच्या पुत्राचे नाव. |
| ८) शल्य | : हा दुर्योधनाचा भाऊ होता. एक अत्यंत शूर योद्धा. |
| ९) गदा | — |
| १०) सौप्तिक | : द्रोणपुत्र अश्वत्थामन् याने रात्रीच्या वेळी पांचाळनगरीवर हल्ला केला व तेथील प्रजाजनांना ठार केले- |
| ११) जलप्रदानिका | : मृताला स्पर्श केल्यानंतर अशौच झाल्यामुळे (स्नान करून) पवित्र होण्यासाठी पाणी काढणे. |
| १२) स्त्री | : स्त्रियांनी केलेला शोक. |
| १३) शांति | : या पर्वाचे २४,००० श्लोक असून हे संपूर्ण पर्व पुढील चार भागांत विभागले आहे. या पर्वात तिरस्कार-द्वेषादी विकार |

नष्ट कसे करावे याविषयी विवरण केले आहे :

१) राजधर्म : राजांनी आपले कर्तव्यपालन केल्यामुळे त्यांना प्राप्त होणारे फल.

२) दानधर्म : दानधर्म केल्यामुळे मिळणारे फल.

३) आपद्धर्म : आपद्ग्रस्तांना साहाय्य केल्यामुळे मिळणारे फल.

४) मोक्षधर्म : जगातून मुक्त झालेल्या व्यक्तीस प्राप्त होणारे फल.

१४) अश्वमेघ : एकदा सम्राट आपल्या सैन्याबरोबर एक घोडा देतो. हे सैन्य त्या घोड्याला आपल्याबरोबर घेऊन जगातील सर्व देशांत प्रवास करते. प्रत्येक देशात ते पुढील घोषणा करतात. संपूर्ण जगावर स्वामित्व प्रस्थापित केलेल्या सम्राटाचा हा अश्व आहे. ज्याला हे (सम्राटाचे स्वामित्व) मान्य नसेल, त्याने आमच्याबरोबर युद्ध करण्यास सिद्ध व्हावे. जेथे जेथे हा घोडा मलविसर्जन करतो, त्या त्या ठिकाणी घोड्याच्या मागून चालत येणारे ब्राह्मण होम-हवनादी करतात.

१५) मौसल : यादवांनी आपापसांत केलेले युद्ध.

१६) आश्रमवास : देशत्याग करणे.

१७) प्रस्थान : प्राप्त करण्यासाठी राज्यत्याग करणे.

१८) स्वर्गारोहण : स्वर्गास प्रयाण.

यानंतर 'हरिवंश' नावाचेही एक पर्व आढळते. त्यात वासुदेवाची वंशपरंपरा सांगितली आहे.

ज्याचे स्पष्टीकरण अनेकविध रीतींनी करता येईल अशी कितीतरी कूटस्थले 'भारत' या ग्रंथात आहे. या कूटस्थलांची कारणमीमांसा करताना हिंदू लोक पुढील कथा सांगतात : "मी 'भारत' नामक ग्रंथांचे निवेदन करणार आहे. तो लिहून घेण्यासाठी मला एकदा लेखक द्या." अशी विनंती व्यासांनी ब्रह्मास केली. त्याने आपल्या विनायक नावाच्या पुत्राकडे हे काम सोपविले (याच विनायकाच्या प्रतिमेत हत्तीचे शिर असलेली मानवदेहाकृती आढळते). ब्रह्माने विनायकास अविरत लेखन करण्याची आज्ञा दिली होती. तर "तुला जे पूर्णपणे समजले तेच लिही" अशी व्यासाची आज्ञा होती. त्यामुळे व्यासाने 'भारत' ग्रंथ निवेदन करताना अशी काही मार्मिक सूत्रे सांगितली की जी लिहिताना लिहिणाऱ्यानेही विचारमग्न व्हावे व निवेदकालाही काहीशी विश्रांती मिळावी.

१३

# व्याकरण व छंद : शास्त्र

हिंदूंचे व्याकरण आणि छन्दःशास्त्र त्यांच्या इतर शास्त्रांना साहाय्यकारक व पूरक असेच आहे. यांपैकी ते व्याकरणाला अधिक महत्त्व देतात. या शास्त्रात भाषेची शुद्धता आणि व्युत्पत्ती इ. चे नियम सांगितलेले आहेत. त्याच्या साहाय्याने त्यांना अभिजात, शास्त्रशुद्ध शैलीत भाषण व लेखन करता येते. हिंदूंची भाषाच मुळात परकी असल्याने व त्या भाषेतच या शास्त्राचे बीज रुजले असल्याने मुस्लिमांना या शास्त्राचे अध्ययन करता येत नाही. या शास्त्राचे विवरण पुढील ग्रंथात करण्यात आले आहे, असे मला येथे सांगण्यात आले :

१ ) ऐन्द्र : देवांचा प्रमुख जो इंद्र याच्याशी हे ग्रंथनाम संबंधित आहे.

२ ) चान्द्र : तांबडे झगे घालणाऱ्या बुद्ध साम्प्रदायिकांपैकी चन्द्र नामक लेखकाने लिहिलेला ग्रंथ.

३ ) शाक्त : लेखकाच्या नावावरून त्याच्या ग्रंथालाही हे नाव पडले. त्याचप्रमाणेच त्याच्या नावावरूनच सम्प्रदायालाही 'शाक्तायत' असे नाव पडले आहे.

४ ) पाणिनि : ग्रंथकारावरून त्याच्या ग्रंथाला दिलेले नाव.

५ ) कातंन्त्र : शर्ववर्मन् याने लिहिलेला ग्रंथ

६ ) शशिदेववृत्ति : शशिदेवविरचित ग्रंथ.

७ ) दुर्गविवृत्ति :

८ ) शिल्यहितवृत्ति : उग्रभूतविरचित ग्रंथ.

शेवटी निर्देशिलेला ग्रंथ येथे बराच लोकप्रिय आहे. त्याविषयी येथे मी पुढील आख्यायिका ऐकली आहे : 'शिष्यहितवृत्ति' 'नामक व्याकरणग्रंथाचा कर्ता उग्रभूति हा जयपालाचा पुत्र आनंदपाल याचा गुरु होता. ग्रंथ लिहून झाल्यावर उग्रभूतीने तो काश्मीर येथे पाठविला तथापि तेथील लोक अत्यंत सनातनी असल्याने त्यांनी त्या ग्रंथाचा स्वीकार केला नाही. याबद्दल उग्रभूतीने आनंदपाल राजाकडे तक्रार केली. शिष्य या नात्याने राजाने गुरूची इच्छा पूर्ण करण्याचे अभिवचन दिले. जे

लोक या ग्रंथाचे चांगले अध्ययन करतील त्यांना पारितोषिके देण्यासाठी म्हणून त्याने २००,००० दिराम आणि तेवढ्याच किंमतीच्या उंची वस्तू कश्मीर येथे पाठविल्या. याचा परिणाम असा झाला की सर्वांनी इतर व्याकरणग्रंथ सोडून याच ग्रंथाच्या अध्ययनास, पारायणास व प्रतलेखनास प्रारंभ केला आणि त्यामुळेच या ग्रंथास मोठी लोकप्रियता व विद्वानांची मान्यता प्राप्त झाली. व्याकरणाच्या उत्पत्तीविषयी ते पुढील उपपत्ती सांगतात :—

एकदा, 'समलवाहन' (उच्च भाषेत 'सातवाहन') राजा एका सरोवरात स्त्रियांबरोबर क्रीडा करीत होता. त्यांपैकी एका स्त्रीला तो 'मौदक देही' (म्हणजे माझ्या अंगावर पाणी शिंपडू नकोस) असे म्हणाला. तेव्हा तिला वाटले की राजा 'मोदकं देही' (मोदक दे) असेच म्हणत आहे. तेव्हा ती तेथून गेली व तिने मोदक आणले. तिच्या या कृत्याबद्दल राजाने तिचा उपहास केला. तेव्हा तीही रागावली व तिने काही अपशब्द उच्चारले. राजाला या गोष्टीचा अत्यंत राग आला. येथील प्रथे-प्रमाणे, त्याने (राग आल्यावर) अन्नपाणी वर्ज्य केले व एकांतवास पत्करला. एका ऋषीला ही गोष्ट समजल्यावर त्याने त्याची समजूत घातली आणि मी लोकांना स्वरांचे उच्चारण व व्याकरण इ. विद्या शिकवीन असे अभिवचन दिले. ऋषीजीने तप केल्यावर त्यांच्यावर महादेव प्रसन्न झाला आणि अबुल अस्वद्अद्अली याने अरबी व्याकरणाचे काही नियम सांगितले, त्याप्रमाणे महादेवाने त्यास (ऋषीला) त्याच्या भाषेच्या व्याकरणाचे काही नियम सांगितले. या शास्त्राच्या विकासासाठी व प्रसारा-साठी मी तुला अवश्य साहाय्य करीन, असे आश्वासनही त्याने त्या ऋषीस दिले. मग त्या ऋषीने समलवाहन राजाला व्याकरण शिकविले. अशा प्रकारे व्याकरणाचा उगम झाला.

व्याकरणानंतर हिंदूंच्या छन्दः शास्त्राचा विचार येतो हिंदूंचे सर्व ग्रंथ पद्यात असल्याने त्यांना या शास्त्राचा अत्यंत उपयोग होतो. ग्रंथ पद्यबद्ध असले म्हणजे ते पाठ करणे सुलभ होते. या उद्देशानेच हे ग्रंथ पद्यात लिहिले आहेत. सुव्यवस्था व प्रमाणबद्धता या गोष्टींकडे मानवी मन विशेष आकर्षित होते, असे त्यांना वाटते. जेथे अशा प्रकारची प्रमाणबद्धता नसते तेथे मानवी मन रमत नाही अशी त्यांची धारणा अस-ल्याने पद्यातील लयबद्धता त्यांना विशेष आकर्षित करते. कधी कधी तर या पद्यचरणांचा अर्थ लागला नाही तरी ते तो पाठ म्हणून दाखवितात व त्याबद्दल लोक त्यांची भरपूर प्रशंसाही करतात. त्यामुळेच (लयबद्धतेच्या किंवा छंद वा वृत्ताच्या अभावामुळेच) गद्यरचनेकडे त्यांचा विशेष ओढा नाही.

हिंदूंचे बहुतेक ग्रंथ श्लोकबद्ध आहेत, या श्लोकरचनेचाच अभ्यास मी सध्या करीत आहे. तसेच हिंदू पंडितांसाठी युक्लिड आणि ॲलमागेस्टच्या ग्रंथांचे श्लोकबद्ध

भाषांतरही करीत आहे. वेधयंत्र कसे तयार करावे, याविषयीही मी त्यांना माहिती सांगत आहे. विज्ञानाचा प्रसार व्हावा, या प्रेरणेनेच हे कार्य अंगिकारले आहे. आपल्या भाषेत एखाद्या विषयावरील ग्रंथ नसल्यास ते लगेच त्याचे श्लोकबद्ध भाषांतर करतात. हे श्लोक काहीसे अनाकलनीय वाटतात खरे, तथापि विशिष्ट वृत्तयोजनेसाठी त्यांना अशा प्रकारची श्लोकरचना करावी लागते. अशा प्रकारच्या रचनेमुळे यांना विशिष्ट प्रकारची लयबद्धता साधता येते. ग्रंथात आकर्षक वृत्त–योजना करता आली नाही तर विद्वज्जन त्या रचनेवर ( ती गद्यसदृश झाल्याची ) टीका करतात. यामुळे ग्रंथकारासही अत्यंत दुःख होते. हिंदूंच्या छन्दःशास्त्राचे आद्य ग्रंथ पिंगल व चलित यांनी लिहिले. या विषयावर पुढे विपुल ग्रंथरचना झाली. या विषयावर 'गैसित' हा विशेष महत्त्वाचा ग्रंथ असल्याचे मानले जाते. 'गैसित' हे ग्रंथनाम त्या ग्रंथाच्या लेखकावरूनच पडले आहे. कधी कधी संपूर्ण छंदःशास्त्राचा निर्देश करण्यासाठीच ह्या ग्रंथाचे नाव वापरतात. यावरून हा ग्रंथ या देशात किती लोकप्रिय होता, हे लक्षात येईल. याशिवाय या विषयावर मृगलांछन आणि औलयांद यांनीही महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले आहेत. हे ग्रंथ मला पाहावयास मिळाले नाहीत तसेच 'ब्रह्मसिद्धांत' या ग्रंथातील छन्दःशास्त्र-विषयक प्रकरणाचीही मला फारशी माहिती नाही. यासाठीच मी हिंदूंच्या छन्दःशास्त्राची समग्र माहिती येथे सादर केली आहे, असे समजण्याचे कारण नाही. वस्तुतः एखाद्या विषयासंबंधी थोडी फार माहिती असल्यास त्यासंबंधी विवेचन करणे योग्य नाही तथापि ( आज मला याविषयीची समाधानकारक माहिती मिळाली नाही तरी ) मी या विषयाचे समग्र ज्ञान मिळविण्याचा सतत प्रयत्न करून त्यावर प्रभुत्व मिळविल्याशिवाय उसंत घेणार नाही.

आपल्याकडील अल्खलील इब्न अहमद व इतर छन्दःशास्त्रज्ञ अक्षरे ( गण छन्दस् ) मोजताना पुढील चिन्हे वापरतात.

१ ) स्वरयुक्त व्यंजनासाठी ...... <

२ ) स्वररहित व्यंजनासाठी.......।

हिंदू छन्दःशास्त्रज्ञही अक्षरांच्या गणनेसाठी–त्याचे छन्दातील मूल्य ठरविण्यासाठी-हीच चिन्हे वापरतात. परिगणन करताना १ गुरु = २ लघु आहेत असे ते मानतात.

'दीर्घ' अक्षर हे त्यांच्या छंदःशास्त्रातील 'गुरु' नामक परिमाण होय. दीर्घ अक्षरात स्वराचा लांब वा अधिक काळपर्यंत उच्चार केलेला असावा असे मला वाटते. ( उदा. का, की, कू इ. ) तथापि अद्यापपावेतो 'लघु' आणि 'गुरु' यांच्या संबंधी मला सुस्पष्ट कल्पना आलेली नाही, हे येथे नमूद करावयास हवे. त्यामुळेच मला त्यांची अरबी भाषेतील अक्षरांशी वा अरबी छंदांशी तुलना करता येत नाही.

स्वरविरहित व्यंजन म्हणजे 'लघु' आणि स्वरयुक्त व्यंजन म्हणजे 'गुरु' असा 'लघु' आणि 'गुरु' या शब्दांचा अर्थ नसून ऱ्हस्व स्वरयुक्त व्यंजन म्हणजे 'लघु'

(उदा. क, कि, कु,) आणि त्यातच एक व्यंजन वाढविले की ते 'गुरु' होते (उदा. कत्, कित्, कुत्.) याची (गुरूची) तुलना अरबी 'सबब' शी करता येईल (यात एका दीर्घ स्वराऐवजी दोन ऱ्हस्व स्वरांचा उपयोग करतात.) हिंदू लोक लघु अक्षरांचे एकदम – एकसमयावच्छेदेकरून – उपयोग करीत असल्याने 'लघु' या शब्दांचा प्रथमतः मी जो अर्थ सांगितला, तो कितपत बरोबर आहे याविषयी मला शंका वाटते. अरब लोक हिंदूंप्रमाणे अनेक स्वरविरहित व्यंजनांचा एकत्रित उच्चार करू शकत नाहीत. इतर भाषिकांना मात्र अशा प्रकारचे उच्चार करता येतात. अशा प्रकारच्या स्वरविरहित व्यंजनाचे वर्णन फार्सी छंदःशास्त्रज्ञ '(हिब्रू 'श्व' प्रमाणे) अत्यंत सूक्ष्म स्वराच्या साहाय्याने उच्चारले जाणारे व्यंजन' असा करतात. लागोपाठ तीन किंवा अधिक स्वरविरहित व्यंजने आल्यास त्यांचा उच्चार करणे अत्यंत कठिण होते. या स्वरविरहित व्यंजनसमूहामध्ये अरबी भाषेतील शब्दाप्रमाणे मध्ये एखादा ऱ्हस्व स्वर आल्यास त्या शब्दांचा उच्चार करणे सुलभ होते. उदा. अरबी भाषेतील पुढील वाक्य पाहा :–

"बदानुक कमथलि सिफतिक वफमुक यिसाति शफतिक."

(अर्थ : तुझा देहच तुझे वर्णन करण्यास समर्थ आहे. तुझ्या ओठांच्या रुंदीवरून तुझ्या मुखाची सहज कल्पना येते.) वस्तुतः शब्दांच्या प्रारंभी स्वरविरहित व्यंजनांचा उच्चार करणे कठीण असते. तथापि हिंदूंची बरीच नामे हिब्रू 'श्व' प्रमाणे आद्यस्वरविरहित व्यंजनांनी सिद्ध होतात. पद्यारंभी अशा प्रकारचे स्वरविरहित व्यंजन आल्यास ते त्याची गणना करीत नाहीत कारण स्वरविरहित व्यंजन हे स्वरापूर्वी न येता त्यानंतर येते असा 'गुरु'– विषयीचा नियम आहे (उदा. कत्, कित्, कुत्.)

आपल्याकडे विविध 'अफाईल' (चरणां)च्या साहाय्याने पद्याची रचना करतात त्याचप्रमाणे हिंदूंच्या पद्यरचनेमध्येही चरणांची योजना केलेली असते. या प्रत्येक चरणाची रचना स्वरयुक्त वा स्वरविरहित व्यंजनांच्या साहाय्याने होत असते व त्यावरून अमुक चरणात अमुक लघु व गुरु अक्षरे आहेत असे त्याचे विवरण येथील लोक करतात. या पद्धतीने ते वृत्तविचारही करतात. प्रत्येक वृत्तात प्रत्येक पद्यचरणात लघु–गुरु अक्षरांची एक विशिष्ट संख्या निर्देशिलेली असते. त्यात वर्णसंख्या कमी अधिक असू शकते. तथापि लघु–गुरूच्या संख्येचे बंधन मात्र विशिष्ट वृत्तातील प्रत्येक पद्यचरणात पाळावे लागते. यावरून लघु–गुरु हे त्यांच्या छन्दःशास्त्रातील एक परिमाणच असते, हे सहज लक्षात येईल. लघु आणि गुरु याचे मूल्य 'मात्रेत' ठरवितात. (लघु=१ मात्रा आणि गुरु = २ मात्रा.) पद्यचरणांचा छन्ददृष्ट्या वा वृत्तदृष्ट्या विचार करताना ते केवळ या लघुगुरूंच्या वा मात्रांच्या भाषेतच बोलतात. या ठिकाणी ते त्या पद्यचरणातील वर्णसंख्येचा विचार करीत नाहीत. अरबी छन्दःशास्त्रात मात्र या सर्वच वर्णांचा विचार केला जातो. उदा. अरबी छंद : शास्त्र 'रुक'

या जोडाक्षराचे छन्ददृष्टया मूल्य ' १ स्वरविरहित व्यंजन+एक स्वरयुक्त व्यंजन ' असे आहे व ' कुन् ' या शब्दाचे मूल्य ' १ स्वरयुक्त व्यंजन +, स्वरविरहित व्यंजन असे आहे.

हिंदू लोक ' लघु ' आणि ' गुरु ' यांच्यासाठी अनेक प्रतिशब्दही वापरतात. 'लघु' साठी ते ' ल ', कलि, रूप, चामर आणि ग्रह इ. शब्दांचाही उपयोग करतात तर ' गुरू ' साठी ' ग ', नीव्र, अर्ध, अंशक हे शब्द ते वापरतात. अर्ध अंशक हा गुरूइतका असतो, म्हणजेच पूर्ण अंशक हा २ गुरूंइतका असतो, असे त्यांना म्हणावयाचे आहे असे दिसते. लघु किंवा गुरु यांच्यासाठी हे सर्व प्रतिशब्द छन्दःशास्त्राच्या सोयी-साठी निर्माण झाले असावेत असे वाटते.

लघु आणि गुरु यांच्या संयोगाने वृत्तपरिमाणे सिद्ध होतात :–

|| म्ह. दोन मात्रा किंवा दोन अक्षरे

| <आणि<| म्ह. तीन मात्रा, दोन अक्षरे<| यास ' कृत्तिका ' असे म्हणतात. ( यात तीन मात्रा असतात. )

पुढील परिमाणात चार मात्रा असतात :–

<<पक्ष = अर्धा महिना

||<ज्वलन = अग्नी

|<| मध्य

<|| पर्वत, यास ' हार ' किंवा ' रस ' असेही म्हणतात.

|||| घन

पाच मात्रांच्या परिमाणाचेही अनेक प्रकार आढळतात. त्यांचे विवरण पुढीलप्रमाणे आहे–

|<<हस्तिन् = हत्ती

<|<काम = वासना

<<| = ?

|||< = कुसुम

सहा मात्रांच्या चरणाचे मात्रालेखन<<<अशा प्रकारे करता येईल. त्याची नावे पुढीलप्रमाणे आहेत :–

ज्वलन = हत्ती

मध्य = मनोरा

पर्वत = प्यादा

घन = घोडा

हरिवद्द ( हरिभट्ट ? ) याने आपल्याच नावाने लिहिलेल्या एका कोशात तीन लघु किंवा ३ गुरु यांच्या साहाय्याने जे गण सिद्ध होतात त्याच्याविषयी पुढील माहिती दिली आहे :

म <<< सहा मात्रा
य |<< हस्तिन्
र <|< काम
त <<| ?
स ||< ज्वलन
ज |<| मध्य
म <|| पर्वत
न ||| तीन मात्रा

लघु (|) आणि गुरु (<) यांच्या या चिन्हांच्या साहाय्याने या आठ गणांची रचना कशी करावी हेही या लेखकाने सांगितले आहे. त्यासाठी त्याने पुढील (बीजगणितासारखी) क्लिष्ट पद्धती अवलंबिली आहे :–

गुरु आणि लघु यांपैकी कोणत्याही एकाचीच सर्व चिन्हे प्रथमतः लिहा. (आपण 'गुरु' ने प्रारंभ केल्यास येथे तीन गुरुदर्शक चिन्हे लिहावीत. हे चिन्ह– लेखन <<< असे होईल.) त्यानंतर पुढे त्यात दुसऱ्या प्रकारचे उच्चार परिमाण मिसळून ते दुसऱ्या ओळीच्या प्रारंभी लिहा. या ओळीची बाकीची परिमाणे पहिल्या ओळींतील इतर परिमाणांप्रमाणेच असावीत (उदा. |<<) तिसऱ्या ओळीत मध्यावर दुसऱ्या ओळीच्या प्रारंभी घेतलेले परिमाण लिहा. (<|<) आणि चवथ्या ओळीत ते शेवटी ठेवा (— — |). येथे चार ओळींचा हा पूर्वार्ध संपतो. परिमाणाचे उत्तरार्धाच्या शेवटच्या ओळीत तिन्ही ठिकाणी द्वितीय (म्हणजे येथे 'लघु' दर्शक | हे) चिन्ह लिहा. (|||). त्यावरील म्हणजे सातव्या ओळीच्या प्रारंभी प्रथम परिमाण–(म्ह. गुरु). दर्शक दर्शविणारे चिन्ह. ( | ) लिहा व इतर ठिकाणी द्वितीय परिमादर्शक चिन्हे लिहा. त्यामुळे या ओळीचे लेखन—|| असे होईल. त्यावरील म्हणजे सहाव्या ओळीत प्रथम परिमाण–(येथे गुरु) दर्शक चिन्ह मध्यावर घेऊन इतर ठिकाणी द्वितीय परिमाण (येथे लघु) दर्शक चिन्हे लिहा (|—|) आणि त्यावरील म्हणजे पाचव्या क्रमांकाच्या ओळीत–म्हणजेच उत्तरार्धाच्या प्रारंभीच्या ओळीत–प्रथम परिमाणदर्शक चिन्ह शेवटी द्वितीय परिमाणदर्शक चिन्हे इतर ठिकाणी लिहावीत. येथे उत्तरार्ध संपतो आणि त्याबरोबरच मात्राचे हे सर्व संभवनीय प्रकारही आपल्या लक्षात येतात. ही चिन्हे अशा पद्धतीने मांडून दाखविता येतील :—

<table>
<tr><th></th><th></th><th>१</th><th>२</th><th>३</th></tr>
<tr><td>पूर्वार्ध</td><td>१</td><td><</td><td><</td><td><</td></tr>
<tr><td></td><td>२</td><td>|</td><td><</td><td><</td></tr>
<tr><td></td><td>३</td><td><</td><td>|</td><td><</td></tr>
<tr><td></td><td>४</td><td>|</td><td>|</td><td><</td></tr>
<tr><td>उत्तरार्ध</td><td>५</td><td><</td><td><</td><td>|</td></tr>
<tr><td></td><td>६</td><td>|</td><td><</td><td>|</td></tr>
<tr><td></td><td>७</td><td><</td><td>|</td><td>|</td></tr>
<tr><td></td><td>८</td><td>|</td><td>|</td><td>|</td></tr>
</table>

गणलेखनाची लेखकाची ही पद्धती अचूक असली तरी त्याने या आठ गणांपैकी कोणत्याही एका गणाचा क्रमांक कसा शोधून काढावयाचा, हे सांगण्यासाठी ज्या पद्धतीचा अवलंब केला आहे ती मात्र सदोष वाटते. तो म्हणतो,

" प्रत्येक गणातील गुरु वा लघु दर्शविणारे प्रत्येक चिन्ह म्हणजे २ ही संख्या आहे, असे गृहीत धरा. असे केल्याने प्रत्येक गण हा २, २, २, या संख्यांनी दर्शविला जाईल. नंतर डाव्या बाजूच्या संख्येने मधील संख्येस गुणा. उजव्या बाजूकडील त्या गणातील शेवटचे चिन्ह लघुदर्शक असल्यास या शेवटच्या संख्येने पहिल्या दोहोंच्या गुणाकाराला गुणावे व शेवटचे चिन्ह गुरुदर्शक असल्यास पहिल्या दोन संख्यांच्या गुणाकारातून १ ही संख्या वजा करावी व मग येणाऱ्या संख्येस शेवटच्या संख्येने गुणावे.

सहाव्या चरणाचे उदाहरण घेऊन लेखकाने आपल्या या पद्धतीचे स्पष्टीकरण केले आहे. या गणातील चिन्हे |<| अशी आहेत. या गणाचा क्रमांक ६ असल्याचे या पद्धतीने सिद्ध होते :—

२ × २ = ४ − १ = ३ × २ = ६

तथापि ही पद्धती सर्वच गणांच्या क्रमांकाच्या बाबतीत लागू पडते असे नाही. याचे

कारण या ग्रंथाच्या प्रतलेखनात काही चूक झाली असावी असे मला वाटते. या पद्धती-नुसार गणांचा क्रम पुढीलप्रमाणे असावयास हवा :–

| | I | II | III | | I | II | III |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | < | < | < | ५ | < | < | \| |
| २ | \| | < | < | ६ | \| | < | \| |
| ३ | < | \| | < | ७ | < | \| | \| |
| ४ | \| | \| | < | ८ | \| | \| | \| |

यांतील चिन्हांच्या योजनेचे विश्लेषण अशा प्रकारे करता येईल :–

: यात एक परिमाणानंतर दुसरे परिमाण एकसारखे येते.

: यात एक परिमाण दोनदा आणि व त्यानंतर दुसरे परिमाण दोनदा आणि व त्यानंतर दुसरे परिमाणही दोनदा येते.

: यात सर्वच (चार) ठिकाणी एकच परिमाण येते.

अरबी पद्य दोन भागांत विभागलेले असते. त्यातील पूर्वार्धास ‘अरुद’ आणि उत्तरार्धास ‘दर्ब’ असे म्हणतात. हिंदूंच्या पद्यरचनेतही असे विभाग असतात. प्रत्येक विभागास ते ‘पाद’ असे म्हणतात. ग्रीकांनीही पद्यरचनेतील विभागांना ‘चरण’ या अर्थाचाच एक शब्द वापरला आहे.

हिंदूंच्या पद्यरचनेत बहुधा तीन, चार (किंवा क्वचित् पाचही) पाद असतात. हा पाचवा पाद बहुधा पद्याच्या मध्ये येतो. या पादांमध्ये एका विशिष्ट वृत्ताचा वापर केलेला असतो. पहिल्या दोन पादांच्या शेवटची अक्षरे सारखी आल्याने त्यात एक प्रकारची लयबद्धता येते. त्यापुढील दोन पादांतही हाच प्रकार आढळतो. या प्रकारच्या वृत्तास ते ‘आर्या’ असे म्हणतात. पादाच्या शेवटी असलेल्या लघु अक्षराचे गुरूत रूपान्तर होते.

हिंदूंच्या काव्यात विविध प्रकारची वृत्ते आढळतात. पाच पादांच्या वृत्तात पाचवा पाद हा तिसऱ्या व चवथ्या पादाच्या मध्ये ठेवतात. अक्षरसंख्येपरत्वे वृत्ताचे नावही बदलते. एकाच वृत्तात सलग प्रदीर्घ पद्यरचना करणे त्यांना तितकेसे आवडत नाही. त्यामुळेच रेशमी वस्त्रातील जरतारी वीण दिसते, त्याप्रमाणे त्याच्या एकाच कवितेत किती तरी, विविध प्रकारची वृत्ते असतात.

त्यांच्या चतुष्पाद वृत्तातील चार पादांची रचना पुढीलप्रमाणे असते :–

| | | | |
|---|---|---|---|
| पाद १ | < < पक्ष = १ अंशक<br>< \|\| पर्वत<br>\|\| < ज्वलन | < < पक्ष<br>< \|\| पर्वत<br>< < पक्ष | पाद ३ |
| पाद २ | << पक्ष<br>\|\|< ज्वलन<br>\|<\| मध्य<br><\|\| पर्वत<br><< पक्ष | << पक्ष<br>\|\| > ज्वलन<br>\|<\| मध्य<br><\|\| पर्वत<br>\|\|< ज्वलन | पाद ४ |

त्यांच्या ‘ स्कंध ’ नामक चतुष्पाद वृत्ताचे उदाहरण घेऊ या. या वृत्ताचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन विभाग असून प्रत्येक विभागात आठ अंशक असतात. त्यातील प्रत्येक अंशकातील पहिला, तिसरा व पाचवा गण हा कधीही मध्य ( <| ) नसतो. सहाव्यात मात्र एक एक मध्य किंवा एक घन असतो. हीच पद्धती अन्य अंशकांच्या बाबतीत अवलंबिल्यास, त्यांची रचना कवीच्या लहरीप्रमाणे हवी तशी होऊ शकेल. तथापि वृत्त म्हटले की ते स्वयंपूर्ण असणे अनिवार्य आहे. त्यात नियत केलेल्या परिमाणांपेक्षा कमी–अधिक मात्रा असता कामा नये. त्यासाठी प्रत्येक पादात विशिष्ट अंशकांची योजना करून आपल्याला पुढील चार पादांची अशा प्रकारे रचना करता येईल :–

पाद १ << <|| ||<.<br>
पाद २ << ||< |<| <|| <<.<br>
पाद ३ << |<| <<.<br>
पाद ४ << |<< |<| <|| ||<.

अरबी मात्रादर्शक चिन्हांशी हिंदूंच्या मात्रादर्शक चिन्हांची तुलना केल्यास त्यात बराच भेद असल्याचे लक्षात येते. | या चिन्हांचा अरबी छन्दःशास्त्रातील अर्थ, स्वर-रहित व्यंजन असा होतो तर त्यासारख्याच दिसणाऱ्या | या हिंदूंच्या छन्दःशास्त्रातील चिन्हाचा अर्थ ( लघु किंवा ) ऱ्हस्व वर्ण असा होतो. ० या अरबी चिन्हाचा अर्थ ऱ्हस्व स्वरानंतर येणारे व्यंजन असा होतो आणि हिंदूंच्या या< चिन्हाचा अर्थ (गुरु किंवा ) दीर्घ अक्षर असा होतो. हा विचार अधिक स्पष्ट व्हावा म्हणून खफीफ नामक अरबी वृत्ताचे लेखन पुढे करून दाखवीत आहे. यातील प्रत्येक चरण फअल धातूशी संबद्ध आहे.

## खफीफ वृत्त

( १ ) फअल धातूची रूपे :

( २ ) त्यांचे अरबी मात्राचिन्हानुसार रूपान्तर |०|

( ३ ) त्यांचे हिंदूंच्या मात्राचिन्हांनुसार रूपान्तर <<

शेवटच्या ( क्र. ३ मधील ) खुणा उलट्या क्रमाने दिल्या आहेत कारण हिंदू लोक डावीकडून उजवीकडे वाचतात. ( आपल्याप्रमाणे उजवीकडून डावीकडे वाचत नाहीत. )

या विषयासंबंधीच्या माझ्या अल्पज्ञानामुळे मला या विषयाची यथासांग माहिती देता येत नाही, याविषयी मी यापूर्वीच सांगितले आहे. त्याचाच येथे पुनरुच्चार करतो आणि त्याबद्दल मी वाचकांची क्षमा मागतो. या विषयाची समग्र माहिती मिळविता यावी व त्याचे सुस्पष्ट विवेचन करता यावे म्हणून मी अतोनात परिश्रम केले आहेत. तथापि तेही या विषयाच्या व्याप्तीच्या मानाने अत्यल्प आहेत, याची मला जाणीव आहे.

चतुष्पाद छन्दास ' वृत्त ' असे नाव दिले आहे. त्याच्या प्रत्येक पादातील मात्रा-संख्या वा अक्षरसंख्या सारखीच असते. त्यामुळे एका पादाची रचना लक्षात आली की त्यावरून दुसऱ्या पादाच्या रचनेची कल्पना येते. कारण हे सर्व पाद सारखेच असतात. वेदातही चार वर्णांपेक्षा कमी वर्णांचा पाद नसल्याने वृत्तातील पादांतही कमीत कमी चार वर्ण असावेत, असा छन्दःशास्त्रात एक नियम आहे. त्यामुळेच प्रत्येक पादातील अक्षरसंख्या कमीत कमी चार तरी असतेच. ही संख्या अधिकात अधिक २६ असते.

वृत्तांचे २३ प्रकार आहेत. ते पुढे देत आहे :—

### वृत्तक्रमांक त्याच्या रचनेची वैशिष्ट्ये ( मात्रा इ. )

१. या वृत्तातील पादात चार गुरु असतात. प्रत्येक गुरुच्या ऐवजी २ लघूंचा समावेश करता येत नाही.

२. या वृत्तातील पादाच्या द्वितीय प्रकाराचा मला नीटसा उलगडा झाला नाही.

३. घन + पक्ष

||||    <<

४. २ गुरु + २ लघु + ३ गुरु

<<    ||    <<<

हा पाद पुढील प्रकारे अधिक स्पष्ट करता येईल :–

पक्ष + ज्वलन + पक्ष

५. २ कृत्तिका + ज्वलन + पक्ष
<|<| ||< <<

६. घन + मध्य + पक्ष -
|||| |<| <<

७. घन + पर्वत + ज्वलन
|||| <|| ||<

८. काम, कुसुम, ज्वलन, गुरु
<|< |||< ||< <

९. पक्ष, हस्तिन, ज्वलन, मध्य, गुरु
<< |<< ||< |<| <<

१०. पक्ष, पर्वत, ज्वलन, मध्य, पक्ष
<< <|| ||< |<| <<

११. पक्ष, मध्य, २ ज्वलन, हस्तिन्
<< |<| ||<||< |<<

१२. घन, ज्वलन, पक्ष, २ हस्तिन
|||| ||< << |<<|<<

१३. पर्वत, काम, कुसुम, मध्य, ज्वलन
<|| <|< ||< |<| ||<

१४. हस्तिन, पक्ष, पर्वत, कुसुम, पर्वत, लघु, गुरु
|<< << <|< |||< <|| | <

१५. २ पक्ष, पर्वत, कुसुम, २ काम, गुरु
<<<< <|| |||< <|<||< <

१६. पक्ष पर्वत, काम, कुसुम, पक्ष, लघु गुरु
<< <|| <|< ||< << | <

१७. २ पक्ष, पर्वत, घन, ज्वलन, पक्ष, कुसुम
<<<< <|| |||| ||< << ||<

१८. २ पक्ष, पर्वत, घन, ज्वलन, २ काम, गुरु
<<<< <|| |||| ||< <|<|< <

१९. गुरु, २ पक्ष, पर्वत, घन, ज्वलन, २ काम गुरु
< <<<< <|| |||| ||< <|<<|< <

२०. ४ पक्ष, ज्वलन, मध्य, पक्ष, २ मध्य, गुरु
<<<<<<<< ||< |<| << |<||<| <

२१. ४ पक्ष, ३ ज्वलन, २ मध्य गुरु
||<||<||< <||< <

२२. ४ पक्ष, कुसुम, मध्य, ज्वलन २ मध्य गुरु
|||< |<| ||< |<||<| <

२३. ८ गुरु, १० लघु, काम, ज्वलन, लघु गुरु
|||||||||| <|< ||< | <

विविध वृत्तांतील मात्रांचा व रचनेविषयीचा हा तपशील येथे दिलेला असला तरी वाचकांना त्याचा अत्यंत अल्प प्रमाणातच उपयोग होईल असे वाटते. तथापि त्यांना यावरून हिंदूंच्या छन्दःशास्त्रात प्रत्येक वृत्त कशा प्रकारे (कोणत्या चिन्हांनी) नमूद करून ठेवले जात असे, याची कल्पना येईल असे वाटते. अरबी छन्दःशास्त्रज्ञ अल्ख-लील इब्न अहमद याने आपल्या स्वतःच्याच प्रज्ञेच्या बळावर अरबी भाषेतील छन्दः-शास्त्राची उभारणी केली. कदाचित त्यास हिंदूंच्या पद्यरचनेतील वृत्ताची माहिती असण्याचीही शक्यता आहे.

हिंदूंचे बहुतेक ग्रंथ श्लोकबद्ध असतात. वर त्यांच्या वृत्तांचे तपशीलवार विवरण केले आहे. त्याच्या आधारे त्यांच्या श्लोकांची रचना कशी असते हे पाहणेही सोयीचे होईल.

'श्लोक' हा चतुष्पाद वृत्ताचाच एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार होय. त्यातील प्रत्येक पादात आठ अक्षरे असतात. प्रत्येक पादाचे शेवटचे अक्षर गुरु असते. त्याचप्रमाणे प्रत्येक पादातील पाचवे अक्षर लघु व सहावे अक्षर गुरु असते. दुसऱ्या व चवथ्या पादातील सातवे अक्षर लघु असते तसेच पहिल्या व तिसऱ्या पादातील सातवे अक्षर गुरु असते. पादातील इतर अक्षरांची योजना कवी आपल्या इच्छेनुसार करू शकतो.

हिंदूंनी छन्दःशास्त्रातही अंकगणिताचा कसा उपयोग केला आहे, हे लक्षात यावे म्हणून ब्रह्मगुप्ताच्या ग्रंथातील एक उतारा पुढे देत आहे :—

पहिल्या प्रकारचे काव्य 'गायत्री' नामक छंदात असते. त्यात २ पाद असतात. या वृत्ताची अक्षरसंख्या २४ असते, असे आपण गृहीत धरल्यास त्यातील प्रत्येक पादातील कमीत कमी असलेली अक्षरसंख्या ४ ही होय. ही कमीत कमी अक्षरसंख्या घेऊन आपल्याला या दोन पादांची रचना ४+४ अशा प्रकारे करता येते. तथापि या पादांची अधिकात अधिक असलेली अक्षरसंख्या २४ आहे. ४+४ (=८) आणि २४ यातील बाकी राहणारी संख्या (१६) ४+४ यातील दुसऱ्या संख्येत (म्हणजे ४ या संख्येत) मिळवावी. यामुळे या द्विपाद वृत्ताची पादरचना अशी होईल. : ४+२० या वृत्तात तीन पाद असल्यास त्याची रचना ४+४+१६ अशी आणि त्यात चार पाद असल्यास पादांची रचना ४+४+४+१२ अशी करता येईल.

कवीने कमीत कमी अक्षरसंख्येच्या (म्हणजे ४ या संख्येच्या) पादांची रचना केली नाही तर द्विपाद वृत्तात पुढील पद्धतीने दोन पादांच्या अक्षरसंख्येची विभागणी करता येते. याचे कोष्टक मांडण्यासाठी उजव्या बाजूस कमीत कमी अक्षरसंख्या (म्ह. ४)

लिहावी व डाव्या बाजूस वृत्ताच्या पूर्ण अक्षरसंख्येतून ( म्हणजे २४ मधून ) कमीत कमी असलेली अक्षरसंख्या ( म्ह. ४ ) ही वजा करून आलेली संख्या ( म्ह. २० ) लिहावी. ४ या संख्येखालील स्तंभात १ वाढवून संख्या लिहावी. व २० या संख्ये-खालील स्तंभातील एक ही संख्या कमी करून संख्या लिहावी. या पद्धतीने पुढील कोष्टक तयार होईल.

| | |
|---|---|
| ४ | २० |
| ५ | १९ |
| ६ | १८ |
| ७ | १७ |
| ८ | १६ |
| ९ | १५ |
| १० | १४ |
| ११ | १३ |
| १२ | १२ |
| १३ | ११ |
| १४ | १० |
| १५ | ९ |
| १६ | ८ |
| १७ | ७ |
| १८ | ६ |
| १९ | ५ |
| २० | ४ |

यानुसार एकूण १७ प्रकारांनी द्विपाद वृत्तांतील दोन पादांची रचना करता येईल.

अशा प्रकारे त्रिपाद वृत्तातील प्रत्येक पादाची रचनाही करता येते. आपण या वृत्तासाठी २४ ही अक्षरसंख्या गृहीत धरली आहे. त्यातील छन्दःशास्त्राच्या नियमा-नुसार प्रथमतः कमीत कमी अक्षरसंख्येचे पहिले २ चरण केल्यास या वृत्ताची रचना अशी होईल—

४+४+१६

तीन पादांची रचना विविध प्रकारच्या अक्षरसंख्यांच्या साहाय्याने करावयाची असल्यास वर आलेल्या तीन संख्यांच्या आधारे (४, ४, १६) व द्विपाद वृत्ताच्या कोष्टकाच्या पद्धतीनेच पुढील कोष्टकही आपल्याला तयार करता येईल. (यात ४, ४ व १६ या संख्या स्तंभाच्या प्रारंभी लिहाव्या.)

| ४ | ४ | १६ |
|---|---|---|
| ४ | ५ | १५ |
| ४ | ६ | १४ |
| ४ | ७ | १३ |
| ४ | ८ | १२ |
| ४ | ९ | ११ |
| ४ | १० | १० |
| ४ | ११ | ९ |
| ४ | १२ | ८ |
| ४ | १३ | ७ |
| ४ | १४ | ६ |
| ४ | १५ | ५ |
| ४ | १६ | ४ |

या पद्धतीने त्रिपाद-रचनेचे १३ प्रकार पडतात. तथापि थोडीफार आकडेमोड केली तर याच्या ६ पट (म्हणजे एकूण ७८ प्रकारची) रचना करता येते.

पहिला प्रकार :

यात पहिल्या दोन स्तंभाची आलटापालट करावी व शेवटचा स्तंभ तसाच कायम ठेवावा. त्यामुळे पुढील प्रकारचे कोष्टक तयार होईल :

| | | |
|---|---|---|
| ४ | ४ | १६ |
| ५ | ४ | १५ |
| ६ | ४ | १४ |
| ७ इ. | ४ इ. | १३ इ. |

दुसऱ्या प्रकारात शेवटचा स्तंभ मध्ये घ्यावा :

| | | |
|---|---|---|
| ४ | १६ | ४ |
| ४ | १५ | ५ |
| ४ | १४ | ६ |
| ४ इ. | १३ इ. | ७ इ. |

आणि तिसऱ्या प्रकारात दुसऱ्या प्रकारातील पहिल्या आणि तिसऱ्या स्तंभांची आलटा-पालट करावी :

| | | |
|---|---|---|
| ४ | १६ | ४ |
| ५ | १५ | ४ |
| ६ | १४ | ४ |
| ७ इ. | १३ इ. | ४ इ. |

चवथ्या व पाचव्या प्रकारात पहिल्या प्रकारातील शेवटचा स्तंभ प्रथम घ्यावा व नंतर उरलेल्या दोन स्तंभांची पुढीलप्रमाणे आलटापालट करावी.

चवथा प्रकार :

| | | |
|---|---|---|
| १६ | ४ | ४ |
| १५ | ४ | ५ |
| १४ | ४ | ६ |
| १३ इ. | ४ इ. | ७ इ. |

पाचवा प्रकार :

| | | |
|---|---|---|
| १६ | ४ | ४ |
| १५ | ५ | ४ |
| १४ | ६ | ४ |
| १३ इ. | ७ इ. | ४ इ. |

यापुढील पादांची अक्षरसंख्या २ या संख्येच्या वर्गाप्रमाणे वाढत जाते. ४ नंतर ८ ही संख्या येते व तीन पादांच्या अक्षरसंख्येची विभागणी ८+८+८ अशी करावी लागते. चतुष्पाद वृत्ताच्या प्रत्येक पादाची अक्षरसंख्या त्रिपाद वृत्तांतील विविध पद्धतीप्रमाणेच ठरविता येते.

ब्रह्मगुप्ताच्या वरील प्रबंधाचे फक्त एकच पान मला वाचायला मिळाले. त्यात गणितशास्त्राच्या महत्त्वपूर्ण तत्त्वांचे विवरण केले आहे, यात शंका नाही. ईश्वरकृपेने मला अधिक आयुष्य लाभले तर मी हे सर्व ज्ञान निश्चितपणे आत्मसात करीन.

# १४

# ज्योतिष–खगोलादी अन्य विज्ञानविषयक साहित्य

शास्त्रे अगणित आहेत. शास्त्रे उर्जितावस्थेत असतांना त्यांचे महत्त्व समाजाला पटवून दिल्यास व शास्त्रज्ञांना प्रोत्साहन दिल्यास शास्त्रांच्या संख्येत अधिक भर पडेल, यात शंका नाही. ही जबाबदारी पेलण्यास राज्यकर्तेच समर्थ असतात. त्यांनी विद्वानांच्या उदरनिर्वाहाच्या गरजा भागवून त्यांच्या दैनंदिन विवंचना नष्ट केल्यास विज्ञानाच्या विकासाला निश्चितपणे अधिक हातभार लागेल. तथापि सध्याच्या काळात मात्र असे होत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नवीन मूलभूत वैज्ञानिक संशोधन होणे अशक्य वाटते. आजची आपली शास्त्रे म्हणजे गतकालीन वैभवाचे विखुरलेले अवशेष होत.

विज्ञानाच्या विकासात प्रत्येक राष्ट्र आपापला वाटा उचलते, त्याप्रमाणे हिंदूंनीही आपला वाटा उचलला आहे. त्यांनी प्रतिपादिलेल्या ऋतुचक्रविषयक कल्पनेत विशेष असे काही नाही. वैज्ञानिक निरीक्षणाचीच ती फलनिष्पत्ती आहे. हिंदू धर्मातील अनेक बाबी खगोलशास्त्राशी निगडित असल्याने ते शास्त्र भारतात अत्यंत लोकप्रिय आहे. एखाद्या विद्वानाला खगोलशास्त्रज्ञ व्हावयाचे असल्यास त्यास केवळ खगोलशास्त्राच्या विविध शाखोपशाखांचे ज्ञान असूनच भागत नाही, तर त्याने ज्योतिषशास्त्राचे ज्ञानही संपादन करावयास हवे. ज्या ग्रंथाला मुसलमान लोक 'सिंदहिंद' असे म्हणतात, त्यास हिंदू लोक 'सिद्धान्त' असे म्हणतात. ('सिद्धान्त' या शब्दाचा अर्थ सरळ, वक्र नसलेला किंवा अपरिवर्तनीय असा आहे.) खगोलशास्त्रावरील सर्व प्रमाणग्रंथासाठी हीच संज्ञा वापरतात. आपल्याकडील 'झीज्' नामक गणिताधिष्ठित खगोलशास्त्रविषयक प्राथमिक स्वरूपाच्या पुस्तिकांइतकेही ज्यांचे महत्त्व नाही, अशा ग्रंथांचा समावेश ते 'सिद्धान्ता'तच करतात.

हे 'सिद्धान्त' पाच असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :–

१) लाटविरचित 'सूर्यसिद्धान्त'

२) विष्णुचंद्रकृत 'वसिष्ठ सिद्धांत'

३) 'पुलिश सिद्धांत' : 'सैंत्र' (मला वाटते, हे अलेक्झांड्रिया शहराचे नाव

असावे ) येथील ग्रीक पंडित ' पॉलिस ' याने रचलेला ग्रंथ.

४ ) श्रीशेणविरचित ' रोमक सिद्धांत ' :– रूम ( रोमन साम्राज्यातील प्रजा ) या शब्दावरून ' रोमक ' हा शब्द आला.

५ ) ' ब्रह्मसिद्धांत ' : मुलतान व अनहिलवार या दोहोंच्यामध्ये असलेल्या व अनहिलवारपासून १६ योजने दूर असलेल्या भिल्लमाल या स्थळी राहणाऱ्या ब्रह्मगुप्त नामक विष्णु–पुत्राने हा ग्रंथ लिहिला.

आदिपिता जो ब्रह्म, त्याच्यावरून ' पितामह ' असे नाव या शास्त्राविषयीच्या एका ग्रंथास पडले. या ग्रंथातील माहिती वरील सर्व ग्रंथांत घेतली आहे.

वराहमिहिराने ' पंचसिद्धांतिका ' नावाची एक खगोलशास्त्रविषयक पुस्तिका लिहिली आहे. तिच्या नावावरूनच तिच्यात उपरिनिर्दिष्ट पाच ग्रंथांचे सार आले असावे, असे वाटते. तथापि तसे या ग्रंथाचे स्वरूप नाही. शिवाय, या पाच ग्रंथांपैकी एखाद्या ग्रंथाची माहिती या ग्रंथात विशेष चांगल्या प्रकारे सांगितली आहे, असेही नाही. तेव्हा या ग्रंथाचे नाव कोणत्याही विशेष लक्षात घेण्याजोग्या गोष्टीचा निर्देश करीत नसून ' सिद्धान्त ' नामक ग्रंथाची संख्या पाच आहे, एवढे मात्र या ग्रंथनामावरून लक्षात येते !

ब्रह्मगुप्त म्हणतो, "सूर्य, इंदु, पुलिस, रोमक, वसिष्ठ आणि यवन इ. अनेक सिद्धांत आहेत. त्यांतील आशय जवळजवळ सारखाच आहे. या सिद्धान्तांचे सूक्ष्म अध्ययन केल्यास त्या सर्वांत कितीतरी साम्य आहे, ही गोष्ट सहज दृष्टोत्पत्तीस येईल."

पुलिस आणि ब्रह्मगुप्त यांच्या ग्रंथाशिवाय या विषयावरील इतर ग्रंथ मला अद्यापि उपलब्ध झाले नाहीत. उपलब्ध झालेल्या ग्रंथाच्या अनुवादाला मी प्रारंभ केला आहे. तथापि हे काम अजून पूर्ण झालेले नाही. ' ब्रह्मसिद्धान्ता 'तील माहिती पुढे देत आहे. ती वाचकांना उपयुक्त व उद्बोधक वाटेल.

' ब्रह्मसिद्धान्ता 'तील २४ प्रकरणांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :

१ ) आकाश–मंडला ( खगोल ) चे स्वरूप, स्वर्ग आणि पृथ्वी यांचा आकार.

२ ) ग्रहांचे भ्रमण, कालमापन ( म्हणजे वेगवेगळ्या अक्षांशांवरील व रेखांशांवरील ) वेळा शोधणे, दोन ग्रहांतील मध्यवर्ती स्थाने शोधून काढणे, वर्तुळाच्या परिघाची ज्या काढणे इ.

३ ) ग्रह–स्थाने निश्चित करणे.

४ ) छाया, दिवसाचा व्यतीत झालेला कालखंड इ.

५ ) सूर्यकिरणांपासून दूर गेल्यावर ग्रह दिसतात व सूर्यकिरण–व्याप्त प्रदेशात आल्यावर ते ' अदृश्य ' कसे होतात याविषयीची माहिती.

६ ) प्रथमेचा चंद्र

७ ) चंद्रग्रहण.
८ ) सूर्यग्रहण.
९ ) चंद्राची छाया.
१० ) ग्रहांची युती.
११ ) ग्रहांचे अक्षांश.
१२ ) खगोलशास्त्रविषयक ग्रंथातील माहितीची योग्यायोग्यता पारखण्यासाठी केलेली चिकित्सा.
१३ ) अंकगणित, सामान्य परिमाणे आणि तत्सम गोष्टींचा विचार.
१४ ) शास्त्रीय पद्धतीने ग्रहांमधील स्थाने निश्चित करणे.
१५ ) शास्त्रीय गणनेच्या साहाय्याने निश्चित केलेली गृहस्थाने.
१६ ) शास्त्रीय पद्धतीने सोडवलेली चवथ्या प्रकरणातील ३ गणिते.
१७ ) ग्रहणांची 'वक्रता, ' किंवा व्यावृत्ति. '
१८ ) नवीन पक्षातील चंद्र–दर्शन आणि त्याविषयी केलेली शास्त्रीय विचिकित्सा.
१९ ) ' कुट्टक ' ( म्हणजे एकादी वस्तु कुटणे. गळिताची धान्ये इ. कुटून त्यातून तेल काढण्याच्या प्रक्रियेची तुलना येथे शास्त्रीय संशोधनाशी केली आहे. ) या प्रकरणात बीजगणित व अंकगणित याविषयी महत्त्वाचे विवेचन केले आहे.
२० ) छाया.
२१ ) ( काव्यातील ) वृत्त व छंद याविषयी विवेचन.
२२ ) कालचक्र ( ऋतुचक्र ) त्याच्या अवलोकनाची साधने इ.
२३ ) काल व कालमापनाची ४ साधने : सौर, चांद्र इ. कालमापनपद्धती.
२४ ) एतद्विषयक छंदोबद्ध ग्रंथातील गणना–पद्धतीविषयी विवेचन.

वरीलप्रमाणे आपल्या २४ प्रकरणांची यादी त्याने दिली असली तरी ' ध्यान-ग्रह-अध्याय ' नामक आणखी एक ( पंचविसावे ) प्रकरणही या ग्रंथात आढळते. त्यात लेखकाने गणितशास्त्राच्या ऐवजी तर्काने या शास्त्रातील काही प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. यात प्रतिपादिलेली मते गणितशास्त्राच्या निकषांच्या साहाय्याने पारखून घेतल्यास ती बरोबर आहेत असे वाटत नाही आणि म्हणूनच त्यांचा समावेश मी या ग्रंथाच्या पंचविसाव्या प्रकरणाचा वरील यादीत केला नाही. हे विवेचन ' Ratio Metaphysica ' पद्धतीचे असावे असे मला वाटते. एरवी गणिताशिवाय या शास्त्रातील कुठलाही प्रश्न सुटणे कसे शक्य आहे ! याशिवाय या विषयावर इतर ग्रंथही उपलब्ध आहेत. जी पुस्तके ' सिद्धान्ता 'इतकी महत्त्वाची नाहीत त्यांना तंत्र किंवा ' करण ' असे म्हणतात. ' तंत्र ' या शब्दाचा अर्थ ' प्रशासकाची अधिसत्ता ' असा असून ' करण ' या शब्दाचा अर्थ ' अनुकरण करणे ' असा आहे. यात उल्लेखिलेले ' प्रशासक ' म्हणजे ' आचार्य ' किंवा ' ऋषी ' होय.

भानुयशस्च्या ' रसायनतंत्रा 'शिवाय आणखी दोन ग्रंथ आहेत. पहिल्याचा कर्ता आर्यभट हा असून दुसऱ्याचा बलभद्र आहे. ' रसायना 'विषयी स्वतंत्र प्रकरणात विचार करू.

' करण–खंड खाद्यका ' प्रमाणेच ब्रह्मगुप्ताच्या नावावर एक आणखी करण ग्रंथही आढळतो. ' खाद्यक ' म्हणजे एक प्रकारची मिठाई. ' करण–खंड खाद्यक ' हे नाव का दिले, त्याविषयी मला पुढील कारण सांगण्यात आले.

सुग्रीव नाम एका बौद्धाने 'दधि-सागर' (अर्थ : आंबट दुधाचा सागर) नावाची खगोलशास्त्राविषयी पुस्तिका लिहिली. त्याच्या एका शिष्याने याच विषयावर ' कूर–बबया' ( अर्थ : भाताचा पर्वत ) नावाचे एक पुस्तक लिहिले. त्यानंतर त्याने ' लवण–मुष्टि ' ( अर्थ : मूठभर मीठ ) नावाचे एक पुस्तक लिहिले. म्हणून आपल्या ग्रंथास 'खाद्यक' म्हणजे ' मिठाई ' किंवा पक्कान्न असे नाव दिले. ' खाद्यक ' या शब्दात दही, भात, मीठ या सर्वच पदार्थांचा समावेश झाला. आपल्या ग्रंथात या विषयासंबंधीची सर्व माहिती समाविष्ट केली आहे, असे त्यास या शीर्षकातून सुचवायचे आहे असे दिसते.

' करण–खंड खाद्यक ' या ग्रंथात आर्यभटाच्या विचारांचेच प्रतिपादन केलेले असल्याने ब्रह्मगुप्ताने ' खंड-खाद्यक 'च्या स्पष्टीकरणार्थ ' उत्तर-खंड-खाद्यक ' नावाचा एक ग्रंथ लिहिला. यानंतर या विषयावर ' खंड-खाद्यक-टीपा ' नावाचा आणखी एक ग्रंथ आढळतो. पण तो ब्रह्मगुप्ताने लिहिला की कुणा अन्य ग्रंथकाराने लिहिला हे ठामपणे सांगता येत नाही. ' खंड–खाद्यका 'तील गणनांचे स्वरूप व त्यांची कारणमीमांसा या ग्रंथात केली आहे. या ग्रंथाचा कर्ता बलभद्र हा असावा असे वाटते.

बनारस येथील विजयनंदिन नामक भाष्यकारानेही ' करणतिलक ' नामक खगोलशास्त्रविषयक पुस्तिका लिहिल्याचे आढळते. नागरपूर येथील भदत्त (की मिहदत्त ?) याचा पुत्र विचेश्वर याने ' करण–सार ' नावाचा एक ग्रंथ लिहिला. भानुयशस् पंडिताने रचिलेल्या ' करण–परतिलक ' नावाच्या ग्रंथात ताऱ्यांच्या स्थानांविषयी माहिती दिली आहे, असे मला सांगण्यात आले.

याशिवाय या विषयावर काश्मिरी पंडित उत्पल याचा ' राहुनूर करण ' (?) हा ग्रंथ तसेच या विषयावरील ' करण-पात' आणि ' करण–चूडामणि ' इ. या इतर ग्रंथही उपलब्ध आहेत. ' करण–चूडामणि 'च्या लेखकाचे नाव मला कळले नाही.

याच विषयाचे विवेचन करणारे काही इतर ग्रंथ ' मानस ' हा मनुविरचित ग्रंथराज आणि उत्पलाचे त्यावरील भाष्य, दक्षिणेकडील पंडित पंचल (?) याने केलेला ' मानसा 'चा संक्षेप, आर्यभटाची ' दशगीतिका ', आर्यभटकृत ' आर्याष्टशतं ', ' लोकानंद ', ब्राह्मणभट्टीलाचा ' भट्टीला ' (?) इत्यादी या विषयासंबंधीचे कितीतरी ग्रंथ येथे आढळतात.

पुढील लेखकांनी ज्योतिषशास्त्रावर ' संहिता ' लिहिल्या आहेत :

| | |
|---|---|
| माण्डव्य | बलभद्र |
| पराशर | दिव्यतत्त्व |
| गर्ग | वराहमिहिर |
| ब्राह्मण | |

'संहिता' या शब्दाचा अर्थ 'मिळविलेले, जमा केलेले किंवा संगृहीत' (साहित्य) असा असून त्यात पुढे दिल्याप्रमाणे विविध प्रकारची माहिती आढळते. हवामानाच्या अवलोकनाच्या आधारे प्रवासविषयक सूचना, विविध राज्यकर्त्यांच्या कारकीर्दीचे भविष्य, शुभ–अशुभ वस्तूंविषयी माहिती, हस्तरेषांवरून केलेले भविष्य–कथन, स्वप्नांचे स्पष्टीकरण, पक्ष्यांच्या ध्वनीवरून किंवा उड्डाणावरून केलेली भाकिते किंवा शकुन-विषयक विवरण इ. इ. हिंदू पंडित या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवतात. आपल्या 'संहिता'त हवामानशास्त्र व विश्वोत्पत्तिशास्त्र या दोन शास्त्रांचाही समावेश करण्याची प्रथा येथील खगोलशास्त्रात आढळते.

विश्वाच्या उत्पत्तीविषयी पुढील विद्वानांनी जातक–ग्रंथ लिहिले आहे :–

| | | |
|---|---|---|
| पराशर | () | जीवशर्मन् |
| सत्य | () | माउ (ग्रीक) |
| मणित्थ | () | |

वराहमिहिराने एक लहान व दुसरा मोठा असे दोन जातक ग्रंथ लिहिले आहेत. यांपैकी पहिल्या ग्रंथाचा अनुवाद मी अरबी भाषेत केला असून दुसऱ्यावर बलभद्राने भाष्य लिहिले आहे. याशिवाय 'वझीदज्' (फार्सी 'गुजीदा'?) सारखा 'सारावली' नावाचा ज्योतिषशास्त्रावरील एक अत्यंत महत्त्वाचा उत्पत्तिविषयक ग्रंथ कल्याणवर्मन् याने लिहिला. या श्रेष्ठ शास्त्रीय कृतीबद्दल त्यास या क्षेत्रात अत्यंत मानाचे स्थान दिले जाते. तथापि यापेक्षाही मोठा आणि सर्व ज्योतिषशास्त्रीय तत्त्वप्रणालींचे सविस्तर विवेचन करणारा असा एक ग्रंथ आढळतो. त्याचे नाव आहे 'यवन'.

'शतपंचाशिका,' 'होरा–पंचहोत्रीय (?)' इ. वराहमिहिरविरचित अनेक लहान लहान पुस्तकांचाही येथे उल्लेख करावयास हवा.

'योगयात्रा' व 'तिकणी (?) यात्रा' या ग्रंथात प्रवासाविषयी, 'विवाह–पटल' या ग्रंथात विवाहाविषयी आणि आणखी एका ग्रंथात शिल्पाविषयी चर्चा केली आहे.

'श्रुधव' (श्रोतव्य ?) या ग्रंथात पक्ष्यांच्या उड्डाणावरून किंवा त्यांच्या ध्वनींवरून तसेच पुस्तकात सुई टोचून शकुन वर्तविण्याच्या कलेविषयी माहिती दिली आहे. या पुस्तकाच्या तीन वेगवेगळ्या प्रती आहेत व त्याचे लेखक अनुक्रमे महादेव, विमल-बुद्धी आणि बंगाल हे आहेत. तांबडे झगे घालणाऱ्या अनुयायांच्या शामानियनांचा पंथप्रवर्तक बुद्ध याने अज्ञात गोष्टींविषयी माहिती देणारा 'गूढामन' (?) नामक ग्रंथ लिहिला. उत्पलानेही 'प्रश्न–गूढामन' नावाचा याच शास्त्रावरील ग्रंथ लिहिला.

पुढे दिलेल्या हिंदू विद्वानांची केवळ नावेच उपलब्ध होतात. त्यांच्या ग्रंथांची नावे उपलब्ध होत नाहीत :–

| | |
|---|---|
| १ ) प्रद्युम्न | ५ ) सारस्वत |
| २ ) संगहिल ( शृंखल ? ) | ६ ) पीरूवान ( ? ) |
| ३ ) दिवाकर | ७ ) देवकीर्ति |
| ४ ) परेश्वर | ८ ) प्रिथुदक-स्वामिन् |

हिंदूंनी वैद्यकाविषयीही लेखन केले आहे. ते वैद्यकाचा अंतर्भाव खगोलशास्त्रासारख्या विज्ञान-शाखेतच करतात. खगोलशास्त्र आणि हिंदू धर्मतत्त्वे यांचा अत्यंत निकटचा संबंध असल्याचे प्रत्ययाला येते. तसे वैद्यकाचे नाही. वैद्यकावर चरक नामक पंडिताने लिहिलेला ग्रंथ सर्वोत्कृष्ट आहे, असे ते मानतात. चरकाचे पूर्वीचे नाव अग्निवेश असे असून तो द्वापारयुगातील एक ऋषि होता. 'चरक' या शब्दाचा अर्थ 'अत्यंत बुद्धिमान' असा आहे.

चरकापूर्वी काही ऋषींनी–सूत्राच्या पुत्रांनी–वैद्यकशास्त्राच्या मूलतत्त्वांविषयी विवेचन केले होते. प्रजापतीकडून म्हणजे ब्रम्हाकडून अविश्वनास, अविश्वनाकडून इंद्रास व इंद्राकडून या ऋषींना हे प्राथमिक ज्ञान मिळाले. बर्मेसाइडस ( Bermecides ) घराण्यातील राजांसाठी या ग्रंथाचा अरबी भाषेत अनुवाद केला आहे.

साहित्याच्या व विज्ञानाच्या असंख्य शाखांचा विस्तार हिंदुस्थानात झाला असून त्याविषयी कितीतरी ग्रंथही हिंदूंनी लिहिले आहेत. माझ्या मर्यादित ज्ञानामुळे मी त्यांचे सार काढू शकलो नाही. आपल्याकडील 'कलील' आणि 'दिमन्' या नावाने प्रसिद्ध असलेल्या 'पंचतंत्र' या ग्रंथाचा अनुवाद करावा अशी तीव्र इच्छा माझ्या मनात आहे. हा ग्रंथ हिंदी, फार्सी व अरबी अशा अनेक भाषांत अनुवादिला गेला असल्याने, अनुवादित झालेला सर्वच मजकूर अगदी मुळाबरहुकूम आहे, असे म्हणता येणार नाही. उदा. ज्यांची धार्मिक श्रद्धा अढळ नाही त्यांच्या मनात स्वधर्माविषयी काही शंका निर्माण करून, आपल्याला अभिप्रेत असलेली धर्मतत्त्वे इतरांच्या मनात रुजविण्यासाठी अब्दल्ला इब्न अल्मुकफ-फा याने या ग्रंथांचा अरबी भाषेत अनुवाद करताना 'बर्झाया' ( Berzaya ) विषयीचे एक प्रकरण समाविष्ट केले आहे. ज्या अर्थी त्याने मूळ ग्रंथात नसलेल्या माहितीची भर घातली, त्या अर्थी त्याचा हा अनुवाद आणि आणि त्याची अनुवादकाची भूमिका ही संशयातीत नाही, असे म्हणता येणार नाही.

## १५

# मापन-पद्धती

गणना करण्याची प्रवृत्ती ही मानवाची एक अत्यंत मूलभूत आणि नैसर्गिक प्रवृत्ती आहे. एखाद्या वस्तूचे स्वरूप समजण्यासाठी, ती किती आहे व केवढी आहे हे लक्षात येण्यासाठी, तिची तुलना तिच्याच जातीच्या वा तिच्याच वर्गातील इतर वस्तूंशी करतात. यातूनच त्या वस्तूचे स्वरूप निश्चित करणाऱ्या परिमाणाची कल्पना उगम पावते. मग विशिष्ट वस्तू वा वस्तुसमुच्चय आणि परिमाण यातील फरकही आपल्य लक्षात येऊ लागतो.

एखाद्या जड वस्तूची घनता किती आहे हे पाहण्यासाठी लोक तिचे वजन करतात. तराजूच्या आडव्या दांड्याशी तराजूचा काटा काटकोनात आला (त्या दोहोमध्ये ९०°चा कोन झाला), की तराजूतील वस्तूचे वजन त्याच्या (दुसऱ्या पारड्यात टाकलेल्या) परिमाणाइतके आहे, हे सिद्ध होते. अशा प्रकारे त्या वस्तूचे वजन आपल्याला कळते. भारतात नाण्यांचे वजन करून त्यांचे मूल्य ठरविण्याऐवजी त्यांच्या संख्येवरून त्यांचे मूल्य ठरविण्याची प्रथा असल्याने हिंदूंना तराजूची आवश्यकता त्या मानाने कमी प्रमाणात भासते. हिंदू लोक सोने किंवा सोन्याचे दागिने यांचे वजन करतात तथापि (सोन्याच्या) नाण्यांचे– 'फुलूस'चे– वजन करीत नाहीत. आपण 'मिथकाल' या सोने मोजण्याच्या परिमाणाचा जसा सर्रास उपयोग करतो, तसाच ते 'तोळा' हे हे परिमाण वापरतात. त्यांचे 'तोळा' हे परिमाण आपल्याकडील ३ दिराम इतके असते. वज़न करण्यासाठी लागणाऱ्या तोळा व तत्सम इतर परिमाणांचे कोष्टक असे मांडता येईल :–

१ तोळा = २ १/१० मिथकाल (आपल्याकडील परिमाण)
१२ 'माश' (मासे) = १ तोळा
१६ 'माश' (मासे) = १ सुवर्ण
१ 'माश' (मासे) = ४ अंडी (एरंड) किंवा गौर नावाच्या झाडाच्या बिया
१ 'अंडी' = ४ यव

१ 'यव' = ४ कला
१ 'कला' = ४ पाद
१ 'पाद' = ४ मद्री (?)

ह्या कोष्टकाची पुनर्रचना करून ते पुढीलप्रमाणे मांडता येईल:– १ सुवर्ण = १६ माश (मासे) = ६४ अंडी = २५६ यव = १६०० कला = ६४०० पाद = २५,६०० मद्री (?)

सहा 'माश' (मासे) मिळून एक 'द्रंक्षण' होते. 'द्रंक्षण' या परिमाणाविषयी तुम्ही त्यांना स्पष्टीकरण विचारल्यास १ मिथकाल = २ द्रंक्षण असे समीकरण ते सांगतात. तथापि हे समीकरण सदोष आहे. कारण द्रंक्षण व मिथकाल यातील प्रमाण २० : २१ असे आहे. (१ मिथकाल=५ ५/७ माश (मासे). तेव्हा १ द्रंक्षण=१ १/२० मिथकाल हेच कोष्टक बरोबर आहे. द्रंक्षण आणि मिथकाल यांच्याविषयी ज्यांनी वर माहिती दिल्याचा उल्लेख केला आहे, त्या लोकांच्या मनांत या दोन्ही परिमाणांत फारसा भेद नसल्याची (चुकीची) कल्पना आहे, असे दिसते. याच समजुतीच्या आधारे त्यांनी केवळ द्रंक्षणाऐवजी द्रंक्षण या परिमाणाची दुप्पट करून तिचे व 'मिथकाल' या परिमाणाचे नाते चटकन् जोडून टाकले, इतकेच. त्यामुळे त्यांनी केलेली दोन्ही परिमाणांची तुलना मात्र पूर्णपणे सदोष ठरली.

वस्तुत: परिमाण ही कांही एखादी नैसर्गिक गोष्ट नाही. मानवाने आपल्या कल्पनाशक्तीच्या साहाय्याने समाजव्यवहार सुकर व्हावेत यासाठी परिमाणांची निर्मिती केली. त्यावर समाजमान्यतेचा शिक्कामोर्तब झाल्यावर विविध परिमाणे प्रमाणभूत मानण्याची प्रथा समाजात रूढ झाली. एकाच वेळी वेगवेगळ्या प्रदेशांत वेगवेगळी परिमाणे असतात, त्याचप्रमाणे वेगवेगळया काळी एकाच देशात वेगवेगळी परिमाणे रूढ असल्याचेही प्रत्ययास येते. स्थल–काल–भाषा–परत्वे त्यांची नावे व त्यांचे आकार प्रकारही बदलत जातात. सोमनाथच्या परिसरातील एका गृहस्थाला मी भेटलो. त्याने भारतात आपल्या 'मिथकाल' या परिमाणासारखे व एक परिमाण असल्याचे मला सांगितले. त्याने सांगितलेली परिमाणे अशी :–

१ मिथकाल = ८ रूत्तु
१ रूत्तु = २ पाली
१ पाली = १६ यव (एक प्रकारचे धान्य)

तदनुसार, १ मिथकाल = ८ रूत्तु = १६ पाली = २५६ यव.

यावरूनही आपले 'मिथकाल' हे परिमाण व भारतातील तत्सदृश परिमाण यात या गृहस्थाने घोटाळा केला आहे, हे लक्षात येते. ज्या परिमाणास तो 'मिथकाल' असे नाव देतो. वास्तविक ते परिमाण 'तोळा' हेच आहे आणि 'माश' (मासा) या परिमाणालाच तो 'रूत्तु' असे म्हणतो, असे दिसते.

हिंदूंनी विविध सूक्ष्मातिसूक्ष्म परिमाणांच्या संदर्भात बराच विचार केला आहे असे दिसते. वराहमिहिराने प्रतिमा किंवा मूर्ती तयार करण्यासाठी जी परिमाणे लागतात त्यांची माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे :–

१ रेणु ( धूलिकण ) = १ रज
८ रज = वालाग्र = [ केसाचे टोक )
८ वालाग्र १ लिख्या ( ऊचे अंडे )
८ लिख्या = १ यूका ( ऊ )
८ यूका = १ यव ( एक प्रकारचे धान्य )

वराहमिहिराने अंतर मोजण्याची परिमाणेही सांगितली आहेत. यापूर्वी वजनाची जी परिमाणे सांगितली आहेत तीच वराहमिहिरानेही निर्देशिली आहेत:–

४ यव = १ अंडी
४ अंडी = १ माश ( मासा )
१६ माश = १ सुवर्ण
४ सुवर्ण = १ पल

वाळलेल्या पदार्थांसाठी पुढील परिमाणे वापरतात:–

४ पल = १ कुडव
४ कुडव = १ प्रस्थ
४ प्रस्थ = १ अढक ( आधक )

आणि द्रव पदार्थांसाठी पुढील परिमाणे आहेत:-

८ पल = १ कुडव
८ कुडव = १ प्रस्थ
४ प्रस्थ = १ अढक ( आधक )
४ अढक ( आधक ) = १ द्रोण

'चरक' नामक ग्रंथात पुढील वजनांचा निर्देश केला आहे. याविषयी मला प्रत्यक्ष ( कुणाच्याही तोंडून ) माहिती ऐकावयास मिळालेली नाही. म्हणून हा भाग मी या ग्रंथाच्या अरबी भाषांतरावरून उद्धृत करीत आहे. सध्या प्रतलेखन करताना जी दक्षता घ्यायला हवी ती घेतली जात नसल्याने ही माहिती सदोष असण्याची शक्यता आहे.

आत्रेय म्हणतो,

| | |
|---|---|
| ६ धूलिकण | = १ मरीचि |
| ६ मरीचि | = १ राजिका |
| ८ राजिका | = १ तांबडा तांदूळ |
| २ तांबडे तांदूळ | = १ वाटाणा |

| | | |
|---|---|---|
| | २ वाटाणे | = १ अंडी |
| शिवाय, | १ अंडी | = १/८ दानक |
| | ७ दानक | = १ दिरम |
| | ४ अंडी | = १ माश |
| | ८ माश | = १ कण (?) |
| | २ कण (?) | = १ कर्ष, सुवर्ण ( दोन दिराम वजनाचे ) |
| | ४ सुवर्ण | = १ पल |
| | ४ पल | = १ कुडव |
| | ४ कुडव | = १ प्रस्थ |
| | ४ प्रस्थ | = १ अधक |
| | ४ अधक | = १ द्रोण |
| | २ द्रोण | = १ शूर्प |
| | ४ शूर्प | = १ जना (?) |

हिंदू लोक व्यवहार करताना अनेकदा 'पल' हे वजन वापरतात. काही जण १ पल = १/१५ मण असे मानतात तर काही जण १ पल म्हणजे १४ मिथकाल होत, असे मानतात. तथापि १ मण हा २१० मिथकाल इतका नसतो. काही जण १६ मिथकाल म्हणजे १ पल असे मानतात तथापि तेही बरोबर नाही. कारण १ मण हा २४० मिथकालइतका नसतो. शिवाय काही जण १५ दिरहम् म्हणजे १ पल असे मानतात तथापि १ मण = २५ दिरहम् इतका नसल्याने हेही समीकरण स्वीकारता येत नाही. खरे पाहिले तर पल आणि मण यातील परस्पर संबंधच यापेक्षा वेगळ्या स्वरूपाचा आहे.

त्यानंतर आत्रेयाने १ अधक = ६४ पल = १ दिरहम् = १ रतल असे कोष्टक दिले आहे. तथापि १ अंडी हे परिमाण दानकाइतके आहे असे मानल्यास १ सुवर्ण=६४ अंडी आणि १ दिरहम्=३२ अंडी असल्याचे मानावे लागले आणि त्यात विसंगती जाणवते. वेगवेगळ्या सिद्धान्तांचे काळजीपूर्वक परीक्षण न करता त्यांची एक-मेकाशी चुकीची तुलना केल्यामुळे असा असा प्रकार होणे अगदी स्वाभाविक आहे.

१ सुवर्ण हा ( आपल्याकडील ) ३ दिरहम् इतका असतो ही गोष्ट येथे सर्वमान्य असल्याचे आढळते. तसेच त्यासंबंधीची पुढील परिमाणांची समीकरणेही ते मान्य करतात :-

१ सुवर्ण = १/४ पल
१ पल = १२ दिरहम्
१ पल = १/१५ मण
१ मण = १८० दिरहम्

यावरून, १ सुवर्ण म्हणजे ( आपल्याकडील ) ३ दिरहम् नसून ३ मिथकाल असावेत, असे मला वाटू लागले आहे.

वराहमिहिर आपल्या संहितेत एके ठिकाणी म्हणतो, एक 'वार'.उंचीचे व तेवढ्याच व्यासाचे वजन २०० दिरहम् किंवा १ अधक या परिमाणाइतके असते. तथापि हे विधान केवळ अंदाजाने केलेले असावे, असे वाटते. कारण यापूर्वीचे विवेचन लक्षात घेता १ अधक = (त्यांच्या मतानुसार) ७६८ दिरहम्, (किंवा माझ्या मतानुसार) ७६८ मिथकल होय.

वराहमिहिराच्या मताच्याच आधारे श्रीपालाने या परिमाणांचे पुढील कोष्टक दिले आहे :–

५० पल = २५६ दिरहम् = १ अधक

तथापि येथे श्रीपाल पंडिताची चूक झाली आहे. येथे त्याने २५६ दिरहम्ऐवजी २५६ सुवर्ण असे म्हणावयास हवे होते. त्याचप्रमाणे १ अधक हा ५० पलांइतका नसून ६४ पलांइतका असतो, हे त्याने लक्षात घेतलेले दिसत नाही.

जीवशर्मन् यास पुढील परिमाणांचे कोष्टक मान्य असल्याचे मला येथील लोकांनी सांगितले :–

| | | |
|---|---|---|
| ४ पल | = | १ कुडव |
| ४ कुडव | = | १ प्रस्थ |
| ४ प्रस्थ | = | १ अधक |
| ४ अधक | = | १ द्रोण |
| २० द्रोण | = | १ खारी |

'सोळा माश (मासे) म्हणजे एक सुवर्ण' हे कोष्टक वाचकांना माहीतच आहे. तथापि गव्हासारख्या धान्याचे वजन करताना मात्र ते

४ सुवर्ण = १ पल

आणि द्रव पदार्थांचे वजन करताना

८ सुवर्ण = १ पल

असे परिवर्तन या परिमाणात करतात.

हिंदू लोक जे तराजू वापरतात, त्यातील तागड्या विशिष्ट रेषेच्या पुढे किंवा मागे सरकतात. यासाठीच ते तराजूस 'तुला' असे म्हणतात. तराजूच्या दांडीवरील पहिल्या काही खुणा १ ते ५ पर्यंतच्या वजनांच्या निदर्शक होत. नंतरच्या काही रेषा १० पर्यंत व त्यानंतरच्या रेषा २०, ३० इ. दशकांच्या निदर्शक होत. या परिमाण-पद्धतीतील रेषांचा इतिहास सांगताना ते पुढील आख्यायिका सांगतात. शिशुपाल-वधापूर्वी वासुदेव म्हणतो,

"शिशुपालाने कुठलाही अपराध केला नसल्यास मी त्याला शिक्षा करणार नाही.

त्याचे दहा अपराध मी क्षम्य मानीन. तथापि त्यानंतर मात्र त्यास अवश्य शिक्षा करीन.”

याविषयी सविस्तर कथा मी कधीतरी सवडीअंती सांगीनच.

अल्फझारीने आपल्या खगोलशास्त्रावरील पुस्तकात ‘पल’ हा शब्द दिवसाचा ६० वा भाग या अर्थाने वापरला आहे. तथापि या अर्थाने हा शब्द हिंदूंच्या ग्रंथात वापरल्याचे मला आढळले नाही. गणितातील ‘शुद्धि’ दाखविण्यासाठी मात्र ते हा शब्द वापरतात.

सिंधविजयविषयक ग्रंथात ‘भार’ नामक परिमाणाचाही निर्देश आढळतो. ‘भार’ हे परिमाण २००० पळांइतके असल्याचे ते मानतात. याचे स्पष्टीकरण ते १००×२० पळ अशा प्रकारे गुणाकार करून देतात हे वजन जवळ जवळ एका बैलाच्या वजनाइतके असते.

येथवर मी हिंदूंच्या वजन करण्याच्या पद्धतीविषयी व परिमाणाविषयी माहिती दिली. याशिवाय हिंदूंची आणखी काही परिमाणे आहेत. त्यांच्याविषयी पुढे माहिती देत आहे.

काही वस्तू एका विशिष्ट पात्रात भरून त्यांची संख्या वा आकारमान ठरविण्याची पद्धतीही भारतात प्रचलित आहे. या वस्तू मोजण्यासाठी निश्चित केलेले पात्र हेच त्याचे माप होय. एकाच आकारप्रकाराचे धान्य वा वस्तू एकाच पात्राने दोनदा मोजल्यास त्या दोन्ही ढिगांत (आकारदृष्ट्या) समानता असते, हे मान्य करावयास हवे. एकाच परिमाणाने मोजलेल्या एकाच प्रकारच्या दोन वस्तूंचे वजन व माप कदाचित सारखे असते. तथापि दोन वेगवेगळ्या वस्तू एकाच परिमाणाने मोजल्यास त्याचे वजन व माप सारखेच भरते असे मात्र म्हणता येत नाही.

भारतात ब्रीसी (सिब्री ?) नावाचे एक परिमाणही प्रचलित आहे. कनोज आणि सोमनाथ येथे या परिमाणाचा विशेष प्रकार असल्याचे आढळले. कनोज येथील लोकांनी मला या परिमाणाविषयी पुढील माहिती सांगितली :—

४ ब्रीसी = १ प्रस्थ

$\frac{1}{4}$ ब्रीसी = १ कुडव

तथापि सोमनाथ येथील लोकांनी याविषयी पुढील माहिती दिली :—

१६ ब्रीसी = १ पंती

१२ पंती = १ मोर

याशिवाय इतर काही जणांनी याविषयी पुढील माहिती दिली :—

१२ ब्रीसी = १ कलसी

$\frac{1}{4}$ ब्रीसी = १ मान

तसेच १ ब्रीसी = २० मना असल्याचेही काही जणांनी मला सांगितले. ख्वारिज्मियन

लोकांच्या ‘ सुख्ख ’ या परिमाणाइतके हिंदूंच्या ‘ व्रीसी ’ हे परिमाणाइतके व ‘ धुर ’ हे परिमाण हिंदूंच्या ‘ कलसी ’ या परिमाणाइतके असावे, असे वाटते. ( १ धुर = १२ सुख्ख )

याशिवाय भारतात अंतर मोजण्याची परिमाणेही प्रचलित आहेत. वस्तुतः एकाद्या वस्तूचा नितळ पृष्ठभाग मोजण्यासाठी नितळ पृष्ठभागाचेच एकादे परिमाण वापरायला हवे. रेषांच्या साहाय्यानेही हा पृष्ठभाग मोजता येतो. अशा प्रकारचे अंतर मोजण्यासाठी वराहमिहिराने पुढील परिमाणे सांगितली आहेत.

| | |
|---|---|
| ८ जवाचे दाणे ( एका पुढे एक मांडून ठेवलेले ) | = १ अंगुल |
| ४ अंगुले | = १ राम (?) |
| २४ अंगुले | = १ हष्ठ, दस्त ( यार्ड ) |
| ४ हष्ठ | = १ धनु |
| ४० धनु | = १ नल्व |
| २५ नल्व | = १ क्रोश |

यावरून १ क्रोह ( क्रोश ) = ४०००० यार्ड असे सिद्ध होते. पुलिसानेही हेच कोष्टक मान्य केले आहे. दोन मिवया किंवा २४ अंगुळे हे अंतर १ यार्डाइतके असते.

हिंदूंनी माणसाची उंची इ. मोजण्याच्या वेगवेगळ्या परिमाणांनाही वेगवेगळी नावे दिली आहेत. अंगठ्याचे टोक आणि करंगळीचे टोक ताणल्यावर त्या दोन्ही टोकांत जे अंतर असते, त्याला ‘ वितस्ती ’ किंवा ‘ किश्कु ’ असे म्हणतात. अंगठा व करंगळीजवळील बोट ही दोन्ही ताणल्यावर त्याच्या टोकांमध्ये जे अंतर असते, त्याला ते ‘ गोकर्ण ’ असे म्हणतात. अंगठ्याचे टोक व पहिले बोट यातील अंतरास ‘ करम ’ तसेच अंगठ्याचे टोक व मधल्या बोटाचे टोक यातील अंतरास ‘ ताल ’ अशा संज्ञा वापरतात. माणसाची उंची त्याच्या तालाच्या आठ पट असते, अशी हिंदू लोकांची समजूत आहे. त्याप्रमाणे, पायाची लांबी अशी त्या पुरुषाच्या उंचीच्या $\frac{?}{c}$ इतकी असते, असेही ते मानातत.

प्रतिमा किंवा मूर्ती यांच्या निर्मितीविषयी ‘ संहिते ’त पुढील माहिती दिली आहे.

मूर्तीच्या तळहाताची रुंदी ६ असावी व त्याची लांबी ७ असावी. मधल्या व चवथ्या बोटाची लांबी ५, तर्जनीची लांबी ४$\frac{१}{२}$, करंगळीची व अंगठ्याची लांबी ३$\frac{३}{४}$ इतकी असावी. येथे अंगठा व करंगळी यांची लांबी सारखीच असल्याचे मानले आहे. तसेच यातील आकडे मूर्तीच्या अंगुळाच्या मापांचे निदर्शक असावेत, असे वाटते.

हिंदूंचे ‘ क्रोश ’ ( कोस ) हे परिमाण आपल्या ‘ मैला ’ इतके आहे. अंतर

मोजण्यासाठी ते ' योजन ' नावाचे आणखी एक परिमाण वापरतात. १ योजन म्हणजे ८ मैल किंवा ४२००० यार्ड होत. यावरून १ क्रोश म्हणजे ' फर्सख ' ( अंतर मोजण्याचे परिमाण ) असावे असे काही जणांना वाटण्याची शक्यता आहे व त्याच्या आधारे हिंदूंचे ' फर्सख ' १६००० यार्ड इतक्या लांबीचे असावेत असेही पुढे ते अनुमान करतील. तथापि हे चूक आहे. उलट १ क्रोश हा अर्ध्या योजनाइतकाच असतो. ' योजन ' या परिमाणाच्या साहाय्याने अल्फजारीने पृथ्वीच्या परिघाची लांबी मोजली आहे. योजनांना तो ' जुन ' असे म्हणतो व तो शब्द अनेकवचनार्थी वापरताना तो त्याचे रूपान्तर ' अजवान ' असे करतो.

' वर्तुळाचा परीघ हा त्याच्या व्यासाच्या तिप्पट असतो ' या नियमाच्या आधारे हिंदूंनी काही गणना–पद्धती निश्चित केल्या आहेत. सूर्य–चंद्रांचे व्यास किती योजने लांबीचे आहेत, हे सांगून मत्स्यपुराणाच्या कर्त्याने हाच निष्कर्ष काढला आहे. तसेच, आदित्यपुराणात द्वीपांची रुंदी किती योजने आहे हे सांगितल्यावर त्याच्या आधारे आदित्यपुराणाच्या कर्त्याने वरील नियमच सिद्ध केला आहे. वायुपुराणातही अशाच प्रकारचा उल्लेख आढळतो. त्यानंतरच्या काळात मात्र तीन पूर्णांकानंतरच्या अपूर्णांकाचा शोध हिंदूंना लागला आहे असे दिसते. कारण पुढे ब्रह्मगुप्ताने

' वर्तुळाचा परीघ = $३\frac{१}{६}$ व्यास '

असा नियम आपल्या ग्रंथात सांगितला आहे. ही संख्या आपण कशी शोधून काढली, याविषयी त्याने आपली स्वतःचीच एक पद्धती सांगितली आहे. याविषयी तो म्हणतो, १० यासंख्येचे वर्गमूळ सुमारे $३\frac{१}{६}$ इतके येते. त्यामुळे व्यास व परीघ यातील संबंध हा १ ही संख्या व १० या संख्येच्या वर्गमूळ यांच्यामधील संबंधाप्रमाणेच आहे. त्यानंतर तो व्यासाला व्यासानेच गुणतो. या गुणाकाराने जी संख्या येते, तिला तो १० या संख्येने गुणतो आणि मग तो अशा प्रकारे आलेल्या संख्येचे वर्गमूळ काढतो अशा पद्धतीने परीघाचे अंतर पूर्णांकात मांडता येते. वस्तुतः या गुणाकारांनी मूळ संख्येतील अपूर्णांक ( तो मूळात आहे त्यापेक्षा कितीतरी ) अधिक मोठा करून दाखविला जातो इतकेच. आर्किमिडीजनेही संख्या $\frac{१०}{७०}$ व $\frac{१०}{७१}$ च्या मध्ये कोठेतरी असावी असे म्हटले आहे. वर्तुळाचा परीघ हा ३३९३ इतका आहे असे सांगून आर्यभट पुढे एके ठिकाणी त्याचा व्यास १०८० आहे, असे म्हणतो तर दुसऱ्या ठिकाणी तो १०५० आहे, असे म्हणतो. या विसंगतीबद्दल ब्रह्मगुप्ताने आर्यभटावर टीका केली आहे. आर्यभट्टाने सांगितलेल्या पहिल्या नियमानुसार व्यास व परीघ यातील प्रमाण १ : $३\frac{१७७}{१२५०}$ इतके येते. यातील $\frac{१७७}{१२५०}$ हा अपूर्णांक $\frac{१}{७}$ पेक्षा लहान आहे.

त्याने प्रतिपादिलेला दुसरा नियम सदोष असल्याचे आढळते. या नियमानुसार व्यास व परीघ यांचे प्रमाण १ : ३ $\frac{१}{४}$ असे पडते. ( ही चूक मूळ लेखकाची नसून प्रतलेखकाची असावी, हे उघड आहे. )

पुल्सिाने या नियमाचा आपल्या ग्रंथात उपयोग केला असून त्याने हे व्यास आणि परीघ यांचे प्रमाण १ : ३$\frac{१७७}{१२५०}$ असे दाखविले आहे. $\frac{१}{७}$ पेक्षा हा अपूर्णांक कितीतरी लहान आहे.

एका हिंदू गृहस्थाने दिलेल्या माहितीवरून याकूब इब्न तरीक याने आपल्या ग्रंथात हाच जुना सिद्धान्त निवेदिला आहे. या सिद्धान्ताच्या आधारे राशिचक्राचा परीघ १,२५६,६४०,००० योजनांइतका असून त्याचा व्यास ४००,०००,००० योजनांइतका आहे असे त्याने सांगितले आहे. (प्रमाण— १ : ३$\frac{५६६४००००}{४००००००००}$ या संख्येला ३६०,००० या समान भाजकाने भागल्यास अंशस्थानी १७७ व छेदस्थानी १२५० ही संख्या येते. या पद्धतीनेच पुलिसाने $\frac{१७७}{१२५०}$ ही संख्या शोधून काढली आहे, असे दिसते.

## १६

## ( अ ) लेखनपद्धती
## (आ ) अंकगणित व तत्सम शास्त्रे
## ( इ ) हिंदूंच्या काही चमत्कारिक रूढी.

वाणीच्या साहाय्याने आपले विचार दुसऱ्याला सांगता येतात तथापि या साधनाचा उपयोग तात्कालिक स्वरूपाचा असतो. मागील सर्व पिढ्यांचा इतिहास मौखिक परंपरेच्या साहाय्याने जतन करून ठेवणे केवळ अशक्य आहे. यासाठी मानवाने लेखनकलेचा शोध लावला. त्यामुळे ज्ञानाने देश-कालाच्या बंधनांवरही मात केली. वाऱ्याप्रमाणे त्याचा प्रसार होऊन लागला. ज्या परमेश्वराने ही सृष्टी निर्माण केली व तिच्यामध्ये लेखनकलेसारख्या श्रेष्ठतम गोष्टी निर्माण केल्या त्या ईश्वराची स्तुती करावी तितकी थोडीच.

प्राचीन ग्रीक लोक कातड्यावर लिहीत असत. एकदा सॉक्रेटिसाला ' तुम्ही ग्रंथ का लिहीत नाही ? ' असा प्रश्न विचारला असता तो म्हणाला, ' जिवंत मानवाचे ज्ञान मेलेल्या मेंढीच्या कातड्यात कोंबणे ही गोष्ट मला मान्य नाही. ' ( यावरूनही हे ग्रीक लोक कातड्याचा लेखनासाठी उपयोग करीत असत, हे सिद्ध होते. ) इस्लामधर्माच्या उदयकाळी मुसलमान लोकही चामड्यावर लिहीत असत. हजरत पैगंबरसाहेब आणि खैबर येथील ज्यू लोक यांच्यामध्ये झालेला तह आणि हजरत पैगंबरसाहेबांनी किस्ताला लिहिलेले पत्र चामड्यावरच लिहिलेले आहे. पवित्र कुराणाच्या काही प्रती मृगचर्मावर लिहिलेल्या आहेत. या संदर्भात ते ' करातीस ' तयार करीत आहेत, अशा प्रकारचा एक उल्लेख पवित्र कुराणात आढळतो ( सूरा ६-९१ ). ईजिप्तमध्ये भूर्जपत्र कापून ' किर्तास ' ( : सनद ) तयार करतात. अगदी अलीकडेदेखील अशाच प्रकारच्या लेखनसाहित्यावर खलिफांची आज्ञापत्रे लिहून जगभर पाठविली जात असत. लेखनसाहित्य म्हणून भूर्जपत्र हे अधिक सोयीचे असते. याचे कारण असे की, त्यावरील मजकूर पुसता किंवा बदलता येत नाही. तसे करण्याचा प्रयत्न केल्यास तो फाटतो.

कागदाचा शोध प्रथमतः चीन देशात लागला. समर्कन्द येथील चिनी कैद्यांनी कागद तयार करण्याची रीत सांगितली आणि मग त्यानुसार इतर देशांतही कागद तयार होऊ लागला.

हिंदू लोक ग्रीक लोकांप्रमाणे लेखनासाठी चामड्याचा उपयोग करीत नाहीत. दक्षिण हिंदुस्थानात खजूर आणि नारळ यांच्या झाडांसारखे दिसणारे झाड विपुल प्रमाणात आढळते. या झाडाला चांगली ( खाण्याजोगी ) फळे येतात. त्याची पाने बरीच लांब असतात. या पानांची लांबी सुमारे १ यार्ड असून त्यांची रुंदी तीन बोटांइतकी असते. एकामागे एक अशा प्रकारे किती तरी पाने या झाडाला येतात. या पानांना ते 'तारी' ( ताल, तार ) असे म्हणतात. हिंदू लोक याच पानांचा उपयोग लिहिण्यासाठी करतात. ही पाने एकत्र जुळवून त्यात ते मध्यभागी एक छिद्र पाडतात. त्यात एक दोरी ओवून त्या सर्व पानांचे एक पुस्तकच ते तयार करतात.

मध्य आणि उत्तर भारतातील लोक मात्र 'तुझ' नावाच्या झाडाच्या साली लिहिण्यासाठी वापरतात. तसेच बाणांची टोके बांधण्यासाठी आवरण म्हणूनही या सालींचा ते उपयोग करतात. त्यास ते 'भूर्ज' असे म्हणतात. सुमारे एक वीत रुंद आणि एक यार्डाइतकी किंवा त्यापेक्षा थोडया कमी लांबीची साल घेऊन ते तिच्यापासून विविध आकाराची पृष्ठे तयार करतात. ते या पानांवर तेल लावतात. त्यामुळे ती आतून घट्ट व टणक होतात आणि त्यांचा पृष्ठभाग मऊ होतो. पृष्ठांचा क्रम त्यावर क्रमांक लिहून दर्शविला जातो. संपूर्ण ग्रंथ लिहून झाल्यावर ते तो कापडात गुंडाळून त्याच ( पृष्ठांच्या ) आकाराच्या दोन लाकडी पट्ट्यात बांधून ठेवतात. अशा प्रकारे तयार झालेल्या ग्रंथाला ते 'पूथी' ( पोथी ) असे म्हणतात. ग्रंथाप्रमाणेच पत्रे आणि इतर मजकूर लिहिण्यासाठीही ते 'तुझ' नामक झाडाच्या साली वापरतात.

हिंदूंची वर्णमाला एके काळी नष्ट झाली होती, लोक ही वर्णमाला विसरले होते व तिच्याविषयी कुणालाही फारशी आस्था उरली नव्हती. त्यामुळे हिंदू समाज निरक्षर झाला, त्यात अज्ञान वाढीस लागले. विज्ञानापासूनही ते दूर दूर जाऊ लागले. तेव्हा ईश्वराच्या प्रेरणेने, काही कालावधी लोटल्यावर पराशरपुत्र व्यास याने ५० वर्णांची वर्णमाला शोधून काढली. या वर्णमालेतील प्रत्येक वर्णास 'अक्षर' असे म्हणतात.

पूर्वी या वर्णमालेतील वर्णसंख्या अत्यंत कमी होती, उत्तरोत्तर ती वाढू लागली. असे काही जणांचे म्हणणे आहे. असे होणे केवळ स्वाभाविकच नव्हे तर अपरिहार्य आहे, असे मला वाटते.

जेव्हा इस्राइली लोक ईजिप्तवर राज्य करीत होते त्या वेळी 'असिधस' नामक गृहस्थाने विज्ञानाच्या अभिवृद्धीसाठी १६ अक्षरांची एक वर्णमाला तयार केली. कीमुश आणि अगेनान यांच्या प्रयत्नांमुळे या वर्णमालेशी ग्रीक लोकांचा परिचय झाला. या वर्णमालेतील मूळ १६ वर्णांत ग्रीक लोकांनी ४ वर्णांची भर घालून २० वर्णांची वर्ण-

माला तयार केली. ज्या वेळी सॉक्रेटिसावर विषप्रयोग करण्यात आला, त्या सुमारास सिमोनीडेस याने या वर्णमालेत आणखी ४ वर्णांची भर घातली त्यामुळे या वर्णमालेत एकूण २४ वर्णांचा समावेश झाला. डरायसचा पुत्र अतोकुसेर्सेस याच्या काळात ही घटना घडली, असे पाश्चात्य इतिहासकारांचे मत आहे.

हिंदूंच्या वर्णमालेत वर्णांचे इतके वैपुल्य का आहे, याची अनेक कारणे सांगता येतील. एक तर, ते स्वर, हम्जा ( : विसर्ग ) यांच्यानंतर येणाऱ्या किंवा थोड्याफार दीर्घ उच्चारासाठीही स्वतंत्र चिन्ह वापरतात. तसेच, त्यांच्या भाषेत असे काही उच्चार आहेत की जे इतर भाषांत आढळत नाही. या उच्चारांसाठीही त्यांनी स्वतंत्र व्यंजन–चिन्हे वापरली आहेत. त्यांच्या भाषेतील काही वर्णांचे उच्चारण करणे आपल्या-सारख्या अरबीभाषिकांना काहीसे अवघड वाटण्याची शक्यता आहे, कारण अशा प्रकारचे उच्चार ऐकण्याचा आपल्या कानांना सराव नाही. त्यामुळे या विविध प्रकारच्या उच्चारांतील वेगळेपणही आपल्या लक्षात चटकन येत नाही. या सर्व उच्चारां-साठीही हिंदूंनी वेगवेगळी लिपिचिन्हे वापरली आहेत. हिंदूंची लेखन-पद्धतीही वैशिष्ट्य-पूर्ण आहे. ग्रीक लोकांप्रमाणेच हिंदू लोकही डावीकडून उजवीकडे लिहितात. अरबी लिपीत ओळीच्या वरील बाजूस अक्षरे लिहितात तर हिंदूंच्या प्रत्येक अक्षरावर एक लहानशी सरळ रेषा असते. ( रेषेच्या खालील बाजूस ते अक्षर लिहितात. ) रेषेच्या वर जी चिन्हे असतात, ती चिन्हे म्हणजे उच्चारणाच्या खुणा होत.

भारतात सर्वसामान्यपणे रूढ असलेल्या वर्णमालेत ' सिद्धमात्रिका ' असे म्हणतात. कश्मीरमधील लोक ह्या वर्णमालेचा उपयोग करीत असल्याने तेथे तिचा उगम झाला असावा अशी हिंदू लोकांची समजूत आहे. ही वर्णमाला वाराणशी येथेही प्रचारात आहे, असे समजले. कश्मीर आणि वाराणशी ही या देशातील ज्ञानाची महत्त्वपूर्ण केन्द्रे आहेत. ' मध्यदेशा 'तही (–म्हणजेच या देशाच्या मध्यभागी असलेल्या प्रदेशा-तही–) हीच वर्णमाला प्रचारात आहे. हा प्रदेश कनौजच्या भोवती असून त्यास ' आर्यावर्त ' असेही म्हणतात.

मालव नामक प्रांतात ' नागर ' नावाची दुसरी एक लिपी प्रचारात आहे. वर निर्देशिलेल्या वर्णमालेच्या अक्षरांच्या आकारात आणि या वर्णमालेच्या अक्षरांच्या आकारात थोडाफार फरक असल्याचे आढळते.

' अर्धनागरी ' नावाची आणखी एक लिपीही यात वापरली जाते. या लिपीस ' अर्धनागरी ' असे म्हणण्याचे कारण असे की, वर उल्लेखिलेल्या दोन्ही लिप्यांच्या साहाय्याने ही लिपी सिद्ध झाली आहे. भाटीय आणि सिंध प्रांतात काही ठिकाणी ही लिपी वापरतात.

याप्रमाणेच भारतात आणखी काही लिप्याही प्रचलित आहेत. दक्षिण सिंधच्या

किनाऱ्यावरील 'मलवशौ' नामक किनाऱ्यावरील प्रदेशात 'मलवारी' लिपी वापरतात. बम्हनवा किंवा एल्मन्सूर, येथे 'सैंधव,' ज्या प्रदेशातून सैन्यातील 'कन्नर' नावाच्या तुकड्या येतात, त्या कर्नाटकदेशात 'कर्नाट' लिपी, आन्ध्रदेशात 'आन्ध्र' लिपी, दिर्वर (द्रविड) देशात 'दिर्वरी' (द्राविडी) लिपी, लारदेशात (लाट देशात) लारी लिपी, पूर्वदेशात 'गौरी' आणि पूर्वदेशातील उदनपूर येथे 'भैक्षुकी' इ. लिप्या या देशात प्रचारात आहेत. यांपैकी सर्वात शेवटी ज्या वर्णमालेचा उल्लेख केला आहे तिच्यामध्ये बुद्धाने लेखन केले आहे.

आपण 'परमेश्वराच्या नावाने' हे शब्द लिहून लेखनारंभ करतो त्याप्रमाणे हिंदू लोक प्रथमतः 'ओम्' हा शब्द लिहून त्यानंतर त्यांना जो मजकूर लिहावयाचा आहे तो लिहितात 'ओम्' या शब्दाची आकृती ॐ अशी आहे. या आकृतीत अक्षरे नाहीत. तथापि या उच्चाराची प्रतिमा लक्षात यावी म्हणून त्यांनी हे लिपिचिन्ह तयार केले आहे. या शब्दाच्या उच्चारणाने वा लेखनाने आशीर्वाद मिळतो किंवा आपले कल्याण होते आणि ईश्वराच्या एकत्वावरील आपला विश्वास प्रकट होतो अशी त्यांची समजूत आहे. ज्यू लोकांमध्येही अशीच एक प्रथा रूढ आहे. 'थोरा' मध्ये परमेश्वराच्या नावाप्रीत्यर्थ 'यह्वह्' हा शब्द लिहिण्याचे आढळते. त्याचा उच्चार ज्यू लोक 'अदोनइ' असा करीत असले तरी उच्चारानुसार तो या शब्दाचे लेखन हिब्रू भाषेत करीत नाहीत.

संख्या लिहिण्यासाठी आपण जसा वर्णमालेतील अक्षरांचा उपयोग करतो, त्याप्रमाणे हिंदू लोक करीत नाहीत. ज्याप्रमाणे भारतात एकाच वर्णासाठी वेगळे लिपिचिन्ह वापरले जाते, त्याप्रमाणेच एकाच अंकासाठी वेगवेगळ्या प्रदेशांत वेगवेगळे चिन्हही वापरल्याचे आढळते. आपण जी संख्यादर्शक चिन्हे वापरतो, ती चिन्हे म्हणजे हिंदूंच्या संख्यादर्शक चिन्हांचीच अधिक चांगली आवृत्ती होय. तथापि अशा प्रकारची चिन्हे किंवा आकृत्या यांचा अर्थ लोकांना कळावा म्हणून काढतात हे लक्षात ठेवावयास हवे. त्यांचा अर्थ कळला नाही तर त्यांचा काय उपयोग ? (या संदर्भात एका गोष्टीचा उल्लेख करावयास हवाः) काश्मीरी लोक आपल्या ग्रंथातील प्रत्येक पृष्ठावर, (ती ओळखण्यासाठी) चित्रांसारख्या दिसणाऱ्या किंवा चिनी वर्णासारख्या काही आकृती काढतात. बऱ्याच दिवसांच्या सरावानंतरच या आकृतींचा अर्थ लक्षात येतो. वाळूच्या साहाय्याने गणना करताना मात्र ते या प्रकारची संख्यादर्शक चिन्हे वापरीत नाहीत.

अंकगणितातील एक, दहा, शंभर, हजार ह्या पद्धतीच्या संख्या-क्रमास किंवा गणनापद्धतीस जवळ जवळ सर्व देशात सारखीच मान्यता असल्याचे आढळते. यातील सर्व संख्यांचा दहा या संख्येशी काही ना काही संबंध आहे. यांतील प्रत्येक संख्या पुढील संख्येचा दहावा भाग आहे. आजवर ज्या ज्या देशातील लोकांशी माझा संबंध

आला, त्यांच्या गणनापद्धतीचा व त्यांच्या या प्रकारचा संख्याश्रेणींचा मी काळजीपूर्वक अभ्यास केला आहे. यांपैकी बहुतेक देशांतील लोक बहुधा हजार या श्रेणीच्या पलीकडे सर्वसामान्यपणे गणना करीत नाहीत. अरबही तसेच करतात व व्यवहारदृष्ट्या असे करणेच अधिक निर्दोष आहे असे मला वाटते. याविषयी मी स्वतंत्र ग्रंथात सविस्तर विवेचन केलेच आहे.

जे लोक हजारांच्या पलीकडील संख्याश्रेणी मानतात, त्यातच हिंदूंचाही समावेश करावा लागेल, अशा प्रकारच्या संख्याश्रेणी ते एक तर स्वतंत्रपणे शोधून काढतात किंवा व्युत्पत्तीच्या साहाय्याने ठरवितात. काही जण या दोन्ही पद्धतींच्या संमिश्रणाने हजारांपुढील संख्या–श्रेणी निश्चित करतात. हिंदूंनी १८ पर्यंत संख्या–श्रेणी मानल्या आहेत, त्यामागे काहीसे धार्मिक कारणही आहे. (१८ ह्या संख्येस त्यांच्या धार्मिक बाबीत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.) १८ पर्यंत संख्या–श्रेणी मानण्याच्या या कार्यात व्याकरणकारांनी गणितज्ञांना सर्व प्रकारच्या व्युत्पत्तींची माहिती देऊन मनःपूर्वक साहाय्यक केले आहे.

हिंदू लोक १८ व्या संख्या–श्रेणीस 'परार्ध' असे म्हणतात. 'परार्ध' म्हणजे अर्धे आकाश किंवा (शब्दशः) 'वर जे दिसते त्याचा अर्धा भाग.' याबाबतीत पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करता येते. हिंदू लोक कल्पांच्या साहाय्याने काळाचे विभाग पाडतात. कल्पांच्या गणनेसाठी परमेश्वराचा एक दिवस ('अहोरात्री' चा पूर्वार्ध) परिमाण ते वापरतात. तथापि परमेश्वराच्या दिवसाशी तुलना करण्यासाठी आपल्या कल्पनेनुसार आकाशापेक्षा दुसरी मोठी गोष्टच नसल्याने त्याचाच या परिमाणाशी तुलना करण्यासाठी उपयोग करण्यात आला. या महत्तम गोष्टीचा–आकाशाचा– अर्धा भाग 'परार्ध' म्हणजे– परमेश्वराच्या अहोरात्रीचा अर्धा भाग व परार्धाची दुप्पट म्हणजेच परमेश्वराची एक संपूर्ण 'अहोरात्र' हिंदूंनी मानलेल्या अठरा संख्या–श्रेणींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :–

| | |
|---|---|
| १) एकम् | १०) पद्म |
| २) दशम् | ११) खर्व |
| ३) शतम् | १२) निखर्व |
| ४) सहस्रम् | १३) महापद्म |
| ५) अयुत | १४) शंकु |
| ६) लक्ष | १५) समुद्र |
| ७) प्रयुत | १६) मध्य |
| ८) कोटी | १७) अन्त्य |
| ९) न्यर्बुद | १८) परार्ध |

या पद्धतीच्या बाबतीत त्यांच्यामध्ये जे मतभेद आढळतात, त्यांचे विवेचन पुढे

केले आहे.

'परार्ध' या अठराव्या संख्या – श्रेणीनंतर 'भूरी' नामक एकोणिसावी संख्या-श्रेणी असून तोच अंकगणनेचा शेवट होय, असे काही जणांचे मत आहे. वस्तुत: अंक–गणना ही मूळातच अनंत–अंतविरहित– आहे, अमर्याद आहे. व्यवहाराच्या सोयीसाठी आपण गणनेस काही संख्या–श्रेणीची मर्यादा असल्याचे गृहीत धरतो व पुढे परंपरेने तीच आपण मानू लागतो. एकोणिसाव्या संख्या–श्रेणीच्या पलीकडे संख्याश्रेणी नसते असे ज्या वेळी सांगितले जाते, त्यावेळी त्या विशिष्ट भाषेमध्ये त्यानंतरच्या संख्याश्रेणींसाठी पारिभाषिक शब्दावली तयार केलेली नाही, असा त्याचा अर्थ घ्यायला हवा.

काही जण १ भूरी = महत्तम दिनाइतकी असल्याचे मानतात. तथापि असे मानण्याची रुढी सर्वसाधारण प्रघात–सर्वसामान्य हिंदू समाजात आढळत नाही. (महत्तम–सर्वांत मोठ्या–दिवसासंबंधीच्या त्यांच्या कल्पनांचा विचार पुढे आम्ही करणारच आहोत.) महत्तम दिनविषयक कल्पनांना मात्र परंपरा किंवा रुढी यांचा आधार असल्याचे आढळते. त्यावरून काही हिंदू गणितज्ञांनी मानलेली एकोणिसावी श्रेणी कृत्रिम किंवा तर्काधिष्ठित असावी, असे वाटते.

काही पंडितांच्या मते संख्या–श्रेणींचा शेवट 'कोटी' या श्रेणीने होतो. कोटीनंतर गणना करावयाची असल्यास त्यापूर्वीच्या दहा, शंभर, हजार इ. श्रेणींचा उपयोग करावा, असे त्यांचे म्हणणे आहे. देवांची संख्याही कोटीतच सांगितली जाते, ही गोष्ट आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ ते सांगतात. हिंदूंच्या समजुतीप्रमाणे देवांची संख्या ३३ कोटी आहे. त्यांपैकी प्रत्येकी ११ कोटी देवांचे अधिपती अनुक्रमे ब्रह्मा, विष्णु आणि महादेव हे आहेत.

हिंदू व्याकरणकारांनी अठराव्या संख्याश्रेणीनंतरच्याही काही श्रेणी मानल्या आहेत. त्यांना या व्याकरणकारांनी काही पारिभाषिक नावे दिली आहेत. याविषयी आम्ही यापूर्वी उल्लेख केलाच आहे.

यापूर्वी उल्लेखिलेल्या अठरा संख्या–श्रेणींपैकी पाचव्या श्रेणीच्या 'अयुत' या नावाऐवजी 'दश सहस्र' हे नांव आणि सातव्या श्रेणीच्या 'प्रयुत' या नावाऐवजी 'दशलक्ष' हे नाव समाजात विशेषेकरून प्रचलित आहे. 'अयुत' किंवा 'प्रयुत' या संज्ञा लोक क्वचितच वापरतात.

कुसुमपुरवासी पंडित आर्यभट याने आपल्या ग्रंथात दहापासून दहा कोटीपर्यंतच्या संख्या–श्रेणीची नावे पुढीलप्रमाणे दिली आहेत—

| | |
|---|---|
| अयुतम् | कोटी पद्म |
| नियुतम् | परपद्म |
| प्रयुतम् | |

काही पंडितांनी संख्याश्रेणीच्या पारिभाषिक संज्ञांमध्ये व्युत्पत्तिदृष्ट्या संबंध प्रस्थापित करण्याचाही प्रयत्न केला आहे. पाचव्या 'अयुत' नामक श्रेणीवरून सहाव्या श्रेणीस 'नियुत' आणि नवव्या श्रेणीच्या 'न्यर्बुद' या नावावरून आठव्या श्रेणीस 'अर्बुद' इ. नावे त्यांनी दिली आहेत. अकराव्या आणि बाराव्या (खर्व आणि निखर्व) तसेच तेराव्या व चवदाव्या–शंकु आणि महाशंकु या श्रेणींमध्येही अशाच प्रकारचे साम्य आढळते. या पद्धतीनुसार पद्मानंतर लगेच महापद्म ही श्रेणी वस्तुतः यावयास हवी. तथापि 'पद्म' हे दहाव्या श्रेणीचे नाव आहे, तर 'महापद्म' हे तेराव्या श्रेणीचे नाव आहे.

याबाबतीतही हिंदूंमध्ये मतभेद आहेत. काही मतांच्या पुष्ट्यर्थ ते विशिष्ट युक्तिवाद सांगतात तथापि काही संख्या–श्रेणी सांगताना रूढ क्रम न पाळता व कोणताही युक्तिवाद वा आधार न सांगता, ते कोणतीही नावे वापरतात. या विषयासंबंधी आपल्याला काही माहिती नाही, असे सांगून स्पष्टपणे आपले अज्ञान मान्य करण्याची प्रवृत्ती या पंडितांत आढळत नाही. उलट युक्तिवाद, आधार किंवा प्रमाण यांच्या अभावीच आपले मत बरोबर आहे असा दुराग्रह ते धरतात.

'पुलिस–सिद्धान्ता'त संख्या–श्रेणींचा क्रम पुढीलप्रमाणे दिला आहे—

| | |
|---|---|
| ४) सहस्रम् | ८) कोटी |
| ५) अयुतम् | ९) अर्बुदम् |
| ६) नियुतम् | १०) खर्व |
| ७) प्रयुतम् | |

यानंतरच्या १० ते १८ पर्यंतच्या संख्या-श्रेणी यापूर्वी दिलेल्या यादीप्रमाणेच आहेत.

अंकगणितात आपण जी संख्यावाचक चिन्हे वापरतो तीच हिंदू लोकही वापरतात. याबाबतीत हिंदू लोकांची किती प्रगती झाली आहे, याविषयी मी स्वतंत्र ग्रंथात विवेचन केलेच आहे.

हिंदूंचे ग्रंथ श्लोकबद्ध असतात याविषयीही मी या पूर्वी माहिती सांगितली आहे. कधी कधी खगोलशास्त्रविषयक ग्रंथात ते संख्येऐवजी शब्दांचा वापर करतात. तसेच वृत्तात एखादा शब्द बसत नसल्यास त्याच्याऐवजी दुसरा समानार्थी शब्द ते वापरतात एके ठिकाणी ब्रह्मगुप्त आपल्या ग्रंथात म्हणतो, तुम्हाला 'एक' हा अंक लिहावयाचा असल्यास त्याऐवजी ज्या ज्या गोष्टीत एकत्व आढळते, त्यांपैकी कोणत्याही गोष्टीचे नाव वापरावयास हरकत नाही. उदा० पृथ्वी, चंद्र इ. 'दोन' या अंकासाठी ज्या ज्या गोष्टींत द्वैत आढळते, त्या त्या गोष्टींचा वापर करता येतो. उदा० पांढरा आणि काळा. 'तीन' या अंकासाठी ज्यात तीन गोष्टींचा समावेश केलेला असेल अशा प्रकारच्या कोणत्याही वस्तूचे नाव योजावयास हरकत नाही. शून्यासाठी आकाश या शब्दाचा आणि १२ या अंकासाठी सूर्याच्या वेगवेगळ्या नावांचा उपयोग करता येतो.

हिंदू लोक अंकाच्याऐवजी जे शब्द वापरतात, ते मी स्वतः त्यांच्या तोंडून ऐकले आहेत. या शब्दांचे अंकवार कोष्टक पुढे दिले आहे. या शब्दांचा अर्थ कळल्याशिवाय हिंदूंच्या खगोलशास्त्राविषयक ग्रंथातील परिभाषेचा नीटसा उलगडा होणार नाही. परमेश्वरकृपेने मला या शब्दाचे इतर सर्व अर्थ कळतील तेव्हा मी पुढील कोष्टकात त्याची नोंद अवश्य करीन—

| अंक | नाव | अर्थ |
|---|---|---|
| | शून्य आणि ख | बिंदू |
| | गगन | आकाश |
| | वियत | आकाश |
| | अंबर | |
| | आकाश | आकाश |
| | अभ्र | आकाश |
| १ | आदि | प्रारंभ |
| | शशिन् | |
| | इंदु | |
| | शीता | |
| | उर्वरा, धरणी | |
| | पितामह | आदिपुरुष |
| | चंद्र | चंद्र |
| | शीतांशु | |
| | रूप | |
| | रश्मी | |
| २ | यम | |
| | आश्विन | |
| | रविचंद्र | |
| | लोचन | नेत्रद्वय |
| | अक्षि | |
| | दस्त्र | |
| | यमल | |
| | पक्ष | (चंद्राचे) पक्ष |
| | नेत्र | दोन डोळे |

| | | |
|---|---|---|
| ३ | त्रिकाळ | काळाचे तीन विभाग |
| | त्रिजगत | |
| | त्रयम् | |
| | पावक, वैश्वानर, दहन, तपन, हुताशन, ज्वलन, अग्नि | अग्नि |
| | त्रिगुण | तीन आदिशक्ती |
| | लोक | विश्व (जगे, पृथ्वी, स्वर्ग व नरक) |
| ४ | वेद | हिंदूंचे धर्मग्रंथ. हे चार असल्याने ४ या अंकासाठी प्रस्तुत शब्द वापरला आहे. |
| | समुद्र, सागर | समुद्र |
| | अब्धि | |
| | दधि | |
| | दिश् | |
| | जलाशय | |
| | कृत | |
| ५ | सार | |
| | अर्थ | |
| | इंद्रीय | पाच ज्ञानेंद्रिये |
| | सायक | |
| | इख्वन | |
| | बाण | |
| | भूत | |
| | इसहु, (इशु) | |
| | पांडव | पाच बंधू (पांडव) |
| | पत्रिन, मार्गण | |
| ६ | रस | |
| | अंग | |
| | शत | |
| | (?) | वर्ष |
| | रितु (?) | |
| | मासार्धम् | |

| | | |
|---|---|---|
| ७ | अग | |
| | महीधर | |
| | पर्वत | पर्वत |
| | सतन | |
| | नग | पर्वत |
| | अद्रि | |
| | मुनि | |
| ८ | वसु, अष्ट | |
| | धी, मंगल | |
| | गज, नाग | |
| | दन्तिन | |
| ९ | गो, छिद्र | |
| | नंद, पवन | |
| | रंध्र, अंतर | |
| | नवन् | नऊ |
| १० | दिश्, खेंदु | |
| | आशा, रावण, शिरस् | |
| ११ | रुद्र | विश्वविनाशक |
| | महादेव | देवतांचा देव |
| | ईश्वर | |
| | अक्षौहिणी | कुरूंचे सैन्य |
| १२ | सूर्य | १२ सूर्य आहेत अशी कल्पना |
| | आदित्य | |
| | अर्क | सूर्य |
| | मास | |
| | भानु | |
| | सहस्त्रांशु | |

| | | |
|---|---|---|
| १३ | विश्व | |
| १४ | मनु | १४ मन्वन्तरांचे अधिपती |
| १५ | तिथि | चान्द्रमासाच्या प्रत्येक पक्षातील दिवस |
| १६ | अष्टी,<br>नृप, भूप | |
| १७ | अत्यष्टि | |
| १८ | धृति | |
| १९ | अतिधृति | |
| २० | नख, कृति | |
| २१ | उत्कृति | |
| २२ | – | |
| २३ | – | |
| २४ | – | |
| २५ | तत्त्व | ज्यांच्या साहाय्याने मोक्ष प्राप्त करता येतो अशी २५ तत्त्वे. |

माझ्या माहितीप्रमाणे संख्यांच्याऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दांची यादी २५ संख्येच्या पलीकडे जात नाही.

यानंतर हिंदूंच्या काही लोकविलक्षण चालीरीतींसंबंधी व वागण्याच्या पद्धतींविषयी माहिती सांगतो एकादी गोष्ट आपण क्वचितच पाहतो, ती पाहण्याचा आपणास नेहमीचा सराव नसतो, त्यावेळी आपण ती गोष्ट विलक्षण किंवा ' विचित्र ' आहे असे म्हणतो, नेहमीच रूढ गोष्टींपेक्षा ती फारच वेगळी आहे, असे जेव्हा आपल्याला, प्रकर्षाने जाणवते तेव्हा तिच्याबद्दल आपल्याला कुतूहल वाटू लागते व ती गोष्ट अत्यंत ' अपूर्व ' आहे, एकाद्या ' चमत्कारा 'सारखी आहे असे आपणास वाटू लागते. अशी गोष्ट प्रत्यक्ष आपल्या डोळयांनी आपण जोवर पाहतो तोवर ती काल्पनिक किंवा खोटी असावी, असेही आपल्याला वाटते. आपल्याला अत्यंत भयंकर किंवा आसुरी वाटतील अशाही काही चालीरीती हिंदूंमध्ये प्रचलित आहेत. त्यांच्या आणि आपल्या चालीरीतींतील हे अंतर पाहून त्यांनी हेतुपुरस्सर तर अशा विरोधी चालीरीती निर्माण केल्या नाहीत ना, असेही काही जणांना वाटण्याची शक्यता आहे. चुकून त्यांच्यामध्ये आणि आपल्यामध्ये एखादी सारखी रूढी असली तरी तिचा अर्थ मात्र नेमका वेगळा असतो. हिंदूंच्या काही चालीरीती पुढीलप्रमाणे आहेत.

१ ) ते आपल्या शरीरावरील केस कापत नाहीत. हा देश अत्यंत उष्ण असल्यामुळे ते पूर्वी वस्त्रे नेसत नसत आणि डोईवरील केस न कापल्यामुळे त्यांचे उष्णतेपासून संरक्षण होत असे. मिशा ठेवण्याची प्रथा मात्र येथे आढळते. येथील लोक

आपल्या इंद्रियांवरील केस काढीत नाहीत. तसे केल्याने कामवासना अधिक उद्दीपित होते, असे त्यांना वाटते.

२) ते आपली नखे खूप वाढवितात आणि आपल्या या आळशीपणाबद्दल स्वतःला दोष देण्याऐवजी नखे वाढविण्याबद्दल स्वतःची प्रशंसा करतात. वस्तुतः या वाढविलेल्या नखांचा डोके खाजवून उवा काढण्यापलीकडे त्यांना कोणताच उपयोग होत नाही,

३) हिंदू लोक शेणाने सारवलेल्या जागेवर ओळीने बसून जेवतात. ते उष्टे अन्न खात नाहीत. जेवल्यानंतर जेवणाची मातीची ताटे ते फेकून देतात.

४) पान, सुपारी व चुना खाल्ल्यामुळे त्यांचे दात तांबुस दिसतात.

(५) जेवणापूर्वी, किंवा कोणताही पदार्थ खाण्यापूर्वी ते मद्यपान करतात. ते गोमूत्र पितात पण गोमांस मात्र खात नाहीत.

(६) लाकडी 'टाळ' नावाचे वाद्य वाजविण्याचा प्रघात त्यांच्यामध्ये आढळतो.

(७) ते फेट्याचा विजारीसारखा उपयोग करतात. ज्यांना कमी वस्त्रे नेसावयाची असतात, ते केवळ कमरेभोवती दोन बोटे रुंदीची चिन्धी दोन दोऱ्यांच्या साहाय्याने बांधतात. तथापि ज्यांना अधिक वस्त्रे नेसण्याची इच्छा असते ते, ज्यापासून अनेक चादरी करता येतील, अशा प्रकारच्या विस्तीर्ण वस्त्राचा विजारीसारखा उपयोग करतात. त्यांची ही तुमान इतकी मोठी असते की तिच्यातून त्यांचे पायही दिसत नाहीत. ज्या दोरीच्या साहाय्याने ते ही विजार बांधतात ती दोरी पाठीमागे दिसते. छाती, गळा यासारख्या शरीराच्या वरील भागासाठी ते 'सिदार' नावाचे वस्त्र विजारीप्रमाणेच असून त्यास पाठीमागील बाजूला गुंड्या असतात.

'कुर्तक' नावाचे वस्त्र हिंदू स्त्रिया वापरतात. हे वस्त्र खांद्यापासून शरीराच्या मध्यभागापर्यंत असून त्यास बाह्या असतात.

(८) ते वासराच्या कातड्याचे जोडे वापरतात.

(९) प्रथम ते पाय धुतात व नंतर तोंड धुतात. पत्नीशी संभोग करण्यापूर्वी ते स्नान करतात.

(१०) सणावाराला अत्तरासारख्या सुगंधी द्रव्याऐवजी ते अंगाला शेण लावतात.

(११) ते स्त्रियांची सौन्दर्यप्रसाधने व अलंकार वापरतात. त्याचप्रमाणे अंगाला उटणेही लावतात. कर्णभूषणे, (दंडात) कडे, (बोटात) सोन्याच्या अंगठ्या इ. अलंकारांचा पुरुषही वापरतात. तसेच ते पायातही काही दागिने घालतात.

(१२) ते खोगीर न घालता घोड्यावर बसतात तथापि खोगीर घातलेच तर मात्र ते घोड्यावर बसण्यासाठी उजव्या बाजूने चढतात. घोड्यावरून प्रवास करीत असताना एखाद्याला आपल्याबरोबर (सोबतीसाठी) घेतात.

(१३) ते कमरेच्या उजव्या बाजूस 'कुठार' नावाचे शस्त्र खोवतात.

(१४) डाव्या खांद्यावरून कमरेच्या उजव्या बाजूपर्यंत ते एक दोरी बांधतात. यास ते 'यज्नोपवीत' असे म्हणतात.

( १५ ) नेहमी विचारविनिमय करताना, तसेच महत्त्वाच्या प्रसंगीही ते स्त्रियांचा सल्ला घेतात.

( १६ ) मुलगा झाल्यावर ते त्याची जशी विशेष काळजी घेतात तशी ते मुलीची काळजी घेत नाहीत.

भारताच्या पूर्वेकडील प्रांतातील लोक दोन मुलांपैकी धाकट्या मुलाचे अधिक कोड-कौतुक करतात. थोरल्याचा जन्म कामवासनेच्या प्राबल्यामुळे झाला असून धाकट्याच्या जन्मास आपली समतोल, प्रौढ वृत्ती कारणीभूत झाली आहे असे त्यांना वाटते.

( १७ ) ज्याच्याशी हस्तांदोलन करावयाचे, त्या व्यक्तीच्या हाताचा बाहेरील भाग आपल्या हातात घेऊन ते हस्तांदोलन करतात.

( १८ ) घरात प्रवेश करण्यापूर्वी ते यजमानाची परवानगी घेत नाहीत तथापि त्या घराबाहेर पडताना मात्र त्याची अनुज्ञा घेतात.

( १९ ) ते सभेमध्ये पायाची घडी घालून ( मांडी घालून ) बसतात.

( २० ) वडीलधारी माणसे समोर बसली असल्यास त्यांचा विचार न करिता ते त्यांच्यासमोर थुंकतात, नाक शिंकरतात व डोईतील उवा काढून त्या मारतात. शिंक येणे हा एक प्रकारचा अपशकुन आहे, असे ते मानतात.

( २१ ) कोष्टी लोक अपवित्र असतात असे ते मानतात. तथापि पैसे घेऊन मरणाच्या पंथाला लागलेल्या जनावरांना बुडवून किंवा जाळून ठार करणारे लोक मात्र त्यांना पवित्र वाटतात. येथील शाळेतील मुले काळ्या पाट्यांवर पांढऱ्या तुकड्याने लिहितात. पाटी उभी ( लांबट बाजू समोर ) धरून लिहिण्याची प्रथा येथे आहे. आडवी पाटी धरून लिहीत नाहीत. तसेच ते डावीकडे लिहीत असतात. हिंदूंची ही लेखन-पद्धती पाहता पुढील ओळी कवीने जणू हिंदूंनाच उद्देशून लिहिल्या असाव्यात असे वाटते :

> कोळशासारख्या काळ्या कागदावर
> पांढऱ्या शुभ्र शाईने
> एकादा कवी लिहीत असल्यास
> तो काळ्याकुळकुळीत रात्रीत पांढरा शुभ्र दिवसच
> रेखाटीत आहे असे वाटते.
> त्याचे हे लेखन म्हणजे कोष्ट्याने
> आडवे सूत न घेताच विणण्यासारखा
> प्रकार नव्हे काय ?

( २२ ) ग्रंथाच्या प्रारंभी त्याचे नाव न लिहिता ते ग्रंथाच्या शेवटी लिहिण्याची प्रथा येथे आहे.

( २३ ) अरब लोक नामापुढे प्रत्यय जोडून लघुत्वदर्शक नामे सिद्ध करतात त्याप्रमाणे हिंदू लोक नामाच्यापुढे काही प्रत्यय जोडून स्त्रीलिंगी नामे सिद्ध करतात.

(२४) एखादी वस्तू दुसऱ्याला द्यावयाची असल्यास आपण त्याच्या अंगावर ज्याप्रमाणे एखादी वस्तू फेकतो, त्याप्रमाणे ते दुसऱ्या व्यक्तीच्या दिशेने ती वस्तू फेकतात.

(२५) दोन व्यक्ती सोंगट्यांचा खेळ खेळतात तेव्हा तिसरीच व्यक्ती खेळास प्रारंभ करते.

(२६) वस्तुतः माजलेल्या हत्तीच्या सोंडेवर जो द्रव ओघळतो, त्याला दुर्गंधी येते. तथापि हिंदूंना मात्र हा द्रव आवडतो.

यानंतर भारतीयांच्या बुद्धिबळाच्या खेळाविषयी माहिती सांगतो. चार जण मिळून हा खेळ खेळतात. या खेळात ते हत्तीला एक एक घर (चौकोन) सरळ पुढे सरकवीत नेतात फिरझान् (राणी) प्रमाणे ते हत्तीला एक एक घर करीत कोपऱ्यातील घरापर्यंतही नेतात. सरळ जावयाचे एक घर व ४ कोपऱ्यांतील ४ घरे मिळून जी पाच घरे होतात, त्यांत हत्तीची सोंड व चार पाय बसतात, अशी त्यांची समजूत आहे.

त्यांच्या बुद्धिबळाच्या पटाची रचना पुढीलप्रमाणे असते :–

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 'रुख' | घोडा | हत्ती | राजा | | | प्यादा | 'रुख' |
| प्यादा | प्यादा | प्यादा | प्यादा | | | प्यादा | घोडा |
| | | | | | | प्यादा | हत्ती |
| | | | | | | प्यादा | राजा |
| राजा | प्यादा | | | | | | |
| हत्ती | प्यादा | | | | | | |
| घोडा | प्यादा | | | प्यादा | प्यादा | प्यादा | प्यादा |
| 'रुख' | प्यादा | | | राजा | हत्ती | घोडा | 'रुख' |

अशा प्रकारचा बुद्धिबळाचा खेळ आपल्याकडे खेळत नाहीत म्हणून त्याविषयी मला येथे जी माहिती उपलब्ध झाली ती अधिक विस्ताराने पुढे देत आहे.

चार जण बुद्धिबळाच्या चौकोनी पटाभोवती बसतात. आपली पाळी आल्यावर ते दान टाकतात. या दानात ५ किंवा ६ हे आकडे आल्यास मूळाप्रमाणे त्यांच्या ५ आणि ६ या संख्या धरीत नाहीत. त्यांचे मूल्य पाचाऐवजी एक आणि सहाऐवजी चार याप्रमाणे असल्याचे गृहीत धरतात. ५ व ६ हे दोन्ही अंक पुढील पद्धतीने लिहिले जात असल्याने त्याचे मूल्य अनुक्रमे १ व ४ आहे असे ते मानतात—

६ ५

४ ३ २ १

यावरून ६ व ५ अंकांशी अनुक्रमे ४ व १ या अंकाचे असलेले साम्य लक्षात येईल. 'फिरझान्' (राणी) राजा हे नाव ते हा खेळ खेळताना वापरतात.

प्रत्येक आकड्यामुळे कोणती तरी एक सोंगटी पुढे सरकते.

१. या दानामुळे राजा किंवा प्यादा पुढे जातो. बुद्धिबळाच्या पटावर या दोघांच्या हालचाली सारख्याच स्वरूपाच्या असतात. राजास पटावरील आपली जागा सोडायला भाग पाडता येत नाही तथापि त्यास काढून घेता येते.

२. आपल्या शतरंजच्या खेळात हत्ती जसा तिरका चालतो, त्या पद्धतीने या दानामुळे सोंगटी तिसऱ्या घरात तिरक्या दिशेने जाते.

३. या दानामुळे घोडा पुढे सरकतो. तो बहुधा पहिल्या चौकोनापासून तिसऱ्या चौकोनापर्यंत तिरक्या चालीने जातो.

४. या दानामुळे हत्तीस गती मिळते. जोवर मार्गात काही अडथळा येत नाही तोवर तो नेहमी आपल्या खेळातील मनोऱ्याप्रमाणे सरळ रेषेत चालतो. त्याच्या मार्गात काही अडथळा असल्यास एखाद्या दानामुळेदेखील तो नाहीसा होऊन हत्तीस पुढे जाता येते. हत्तीची चाल कमीत कमी एक घर (चौकोन) असून जास्तीत जास्त पंधरा घरे इतकी असते. याचे कारण असे की कधी ४ चे दान दोनदा, किंवा ६ चे दोनदा किंवा एकदा चारचे व एकदा ६ चे मिळून असेही दान पडते. त्यामुळे, हत्तीच्या मार्गात काही अडथळा नसल्यास, तो पटाच्या या कडेपासून त्या कडेपर्यंत लीलया फिरू शकतो.

या खेळातील सोंगट्यांच्याही किमती ठरलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत—

राजा : ५
हत्ती : ४
घोडा : ३
रुख : २
प्यादा : १

एक राजा जिंकल्यास ५ अंक मिळतात. दोन राजे जिंकल्यास १० अंक व तीन राजे जिंकल्यास १५ अंक मिळतात (मात्र यावेळी जिंकणाराजवळ स्वतःचा राजा नसावा, अशी अट आहे.) तथापि जिंकणाराजवळ स्वतःचा राजा असल्यास त्यास ५४ अंक मिळतात. हा आकडा कुठलेही गणित करून काढलेला नसून सर्वांच्या संमतीने तो गृहीत धरला आहे.

वरील सर्व विवेचनावरून हिंदू समाजात आणि आपल्या समाजात अनेक बाबींत भिन्नता असल्याचे आढळून येईल. ज्या पद्धतीने ते आपल्यापेक्षा अधिक चांगले आहेत, असे सांगतात, त्याच पद्धतीने आपल्यालाही (त्यांच्याशी आपली तुलना करून) आपले श्रेष्ठत्व पटविता येते.

तथापि या विलक्षण चालीरीतींच्या बाबतीत केवळ हिंदूंनाच दोष देण्यात अर्थ नाही. रानटी अरब समाजातही अशा प्रकारचे दोष व बीभत्स चालीरीती आढळत असत. हे लोक विटाळशी व गरोदर स्त्रियांशी संभोग करीत असत. अनेक जण एकाच स्त्रीबरोबर ती विटाळशी असताना संभोग करीत असत. ते आपल्या पाहुण्यांची व मुलीच्या प्रियकराची मुले दत्तक घेत असत. एवढेच काय, प्रार्थना म्हणताना ते बोटांच्या साहाय्याने शीळ वाजवीत आणि दोन्ही हातांनी टाळ्या वाजवीत असत. तसेच ते मेलेल्या जनावरांचे घाणेरडे मांसही खात असत. इस्लामने अरब समाजातील या वाईट चालीरीती नष्ट केल्या. हिंदुस्थानात ज्या लोकांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला, त्यांच्यामधील वाईट चालीरीतीही इस्लामने नष्ट केल्या आहेत. याबद्दल जगन्नियंत्या ईश्वराला धन्यवाद द्यावयास हवेत.

१७

# लोकांच्या अज्ञानाच्या आधारे जगणारी हिंदूंची काही शास्त्रे

एखादी वस्तू आपल्याला दिसते तशी नसून ती दुसरीच एखादी वस्तू आहे, असा भ्रम चेटूक नामक 'विद्ये'मुळे आपल्या इंद्रियांना होतो हे आपल्याला माहीत आहे. ज्यामुळे एखादी अशक्य कोटीतील गोष्ट प्रत्यक्षात घडते ती विद्या म्हणजे चेटूक असे सर्वसामान्य समाजातील लोक समजतात. तथापि अशक्य गोष्ट प्रत्यक्षात घडणे हे मुळातच चुकीचे असल्याने वर उल्लेखिलेला चेटकासारखा प्रकार म्हणजे निव्वळ फसवणूक होय आणि त्यामुळे चेटूक हे एक शास्त्र आहे असे म्हणता येत नाही.

'किमया' हादेखील चेटकाचाच एक प्रकार होय. तथापी त्यास उघड उघड 'चेटूक' असे कोणी म्हणत नाही. एखाद्या माणसाने थोडासा कापूस घेऊन त्याचे सोन्यामध्ये रूपांतर केले तर त्याला तुम्ही चेटकाशिवाय दुसरे कोणते नाव द्याल? एखाद्या माणसाने चांदीचा तुकडा घेऊन तो सोन्यासारखा करून दाखवला तर त्याने त्या चांदीच्या तुकड्याला सोन्याचा मुलामा दिला असे आपण म्हणतो. तथापि वरील क्रियेच्या बाबतीत 'मुलामा' हे नावही आपल्याला वापरता येणार नाही. (कारण दोन्ही प्रक्रियांत मुळातच फरक आहे.)

'किमये'कडे अद्यापि हिंदूंचे विशेष लक्ष गेलेले दिसत नाही. बहुतेक इतर राष्ट्रात मात्र 'किमया' प्रचलित असल्याचे आढळते. या 'शास्त्रा'ला वेगवेगळ्या राष्ट्रांत कमी–अधिक महत्त्व असेल तथापि त्यावरून त्या राष्ट्रातील लोकांच्या बुद्धिमत्तेची किंवा अज्ञानाची परीक्षा करणे योग्य ठरणार नाही. कित्येक बुद्धिमान लोकदेखील या शास्त्रावर विश्वास ठेवतात व कित्येक अज्ञानी लोक त्याचा उपहास करतात. तथापि यासाठी विद्वानांना दोष देऊन अज्ञानी लोकांची स्तुतिस्तोत्रे गाण्यात अर्थ नाही. 'किमये'सारख्या शास्त्राकडे विद्वान आकर्षित होतात याचे कारण असे की, दुःख नष्ट करून चटकन सुख गवसण्याचा एक उपाय या दृष्टीने ते 'किमया' या शास्त्राकडे पाहतात. या संदर्भात एक छोटीशी गोष्ट सांगतो. "श्रीमंत लोकांच्या

दाराशी विद्वान लोक घोटाळतात, तसे विद्वानांच्या दाराशी श्रीमंत लोक मात्र घोटाळत नाहीत. याचे कारण काय?" असा प्रश्न एकदा एका साधूला लोकांनी विचारला तेव्हा त्याने पुढील उत्तर दिले, 'धनाचा उपयोग कसा करावा याची संपूर्ण कल्पना विद्वानांना आहे तथापि श्रीमंतांना मात्र विद्येचे महत्त्व कळत नाही.' यावरून 'किमये' सारख्या विद्येस विद्वान लोक का महत्त्व देतात ते लक्षात येईल. याच्या उलट किमयेस विरोध करणाऱ्या अज्ञानी लोकांची प्रशंसाही करता येत नाही याचे कारण असे की त्यांना विरोधही अज्ञानमूलक असतो.

या विद्येत पारंगत असलेले लोक या विद्येतील रहस्य दडवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. ज्यांना ही विद्या अवगत नाही त्यांच्याशी ते संभाषणदेखील करीत नाहीत. यामुळे या देशातील लोकांची 'किमया' करण्याची प्रक्रिया कोणती, त्यासाठी ते कोणत्या प्रकारची सामग्री वापरतात यासंबंधीची माहिती मला कळू शकली नाही. ऊर्ध्वपातन, एकाद्या वस्तूचे चुन्यात रुपान्तर करणे, अभ्रकाचे भस्म करणे, इ. गोष्टी त्यांच्या बोलण्यात मी ऐकल्या त्यावरून ते बहुधा धातूंच्या किमयेचा प्रयोग करीत असावेत, असा मी तर्क केला.

याशिवाय भारतात किमयेसारखेच आणखी एक शास्त्र असल्याचे आढळते. त्यास ते 'रसायन' असे म्हणतात 'रसायन' हा शब्द 'रस' (: सुवर्ण) या शब्दावरून सिद्ध झाला आहे. वनस्पतींपासून तयार केलेली औषधे, व त्यांची मिश्रणे इ. विषयींच्या प्रक्रियेला ते 'रसायन' असे म्हणतात. जो मनुष्य जगण्याची मुळीच शक्यता नाही, तो रसायनाच्या साहाय्याने आरोग्यसंपन्न होतो. रसायनामुळे वृद्धांना यौवन प्राप्त होते, पांढऱ्या केसांच रूपान्तर काळ्याकुळकुळीत केसांत होते, शरीराची सर्व इंद्रिये पूर्ववत् कार्यक्षम होतात, त्यांना नवजीवन प्राप्त होते, संभोगशक्ति आणि आयुर्मर्यादा वाढते. एवढेच नव्हे, तर रसायन म्हणजे मुक्ती प्राप्त करण्याचे एक साधन आहे. असेही पंतजलीच्या विवेचनाच्या आधारे आपल्याला सांगता येते. (त्याविषयी पूर्वी उल्लेख केलाच आहे.) अशा प्रकारच्या किमयेसारख्या विद्या हा भ्रम आहे असे आपण कितीही सांगितले तरी खऱ्या आहेत असे मानून त्यांच्यापासून मिळणाऱ्या सुखाला (!) कोण मुकणार !

या विद्येमध्ये पारंगत असलेला एक महापंडित सुमारे शंभर वर्षांपूर्वी भारतात होऊन गेला. तो सोमनाथजवळील दैहक दुर्ग येथे राहात असून त्यांचे नाव नागार्जुन असे होते. त्याने विषयासंबंधी उपलब्ध असलेली सर्व सामग्री व माहिती मिळविली. मिळविलेल्या माहितीचे सार त्याने आपल्हा ग्रंथात सांगितले आहे. हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ आहे.

विक्रमादित्याच्या काळी उज्जैन नगरात व्यादी नामक एक गृहस्थ राहात असे. त्याने आपले संपूर्ण जीवित आणि वित्त याच शास्त्रासाठी वेचले. तथापि त्यापासून

त्याला काहीच लाभ झाला नाही. त्याच्या दैनंदिन गरजा भागण्याइतकाही पैसा त्याला मिळेनासा झाला. या शास्त्रामुळे आपला सर्वनाश झाला या जाणिवेने त्याला या शास्त्राबद्दल अत्यंत तिरस्कार वाटू लागला. जीवनाला कंटाळून तो शेवटी नदीच्या काठावर जाऊन बसला. ज्या वहीत त्याने रसायनविषयक प्रक्रिया लिहून ठेवल्या होत्या त्या वहीचे एक एक पान फाडून काढून ते तो नदीत टाकू लागला. त्याच नदीच्या काठावर पुढे एक वेश्या बसली होती. तिने ती सर्व वाहणारी पाने गोळा केली. त्या पानांतील मजकुरावरून त्यात रसायनाविषयी काही माहिती लिहिलेली असावी, ही गोष्ट तिच्या लक्षात आली. ती सर्व पाने घेऊन ती व्यादीकडे गेली व त्याला तिने पाने फाडण्याचे कारण विचारले. तेव्हा व्यादी उत्तरला, "या शास्त्राचा मला काहीही उपयोग झाला नाही. त्यापासून मला जे धन मिळावयास हवे होते ते तर मला मिळाले नाहीच, उलट माझे दिवाळे मात्र निघाले. माझी सर्व संपत्ती नष्ट होऊन मी आता निष्कांचन झालो आहे. वैभवाचा अविरत पाठलाग करूनही शेवटी मी दुर्दैवीच ठरलो..." यावर ती वेश्या त्याला म्हणाली, "जे ध्येय प्राप्त करण्यासाठी तू संपूर्ण जीवन वेचलेस, त्या ध्येयाचा मार्ग तू मुळीच सोडू नकोस. प्राचीन ऋषींनी कितीतरी अशक्य गोष्टी शक्य असल्याचे सिद्ध करून दाखविले आहे. कदाचित्, तुझ्या यशाच्या मार्गावर निर्माण झालेला अडथळा ही एखादी योगायोगामुळे घडून आलेली घटनाही असण्याची शक्यता आहे. माझ्याजवळ अमाप संपत्ती आहे, तिचा विनियोग तू आपल्या या कार्यपूर्तीसाठी कर." हे ऐकून व्यादीस अत्यंत आनंद झाला व त्याने पुन्हा रसायनाच्या संशोधनास प्रारंभ केला.

रसायनावरील ग्रंथ सांकेतिक भाषेत लिहिलेले असत. या ग्रंथातील एका रासायनिक प्रयोगात तेल आणि मानवी रक्त यांच्याविषयीची एक प्रक्रिया सांकेतिक भाषेत सांगितली होती. त्याचा योग्य तो अर्थ व्यादीने घेतला नाही. मूळ ग्रंथात 'रक्तामल' असा शब्द लिहिला होता. त्याचा अर्थ त्याने चुकून 'एक तांबडे फळ' असा घेतला त्यामुळे त्याचा प्रयोग यशस्वी झाला नाही. नंतर त्याने त्या रसायनात अनेक औषधींचे मिश्रण केले. त्यातून प्रचंड ज्वाला निर्माण झाल्या व त्या ज्वालांमुळे त्याचे डोके भाजले गेले. त्यासाठी उपचार म्हणून तो पुढे आपल्या डोक्याला खूप तेल लावू लागला. एकदा रसायनशाळेतून तो बाहेर जात असता त्याच्या कपाळाला भिंतीच्या खुंटीचा मार लागला. त्यातून रक्त आले. रक्ताच्या त्या ओघळातच डोईस माखलेल्या तेलाचे काही थेंबही मिसळले. त्यामुळे ग्रंथात दिलेल्या प्रयोगातील मिश्रणाची रासायनिक प्रक्रिया आपोआपच पूर्ण झाली. या प्रक्रियेचा व प्रयोगाचा पडताळा पाहण्यासाठी त्याने व त्याच्या पत्नीने ते मिश्रण आपल्या अंगाला फासले. त्या क्षणीच त्या दोघांनाही हवेत उडता येऊ लागले. सम्राट विक्रमादित्याच्या कानी ही वार्ता

पडताच तो हे दृश्य पाहण्यासाठी आपल्या राजवाड्याबाहेर पडला व बाजारपेठेत आला. त्याला पाहून व्यादी म्हणाला, "महाराज, माझी थुंकी घेण्यासाठी तोंड उघडा." राजाला या गोष्टीचा अत्यंत राग आला. त्याने तोंड उघडले नाही. त्यामुळे व्यादीची थुंकी एका घराच्या दाराजवळ पडली व त्या घराचा उंबरठा सुवर्णमय झाला. ही किमया प्राप्त झाल्यामुळे व्यादी व त्याची पत्नी हे उभयता कोणत्याही स्थळी उड्डाण करून जात असत. हे दोघेजणही अद्यापि जिवंत आहेत, असे लोक म्हणतात. व्यादीने पुढे या विषयावर कित्येक ग्रंथ लिहिले.

रासायनिक प्रयोगाविषयीची अशीच आणखी एक अभूतपूर्व हकीगत मी येथे ऐकली आहे. माल्व देशाची राजधानी धार येथे सध्या सम्राट भोजदेव राज्य करीत आहे. या राजधानीतील राजवाड्यासमोरच एक मोठी, लांबट आकाराची शुद्ध चांदीची आकृती ठेवल्याचे आढळते. त्यावर माणसाच्या अवयवांच्या रेषा स्पष्टपणे दिसतात. या चांदीच्या आकृतीविषयी येथील लोक पुढील आख्यायिका सांगतात :

एकदा एक गृहस्थ 'रसायन' घेऊन एका राजाकडे गेला. या रसायनाचा स्वतः-वर प्रयोग केल्यास माणूस अमर होतो, तो नेहमी यशस्वी होतो आणि त्याच्या मनात जी इच्छा असते ती पूर्ण होते, असे त्या गृहस्थाने राजाला सांगितले. त्यानंतर त्याने राजाला एका विशिष्ट ठिकाणी या रासायनिक प्रयोगासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टींची सिद्धता करून ठेवून त्या ठिकाणी एकटे येण्याची विनंती केली. त्याप्रमाणे सर्व गोष्टींची सिद्धता करून राजा त्याला त्या ठरलेल्या ठिकाणी भेटला. त्या ठिकाणी त्या गृहस्थाने एका मोठ्या काहिलीत कित्येक दिवसपर्यंत तेल उकळले व त्या तेलाचा त्याला हवा होता तसा घट्ट द्रव झाल्यावर त्याने त्या राजास सांगितले, "आता तुम्ही या काहिलीत उडी टाका म्हणजे मी पुढील रासायनिक क्रिया पूर्ण करतो." पण राजाला त्या तप्त काहिलीत उडी टाकण्याचे धैर्य होईना. तेव्हा तो गृहस्थ अत्यंत संतप्त झाला व राजाला म्हणाला, "काहिलीत अंग झोकण्याचे धैर्य तुम्हाला होत नसेल तर मग मला तरी तसे करण्याची अनुमती द्यावी म्हणजे त्या रासायनिक प्रक्रियेचा लाभ मला मिळेल." यावर "तुला जसे वाटते तसे कर" असे राजाने म्हणताच त्या गृहस्थाने राजास वेगवेगळ्या औषधींच्या पुड्या दिल्या व विशिष्ट लक्षणे दिसल्यावर विशिष्ट वेळी कोणत्या पुडीतील औषधी काहिलीत टाका-वयाची ते सांगितले. मग तो गृहस्थ काहिलीजवळ गेला व त्याने आपले अंग त्या काहिलीच्या कढत तेलात झोकून दिले आणि त्याच्या अस्थि-मासाचे रूपान्तर एका प्रकारच्या लगद्यात झाले. त्या गृहस्थाने पूर्वसूचना दिल्यानुसार राजाने जवळ जवळ सर्व औषधी विशिष्ट वेळी त्या काहिलीत टाकल्या. शेवटच्या पुडीतील औषधी टाका-वयाचीच तेवढी राहिली होती. त्यानंतर तो प्रयोग संपणार होता. त्यावेळी राजाच्या मनात अचानक एक विचार आला. 'हा रासायनिक प्रयोग यशस्वी होऊन या

गृहस्थाला त्याची सर्व फळे प्राप्त होऊन तो अमर झाला तर आपले व आपल्या राज्याचे काय होणार ?' या विचाराने राजा अत्यंत त्रस्त झाला व त्याने त्या शेवटच्या पुडीतील औषधी काहिलीत टाकली नाही. त्यामुळे तिच्यातील रासायनिक मिश्रण थंड झाले. त्यात एक शुद्ध चांदीची आकृती सापडली. त्या आकृतीवर प्रयोग करणाऱ्या त्या गृहस्थाच्या अवयवांच्या रेषा उमटलेल्या होत्या.

रसायन– विद्येच्या संदर्भातच वल्लभी नगराचा राजा वल्लभ याच्या वेळची एक घटनाही येथील लोक सांगतात. एकदा एका सिद्ध पुरुषाने एका गुराख्यास 'थोहर' नामक वनस्पतीविषयी माहिती विचारली. ही वनस्पती तोडल्यावर तिच्यातून दूध येते. "जी वनस्पती तोडल्यावर तिच्यातून दुधाऐवजी रक्त येते, अशी एकादी वनस्पती तू जंगलात पाहिली आहेस काय ?" असा प्रश्न त्याने त्या गुराख्याला विचारला. तेव्हा त्याने होकारार्थी उत्तर दिले. सिद्ध पुरुषाने त्याला काही पैसे दिले आणि ती वनस्पती दाखविण्यास सांगितले. ती वनस्पती पाहिल्यावर त्या सिद्ध पुरुषाची खात्री पटली व त्याने ती वनस्पती जाळली. शेजारीच त्या गुराख्याचे कुत्रे उभे होते, तेही त्याने त्या आगीत फेकून दिले. त्यामुळे गुरख्याला संताप आला. त्याने त्या सिद्ध पुरुषाला उचलले आणि आगीत टाकून दिले. आग विझली तेव्हा आपल्या कुत्र्याचा आणि त्या सिद्ध पुरुषाचा देह सुवर्णमय झाल्याचे त्याच्या दृष्टोत्पत्तीला आले. त्याने आपला कुत्रा तेथून उचलून नेला व सिद्ध पुरुषाचा सुवर्णमय देह तेथेच टाकून दिला.

काही दिवसांनंतर त्या ठिकाणी एक शेतकरी आला व त्याने त्या सिद्ध पुरुषाचा देह पाहिला. त्याने त्या सिद्ध पुरुषाच्या देहाचे एक बोट कापले आणि 'रंक' नावाच्या गरीब फळ-विक्रेत्याला ते देऊन काही फळे विकत घेतली. नंतर तो शेतकरी पुन्हा त्या 'सोनेरी' सिद्ध पुरुषाकडे गेला. आणि पाहतो तो काय, जे बोट त्याने कापले होते, त्याच ठिकाणी नवीन बोट 'उगवले' होते. पुन्हा त्याने ते बोट कापले व ते त्या फळविक्रेत्याकडे नेले. "हे बोट तू कुठून आणलेस ?" असे त्या फळ–विक्रेत्याने त्याला विचारले, तेव्हा त्या भावड्या शेतकऱ्याने त्याला इत्थंभूत माहिती सांगितली. मग त्या फळविक्रेत्याने तो सुवर्णदेह गाडीत घालून आपल्या घरी आणला. आपल्या जुन्या, मोडकळीस आलेल्या घरात राहूनच त्याने हळूहळू आपल्या शहराचे वेगवेगळे भाग विकत घ्यायला प्रारंभ केला. शेवटी त्याने ते संपूर्ण शहरच विकत घेतले. वल्लभ राजाच्या मनात ते शहर विकत घ्यावयाचे होते म्हणून त्याने त्या फळविक्रेत्याला त्या शहराची किंमत विचारली. तथापि रंकाने- त्या फळविक्र्याने–शहर विकण्यास स्पष्ट नकार दिला. वल्लभ राजाच्या प्रकोपाला भिऊन तो आश्रयार्थ अल्मन्सूरच्या राजाकडे गेला. त्या राजाला त्याने अनेक मौल्यवान वस्तूंच्या भेटी दिल्या. वल्लभ राजापासून आपले रक्षण करण्यासाठी अल्मन्सूरच्या राजाने आपले सैन्य द्यावे अशी त्याने

विनंती केली. त्या रात्रीच त्या सैन्याने वल्लभ राजाच्या राजधानीवर अचानक हल्ला केला व त्याची संपूर्ण राजधानी उध्वस्त केली. अजूनही या ठिकाणी या राजधानीचे काही अवशेष आढळतात, असे लोक म्हणतात.

अशा प्रकारे रसायन– विद्येच्या साहाय्याने सोने तयार करण्याची एक प्रकारची हावच हिंदू राजांना लागली आहे. त्यांच्या या सुवर्ण–लोभाला सीमाच नाही. सोने तयार करण्याच्या प्रयोगासाठी लहान मुलांची हत्या करणे आवश्यक आहे, असे जर कुणी त्यांना सांगितले तर त्यासही ते मागेपुढे पाहणार नाहीत, हे 'अमूल्य' रसायन-शास्त्र या जगातून काढून कोणत्या तरी अशा दुर्गम स्थळी नेऊन ठेवायला हवे की जेथून ते कुणालाही कधीही परत पृथ्वीवर आणता येणार नाही. असे झाले तर किती बरे होईल !

इराण देशात इस्फंदियादविषयी पुढील आख्यायिका सांगतात : मृत्यूसमयी तो म्हणाला, 'कौस याला कायद्याच्या ग्रंथांत निर्देशिलेले अद्भुत सामर्थ्य प्राप्त झाले आहे. वृद्धापकाळात तो 'काफ' नामक पर्वतावर गेला. त्यावेळी वयोमानानुसार त्याचे शरीर अगदी वाकले होते. पण जेव्हा तो काफ पर्वतावरून परत आला तेव्हा त्यास नवयौवन प्राप्त झाले होते. परमेश्वराने त्याला पुन्हा तारुण्य देऊन मेघांच्या रथातून परत पाठविले.'

चेटूक आणि रसायनविद्या या प्रमाणेच मंत्रतंत्र व जादूटोणा यासारख्या गोष्टींवरही हिंदू लोक विश्वास ठेवतात. या शास्त्रांविषयी ज्या ग्रंथात विवेचन केले आहे तो ग्रंथ गरुडाने लिहिला, अशी त्यांची समजूत आहे. गरुड हे नारायणाचे वाहन होय. काही जण सिफ्रिड नावाच्या पक्षाशी व त्याच्या गुणधर्माशी गरुडाशी तुलना करतात. हा सिफ्रिड पक्षी माशांचा शत्रू आहे. पशुपक्षी नेहमी आपल्या शत्रूपासून सावध राहतात व त्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. तथापि गरुड हा पाण्याजवळ यावा म्हणून मासे पाण्यावर येतात. त्यामुळे त्याला मासे धरण्यास मुळीच अडचण पडत नाही. जणू त्याची मोहिनीच या माशांवर पडलेली असते !

काही जण करकोचाशी गरुडाची तुलना करून तो करकोच्याप्रमाणे असतो असे सांगतात. करकोचाची सर्व वैशिष्ट्ये गरुडात आढळतात असे ते म्हणतात. गरुडाचा रंग फिकट, पिंगट असतो, असे 'वायुपुराणा'त म्हटले आहे. गरुडासंबंधीची ही सर्व माहिती लक्षात घेता त्याचे करकोचाशीच अधिक साम्य असावे असे वाटते कारण गरुडाप्रमाणे करकोचा हा सापांचा शत्रू आहे.

हिंदूंचे बहुतेक मंत्र सर्पदंशासाठीच आहेत. या मंत्रांवर मात्र त्यांची अढळ श्रद्धा आहे, हे पुढील उदाहरणांवरून दिसून येईल. सर्पदंशामुळे एक गृहस्थ निधन पावला पण मंत्राच्या साहाय्याने तो पुन्हा जिवंत झाला, अशी माहिती मला येथे एका गृहस्थाने सांगितली.

दुसऱ्या एका माणसाने मला पुढील गोष्ट सांगितली : सर्पदंशामुळे एक गृहस्थ मृत्युमुखी पडला. त्याच्यावर मंत्रप्रयोग केल्यावर तो पुन्हा जिवंत झाला. त्यानंतर त्याने आपले मृत्युपत्र केले. जेथे संपत्ती ठेवली होती ती जागा दाखविली पण पुढे एका भांड्याचा वास घेतल्यामुळे त्याला पुन्हा मृत्यू आला.

जेथे मांत्रिक नाही अशा गावी एखाद्याला सर्पदंश झाल्यास त्याला वेतावर बांधून त्यावर एक पान बांधतात. त्या पानावर त्या व्यक्तीला आपल्या मंत्रसामर्थ्याच्या साहाय्याने बरे करणाऱ्या माणसाचे नाव लिहून आशीर्वाद दिलेला असतो. ती व्यक्ती सर्पदंश झालेल्या व्यक्तीला मंत्रसामर्थ्याने वाचविते, अशी येथील लोकांची समजूत आहे.

या बाबतीत काय मत प्रकट करावे हेच मला समजत नाही. माझा स्वतःचा तरी मंत्रतंत्रावर मुळीच विश्वास नाही. ज्या माणसाचा मंत्रतंत्रावर मुळीच विश्वास नव्हता, त्याने मला पुढील हकीगत सांगितली. एकदा या गृहस्थावर विषप्रयोग करण्यात आला असता काही जणांनी हिन्दू मांत्रिकांना उपचारासाठी बोलाविले. त्यांनी काही मंत्र म्हटले आणि हवेत डहाळ्यांच्या साहाय्याने काही रेषा काढल्या. त्यामुळे तो पूर्ववत् बरा झाला.

मंत्रांच्या साहाय्याने ते हरिणांना आपल्या हाताने धरीत असल्याचे मी स्वतः पाहिले आहे. एक हिंदू तर आत्मविश्वासाने मला असेही म्हणाला की, "मी हरणाला हात न लावता त्याला ( आपल्या मंत्रसामर्थ्याने ) माझ्यासमोर येण्याची आज्ञा देईन व सरळ स्वयंपाकघरात पाठवून देईन !" तथापि या गोष्टी मंत्राऐवजी एका विशिष्ट पद्धतीने साध्य करता येतात असे मला वाटते. जनावरांसमोर हळुहळू सातत्याने विशिष्ट प्रकारचा आवाज किंवा सूर काढल्याने त्यांना त्याची सवय होऊ लागते व त्यामुळे त्यांच्यावर अशा प्रकारची हुकमत गाजविता येते. आपल्याकडे डोंगराळ रान—बोक-डांची शिकार अशाच पद्धतीने करतात. ही रान-बोकडे कितीतरी भयानक व हिंस्त्र असतात. जेव्हा ही जनावरे विश्रांती घेत असतात, तेव्हा हे शिकारी त्यांच्याभोवती वर्तुळाकार फिरत फिरत काही स्वर गुणगुणतात. पुढे पुढे या गोष्टीचा जनावरांना सराव होतो. त्यानंतर ते जनावरांभोवतीच्या वर्तुळाचा आकार कमी कमी करीत फेर धरीत, तेच परिचित स्वर किंवा तीच परिचित तान गुणगुणतात. जनावरांना या सर्व गोष्टींची सवय झाल्यावर ते त्यांची अगदी जवळून शिकार करतात. 'कता' नावाच्या पक्षांची शिकारही अशाच पद्धतीने करतात. रात्री तांब्याच्या भांड्यांचा विशिष्ट प्रकारचा आवाज काढल्यास त्याचा त्या पक्षांना सराव होतो मग त्यांना हातानेसुद्धा धरता येते. मात्र आवाजाची पद्धती किंवा ठेका बदलला की हे पक्षी बिथरून दिसेल त्या दिशेने उडून जातात. तथापि आपल्याकडील सर्व गोष्टींचा मंत्रतंत्राशी संबंध नाही. मृगयेच्या त्या विशिष्ट पद्धती, प्रघात आहेत. उभ्या खांबावर चढून चेंडू खेळणे

किंवा दोरी सरळ उभी करणे इ. गोष्टीमुळे हिंदू लोक जादूगार असावेत असे लोकांना वाटते पण ही जादू नसून त्या 'युक्त्या' आहेत व या युक्त्या अनेक देशांत प्रचलित आहेत. त्यात जादू किंवा चेटूक असा काहीच प्रकार नाही.

# १८

## अ) भारताचे स्वाभाविक प्रदेश
## आ) भारतातील नद्या
## इ) भारताच्या सीमा

पृथ्वीच्या उत्तरार्धातील अर्ध्या भागात म्हणजे पृथ्वीच्या $\frac{1}{4}$ भागातील वस्ती कशा प्रकारची असेल याची कल्पना वाचकांनीच करावी. या प्रदेशाला समुद्राने पूर्वेकडून व पश्चिमेकडून वेढले आहे. ग्रीकांच्या ग्रंथांत याविषयी उल्लेख असल्याचे आढळते. या प्रदेशाच्या पूर्वेकडे वा पश्चिमेकडे जे प्रदेश किंवा जी बेटे असतील त्यांच्यामध्ये आणि त्यांच्या अलीकडील मानवाने वस्ती केलेल्या प्रदेशामध्ये या समुद्रामुळे एक प्रकारची तटबंदीच निर्माण झाली आहे. तेथील हवा आणि पाणी यात एक प्रकारचा जडपणा असल्यामुळे समुद्रपर्यटनात कित्येक अडचणी निर्माण होतात. त्यातून वाट काढता येत नाही. आणि एवढा धोका पत्करूनही प्रवास केलाच तरी त्यांतून काही फारसे लाभदायक निष्पन्न होईल अशी खात्री नाही. या समुद्रात प्रवेश करू नये म्हणून प्राचीन लोकांनी त्याच्या किनाऱ्यावर काही ( स्तंभादी ) सूचनादर्शक चिन्हे उभारली आहेत.

कडक थंडीमुळे, लोकवस्ती असलेल्या जगाचा उत्तरेशी फारसा संबंध येत नाही. तथापि भूशिरासारख्या काही प्रदेशांशी मात्र जगाच्या इतर प्रदेशांतील लोकांचा थोडा फार संबंध येतो. दक्षिणेकडे हा विभाग सागरापर्यंत पसरला आहे. या दक्षिण समुद्रात मात्र दळणवळण चालते. तथापि ह्या दक्षिणेकडील समुद्राचा किनारा म्हणजे वस्ती असलेल्या जगाची अंतिम सीमा नव्हे. या समुद्रात दूरवरच्या प्रदेशात कित्येक लहानमोठी बेटे विखुरली आहेत. जणू जमीन आणि पाणी यांची या ठिकाणी एक-मेकांशी स्पर्धाच चालली आहे की काय, असे वाटू लागते. काही ठिकाणी खंडाचा काही भाग समुद्रात शिरतो तर काही ठिकाणी समुद्र खाड्यांच्या रूपाने खंडात प्रवेश करतो.

पृथ्वीच्या पश्चिमार्धाकडे ह्या खंडाचे टोक समुद्रात खूप दूरवर शिरले आहे आणि

त्यामुळे दक्षिणेकडील या प्रदेशाचा किनाराही अत्यंत विस्तीर्ण असा झाला आहे. या किनाऱ्यावरील सखल प्रदेशात पश्चिमेकडील निग्रो लोक राहतात. गुलामांची आयात याच प्रदेशातून होते. येथे चंद्राचे पर्वत असून त्यात नाइल नदीचा उगम झाला आहे. येथील समुद्र–किनाऱ्यावर व बेटांवर 'झांज' लोकांच्या टोळ्या राहतात. पृथ्वीच्या पश्चिमार्धात बर्बेराचा उपसागर, क्लेस्माचा उपसागर (:तांबडा समुद्र), पर्शियाचे आखात (पर्शियन गल्फ) इ. कित्येक उपसागर व आखाते आहेत. या उपसागरांच्या, आखातांच्या व खाड्यांच्या अलीकडे–पलीकडे पश्चिम खंडाचे दर्शन घडते.

पृथ्वीच्या पूर्वार्धातील उत्तर खंडात समुद्र खूपच आत दूरवर शिरला आहे. त्यामुळे त्या प्रदेशात उपसागर व खाड्या निर्माण झाल्या आहेत. हे उपसागर म्हणजे त्या सागराचेच छोटे छोटे विभाग असून या प्रदेशातील उपसागरांना किंवा खाड्यांना या खंडातील नद्या येऊन मिळतात. त्यामुळे तेथे कित्येक नद्यांची मुखे आढळतात. हा सागर ज्या ज्या स्थलांना स्पर्श करतो, त्या त्या ठिकाणी त्या स्थलावरून, किनाऱ्यावरून वा बेटावरून त्यास नाव दिले गेले आहे. येथे आपणास या सागराने जेथे भरतखंडास वेढले आहे, त्या प्रदेशापुरताच विचार करावयाचा आहे. हिंदुस्थानाभोवतीच्या सागरास 'हिंदी महासागर' असे म्हणतात.

जगाच्या ज्या प्रदेशात लोकवस्ती झाली आहे, त्या प्रदेशाच्या स्वाभाविक विभागांकडे एक दृष्टिक्षेप टाकल्यास पृथ्वीच्या मध्यभागी असलेल्या अक्षांशावर एक उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारी उंचच उंच पर्वतांची रांग एखाद्या प्रचंड पाईन वृक्षाप्रमाणे ताठ उभी असल्याचे दिसते. या प्रदेशातील पूर्व-पश्चिम रेखांश चीन, तिबेट, तुर्कस्तान, काबूल, बधक्षान, तोखारिस्तान, बामियान, एल्घोर, खुरासान, मेदिया आधरबैजान, रोमन साम्राज्य, फ्रान्स व जलालीक (गॅलीशियन) लोकांचा देश यातून जातो. हा प्रदेश जसा लांबच लांब आहे तसाच अत्यंत रुंदही आहे. पर्वतांतून आलेल्या नद्यांच्या पाण्याने येथील मैदाने भिजतात. हिंदुस्थान देश म्हणजे यापैकीच एक विस्तृत मैदान होय. भारताचा दक्षिणेकडील किनारा हिंदी महासागराने व्यापला आहे. पर्वतांनी इतर तिन्ही दिशांना या देशास वेढले आहे.

या देशात विविध प्रकारचे दगड सापडतात. येथील जमीन खोलवर खणल्यास तेथे गोलाकार दगड सापडतात. डोंगराजवळ नद्यांच्या गतिमान प्रवाहांजवळ प्रचंड आकाराचे दगड आढळतात. तथापि डोंगरापासून दूर अंतरावर असलेल्या प्रदेशात तसेच जेथे नद्यांचा प्रवाह अत्यंत मंदपणे वाहतो, त्या प्रदेशात मात्र अत्यंत लहान लहान आकाराचे दगड सापडतात. आणि नद्यांच्या प्रवाहात घासून घासून अत्यंत लहान झालेले दगड वाळूच्या रूपाने त्यांच्या मुखाशी सागराजवळ इतस्ततः विखुरलेले असतात. या सर्व गोष्टी व भारताची विस्तृत भूमी पाहिल्यास, या ठिकाणी एके काळी

समुद्र होता व त्यातूनच तेथील प्रवाहातील गाळ जमून हा प्रदेश वर आला असावा, या गोष्टीवर तुमचा विश्वासदेखील बसणार नाही.

कनोजच्या भोवतालचा प्रदेश हा भारताच्या मध्यावरील प्रदेश असून त्याला 'मध्यदेश' असे म्हणतात. भौगोलिक दृष्ट्या समुद्र आणि पर्वत, उष्ण व शीत प्रदेश, देशाची पूर्व व पश्चिम सीमा यांच्या मध्यावर तर हा प्रदेश आहेच तथापि याच प्रदेशात पूर्वी राजे व पराक्रमी पुरुष होऊन गेले. त्यामुळे राजकीय दृष्ट्याही अनेक महत्त्वाच्या घडामोडींचे केन्द्रस्थान म्हणून त्याचे महत्त्व विशेष आहे.

सिंधदेश कनोजच्या पश्चिमेस आहे. आपल्या देशातून सिंध देशाला जावयाचे असल्यास आपण निमरोज किंवा सिजिस्तानकडून जातो. तथापि हिन्द देशात जावयाचे असल्यास आपण काबूलच्या वाटेने जातो. या देशास जाण्यासाठी केवळ हाच एक मार्ग नाही. भारतात जाण्यासाठी इतर कित्येक मार्ग आहेत. त्या मार्गांतले अडथळे मात्र तुम्हास दूर करता आले पाहिजेत. हिंदच्या सीमेवर कित्येक पर्वत आहेत. तेथे हिंदूंच्या किंवा तत्सम जमातींच्या कित्येक टोळ्या राहतात. या टोळ्यांतील लोक अत्यंत रानटी वंशाचे असावेत असे वाटते. या सीमाप्रदेशात या रानटी लोकांच्या टोळ्या दूरवर विखुरलेल्या आहेत.

कनोज गंगेच्या पश्चिमेकडे आहे. प्राचीन काळी हे एक फार मोठे शहर होते तथापि सध्या मात्र तेथे फक्त अवशेषच आढळतात. गंगेच्या पूर्वेकडे 'बारी' हे शहर आहे. राज्यकर्त्यांनी कनोजहून बारी येथे राजधानी हलविल्यावर कनोजचे महत्त्व कमी झाले. कनोजहून बारीला जाण्यासाठी तीन–चार दिवस लागतात. ज्याप्रमाणे कनोज हे नगर पांडूच्या मुलांमुळे प्रसिद्धीस आले, त्याचप्रमाणे माहूर (मथुरा) हे नगर वासुदेवामुळे नावारूपास आले. माहूर हे नगर यमुनेच्या पूर्वेला असून ते कनोजपासून २८ फर्सख इतक्या अंतरावर आहे.

तानेशर (स्थानेश्वर) हे नगर दोन नद्यांमध्ये वसलेले असून ते कनोज आणि माहूर यांच्या उत्तरेस आहे. ते कनोजपासून ८० फर्सख व माहूरपासून ५० फर्सख इतक्या अंतरावर आहे.

वर निर्देशिलेल्या पर्वतात गंगा नदी उगम पावते. तिच्या उगमस्थानाला 'गंगाद्वार' असे म्हणतात. या देशातील बहुतेक इतर नद्याही याच पर्वतराजीतून उगम पावतात. त्याविषयी अन्यत्र माहिती सांगितलीच आहे.

ज्यांनी स्वतः भारत हा देश पाहिलेला नाही, त्यांना या देशाच्या वेगवेगळ्या प्रांतातील अंतराबद्दल परंपरेने चालत आलेली जी ऐकीव माहिती आहे, तिच्यावरच विसंबून राहावे लागते. अशा प्रकारच्या माहितीत आख्यायिकांच्या सारखा अनावश्यक तपशीलही येत असल्याने खुद्द टॉलेमीने या पारंपरिक माहितीवर विश्वास ठेवण्यास काहीसा विरोध दर्शविला आहे. अंतर मोजण्याच्या हिंदूंच्या पद्धतीतील चुका मी

शोधून काढल्या आहेत व त्यावरून येथील वेगवेगळ्या स्थळांमधील अंतर किती, हे शोधून काढण्यासाठी मी एक पद्धती ठरविली आहे. दोन स्थानांमधील अंतर मोजण्याची हिंदूंची पद्धती पुढीलप्रमाणे आहे. एक बैल २००० ते ३००० मण ओझे वाहून नेऊ शकतो, असे ते प्रथम गृहीत धरतात. (वस्तुतः प्रत्यक्षात इतके ओझे नेण्याची ताकद बैलात नसते.) या गृहीत तत्त्वाच्या आधारे तो किती दिवसांत हे ओझे गाडीने घेऊन जाऊ शकेल हे ठरवितात. एका दिवसांत बैल किती अंतर चालून गेला, हे पाहून त्यानुसार एखाद्या स्थळी जावयास जितके दिवस लागतात, त्याच्या आधारे ते एका स्थळापासून दुसऱ्या स्थळास जावयाचे अंतर ठरवितात. अशा प्रकारे एक स्थळ हे दुसऱ्या स्थळापासून किती 'दिवसांच्या' अंतरावर आहे हे ते ठरवितात तथापि हिंदूंच्या या पद्धतीमुळे भिन्न भिन्न स्थळांतील अंतर मोजणे अत्यंत कठीण होऊन बसले आहे. एवढे करूनही ही पद्धती निर्दोष आहे, तिच्यामुळे आपल्याला अचूक अंतर काढता येते, असेही म्हणता येत नाही. तसेच ही पद्धती अत्यंत त्रासाची व दगदगीची वाटते. त्यांनी या सदोष पद्धतीमुळेच, वेगवेगळ्या प्रदेशांतील अंतरासंबंधी जी माहिती सांगितली आहे, ती जशीच्या तशी आपण स्वीकारावी की नाही याबद्दल संभ्रम वाटतो. तथापि त्यातील चुका कळण्याच्या आधीच ती पूर्णतया नाकारता येत नाही किंवा ती संपूर्णपणे चुकीची आहे असेही म्हणवत नाही. आणि म्हणूनच, त्यांतील चुकांबद्दल वाचकांची प्रथमतःच क्षमा मागून, उपलब्ध झालेली माहिती पुढे देत आहे—

जौन (यमुना) आणि गंगा या नद्यांच्या किनाऱ्यांमधील प्रदेशांतून, कनोजकडून दक्षिणेकडे जाताना पुढील सुप्रसिद्ध स्थळे लागतात. (अंतर मोजण्याचे परिमाण : १ फर्सख=४मैल किंवा १ क्रोह)

जजमौ : (कनोजपासून) १२ फर्सख, अभापूरी : ८ फर्सख, कुरह : ८ फर्सख, ब्रह्मशील : ८ फर्सख, प्रयाग येथील वृक्ष : १२ फर्सख. या ठिकाणी गंगेस 'जौन' (यमुना) नामक नदी येऊन मिळते व येथे हिंदू लोक स्वतःचाच विविध प्रकारे छळ करतात. याविषयी त्यांच्या धर्मग्रंथांत बरीच माहिती आढळते. जेथे गंगा नदी सागराला मिळते ते स्थळ प्रयागपासून १२ फर्सखवर आहे.

प्रयाग – वृक्षापासून देशाच्या दक्षिण किनाऱ्याकडे जाण्यासाठीही पुढील मार्ग आहेत—

अर्कुतीर्थ : (प्रयागपासून) १२ फर्सख

उवर्यहार : ४० फर्सख

(किनाऱ्यावरील) ऊर्दविशार : ५० फर्सख

तेथून पूर्व किनाऱ्यावरील प्रदेशात सध्या 'जौर' नामक राजाचे राज्य आहे.

दरौर : (ऊर्दबीशाउपासून) ४० फर्सख

कांजी : ३० फर्सख

मलय : ४० फर्सख

कुंक : ३० फर्सख ('जौर' राजाच्या अधिसत्तेखालील शेवटच्या टोकाचे शहर)

बारी शहरापासून गंगेच्या पूर्वेकडे पुढील स्थळे लागतात—

अजोदह : (बारीपासून) २५ फर्सख

सुप्रसिध्द 'बनारसी' (वाराणसी) : २० फर्सख

त्यानंतर दिशा बदलून, दक्षिणेकडे न जाता पूर्वेकडे गेल्यास वाटेत पुढील स्थळे लागतात—

शर्वार : ('बनारसी'पासून) ३५ फर्सख

पाटलीपुत्र : २० फर्सख

मुन्गीरी : १५ फर्सख

जंप (जन्प) : ३० फर्सख

दुगुम्फर : ५० फर्सख

गंगासायर : ३० फर्सख. या ठिकाणी गंगा सागरास मिळते.

कनोजकडून पूर्वेकडे आल्यास पुढील शहरे लागतात—

बारी : १० फर्सख

दुगम : ४५ फर्सख

सिल्हरचे साम्राज्य : १० फर्सख

बिहार (राज्य) नगर : १२ फर्सख.

येथून देशाच्या पूर्वेकडे जो भाग आहे, त्यास 'तिल्वत' असे म्हणतात. येथील 'तुरू' लोकांचा रंग अत्यंत काळा असून त्यांचे नाक तुर्की लोकांप्रमाणे पसरट असते. येथून आपल्याला समुद्रापर्यंत पसरलेल्या 'कामरू' नामक पर्वतापर्यंत जाता येते.

त्यामुळे नेपाळ राज्याची सीमा लागते. एका गृहस्थाने या प्रदेशात बराच प्रवास केला होता. तो मला येथे भेटला. त्याने या प्रदेशाविषयी पुढील माहिती सांगितली—

'तनवत'पासून प्रथम पूर्वेला व नंतर डावीकडे वळल्यावर २० फर्सख इतक्या अंतरावर नेपाळ देश लागतो. नेपाळहून भोतेशर येथे यावयास मला ३० दिवस लागले. या दोन्ही स्थळांमधील अंतर ८० फर्सख इतके असून वाटेत बरीच चढण लागते. या प्रवासात एकच नदी कित्येक वेळा ओलांडावी लागते. या नद्या ओलांडण्यासाठी या प्रदेशात बांबूचे पूल तयार केले आहेत. दोरखंडाच्या साहाय्याने फळ्या बांबूंना बांधून ह्या लाकडी पुलाच्या दोरखंडाची टोके दोन्ही किनाऱ्यावरील दगडांना किंवा खडकांना घट्ट बांधलेली असतात. या पुलावरून लोक खांद्यावर ओझी घेऊन जातात. पुलाच्या खाली सुमारे १०० यार्डावर बर्फासारखे पांढरे शुभ्र पाणी फेसाळत असते. किनाऱ्यावरील खडकांना जणू ते एकसारखे आव्हानच देत असते. पुलाच्या

दुसऱ्या टोकाला पोचल्यावर लोक ओझे वाहण्यासाठी बोकडांचा उपयोग करतात. या प्रदेशात मी चार डोळ्यांची हरणे पाहिली. ही चार डोळ्यांची हरणे म्हणजे केवळ एक निसर्गातील अपवादात्मक वा योगायोगाने घडून आलेला चमत्कार नसून ती येथील हरणांची एक स्वतंत्र जातच आहे, अशी माहिती मला भेटलेल्या त्या इसमाने सांगितली.

'भोतेशर' ही तिबेटची पहिली सीमा होय. येथे गेल्याबरोबर लोकांचा वंश, भाषा व वेश यात एकदम ठळकपणे जाणवण्याइतका फरक असल्याचे आढळते. या स्थळापासून पर्वताचे अत्युच्च शिखर २० फर्सख इतक्या अंतरावर आहे. या सर्वोच्च शिखरावरून भारताकडे पाहिल्यास त्या ठिकाणी एक विस्तीर्ण काळसर मैदान असावे असे वाटते. तिबेट आणि चीन हे देश तांबूस रंगाचे दिसतात. याच्या उतारावरील प्रदेशात गेल्यास चीन व तिबेट या दोन देशांत एका फर्सखापेक्षाही कमी अंतर असेल, असे मला वाटते.'

कनोजच्या आग्नेयेस, गंगेच्या पश्चिमेकडे, (कनोजपासून ३० फर्सख अंतरावर) 'जजाहुती' नामक राज्य लागते. 'कजूराह' ही राज्याची राजधानी होय. कजूराह आणि कनोज या दोन शहरांच्या मध्येच ग्वालियर आणि कालंजर येथील भारताचे दोन सुप्रसिद्ध किल्ले आहेत. येथील 'दहाल' नामक राज्याची राजधानी 'तिऔरी' ही असून तेथे 'गंगेय' नावाचा राजा राज्य करतो.

तेथून पुढे २० फर्सखांवर कन्नकर नामक राज्य असून तेथील समुद्रकिनाऱ्यावर अप्सूर, बनवास ही शहरे आहेत.

कनोजकडून ईशान्येकडे गेल्यास पुढील शहरे लागतात. :–

| | | |
|---|---|---|
| आसी | | (कनोजपासून) १८ फर्सख |
| सहन्या | : | १७ फर्सख |
| जन्द्रा | : | १८ फर्सख |
| राजौरी | : | १५ फर्सख. |

बझाना (गुजरातची राजधानी) २० फर्सख. आपल्याकडील लोक या शहरालाच 'नारायण' असे म्हणतात. या शहराचा पाडाव झाल्यावर येथील लोकांनी 'जदूरा' या ठिकाणी वास्तव्य केले.

माहूर व कनोज यातील अंतर बझाना व कनोज यातील अंतराइतकेच– म्हणजे २८ फर्सख इतके– आहे. माहूरहून उजैनीकडे गेल्यास बहुधा पाच पाच फर्सखांवर एक एक गाव लागते. अशा प्रकारे ३५ फर्सख चालून गेल्यावर दूदही नावाचे खेडे लागते. तेथून १७ फर्सखांवर 'बामहूर' आणि ५ फर्सखांवर 'भाइलसान' ही शहरे आहेत. 'भाइलसान' हे येथील एक सुप्रसिद्ध स्थळ आहे. भाइलसान या नावाच्याच देवतेचे एक मंदिर या गावी आहे. भाईलसाननंतर ९ फर्सखांवर आर्दीन हे गाव

लागते. येथील लोक 'महकाळ' नामक देवतेची उपासना करतात. तेथून धार ७ फर्सखांवर आहे.

बझानाच्या दक्षिणेस २५ फर्सखांवर 'मैवार' नामक संस्थान लागते. 'जत्रौर' ही या संस्थानाची राजधानी होय. येथून 'मालवा' संस्थानाची राजधानी धार ही २० फर्सखांवर आहे. धारच्या पूर्वेस ७ फर्सखांवर उजैन नामक शहर आहे. मालवा राज्यातील भाइलसान हे नगर उजैनपासून १० फर्सखांवर आहे.

धारच्या दक्षिणेस २० फर्सखांवर 'भूमिहर' नामक शहर आहे. पुढे २० फर्सखांवर कंद, १० फर्सखांवर नर्मदेच्या तीरावरील नमावुर, २० फर्सखांवर अलीसपुर आणि त्यानंतर ६० फर्सखांवर गोदावर नदीच्या तीरावर मंदगिर ही नगरे आहेत.

'नमिय्य' नावाची दरी धारच्या दक्षिणेस ७ फर्सखांवर आहे. पुढे १८ फर्सखांवर 'महरट्ट देश' आणि २५ फर्सखांवर 'कुंकन' (कोकण) प्रांत व त्याची समुद्रकिनाऱ्यावरील 'तान' (ठाणे) ही राजधानी आहे. या कुंकन प्रांतातील दानक नावाच्या सपाट मैदानावर 'शख' (सं. शरभ) नावाचा एक प्राणी आढळतो. या प्राण्यास चार पाय असतात. त्याच्या पाठीवरही चार पाय असतात. त्याला एक लहान सोंड असून लांब व तीक्ष्ण शिंगे असतात. या शिंगांच्या साहाय्याने तो हत्तीवर चालून जातो. त्याचा निःपात करतो. त्याचा आकार म्हशीसारखा असला तरी तो 'गंडा' (गेंडा) या प्राण्यापेक्षाही प्रचंड असतो. कधी कधी हा प्राणी एखाद्या जनावराच्या शरीरात आपली शिंगे खुपसतो व त्याला आपल्या पाठीवरील चार पायांत घट्ट आवळून ठेवतो. तेथे जनावर काही दिवसांनंतर कुजू लागते. त्यात आळ्या होतात व त्या या प्राण्याच्या पाठीत शिरतात. त्यामुळे होणाऱ्या वेदनांनी तो अत्यंत त्रस्त होतो व झाडास पाठ घासून घासून काही दिवसानंतर मरण पावतो, अशी या प्राण्यासंबंधीची माहिती काही जणांनी मला सांगितली.

हा प्राणी आपला मृत्यू स्वतःच कसा ओढवून घेतो याविषयी काही जणांनी मला पुढील माहिती सांगितली : विजेचा कडकडाट ऐकल्यावर तो एखाद्या प्राण्याचाच आवाज आहे असे या विचित्र प्राण्यास वाटते आणि मग तो आपल्या या काल्पनिक शत्रूशी झुंज देण्यास सज्ज होतो. त्याचा शोध घेण्यासाठी तो पर्वतांच्या शिखरांवर चढतो आणि तेथून शत्रूच्या अंगावर तो झेप घेतो. त्यानंतर अर्थातच तो दरीत कोसळतो आणि त्याच्या शरीराच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होतात.

'गंडा' (गेंडा) नावाचा प्राणीदेखील हिंदुस्थानात अनेक ठिकाणी आढळतो. गंगेच्या काठावरील प्रदेशात तर तो विशेषेकरून आढळतो. त्याचा आकार म्हशीसारखा असून त्याच्या अंगावरची कातडी राठ व काळसर असते. त्याच्या हनुवटीच्या खाली एक पसरट कातडे लोंबत असताना दिसते. त्याच्या प्रत्येक पायाला तीन पिवळी खुरे असतात. या तीन खुरांपैकी मधले खूर बरेच मोठे असते. त्याचे

शेपूट आखूड असून डोळे (इतर प्राण्यांच्या डोळयांशी तुलना करता) तोंडाच्या थोड्याफार खालील भागात असतात. त्याच्या नाकाच्या शेंड्यावर एक बाकदार व अणकुचीदार शिंग असते. केवळ ब्राह्मणांनाच गंड्याचे (गेंड्याचे) मास खाण्याचा हक्क आहे.

एकदा एक हत्ती एका तरुण गंड्यावर चालून गेला तेव्हा त्या तरण्याबांड गंड्याने हत्तीवर घेतलेली झेप मी स्वतःच्या डोळयांनी पाहिली आहे. त्याने हत्तीचा पुढील पाय आपल्या शिंगाने जायबंदी केला व हत्तीला क्षणार्धात लोळविले.

'कर्कदन्त' नावाचा प्राणी म्हणजेच गंडा, (गेंडा) अशी माझी समजूत होती तथापि नीग्रोंच्या देशातील 'सुफाल' येथे जाऊन आलेला एक गृहस्थ मला म्हणाला की, कर्कदन म्हणजे गंडा (गेडा) नसून नीग्रो लोक ज्याला 'इम्पीला' असे म्हणतात, त्या प्राण्याशी कर्काचे बरेच साम्य असल्याचे आढळते. आपल्या शस्त्रांच्या मुठी याच प्राण्याच्या शिंगांपासून तयार करतात. या प्राण्याच्या डोक्यावर एक तीक्ष्ण शिंग असते. हे शिंग खालील बाजूला पसरट होत जाते. ते आतील बाजूस काळे असून इतरत्र पांढरे असते. या प्राण्यास समोरील बाजूसच आणखी एक अधिक लांबट आकाराचे शिंग असते. एखादी वस्तू चिरावयाची वा उचलावयाची असल्यास हे शिंग त्याला वर उचलता येते व हवे तसे हलविता येते. हे शिंग खडकांवर घासून हा प्राणी त्यास 'धार लावीत' असतो. अशा प्रकारे हे शिंग तीक्ष्ण झाल्यामुळे तो ते कोठेही खुपसू शकतो त्यामुळे त्याला कोणतीही वस्तू उभी चिरता येते. या प्राण्याच्या पायांना खुरे असून त्यांस गाढवाच्या शेपटाप्रमाणे एक केसाळ शेपूट असते.

नाईल नदीत जशा सुसरी आहेत त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील नद्यांतही सुसरी आहेत. त्यामुळेच बिचाऱ्या भोळया अल्जाहिजला सिंधमधील 'मुहूरान्' ही नदी नाईलचीच एक उपनदी असावी असे वाटले. भारतातील नद्यांत सुसरीच्या गटातील आणखी कित्येक आश्चर्यकारक प्राणी आढळतात. मकर, वेगवेगळया प्रकारचे चमत्कारिक मासे, 'बुर्लू' नावाचा कातडी पिशवीसारखा प्राणी इ. चा या संदर्भात निर्देश करता येईल. बुर्लू हा प्राणी पाण्यात पोहत असल्याचे जहाजातील प्रवाशांनी अनेकदा पाहिले आहे. श्वासोच्छ्वास करण्यासाठी त्याच्या डोक्यावर एक छिद्र असते असे म्हणतात. मला वाटते, हा समुद्रातील एक प्रकारचा (रंग बदलणारा) मासा असावा.

दक्षिण हिंदुस्थानातील नद्यांत आणखी एक वेगळाच प्राणी आढळतो. त्यास 'ग्राह', 'जलतंतू' आणि 'तन्दुआ' अशी नावे आहेत. हा प्राणी सडपातळ व लांबसडक असतो. एखादा मनुष्य वा प्राणी जेव्हा पाण्यात येतो, तेव्हा तो टेहेळणी करून त्यावर लक्ष ठेवतो आणि मग तो त्यांच्यावर (प्राण्यावर वा माणसावर) एकदम हल्ला करतो. प्रथम तो आपल्या भक्ष्याभोवती वर्तुळाकार हिंडून त्यास लपेटून घेतो. मग आपल्या शरीरानेच त्याच्या पायाभोवतीही वेढा घालून त्याला आवळतो. ही पकड घट्ट झाली

की ते भक्ष्य मृत्युमुखी पडते. ज्याने हा प्राणी प्रत्यक्ष पाहिला, त्याने मजसमोर त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे : " या प्राण्याचे डोके कुत्र्याच्या डोक्याप्रमाणे असून त्याच्या शेपटाला काट्यासारखे तंतू असतात. आपल्या भक्ष्याभोवती तो हे तंतू आवळतो. आपल्या स्पर्शेंद्रियांच्या साहाय्याने तो आपले भक्ष्य जवळ ओढू शकतो. आणि एकदा त्याच्या शेपटीचा वेढा पडला की ते जनावर (भक्ष्य) मरणाच्या पंथाला लागलेच म्हणून समजावे. "

हे थोडेसे विषयांतर झाले. आता आपण पुन्हा आपल्या मूळ विषयाकडे वळू.

वझानाच्या नैऋत्येस ६० फर्सखांवर ' अनहिलवार ' शहर लागते. सोमनाथ समुद्रकिनाऱ्यावर असून ते अनहिल्वार पासून ५० फर्सख इतक्या अंतरावर आहे.

अनहिलवारच्या दक्षिणेस ' लारदेश ' आहे. या देशाच्या ' बिहरोज ' आणि ' रिहंजूर ' या दोन राजधान्या असून त्या अनहिल्वारपासून ४२ फर्सखांवर आहेत. ही दोन्ही शहरे तानच्या पूर्वेस असून ती समुद्रकिनाऱ्यावर आहेत.

वझानाच्या पश्चिमेला ५० फर्सखांवर मुल्तान आणि १५ फर्सखांवर भाटी ही शहरे आहेत. भाटीच्या नैऋत्येस १५ फर्सखांवर अरोर नदीच्या काठावरील एक गाव आहे. इतर गावे (त्यातील अंतरांसह) : ब्रम्हनवा अल्मन्सूरा : २० फर्सख (सिंध नदीच्या मुखाजवळील) लोहरानी : ३० फर्सख.

कनोजच्या वायव्येस ५० फर्सखांवर ' शिर्शारह ' हे शहर आहे. तेथून पुढे १८ फर्सखांवर पर्वतराजीत वसलेले पिंजौर हे शहर असून त्याच्यासमोरील मैदानातच ' तानेशर ' नगर आहे. पर्वताच्या पायथ्याशी, सुमारे १८ फर्सखांवर ' दहमाल ' ही जालंधरची राजधानी आहे. पुढे १० फर्सखांवर ' बल्लावर ' असून त्याच्या पश्चिमेला १३ फर्सखांवर ' लद्दा ', ८ फर्सखांवर ' राजगिरी ' दुर्ग आणि तेथून उत्तरेस २५ फर्सखांवर कश्मीर आहे.

कनोजच्या पश्चिमेस १० फर्सखांवर दियामौ, पुढे प्रत्येक १० फर्सखांवर अनुक्रमे कुटी, आनार, मीरत, पानिपत ही शहरे आहेत. मीरत व पानिपत या दोन शहरांमधून ' जौन ' नदी वाहते. यापुढे प्रत्येक १० फर्सखांवर अनुक्रमे ' कवीतल ' आणि ' सुनाम ' ही गावे आहेत.

तेथून वायव्येकडे वळल्यास ९ फर्सखांवर आदितहौर, पुढे ६ फर्सखांवर जज्जनीर, ८ फर्सखांवर इराव नदीच्या पूर्व किनाऱ्यावर लौहावुरची राजधानी मंदहुकूर. १२ फर्सखांवर ' चन्द्राह ' नदी, ८ फर्सखांवर बियात नदीच्या पश्चिमेकडे जैलम नदी, तेथून २० फर्सखांवर सिंध नदीच्या पश्चिमेकडे कंधारची राजधानी वैहिन्द, १४ फर्सखांवर पुर्शावर, १२ फर्सखांवर काबुल आणि त्यापुढे १७ फर्सखांवर गझना ही शहरे आहेत.

उंचच उंच दुर्गम पर्वतांनी वेढलेले कश्मीर येथेच आहे. कश्मीरचा दक्षिणे-

कडील व पूर्वेकडील प्रदेश हिंदूंचा असून पश्चिमेकडील भाग बोलरशाह व शुग्नाकशाह यांच्या अधिसत्तेखाली आहे. बदक्षानपर्यंत दूरवर पसरलेल्या सीमाप्रदेशावर वखान-शाहचे राज्य आहे. उत्तरेकडील प्रदेश व पूर्वेकडील काही भाग खोतेनच्या तुर्कांचा व तिबेटचा आहे. तिबेटमार्गे भोतेशरच्या शिखरापासून कश्मीरपर्यंत जावयाचे असल्यास ३०० फर्सख इतके अंतर तोडावे लागते.

कश्मीरचे लोक पायीच प्रवास करतात. त्यांच्याजवळ हत्ती किंवा तत्सम वाहनास योग्य असा कोणताच प्राणी नसतो. त्याच्यामधील सरदार व धनिक लोक वाहन म्हणून पालख्यांचा उपयोग करतात. या पालख्यांना कश्मीरमध्ये 'केत्त' असे म्हणतात. या पालख्या वाहून नेण्याचे काम माणसेच करतात.

आपल्या देशाचे नैसर्गिक सामर्थ्य कायम टिकून राहावे म्हणून कश्मीरमधील लोक फारच दक्षता घेतात. आपल्या प्रदेशाच्या सीमांचे ते अत्यंत काळजीपूर्वक संरक्षण करतात. त्यामुळे कश्मीरमधील लोकांशी व्यापारविषयक किंवा अन्य संबंध ठेवणे ही एक अत्यंत कठीण बाब होऊन बसली आहे. पूर्वी ते काही परदेशी लोकांना विशेषतः ज्यू लोकांना आपल्या प्रदेशात येऊ देत असत तथापि सध्या तर ते हिंदूंनादेखील आपल्या प्रदेशात येऊ देत नाहीत.

सिंध आणि जैलम या नद्यांच्या मध्यावरील बब्रहान नामक स्थळापासून कश्मीरकडे जाण्यासाठी एक सुप्रसिद्ध मार्ग आहे. शमीलान पर्वतात उगम पावणाऱ्या कुसनारी आणि माहवी या नद्यांचा संगम जेथे होतो तेथील पुलावरून ही वाट पुढे जाते. तेथून जैलम नदीच्या खोऱ्यापर्यंत ५ दिवसांत जाता येते या दरीच्या दुसऱ्या टोकाला जैलम नदीच्या दोन्ही काठावर 'द्वार' नावाचे पहाऱ्याचे ठिकाण आहे. दरी ओलांडल्यावर आपण मोकळ्या मैदानात येतो. त्यानंतर दोन दिवसांत अद्दिश्तान या कश्मीरच्या राजधानीला जाता येते. वाटेत दरीच्या दोन्ही कडावर वसलेले उश्कारा हे शहर लागते.

कश्मीर हे शहर जैलम नदीच्या दोन्ही तीरांवर ४ फर्सखांच्या परिसरात वसले आहे. या नदीवरील अनेक पुलांमुळे आणि लहान लहान बोटींमुळे या शहरातील दळण-वळण अधिक सोयीचे झाले आहे ज्या हरमकोट पर्वतात जैलम नदी उगम पावते तो प्रदेश बर्फमय असून तेथील बर्फ कधीही वितळत नाही. त्या पर्वताच्या पलीकडे 'महाचीन' नावाचा देश आहे. जैलमच्या उगमस्थानापासून अद्दीश्तानपर्यंत यावयास दोन दिवस लागतात. त्यानंतर पुढे ४ फर्सखांच्या अंतरावर एक चौरस फर्सखांइतकी पाणथळ जागा आहे. येथील लोक याच पाणथळ जागेच्या काठाकाठाने पिकांची लागवड करतात. तेथून निघून जैलम नदी उश्कारा शहराजवळून जाते आणि त्यानंतर ती वर उल्लेखिलेल्या खोऱ्यात प्रवेश करते.

'सिंध' नदी तुर्कांच्या सत्तेखाली असलेल्या प्रदेशातील उनांग नावाच्या पर्वतात उगम पावते. त्या ठिकाणी पुढील मार्गाने जाता येते: वर उल्लेखिलेले कश्मीरच्या

प्रवेशद्वाराजवळील जैलमचे खोरे सोडून पुढे गेल्यावर एक पठार लागते. या पठारावरून दोन दिवस वाटचाल करावी लागते. यावेळी आपल्या डाव्या बाजूस बोलोर आणि शामीलान हे पर्वत लागतात. येथे 'भतवर्यान' नावाच्या तुर्की लोकांच्या टोळ्या आहेत आणि त्यांच्या राजाचे नाव 'भतशाह' असे आहे. हे लोक मुख्यत्वेकरून गिलगिट, अस्विर आणि शिल्टास या शहरांत वास्तव्य करतात आणि ते तुर्की भाषा बोलतात.

शहरातील जलमार्गामुळे कश्मीरचा बराच भाग व्यापला आहे व यामुळे कश्मीरचे एक प्रकारे नुकसानच झाले आहे असे म्हणावे लागेल. नदीच्या डाव्या बाजूने शहरात प्रवेश केल्यास प्रथम तुम्हाला लागवड केलेला प्रदेश दिसेल व तो ओलांडल्यानंतरच राजधानीत प्रवेश करता येईल. उजव्या बाजूने गेल्यास एकमेकांना अगदी बिलगून बसलेली कित्येक छोटी छोटी खेडी तुम्हाला दिसतील. हा भाग राजधानीच्या दक्षिणेस आहे. तो ओलांडून पुढे गेल्यावर कुलार्जक नावाचा एक पर्वत लागतो. हा पर्वत 'दुन्बावन्द' पर्वताप्रमाणेच घुमटाकार आहे. त्याच्यावरील बर्फ कधीच वितळत नाही आणि ते नेहमी ताकेशर आणि लोहावर येथूनही सहज दिसते. या पर्वताचे शिखर आणि कश्मीरचे पठार यांत दोन फर्सखांइतके अंतर आहे. या स्थळाच्या दक्षिणेस राजागिरीचा किल्ला असून पश्चिमेस लाहूरचा किल्ला आहे. निदान माझ्या पाहण्यातील तरी हे दोन अत्यंत मजबूत आणि सुरक्षित किल्ले आहेत. वर उल्लेखिलेल्या शिखरापासून राजावरी हे गाव फक्त ३ फर्सख इतक्या अंतरावर आहे. आपले व्यापारी व्यापारासाठी फक्त येथपर्यंतच जाऊ शकतात. त्याच्यापुढे मात्र त्यांना जाता येत नाही. अशी ही भारताची उत्तरसीमा आहे.

भारताच्या पश्चिम सीमेवर अफगाण लोकांच्या टोळ्या राहतात. हे लोक 'सिंध' नदीच्या खोऱ्यापर्यंत विखुरले असल्याचे आढळते.

भारताच्या दक्षिण सीमेवर मात्र समुद्र आहे. भारताच्या किनाऱ्यास 'तीझ' नावाच्या मक्रानच्या राजधानीपासून प्रारंभ होतो. येथून आग्नेयेस आल्दैवलपर्यंत हा किनारा ४० फर्सखांपर्यंत पसरला आहे, आणि या दोन स्थळांच्यामध्येच तुराणचे आखात आहे. जेव्हा सागराचे पाणी एकाद्या कोनाप्रमाणे जमिनीत शिरते, तेव्हा तेथे 'आखात' निर्माण होते. या ठिकाणी, भरती - ओहोटीमुळे, वाहतूक किंवा दळणवळण करता येत नाही. वाहते पाणी एकाच जागी साचल्यामुळे 'खाडी' निर्माण होते. आखाताप्रमाणेच खाडीदेखील जलमार्गाने वाहतूक करण्यासाठी सोयीची नसते. उलट ती काहीशी धोक्याची असते. खाडीत साचलेले पाणी समुद्रास मिळते. हे पाणी खारे नसल्याने त्यात जहाजे तरत नाहीत आणि ही गोष्टदेखील जलमार्गाच्या वाहतुकीमध्ये बाधा निर्माण केल्याशिवाय राहत नाही.

हे आखात ओलांडून पुढे गेल्यावर आपल्याला लहान 'मुन्ह', मोठे 'मुन्ह' आणि 'ववारिज' (कच्छ आणि सोमनाथ येथील चाचे लोक) हे दिसू लागतात. 'बीरा' नावाच्या जहाजाच्या साहाय्याने हे लोक समुद्रात चाचेगिरी करीत असतात. 'बीरा' या नावावरूनच 'ववारिज' हे नाव पडले.

या किनाऱ्यावरील स्थळांची नोंद पुढे केली आहे : (देबल पासून ५० फर्सखांवर) तवल्लेशर, पुढे १२ फर्सखांवर लोहरानी, १२ फर्सखांवर बग, ६ फर्सखांवर कच्छ (येथे मक्ल नावाची झाडे उगवतात) आणि बारोई, १४ फर्सखांवर सोमनाथ, ३० फर्सखांवर कंबायत, २ दिवसांच्या 'अंतरा' वर असविल, ३० फर्सखांवर बिहरोज (?), ५० फर्सखांवर सन्दान, ६ फर्सखांवर सूबार आणि ५ फर्सखांवर तान. यानंतर या किनाऱ्यावर लारान नावाचा प्रदेश लागतो. जीमूर नामक शहर याच प्रदेशात आहे. त्याच्यापुढे वल्लभ, कांजी आणि दर्वड ही गावे लागतात. ती गावे ओलांडल्यावर एक उपसागर लागतो. त्यातच 'सिंगलदीव' म्हणजेच 'सरनदीव' नावाचे एक बेट आहे. या उपसागराभोवतीच 'पंज्यावर' नामक शहर आहे. हे शहर उध्वस्त झाल्यावर तेथील जौर राजाने पश्चिम किनाऱ्यावर 'पदनार' नावाचे शहर वसविले.

सरनदीव बेटासमोरील किनाऱ्यावर ऊम्मलनार आणि रामशेर ही शहरे आहेत. पंज्यावर आणि रामशेर यात ४० फर्सख अंतर आहे आणि रामशेरपासून सेतुबंध २ फर्सखांवर आहे. 'सेतुबंध' या शब्दाचा अर्थ 'समुद्रावरील पूल' असा आहे. दशरथाचा पुत्र राम याने भरतखंडापासून लंकेतील प्रासादापर्यंत बांधलेला पूल म्हणजे हा सेतू होय. सध्या हा सेतू समुद्रात इतस्तत: विखुरलेल्या पर्वतांच्या तुटक रांगेप्रमाणे दिसतो. सेतुबंधाच्या पूर्वेस १६ फर्सखांवर 'किष्किंद' नावाचे पर्वत आहेत, त्यांना वानरांचे पर्वत असे म्हणतात. येथे रोज वानरांचा राजा आपल्या यजमानासह घनदाट झाडीतून बाहेर येतो व त्याच्यासाठीं खास तयार केलेल्या आसनावर विराजमान होतो. त्याच्याबरोबर असलेली इतर वानरेही आपापल्या जागी स्थानापन्न होतात. येथील लोक त्यांच्यासाठी पानांवर भात वाढतात. यथेच्छ भोजन झाल्यावर ही वानरसेना पुन्हा दाट जंगलात परत जाते. यात कोणत्याही प्रकारची कसूर वा हेळसांड झाल्यास हे असंख्य वानर ते शहर चुटकीसरशी उध्वस्त करून टाकतात. ही वानरे म्हणजे एक प्रकारची माणसांचीच जात असून पूर्वी रामाने रावणाशी युद्ध केले त्यावेळी त्यांनी रामाला साहाय्य केले म्हणून रामाने त्यांना वानर केले व त्यांना येथील प्रदेश इनाम किंवा वतन म्हणून देऊन टाकला, अशी येथील लोकांची समजूत आहे. यांच्या प्रदेशात चुकून एखादा माणूस गेला व त्याने त्यांच्यासमोर रामाची गीते गायिली किंवा रामविषयक मंत्र म्हटले की ही वानरे अत्यंत शांतपणे हे सर्व ऐकून घेतात व त्याला मास व मद्य देऊन ते त्यास परत जाण्याची वाट दाखवितात, असाही येथील लोकांचा समज आहे. तथापि यात

तथ्यच असेल तर त्याचा विचार वेगळया पद्धतीने करता येईल. हरणे धरण्यासाठी ज्याप्रमाणे शिकारी विशिष्ट स्वर काढतात व हरणांना पुढे पुढे त्याच स्वरांचा सराव होतो त्याचा त्यांच्यावर प्रभाव पडतो, त्याचप्रमाणे येथेही रामपर गीतांतील व मंत्रोच्चारांतील विशिष्ट स्वराचा वा लयीचा या वानरांवर प्रभाव पडत असावा आणि त्यामुळे ते तसे वागत असावेत, असे वाटते.

हिंदी महासागरातील पूर्वेकडील बेटे भारतापेक्षा चीनलाच अधिक जवळ आहेत. या बेटांना ' झावज ' बेटे किंवा हिंदूंच्या भाषेत ' सुवर्णद्वीप ' (: सोन्याची बेटे ) असे म्हणतात. या सागराच्या पश्चिमेकडे झांज लोकांची बेटे आहेत, मध्यभागी ' रम्भ' आणि ' दीव ' बेटे आहेत. त्यातच 'कुमैर' बेटांचाही समावेश होतो. ही बेटे-विशेषतः दीव बेटे हळु हळू- क्रमाक्रमाने – एका विशिष्ट प्रक्रियेनुसार दृग्गोचर होऊ लागतात. प्रथम समुद्रावर केवळ वाळवंट दिसते आणि मग ते हळुहळू वर आल्यासारखे व आसपासच्या प्रदेशात विखुरल्यासारखे दिसते. त्यानंतर बेटावरील जमीन दिसू लागते आणि त्याचवेळी त्याच्याजवळील दुसरे बेट मात्र दिसेनासे होते. ते सागरात बुडू लागते. या गोष्टीची जाणीव होताच बुडणाऱ्या बेटावरील लोक आसपासच्या एखाद्या चांगल्या सुपीक बेटाचा शोध घेतात व तेथे ते आपल्या बेटावरील नारळाची व खजुरीची झाडे, अन्नधान्य व सामानसुमान नेतात आणि तेथे वसाहत करतात.

बेटांतील विविध प्रकारच्या उत्पन्नावरून या दीव बेटांचे दोन विभाग पडतात :

१ ) दीव – कुढ ( म्हणजे कवड्याची दीव बेटे ) : येथील लोक नारळाच्या झाडांच्या फांद्यांना लागलेल्या कवड्या गोळा करतात.

२ ) दीव–कंबार : ज्या बेटांत नारळाच्या बुंध्याच्या तंतूपासून दोरखंड तयार करतात ती बेटे. जहाजाच्या फळया बांधण्यासाठी या दोरखंडाचा उपयोग होतो.

कुमैर बेटातच अल्वाक्वाक नावाचे एक बेट आहे. कुमैर नामक वृक्षांना फळांऐवजी विद्रूप मानवी शिरे येतात, अशी येथील लोकांची समजूत आहे तथापि त्यात तथ्य नाही. कुमैर हे एक प्रकारच्या श्वेतवर्णी मानववंशाचे नाव आहे. हे लोक ठेंगणे असून त्यांच्या शरीराचा बांधा तुर्क लोकांप्रमाणे असतो. हे लोक हिंदू धर्माचे असून त्यांच्यामध्ये कान टोचण्याची पद्धती रूढ आहे. अल्वाक्वाक बेटात काही कृष्णवर्णी लोकही आहेत. या लोकांना आपल्या देशात गुलाम म्हणून नेतात. आपल्या देशात या गुलामांची बरीच मागणी असते. या बेटातून मुलम्मा, व शौहत नावाच्या काळ्या लाकडाची व झांज बेटातून पिवळ्या चंदनाची मोठ्या प्रमाणावर आयात होते.

प्राचीन काळी सरनदीब नामक बेटात मोत्यांचा खूप साठा असे. तेथील साठा संपल्यामुळे आता लोक झांज बेटातील 'सुफाल' येथे मोती आणावयास जातात. त्यामुळे अलीकडे सरनदीबच्या मोत्यांनी 'सुफाल' येथे स्थलांतर केले आहे, असे लोक म्हणतात, त्याचे कारण हेच होय. भारतात उन्हाळ्यात पाऊस पडतो. या काळास ' वर्षाकाल '

असे म्हणतात. देशाच्या उत्तरेस हा पाऊस मोठ्या प्रमाणात पडतो. 'आमच्या प्रदेशात 'वर्षाकाल' च नसतो, उत्तरेकडील पर्वतमय प्रदेशात तो विशेषेकरून असतो,' असे मुलतान येथील लोकांनी मला सांगितले. भातल आणि इंद्रबेदी येथे आषाढ महिन्यात पावसास प्रारंभ होतो. पाण्याच्या बादल्या एकसारख्या भरभरून ओताव्यात त्याप्रमाणे चार महिने पावसाची संतत धार या प्रदेशात लागलेली असते. देशाच्या उत्तरेकडे कश्मीरच्या परिसरातील पर्वतांपासून धनपूर आणि बशविर यांच्यामधील 'जूदरी' नावाच्या शिखरापर्यन्तच्या प्रदेशात विपुल प्रमाणात पाऊस पडतो. श्रावणमासापासून या पावसाला प्रारंभ होतो व तो अडीच महिन्यांपर्यंत सतत पडतो. तथापि या शिखराच्या पलीकडे मात्र पाऊस पडत नाही कारण उत्तरेकडील ढग अत्यंत जड असतात. ते जमिनीच्या पृष्ठभागापासून फार वर जात नाहीत. एकाद्या पर्वताचा स्पर्श त्यांना झाला की ते एकदम कोसळतात आणि मग त्या पर्वताच्या परिसरातील प्रदेशातच मोठा पाऊस पडतो. पर्वताच्या पलीकडील भागात हे ढग जाऊच शकत नाहीत, त्यामुळे त्या भागात पाऊस पडत नाही. त्यामुळेच कश्मीरमध्ये वर्षाकाल नसतो तथापि तेथे माघ मासापासून सतत अडीच महिने हिमवर्षा होत असते आणि चैत्राचा पूर्वार्ध संपल्यावर, बर्फ वितळल्यामुळे काही दिवस तेथे पाऊस पडतो व तेथील जमीन स्वच्छ होते.

भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांत पाऊस केव्हा केव्हा पडतो याविषयी वर माहिती सांगितली आहे. बहुधा भारतात याप्रमाणेच पाऊस पडतो. असे घडले नाही असे क्वचितच होते.

भारतातील प्रत्येक प्रांताच्या हवामानाची स्वतःची अशी काही खास वैशिष्ट्ये आहेत, हेही येथे जाता जाता नमूद करून ठेवायला हवे, असे वाटते.

१९

# अ) ग्रह,
# आ) राशिचक्र,
# इ) नक्षत्र आणि तत्सम अन्य विषय

हिंदूंच्या भाषेत एकाद्या वस्तूसाठी अनेक संज्ञा वापरल्या जातात असे मी या ग्रंथाच्या आरंभीच सांगितले आहे. यांपैकी काही मूळ संज्ञा असून इतर संज्ञा त्या मूळ रूपापासून सिद्ध झाल्या आहेत.

सूर्यासाठी त्यांच्या भाषेत जवळ जवळ एक हजार शब्द असल्याचे मला येथे कळले. त्याचप्रमाणे प्रत्येक ग्रहासाठी त्यांच्या भाषेत किती तरी समानार्थी शब्द आहेत. अशा प्रकारच्या विपुल शब्दसंग्रहाचा त्यांच्या छन्दोबद्ध ग्रंथरचनेला बराच उपयोग होतो.

त्यांनी आठवड्यातील प्रत्येक दिवसाचे नाव ग्रहावरून ठेवले आहे. प्रत्येक दिवसाला ते 'वार' असे म्हणतात. हाच शब्द ते ग्रहनामालाही जोडतात. फार्सी भाषेत या 'वार' प्रमाणेच 'शम्बिह' हा प्रत्यय वापरतात. (उदा. 'दूशम्बिह्', 'सिह्-शम्बिह्' इ.) हिंदूंच्या आठवड्यातील दिवसांची नावे पुढीलप्रमाणे आहेत–

| | |
|---|---|
| आदित्यवार | बृहस्पतिवार |
| सोमवार | शुक्रवार |
| मंगलवार | शनैश्चरवार |
| बुधवार | |

'शनैश्चरवार' नंतर ते पुन्हा 'आदित्यवार', 'सोमवार' या क्रमाने आठवड्यातील दिवस गणना करतात.

मुस्लिम खगोलशास्त्रज्ञ ग्रहाला 'दिनाधिपती' अशी संज्ञा देतात, दिवसाचे तास मोजताना त्या दिवसावर ज्याची अधिसत्ता असते त्या ग्रहापासून ते प्रारंभ करतात आणि क्रमाने प्रत्येक तासाला राशिचक्रातील इतर ग्रहांची त्या त्या तासावर अधिसत्ता असल्याचे ते मानतात. हा विचार पुढील उदाहरणावरून अधिक स्पष्ट

होईल. आठवड्यातील पहिल्या दिवसावर (रविवारवर) व पहिल्या तासावर सूर्याची अधिसत्ता असते. दुसऱ्या तासावर शुक्राची, तिसऱ्यावर बृहस्पतीची आणि चवथ्यावर चंद्राची अधिसत्ता आहे असे ते मानतात. अशा प्रकारे गणना करीत असताना सूर्यापासून ग्रह-गणनेस पृथ्वीभोवतालच्या वातावरणापर्यंत येत येत ते पुन्हा शनीपर्यंतचे ग्रह मोजतात. या पद्धतीनुसार पंचविसाव्या तासाचा अधिपती चंद्र हा आहे. आणि हा पंचविसावा तास म्हणजेच दुसऱ्या दिवसाचा–सोमवारचा पहिला तास होय. त्यामुळे चंद्र हा केवळ त्या पंचविसाव्या तासाचाच अधिपती नसून त्या नवीन दिवसाचाच अधिपती आहे असे मानतात. याबाबतीत हिंदूंच्या पद्धतीत आणि आपल्या पद्धतीत फारच थोडा फरक आढळतो. ते प्रत्येक तासाचा वेगवेगळा अधिपती (ग्रह) न मानता रात्र आणि दिवस हे दोन्ही मिळून त्याच्यासाठी एक ग्रह अधिपती असल्याचे मानतात. बहुतेक राष्ट्रांत हीच पद्धती अवलंबिली जाते.

तथापि वर उल्लेखिलेली दिवस व रात्र यांचे (प्रत्येकी बारा बारा) विभाग करण्याची व त्यांचे स्वतंत्र ग्रहरूप अधिपती मानण्याची पद्धती त्यांना माहीत नव्हती असे नाही. या गोष्टीचेही त्यांना निश्चितपणे ज्ञान होते, असे त्यांच्या कालगणनेच्या पद्धतीवरून वाटते. दिवस व रात्रीच्या या विभागासाठी– तासासाठी– ते 'होरा' ही संज्ञा वापरतात. 'नीम्नहर' विषयक गणती करताना ते अर्ध्या राशीसाठीही 'होरा' शब्द वापरतात. या प्रत्येक कालखंडाचा–होराचा–एक स्वतंत्र अधिपती असतो असे त्यांच्या एका खगोलशास्त्रविषयक ग्रंथात सांगितले आहे.

ग्रहांचा क्रम वारांच्या नावाप्रमाणे आहे, अशी हिंदू लोकांची समजूत आहे. आपल्या खगोलशास्त्रविषयक व अन्य ग्रंथांत ते याच पद्धतीचा उपयोग करतात. ग्रहांचा क्रम सांगणारी एखादी अधिक निर्दोष पद्धती आहे तथापि ते त्या दुसऱ्या पद्धतीचा उपयोग करीत नाहीत.

ग्रीक लोक आपल्या वेधयंत्रात (होकायंत्रात) ग्रहांच्या सीमा दर्शविण्यासाठी प्रत्यक्ष त्या ग्रहांच्या प्रतिमाच वापरीत असत. हिंदू लोक ग्रहांच्या प्रतिमांसाठी ग्रहनामांचे संक्षेप वापरतात. ग्रहांच्या नावातील आद्याक्षरांचा ते या संक्षेपादाखल उपयोग करतात. उदा. आ = आदित्य किंवा सूर्य, च = चंद्र, ब = बुध इ.

पुढे या यात ग्रहांची रूढ नावे दिली आहेत :-

भारतीय भाषेतील त्याची इतर नावे अशी आहेत–

**ग्रह**

सूर्य– आदित्य, भानु, अर्क, दिवाकर, रवि, बिबता (?), हेलि.

चंद्र–सोम, इन्दु, हिमगु, शीतरश्मि, हिमरश्मि, शीतांशु, शीतदी, धिति, हिममयूख.

मंगळ– भौम्य, कुज, आर, वक्र, आवनेय, माहेय, क्रूराक्षि (?), रक्त.

बुध– सौम्य, चान्द्र, ज्ञ, बोधन, वित (?), हेम्न
गुरु– बृहस्पति, जीव, देवेज्य, देवपुरोहित, देवमंत्रित, अंगिरस, सूरि, देवपिता.
शुक्र– भृगु, सीत, भार्गव, आस्फुजित (?), दानवगुरु, भृगुपुत्र, आस्फुजित (?)
शनि– शनैश्चर, मंद, असित, कोण, आदित्यपुत्र, सौर आर्कि, सूर्यपुत्र.

या यादीत सूर्याच्या अनेक नावांचा निर्देश केलेला असल्याने असंख्य सूर्य असावेत असे काही धर्मशास्त्रज्ञांना वाटले. प्रत्येक महिन्याला एक याप्रमाणे बारा सूर्य आहेत असे ते मानू लागले. 'विष्णुधर्म' या ग्रंथात याविषयी पुढील माहिती सांगितली आहे :

"वस्तुतः विष्णु (नारायण) हा आद्यन्तविरहित आहे. देवतासाठी त्याने स्वतःचे बारा विभाग केले, तेच पुढे कश्यपाचे पुत्र झाले आणि तेच बारा महिन्यांचे बारा सूर्य होत."

काही हिंदू पंडितांना हे मत मान्य नाही. सूर्याप्रमाणेच इतर ग्रहांनाही अनेक नावे आहेत. तथापि एका ग्रहाला अनेक नावे असली तरी तो ग्रह मात्र एकच असतो, असे ते म्हणतात, तसेच सूर्याला केवळ बाराच नावे नसून असंख्य नावे आहेत. प्रत्येक नाव विशिष्ट प्रकारचा अर्थ व्यक्त करण्यासाठी दिले गेले आहे. उदा. सूर्याबरोबरच सर्व गोष्टींचा प्रारंभ होतो आणि म्हणूनच त्यास 'आदित्य' असे म्हणतात. जगातील सर्व वंशांची उत्पत्ती सूर्याबरोबरच झालेली असल्याने त्यास 'सावित्री' असे म्हणतात. सूर्य ओल्या वस्तू वाळवितो म्हणून त्यास 'रवी' असे म्हणतात. वनस्पतीतील द्रवास ते 'रस' असे म्हणतात, आणि रस शोषण करणारास ते 'रवी' असे म्हणतात. म्हणून सूर्याला 'रवी' असे नाव पडले.

सूर्याचा मित्र जो चंद्र त्यालाही सूर्याप्रमाणेच अनेक नावे आहेत. तो भाग्यवान असल्याने त्यास 'सोम' असे म्हणतात. यावरूनच पुढे सर्व भाग्यवान शुभ वस्तूंना 'सोमग्रह' आणि अशुभ वस्तूंना 'पापग्रह' असे म्हणतात. त्यास 'निशेश' (रात्रीचा स्वामी), 'नक्षत्रनाथ' (: नक्षत्रांचा स्वामी) 'द्विजेश्वर' (: ब्राह्मणांचा स्वामी); अशी इतर नावेही आहेत. चंद्राचा गोळ हा द्रवयुक्त आहे व ही गोष्ट पृथ्वीस अत्यंत उपकारक असल्याने त्यास 'शीतांशु' (: शीतल किरणयुक्त) असेही म्हणतात. सूर्यकिरण चंद्रावर पडतात तेव्हा ते चंद्राप्रमाणेच शीतल होतात. तेथून ते परावर्तित होतात, त्यामुळे अंधार नाहीसा होऊन आपणास प्रकाश मिळतो, रात्र अधिक सुखद वाटते. तसेच सूर्याच्या उष्णतेतील प्रखरपणा नष्ट होऊन वातावरण शीतल राहते. सूर्य हा नारायणाचा उजवा डोळा असून चंद्र हा त्याचा डावा डोळा आहे असे हिंदू लोक मानतात. यानंतर पुढील कोष्टकात हिंदू कालगणनेतील महिन्यांची नावे दिली आहेत. प्रचलित नावांबरोबरच 'विष्णुधर्म' व 'आदित्यपुराण' यांतील त्याविषयीची माहितीही दिली आहे–

| मास | 'विष्णुधर्मा'त उल्लेखिलेले त्याच्या सूर्याचे नावं | 'विष्णुधर्मा'नुसार या नावाचा अर्थ | 'आदित्यपुराणा'त निर्देशिलेले त्याच्या सूर्याचे नाव | समाजात प्रचलित असलेले नाव |
|---|---|---|---|---|
| चैत्र | विष्णु.... | अस्थिर, आकाशात भ्रमण करणारा | अंशुमंत... | रवि |
| वैशाख | अर्यमन् | हा अपराध्यांना शिक्षा करतो त्यामुळे ते त्यास घाबरतात व त्यास कधीही विरोध करीत नाहीत. | सवितृ... | विष्णु |
| ज्येष्ठ | विवस्वन्त | हा सर्व गोष्टीचे विहंगमावलोकन करतो | धानु | धात्रि |
| आषाढ | अंशु | किरणयुक्त | विवस्वन्त | विधात्रि |
| श्रावण | पर्जन्य | पाऊस इ. देऊन साहाय्य करणारा | विष्णु | अर्यमन् |
| भाद्रपद | वरुण | हा सर्व गोष्टींची सिद्धता करतो. | इंद्र | भग |
| आश्वयुज | इन्द्र | मित्र व स्वामी | धात्रि | सावित्रि |
| कार्तिक | धात्रि | हा मानवांना साहाय्य करून त्यांच्यावर राज्य करतो. | भग | पूषन |
| मार्गशीर्ष | मित्र | ज्याच्यावर सर्व जग प्रीती करते तो | पूषन | त्वष्ट्रि |
| पौष | पूषन | मानवाचे पोषण करणारा | मित्र | अर्क |
| माघ | भग | जगास आवडणारा | वरूण | दिवाकर |
| फाल्गुन | त्वष्ट्रि | कल्याणप्रद | अर्यमन | अंशु |

'विष्णुधर्मा'त दिलेला या सूर्य-नामांचा क्रम अगदी बरोबर आहे, त्यात कोणतीही चूक नाही, असे येथील लोकांना वाटते. कारण वासुदेवाचेही प्रत्येक महिन्यातील नाव वेगळे आहे आणि त्याचे उपासक मार्गशीर्ष महिन्यापासून मास-गणनेला प्रारंभ करतात. या महिन्यातील त्याचे नाव 'केशव' असे आहे. याप्रमाणे महिन्याबरोबर त्याची (वासुदेवाची) नावे क्रमाने घेतल्यास चैत्र महिन्यात त्याचे नाव 'विष्णु' असे असल्याचे दिसते आणि ही गोष्ट 'विष्णुधर्मा'त प्रतिपादिलेल्या परंपरेनुसारच आहे.

हिंदू महिन्यातील नावे त्या महिन्यातील नक्षत्राशी संबंधित आहेत असे दिसते. एखाद्या महिन्यातील दोन किंवा तीन नक्षत्रांपैकी एकाद्या नक्षत्राचे नाव त्या महिन्यास दिलेले असते.

ज्यावेळी एकाद्या विशिष्ट महिन्यात विशिष्ट नक्षत्रकालात गुरु येतो, त्या वेळी त्या महिन्याची अधिसत्ता त्या संपूर्ण वर्षावर आहे असे मानून त्या वर्षाला त्या महिन्याचे नाव देतात.

पुढील तक्त्यातील महिन्यांच्या नावांत व यापूर्वी विवेचन करताना वापरलेल्या महिन्यांच्या नावांत थोडाफार फरक असण्याची शक्यता आहे कारण यापूर्वी प्रचलित, रूढ नावे वापरली असल्याने ती अपभ्रष्ट असण्याची शक्यता आहे. पुढे दिलेली मास-नामे ही शास्त्रोक्त व शिष्टसंमत आहेत—

| मास | | नक्षत्र | मास | | नक्षत्र |
|---|---|---|---|---|---|
| कार्तिक | ३ | कृत्तिका * | वैशाख | १६ | विशाखा * |
| | ४ | रोहिणी | | १७ | अनुराधा |
| | | | जेष्ठ | १८ | जेष्ठा * |
| | | | | १९ | मूल |
| मार्गशीर्ष | ५ | मृगशीर्ष * | आषाढ | २० | पूर्वाषाढा ● |
| | ६ | आर्द्रा | | २१ | उत्तराषाढा |
| पौष | ७ | पुनर्वसु | श्रावण | २२ | श्रवण |
| | ८ | पुष्य * | | २३ | धनिष्ठा |
| माघ | ९ | अश्लेषा | भाद्रपद | २४ | शतभिषज |
| | १० | मघा * | | २५ | पूर्व भाद्रपदा ● |
| | | | | २६ | उत्तर भाद्रपदा |
| फाल्गुन | ११ | पूर्व फाल्गुनी * | | | |
| | १२ | उत्तर फाल्गुनी | आश्वयुज | २७ | रेवती |
| | १३ | हस्त | | १ | आश्विनी |
| | | | | २ | भरणी |
| चैत्र | १४ | चित्रा * | | | |
| | १५ | स्वाती | | | |

हिंदू लोकांनी राशींच्या आकृतींवरून त्यांना नांवे दिली आहेत. या खुणा सर्व देशांत सारख्याच असल्याचे आढळते. तिसऱ्या राशीचे नाव 'मिथुन' असे आहे. 'मिथुन' म्हणजे तरुण आणि तरुणी यांचे युगुल. अन्य राष्ट्रांत या राशीसाठी जुळ्यांची प्रतिमा वापरतात. वराहमिहिराच्या ग्रंथात यासाठी एक तंतुवाद्य हातात घेतलेल्या व्यक्तीच्या प्रतिमेचा उल्लेख केलेला असल्याने त्याने मृगशीर्ष नक्षत्र 'अल्जब्बार' म्हणजेच ही राशी असे कल्पिले असावे असे वाटते. सर्वसामान्य माणसांतही हे मत प्रचलित आहे आणि म्हणूनच 'अल्जौझा' आणि मिथुन राशीचा निकटचा संबंध असावा असे त्यांना वाटते. वस्तुतः 'अल्जौझा' नक्षत्राच्या प्रतिमेचे मिथुन राशीच्या खुणेशी साद्दश्य नाही.

जहाज व त्याच्या 'हाता'त धान्याचे कणीस– ही सहाव्या राशीची खूण असल्याचे वराहमिहिराने सांगितले आहे. या ठिकाणी मूळ ग्रथाच्या उपलब्ध प्रतीत काही चूक असावी असे मला वाटते. कारण जहाजाला 'हात' कुठे असतो! हिंदू लोक या राशीला 'कन्या' असे म्हणतात. कन्या म्हणजे 'कुमारी'. यावरून जहाजात किंवा नावेत बसलेल्या मुलीच्या हातातील धान्याचे कणीस असा मूळ ग्रंथात निर्देश असावा असे वाटते. हे 'अल्सिमाक अल्अझस्' नक्षत्र असावे. जहाजाच्या निर्देशामुळे 'अल्अव्वा' या नक्षत्राची आकृती गलबतासारखी असल्याने लेखकास या संदर्भात 'अल्अव्वा' हे नक्षत्र सूचित करावयाचे आहे की काय, असेही वाटू लागते. 'तुला' नावाच्या सातव्या नक्षत्राची खूण 'अग्नि' ही आहे. 'तुला' या शब्दाचा अर्थ मात्र 'तराजू' असा आहे.

दहाव्या राशीची खूण म्हणजे मगरीचे धड आणि बोकडाचे तोंड असलेला प्राणी होय. या प्रतिमाकाराने मगरीच्या धडास बोकडाचे तोंड लावून (मगरीच्या तोंडाचा क्लिष्ट आकार काढण्याचा) स्वतःचा त्रास चुकविला आहे असे दिसते. ग्रीकांनी मात्र आपली प्रतिमा बोकडाच्या धडास माशांच्या देहाचा उरलेला भाग जोडून तयार केली आहे. तेव्हा त्यांनी दोन प्राण्यांच्या दोन भागांच्या साहाय्याने ही प्रतिमा तयार केली ही गोष्ट औचित्यपूर्ण वाटते. हिंदूंना ही प्रतिमा तयार करताना दोन प्राण्यांचे अर्धे अर्धे भाग जोडून एक तिसराच प्राणी निर्माण करण्याची आवश्यकता वाटली नाही. कारण 'मकर' राशीतील 'मकर' नावाचा जो प्राणी आहे, तो प्रत्यक्ष पाहिल्यास त्याची आकृती दोन प्राण्यांचे अर्धे अर्धे भाग जोडल्यासारखी दिसत नाही, असे येथील लोक सांगतात.

अकराव्या राशीची खूण एकाद्या बादलीसारखी दिसते. त्यास ते 'कुंभ' असे म्हणतात. तथापि कधी कधी ते या राशीसाठी मानवाकृतीचा उपयोग करतात, तेव्हा त्यांच्या एतद्विषयक कल्पना आणि ग्रीकांची 'ॲक्वेरियस्'ची कल्पना या दोहोतील साम्य स्पष्टपणे जाणवू लागते.

'दोन मासे' ही बाराव्या राशीची खूण आहे असे वराहमिहिर म्हणतो तथापि सर्व भाषांत या राशीच्या नावाचा अर्थ सर्व भाषांत 'एक मासा' असाच होतो. वराहमिहिराने आपल्या ग्रंथात राशीच्या या रूढ व प्रचलित नावांबरोबरच त्यांच्या विशेष रूढ नसलेल्या नावांचीही यादी दिली आहे. राशीच्या या सर्व प्रचलित व अप्रचलित नावाचा समावेश मी पुढील तक्त्यात केला आहे—

| राशी | त्यांची रूढ नावे | विशेष प्रचारात नसलेली नावे |
|---|---|---|
| ० | मेष | क्रिय |
| १ | वृषन् | ताम्बिरू |
| २ | मिथुन | जिमुत |
| ३ | कर्कट | कुलीर |

| | | |
|---|---|---|
| ४ | सिंह | लियय |
| ५ | कन्या | पार्तीन |
| ६ | तुला | जुग |
| ७ | वृश्चिक | कौर्व |
| ८ | धनु | तौषिक |
| ९ | मकर | अगोकीरू |
| १० | कुंभ | उद्रुवग |
| ११ | मीन | अंत, जीतु |

राशी मोजताना हिंदू लोक मेष राशीस '०' क्रमांक व वृषभ राशीस '१' क्रमांक देत नाहीत तर मेष, वृषभ या राशींना ते १, २ अशा प्रकारचे क्रम देतात. त्यामुळे मीन राशीचा क्रमांक १२ हा येतो. वरील तक्त्यावरूनही हे लक्षात येईलच.

२०

# ब्रह्मांड

'ब्रह्मांड' या संज्ञेचा शब्दशः अर्थ 'ब्रह्माचे अंडे' असा होतो. वर्तुळाकारातील सादृश्यामुळे ही संज्ञा आकाशासाठी आणि बऱ्याच वेळेस संपूर्ण विश्वासाठीही वापरतात. सर्व आकाशांची बेरीज ब्रह्मांडाइतकी असते असे हिंदू लोक मानतात. हिंदूंनी खगोलशास्त्राचे नीटसे अध्ययन केलेले नसल्याने त्यांच्या एतद्विषयक कल्पना सदोष असल्याचे आढळते. मानवाप्रमाणेच पृथ्वीही विश्रांती घेत असते, असे ते मानतात. तसेच स्वर्गीय सुखाचे वर्णन करताना ते त्यांची तुलना ऐहिक सुखांशी करतात. पृथ्वी हे काही देवतांचे वस्तिस्थान असून त्या देवता वरील जगातून खालील जगात (स्वर्गातून पृथ्वीवर) येतात, असेही ते मानतात. या सर्व गोष्टींवरून पृथ्वीसंबंधीच्या व विश्वासंबंधीच्या त्यांच्या कल्पनांमधील दोष लक्षात येतील.

विश्वाच्या प्रारंभाविषयी व त्याच्या निर्मितीविषयी त्यांच्याच गूढ रहस्यमय भाषेत बोलावयाचे झाल्यास विश्वनिर्मितीपूर्वीचे वातावरण केवळ जलमय होते. माझ्या कल्पनेप्रमाणे हा काल 'पुरुषाहोरात्री'चा आत्म्याच्या दिवसाचा प्रारंभ-काल होय. त्यावेळीच विश्वाच्या उत्पत्तीस प्रारंभ झाला. या उत्पत्तिकालाच्या वेळी पाणी गर्जत होते. फेसाळत होते. त्यातून एक पांढरी शुभ्र वस्तू वर आली आणि तिच्यातून विधात्याने (सृष्टिनिर्मात्याने) ब्रह्मांड निर्माण केले. ते फुटून त्यातून ब्रह्मा प्रकट झाला. त्या अंड्याचा वरील अर्धा भाग म्हणजेच आकाश असून खालील भाग म्हणजे पृथ्वी होय. या दोन विभागांतील तुकड्यांतून पाऊस निर्माण झाला असे ते मानतात. या ठिकाणी या तुकड्याचे (पावसाऐवजी) पर्वतात रूपांतर झाले, असे त्यांनी म्हटले असते तर ते अधिक स्वाभाविक वाटले असते.

ब्रह्मांडाविषयी काही जणांनी दुसरी उपपत्ती दिली आहे. "तुझ्यासाठी मी एक अंडे निर्माण केले आहे," त्यात तू राहा, असे परमेश्वराने ब्रह्मास सांगितले. वर निर्देशिलेल्या पाण्याच्या फेसाने त्याने ते अंडे तयार केले पण जेव्हा पाणी नाहीसे झाले, त्यावेळी ते अंडे फुटून त्याचे दोन विभाग झाले.

हिंदूंच्या ब्रह्मांडविषयक कल्पनेप्रमाणेच ग्रीक लोकांतही अशीच एक कल्पना प्रचलित

असल्याचा उल्लेख जालीनूस (Galenus) याने केला आहे. वैद्यकशास्त्राचा शोध लावणारा संशोधक अस्क्लेपियस याच्या एका हातात असलेले अंडे हे जग वर्तुळाकार असल्याचे सिद्ध करते, त्याचप्रमाणे याच जगास वैद्यकशास्त्राची अत्यंत आवश्यकता आहे हेही त्यामुळे सूचित होते.

हिंदू लोकांना ब्रह्माविषयी जितका आदरभाव वाटतो, तितकाच ग्रीकांना ॲस्क्लेपियस याच्याविषयी वाटतो. ॲस्क्लेपियसमध्ये दैवी सामर्थ्य असून त्याचे नावच त्याच्या कृतीतून निर्माण झाले आहे असे ते मानतात. शुष्कत्वापासून–मृत्यूपासून–रक्षण करणे हे त्याचे कार्य आहे, तो क्रोनॉस (Kronos), फ्लेगॅस (Phlegyas) आणि अपोलो (Apollo) यांचा पुत्र आहे, असे त्यांना वाटते. यावरून या तिन्ही देवतांच्या शक्ती ॲस्क्लेपियस याच्यामध्ये यात एकवटल्या आहेत, या मतावरील त्यांचा विश्वास प्रकट होतो.

अणूंचा संयोग हे वस्तूंच्या निर्मितीचे व वृद्धीचे–विकासाचे–कारण होय. हे तत्त्व विश्वोत्पत्तीपूर्वी वातावरणात पाणी होते, या गोष्टीविषयी स्पष्टीकरण करते. (जलातील अणूंच्या संयोगाचा यात निर्देश असावा, असे वाटते.) त्यामुळेच कोणतीही वस्तू निर्माण करण्यासाठी निर्मात्याच्या हातात जल हे साधन म्हणून असते. त्यामुळेच सर्व वस्तूंच्या निर्मितीपूर्वी जल हे अस्तित्वात असतेच, अशी हिंदूंची समजूत आहे. हिंदूंच्या या विचाराशी थोडाफार जुळणारा 'परमेश्वराचे सिंहासन पाण्यावर होते,' असा निर्देश कुराणातही (११–९) आढळतो. तेव्हा (विश्वनिर्मितीच्या वेळी) परमेश्वराजवळ पाणी आणि त्याचे सिंहासन होते या गोष्टी आपल्याला मान्य कराव्या लागतात. प्रस्तुत ग्रंथाचा विषय भारतासारख्या एखाद्या देशापुरताच मर्यादित नसता तर जगातील इतर देशांत प्राचीन काळी ब्रह्मांडापेक्षाही अर्थहीन व चमत्कारिक कल्पना कशा प्रचलित होत्या, ते मी अधिक विस्ताराने सांगितले असते.

ब्रह्माच्या अंड्याचे दोन विभाग झाले, हा सिद्धांत ज्याने मांडला त्या गृहस्थाचा तात्त्विक दृष्टिकोण शास्त्राधिष्ठित नाही, हे उघड आहे. त्यास शास्त्रीय सत्य ठाऊक असते तर त्याने या अंड्याचा अर्धा भाग पृथ्वीसाठी ठेवून उरलेला वरील भाग घुमटाप्रमाणे त्यावर ठेवून टॉलमीला मागे टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला नसता. पृथ्वीच्या फक्त एकाच दिशेस वरील बाजूला आकाश असते असे त्याने यातून सूचित केले असल्याने तिच्या इतर दिशांना आकाश नसते असे त्यातून सिद्ध होते व असे म्हणणे शास्त्रीय सत्याला धरून नाही.

अशा प्रकारे अनेक पंडितांनी आपल्या धार्मिक तत्त्वज्ञानात बसतील अशा कल्पनांचा पुरस्कार केला आहे. प्लेटो आपल्या Timoeus या ग्रंथात विश्वाच्या उत्पत्तीच्या संदर्भात ब्रह्मांडासारखीच एक कल्पना मांडतो : 'निर्मात्याने एक सरळ दोरा घेऊन त्याचे दोन समान भाग केले. त्यातील प्रत्येकाच्या साहाय्याने त्याने एक

एक वर्तुळ तयार केले. ही वर्तुळे एकमेकांना दोन ठिकाणी मिळतात. यापैकी एका वर्तुळाचे त्याने सात विभाग केले. प्लेटोने या विवेचनात आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे विश्वाच्या पूर्व–पश्चिम व पश्चिम–पूर्व या दोन्ही मूलभूल गतींचा आणि ग्रहगोलांचा सूचक उल्लेख केला आहे.

'ब्रह्मसिद्धांत' या आपल्या ग्रंथाच्या पहिल्याच प्रकरणात ब्रह्मगुप्ताने आकाशांची संख्या सांगितली आहे. चंद्र हा पृथ्वीच्या अगदी जवळच्या आकाशात असून, इतर ग्रह हे इतर आकाशांत आहेत. शनी हा सातव्या आकाशात आहे. ज्या तारका आपल्या जागेवरून हलत नाहीत, त्या आठव्या आकाशात असतात. ही व्यवस्था शाश्वत स्वरूपाची आहे. सद्गुणी माणसांना पुण्य मिळावे व पापी माणसांना शासन व्हावे या दृष्टीने ही शाश्वत व्यवस्था केली आहे. याशिवाय विश्वात दुसरे काहीच नाही.

ब्रह्मगुप्ताने या प्रकरणात ही सर्व आकाशे सारख्याच आकाराची आहेत असे सांगून पुढे त्यांचा क्रमही सांगितला आहे. त्याने सांगितलेला हा क्रम पारंपरिक स्वरूपाचे विवेचन करणाऱ्या ग्रंथात आढळत नाही. या विषयाची माहिती मी अन्यत्र विस्ताराने सांगणारच आहे. ब्रह्मांडाच्या वर्तुळाकारासंबंधी व त्यांच्या परिभ्रमणासंबंधी आपल्याला असलेली माहितीही त्याने या संदर्भात नमूद केली आहे. याव्यतिरिक्त काहीही अस्तित्वात नाही, असे त्याने म्हटले आहे.

या सर्व गोष्टी गृहीत धरल्यास विश्वातील सर्व गोष्टींची गोळाबेरीज म्हणजेच ब्रह्मांड होय. हिंदूंच्या कल्पनेप्रमाणे येथेच पुनर्जन्म प्राप्त झाल्यावर आपल्या कर्मांची फळे भोगावी लागतात.

याबाबतीत पुलिसाचे मतही लक्षात घ्यावयास हवे. तो आपल्या सिद्धांतात म्हणतो: "पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश यांच्या एकत्रीकरणाने विश्व निर्माण झाले. आकाश हे अंधारातून निर्माण झाले. त्यास सूर्यकिरणांचा स्पर्श होत नसल्याने व चंद्रादी ग्रहांप्रमाणे ते प्रकाशित होत नसल्याने ते आपल्याला निळे दिसते. जेव्हा या ग्रहांवर पृथ्वीची छाया पडत नाही व जेव्हा त्यांच्यावर सूर्याचे किरण पडतात त्या वेळी— रात्रीच्या वेळी– या ग्रहांच्या भोवतालचा अंधार नष्ट होऊन त्यांच्या आकृती दृग्गोचर होऊ लागतात. केवळ एका सूर्यापासूनच या सर्वांना प्रकाश मिळतो. या ठिकाणी दृष्टीचा टप्पा ज्या सीमारेषेपर्यंत पोहोचू शकतो त्या प्रदेशासाठी आकाश ही संज्ञा उपयोजिली आहे. जेथे सूर्यकिरणांचा स्पर्श होऊ शकत नाही त्या प्रदेशाला तो आकाश म्हणतो. त्यामुळे आकाश अंधारात असते असे त्यास वाटते. आपल्या दृष्टीला मात्र आकाश निळे–करडे दिसते कारण त्या प्रदेशापर्यंत दृष्टीचा पल्ला पोहोचू शकत नाही आणि त्यामुळे त्याचे यथार्थ स्वरूप आपल्याला दृग्गोचर होत नाही."

ब्रह्मगुप्त याविषयी आपल्या ग्रंथात म्हणतो,

५७,७५३, ३००,००० या चंद्राच्या परिभ्रमणांच्या संख्येस ३२४,००० योजनांनी गुणल्यास १८,७१२,०६९,२००,०००,००० ही राशिचक्राच्या योजनांची संख्या येते. योजन हे अंतर मोजण्याचे परिमाण आहे, हे आम्ही यापूर्वीच सांगितले आहे. याविषयी ब्रह्मगुप्ताने स्पष्टीकरण केलेले नसल्याने आम्ही वरील माहिती जशी उपलब्ध झाली तशीच उद्धृत केली आहे. ती कितपत बरोबर आहे, हे मात्र सांगता येणार नाही. वशिष्ठ याविषयी म्हणतो, "ब्रह्मांडात या सर्व गोलांचा समावेश होतो. वर निर्देशिलेल्या संख्या म्हणजे ब्रह्मांडाचे मोजमाप करण्याची एक प्रकारची परिमाणेच होत." तथापि बलभद्र नामक भाष्यकार वशिष्ठाच्या ह्या मताला मान्यता देत नाही. तो म्हणतो, ब्रह्मगुप्ताने दिलेल्या या संख्या म्हणजे आकाशाचे मोजमाप करण्याची परिमाणे असावीत असे मला वाटत नाही कारण आकाशाची व्याप्ती किती आहे, हे सांगणे केवळ अशक्य आहे. तथापि मानवाच्या दृष्टीच्या कक्षेत जेवढ्या गोष्टी येतात त्यांच्याच संदर्भात या संख्यारूपी परिमाणांच्या साहाय्याने गणना करता येईल. त्यापलिकडे मात्र मानवाची दृष्टी जाऊ शकत नाही. त्यामुळेच काही ग्रह मानवी दृष्टीस मोठे वाटतात व काही लहान वाटतात. (त्याचे वास्तव स्वरूप यापेक्षाही वेगळे असण्याची शक्यता आहे.)

सूर्यकिरण जेथे पोहोचतात त्या स्थळांचे ज्ञान आपल्याला झाले तरी पुरेसे आहे. जेथे सूर्यकिरण जाऊ शकत नाहीत, ते स्थळ कितीही मोठे असले तरी त्याच्याविषयी माहिती मिळविण्याची आमची इच्छा नाही कारण जेथपर्यंत सूर्यकिरण जात नाहीत, ते स्थळ गोचर होऊ शकत नाही व जे गोचर होत नाही, त्याचे ज्ञान तरी कसे होणार?' अशी या संदर्भात आर्यभटाच्या शिष्यांची विचारसरणी आहे.

आता या मतमतांतराचे परीक्षण करू. ब्रह्मांड हा एक प्रचंड गोल असून त्यात आठ गोलांचा समावेश होतो. यातील प्रत्येक गोलाच्या कक्षेचा दुसऱ्या गोलास स्पर्श होतो. ब्रह्मांडात आठ गोलांबरोबरच एक नववा गोल असून तो पूर्वेकडून पश्चिमेकडे भ्रमण करतो आणि आपल्या कक्षेतील सर्व ग्रह–गोलांना तो आपल्या परिभ्रमणाने याच दिशेने गती देतो, असे वसिष्ठाचे म्हणणे आहे. नवव्या गोलाच्या अस्तित्वामुळे इतर गोलांना गती मिळत असली तरी तो स्वतः मात्र स्थिर असतो असे ते मानतात, असे इतर विद्वानांचे मत आहे. एखाद्या बाहेरच्या गतिमान गोष्टीमुळे दुसऱ्या वस्तूला गतिमानता प्राप्त होते, हे ॲरिस्टॉटलने सिद्ध केलेच आहे. त्यानुसार या नवव्या गोलासही एखाद्या बाहेरील गोष्टीमुळे गती मिळते काय असा प्रश्न आपल्यासमोर उपस्थित होतो.

वसिष्ठाच्या मतास ज्यांनी विरोध केला त्यांना ॲरिस्टॉटलचा, ज्यामुळे मूळ गती देणारी गोष्ट स्वतः गतिमान नसते, हा सिद्धांत माहीत असावा असे वाटते. तसेच

गोलांच्या पूर्व-पश्चिम भ्रमणाविषयीही त्यांना माहिती असावी असे दिसते. प्रथम गती देणारी गोष्ट म्हणजे एकादी वस्तू वा ग्रह नसतो हे ॲरिस्टॉटलने स्पष्ट केले आहे. तथापि याउलट तो एकादा ग्रहगोल असावा असे हिंदू पंडितांना वाटते.

या सर्व गोष्टींचा विचार करता नवव्या गोलाचे अस्तित्व ही एक अशक्य कोटीतील गोष्ट वाटते. टॉलेमीनेही आपल्या 'अल्मगेस्त' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत याच मताचा पुरस्कार केला आहे :

"विश्वाला प्रथम ज्यामुळे गती मिळाली ते गतीचे आदिकरण अदृश्य व निश्चल (स्थिर) असा परमेश्वरच होय, असे माझे मत आहे. तथापि या विषयाचा अंतर्भाव अध्यात्मात करावा लागेल. त्याच्या या कर्तृत्वाचे आकलन ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने होत नाही. तथापि विश्वाच्या अत्युच्च पातळीवरून मात्र या गतीचा मागोवा घेता येतो."

नवव्या गोळाचा उल्लेख न करता टॉलेमीने अशा प्रकारे गतीच्या आदिकारणाविषयी विवेचन केले आहे. तथापि प्रोक्लसच्या मताचे खंडन करताना जोहानस ग्रामाटिकसने 'प्लेटोने ग्रहविरहित नवव्या गोळाचा मुळीच निर्देश केलेला नाही.' या शब्दांत नवव्या गोळाचे अस्तित्व अमान्य केले आहे. टॉलेमीलाही हेच सांगावयाचे होते.

या गतीच्या अंतिम सीमेजवळ एखादी अमर्याद वस्तू व पोकळी असावी, असेही काही जणांचे मत आहे. विविध आकाशे एकमेकांशी संलग्न असून ती ग्रहगोलांच्या वर आहेत व ती सर्व (ग्रहांसारख्या) जड वस्तू पेलून धरतात, असे विधान बलभद्र नामक हिंदू पंडिताने केले आहे. डोळ्यांना दिसणाऱ्या गोष्टींऐवजी परंपरागत ज्ञान चटकन स्वीकारणे बलभद्राला अधिक सुलभ वाटत असले तरी आपल्या सारख्याला प्रत्यक्ष प्रमाणाऐवजी संशयास किंवा तर्कास मान्यता देताना जड वाटणे स्वाभाविक आहे.

या सर्व मतांत आर्यभट व त्याचे अनुयायी यांनी प्रतिपादिलेले मत अधिक पटते. ह्या पक्षाच्या विद्वानांनी अधिक शास्त्रशुद्ध विचार केला, हे त्यांच्या ब्रह्मांडविषयक विवेचनावरून आपल्या लक्षात आल्याशिवाय राहात नाही. या विवेचनातच शास्त्रीय सत्याचे दर्शन घडते.

11699२
8/12/04
SHIMLA

Library IIAS, Shimla
MR 954. 022 B 539 P
00116992